साकेत
प्रकाशन

आयुष्य समृद्ध करणाऱ्या

५१ प्रेरणादायी चरित्रकथा

जयप्रकाश झेंडे




आयुष्य समृद्ध करणाऱ्या

५१ प्रेरणादायी चरित्रकथा

जयप्रकाश झेंडे

साकेत प्रकाशन





जयप्रकाश झेंडे

साकेत प्रकाशन

51 प्रेरणादायी चरित्रकथा
कथा
जयप्रकाश झेंडे
प्रकाशन क्रमांक - 1698
पहिली आवृत्ती – 2015
प्रकाशक
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - 431 005,
फोन- (0240)2332692/95.
www.saketpublication.com
info@saketpublication.com
•
पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
ऑफिस नं. 02, 'ए' विंग, पहिला मजला,
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ,
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

व्यवहारातील अवघड तत्त्वे समजवण्यासाठी माझी आई सुमती झेंडे नेहमीच गोष्टींचा आधार घेत असे, तर तत्त्वज्ञानातील मुद्दे स्पष्ट करण्यासाठी माझे वडील धन्वंतरी भालचंद्र शंकर झेंडे हेदेखील रसाळ गोष्टींचाच आधार घेत असत. हाच वारसा मी पुढे चालू ठेवला आणि व्यवस्थापनातील मुद्दे गोष्टीरूपानेच स्पष्ट करू लागलो.

त्याचबरोबर अतिशय साधे आणि सरळ आयुष्य जगलेले माझे सासू, सासरे - मालती आणि राघवेंद्र कुलकर्णी या सर्वांना हे पुस्तक श्रद्धा आणि कृतज्ञतापूर्वक अर्पण.

परिचय

जयप्रकाश भालचंद्र झेंडे हे मेकॅनिकल इंजिनिअर आहेत. टाटा मोटार्स या जगप्रसिद्ध वाहन उद्योगात त्यांनी तीस वर्षे वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून काम केले. त्यात प्लॅनिंग, कास्टिंग आणि इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग या विभागांचा समावेश होता. या काळात भारतात नवीनच आलेल्या कायझेन, सजेशन स्किम, क्वालिटी सर्कल, फाइव्ह एस अशा आपल्या कामात निरंतर सुधारणा करणाऱ्या जपानी कार्यपद्धतीत काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

निवृत्तीनंतर आता ते औद्यागिक सल्लागार आणि प्रशिक्षक म्हणून काम करीत आहेत. आतापर्यंत भारतातील अनेक प्रसिद्ध संस्थांमधून सुमारे 1500 च्या वर कार्यशाळा घेऊन 25,000 अधिकारी आणि कामगारांना त्यांनी प्रशिक्षित केले आहे. त्यांना लेखनाचा छंद आहे. यातूनच त्यांनी अनेक दैनिके आणि नियतकालिकांतून सुमारे 250 लेख लिहिले आहेत. त्यांच्या लेखनाचे विषय सर्वसाधारणपणे स्वत:त आणि संस्थेत सुधारणा कशी घडवून आणता येईल याच्याशी निगडित असतात. त्याचबरोबर आतापर्यंत त्यांची दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांना आतापर्यंत 1) इन्सान या राष्ट्रीयपातळीवर काम करणाऱ्या संस्थेकडून ‘जीवन गौरव’, 2) इंदिरा इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटकडून ‘प्राइड ऑफ इंदिरा’ आणि 3) इंटरनॅशनल बुक हाउस, दिल्ली यांच्याकडून ‘बेस्ट सिटीझन ऑफ इंडिया’ हे सन्मान मिळाले आहेत.

मनोगत

प्रेरक गोष्टींमध्ये आयुष्य उन्नत करण्याची क्षमता असते. त्या आपल्याला हसवतात, रडवतात, प्रोत्साहित करतात व प्रेरणा देतात. आयुष्य समृद्ध करण्यासाठी महत्त्वाचे आणि उपयुक्त धडे शिकवितात. या पुस्तकात अशा काही गोष्टी, अशी काही माणसं आपल्याला भेटतील ज्या गोष्टी, जी माणसं आपल्याला बलवान बनवून आपल्यात समृद्ध जीवनाचा अंकुर रुजवतील अशी माझी श्रद्धा आहे.

आतापर्यंतच्या इतिहासात थोरांनी सामान्य माणसांना शिकविण्यासाठी, ज्ञानार्जनासाठी, उत्साहित करण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी आणि विचार करण्याची प्रेरणा देण्यासाठी अशा कथांचा उपयोग केलेला दिसतो. अशा गोष्टींचा वापर करून वाचणारा, ऐकणारा समृद्ध आयुष्याकडे जाणाऱ्या महामार्गावरील एक मदतशिला म्हणून तिचा वापर करून प्रगतीकडे झेप घेऊ शकतो.

या पुस्तकातील काही गोष्टी आपल्याला हसवतील, काही रडवतील. आशा करतो की, या सर्वांतून आपलं आयुष्य समृद्ध होण्यास मदत होईल. आपली स्वप्नं सत्यात उतरावयास मदत करतील. आपण या गोष्टींचा उपयोग जेव्हा आपल्याला काहीतरी करायचे असते तेव्हा नक्कीच करावयास हवा आणि त्याप्रमाणे कृतीही करावयास हवी. अर्थात समजून घेऊन कृती न करणे हा काळाचा आणि साधनांचा मोठाच अपव्यय होईल. आपलं आयुष्य तेव्हाच बदलेल जेव्हा आपण एकाग्रचित्तानं कृती करू. आपण योग्य कृती केली नाही, तर या प्रेरक कथा कुचकामी, निरर्थक, निरोपयोगी ठरतील. यांचा उपयोग कदाचित आपला आत्मविश्वास वाढविण्यासाठीही होऊ शकतो. मी आशा बाळगतो की, या गोष्टी आपल्या आयुष्यात बदल घडवण्यास सहायक ठरतील.

आपल्याकडे अशा काही प्रेरक कथा असतील, तर त्या माझ्याकडे जरूर पाठवा. या कथांचाही आस्वाद घ्या. मजा चाखा. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर जरी एकाच व्यक्तीचं नाव लेखक म्हणून प्रसिद्ध होत असलं तरी हे एक टीमवर्कच आहे; कारण खरंतर या कथांचं मूळ अनेकांच्या मनात आहे. आपण अनेक व्याख्यानं ऐकतो, वर्तमानपत्रं वाचतो, आता तर काय ई-मेल वरून माहिती आणि कथांचा मोठा स्रोतच वाहतो आहे. अशाच नाव उपलब्ध नसणाऱ्या कथा मी माझ्या शब्दात आणि विचारांच्या साच्यात बसवण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्वांच्या अप्रत्यक्ष सहभागाला दाद देणे अगत्याचे आहे आणि मी ते माझे कर्तव्य समजतो.

या पुस्तकातील काही कथा थोरामोठ्यांच्या जीवनानुभवांचे वर्णन करतात तर काही कथा जगण्याचा प्रेरणादायी मार्ग दर्शवितात.

पुस्तकाला हे सुंदर रूप देण्याची जबाबदारी साकेत प्रकाशनाच्या सौ. प्रतिमाजी भांड यांनी उचलली, त्यांना औपचारिक आभार मानणे आवडणार नाही म्हणून त्यांच्याबद्दल फक्त कृतज्ञताच व्यक्त करतो.

नेहमीप्रमाणेच माझी पत्नी जयश्री, मुले योगेश, परेश आणि सून प्रांजली ही मंडळी माझ्या लिखाणाचे पहिले शिकारी असतात, त्यांची सहनशक्ती खरंच कौतुकास्पद आहे.

माझा नातू ‘आयुष’ याच्या प्रेमळ सहवासातून थोडा वेळही चोरावा लागतोच.
माझे या आधीचे असेच पुस्तक ‘आयुष्य सुंदर करताना’ वाचकांच्या पसंतीला खूप उतरलं. परदेशातूनही प्रशंसा करणारे फोन आले. नवीन पुस्तकाची प्रेरणा त्यांचीच. नवीन पुस्तकालाही वाचक तसाच प्रतिसाद देतील अशी आशा करतो. धन्यवाद!

- जयप्रकाश भालचंद्र झेंड

प्रस्तावना

श्री. जयप्रकाश झेंडे यांच्या ‘आयुष्य समृद्ध करणाऱ्या 51 प्रेरणादायी चरित्रकथा’ या पुस्तकाच्या रूपात प्रकाशित होत आहेत, याचा मला मनस्वी आनंद होत आहे.

‘‘मराठी पुस्तकांना वाचक मिळत नाहीत. मराठीचे काही खरे नाही.’’ अशी ओरड चालू असताना असे सकस लेखन वाचकांच्या हाती पडणार असेल तर मला वाटते की, मराठी पुस्तकांबद्दल काही लोकांच्या मनात असलेली ही भावना नक्कीच कमी होऊ शकेल. एका विशिष्ट वयाआधी आणि विशिष्ट वयानंतर कथा-कादंबऱ्यांकडे वाचकांचे फारसे लक्ष जात नाही. कदाचित अभ्यासकांचे आणि टीकाकारांचे जात असेल. तरुण पिढीला सहजपणे घडविण्याची किमया लेखनात असणे हे चांगल्या लिखाणाचे फार महत्त्वाचे वैशिष्ट्यच आहे.

तरुणपणी आजीच्या गोष्टी ऐकण्याचे वय सरलेले असते आणि विद्वत्ताप्रचुर भाषेत लिहिलेले प्रबोधनात्मक वाङ्मय वाचण्याचीही प्रवृत्ती झालेली नसते अशावेळी सहजरीत्या नवी वाटचाल करण्याची दिशा दाखविणारे, अंगी नवे विचार बिंबविणारे, साध्या सरळ भाषेत लिहिलेले असे काही वाचावयास मिळाले, तर ते तरुणांना आणि पालकांनाही रुचणारे ठरते.

श्रीयुत जयप्रकाश यांचे प्रस्तुत लिखाण अशाच स्वरूपाचे, न कंटाळता वाचले जाणारे नि वाचता वाचता त्यातून काही शिकायला मिळणारे असे आहे.

ज्या वयात व्यक्तीच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार असते अशा वयात ‘आयुष्य समृद्ध करणाऱ्या 51 प्रेरणादायी चरित्रकथा’ यासारखी पुस्तके उपलब्ध होणे आवश्यक असते. इसापनीती, पंचतंत्र अशी पुस्तके वाचण्याचे वय संपले की, गरज असते ती प्रत्यक्ष अनुभूतीच्या अभिव्यक्तीवर आधारलेल्या पुस्तकांची, समाजातील सर्जन, सात्त्विकशक्तींची ओळख होण्याची. वाचनातून विचारप्रवृत्त केले जाईल, सुष्ट-दुष्ट शक्तींची जाणीव होईल, अविवेकाची काजळी झटकून विवेकाची दिवाळी साजरी करण्याची मनाची तयारी करता येईल. अशा साहित्य वाचनातून सुसंस्कृत पिढी घडविण्याचे कार्य आपोआप होईल.

प्रत्यक्षात घडलेल्या छोटया-छोटया घटना मायकेल एंजलो, थॉमस एडिसन, विन्स्टन चर्चिल, अल्फ्रेड नोबेल यांसारख्या महान व्यक्तींच्या जीवनातील बोधपर प्रसंग व प्रेरणादायी गोष्टी सोप्या भाषेत सांगून उत्सुकता वाढविणाऱ्या व मनोवेधी आहेत. त्या प्रेरणादायी गोष्टी म्हणजे उभरत्या मनाला मिळणारा पौष्टिक आहारच! ‘संयमी व्हा’ ही गोष्ट वाचली की, कार्यतत्पर, स्वतःचे दुःख विसरून रोग्याला जीवदान देणाऱ्या डॉक्टरांबद्दल आदर निर्माण होतोच, त्याहीपेक्षा उतावीळपणाने, सारासारविचार न करता बोलणे किती घातक ठरते हेही कळते. यातील काही गोष्टी उपदेशपर आहेत, तर काही प्रेरणादायी आहेत; तसेच काही आपल्या देशात तर काही पाश्चात्त्य देशात घडलेल्याही आहेत.

श्री. जयप्रकाश यांनी या कथांद्वारे प्रबोधनकारी मूल्ये घेऊन ती आपल्यापर्यंत

संस्कारित केलेली आहेत. या कथासंग्रहात आपल्याकडील आणि पाश्चात्त्य देशातील कथा असा दुजाभाव त्यांनी केलेला नाही. जे उत्तम, उदात्त आहे ते त्यांनी उचललेले आहे आणि त्यांची वाचनीय आणि मननीय अशा कथांची एक माळ वाचकांच्या समोर ठेवली आहे. येथे एक गोष्ट आवर्जून लक्षात आणून दिली पाहिजे- या कथा केवळ वाचून हातावेगळ्या कराव्यात हा लेखकाचा उद्देश नाही; तर त्या स्पृहणीय म्हणजे अनुकरणीय ठराव्यात हे त्यांना अभिप्रेत आहे.
यातील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या निर्मितीची कथा वाचून मला स्वामी विवेकानंदांच्या आयुष्यातील एक घटना आठवली. अमेरिकेतील वास्तव्यात असताना रस्त्यातून जाताना एका बाईने विवेकानंदांच्या फेटयाकडे, भगव्या वस्त्राकडे नवऱ्याचे लक्ष वेधले असता तिचा नवरा त्यांना गावंढळ ठरवितो. स्वामीजींच्या कानावर हे शब्द पडताक्षणीच ते मागे वळून या 'सभ्य' गृहस्थाला उद्देशून म्हणाले, ''मी ज्या देशातून आलो आहे तेथे कपडयांवरून सुसंस्कृतता ठरवीत नाहीत, तर विचार आणि वागणुकीवरून ठरवितात.''
या पुस्तकातील एक कथा निरपेक्ष प्रेमाची महती सांगते. त्यावरून एक कथा आठवली. नवेगावात चिमणीचं एक नवजात पिल्लू तोल जाऊन घरटयातून काटेरी झुडपात पडते, ते पाहून एका कावळ्याने अनेक हेलपाटे करून स्वत:च्या चोचीतून पाणी आणून त्याला पाजवले व त्याच्यापरीने त्याला वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हे दृश्य पाहून प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनी निरपेक्षपणे दीनदुबळ्या, असाहाय्य अशा जीवांना बळ देण्याचे व्रत घेतले.
जगप्रसिद्ध नेमबाज कारोली यांचा उजवा हात अपघातामुळे निकामी झाल्यावर रडत न बसता खूप सराव करून डाव्या हाताने नेमबाजी करून त्यांनी ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले होते. यश मनाच्या उभारीवर, जिद्दीवर आणि आत्मविश्वासावर अवलंबून असते अशी आदर्श शिकवण त्यांनी सर्वांना दिली. अशा घटनांपासून प्रेरणा घेतली पाहिजे हे लेखकाचे म्हणणे रास्तच आहे. घायाळ पक्षिणी, जखमी प्राणी स्वबळावरच स्वत:ला संकटातून मुक्त करून घेतात हे आपण पाहतच असतो. त्यांच्याकडून बोध घ्यायची इच्छा आपण बाळगली पाहिजे की नाही?
पुण्यातील प्रसिद्ध न्युरो सर्जन डॉ. नीलेश आपटे किंवा स्वत:ला कर्करोग झाला असतानाही अमेरिकेतून प्रतिवर्षी भारतात येऊन विनामूल्य शस्त्रक्रिया करणारे डॉ. दळवी आपणास माहीत आहेत. अशा व्यक्तींकडून इतर डॉक्टरांनी; तसेच आपण सर्वांनीच त्यांची ही निरपेक्षवृत्ती आपल्यातही जोपासायला नको का?
या कथासंग्रहातील प्रत्येकच कथा आपणास काहीतरी महत्त्वाचे सांगून जाते. आदर्श जीवन जगण्यासाठी, शुद्ध आचरणासाठी, निर्मळ मनासाठी आणि 'सर्वेत्र सुखिन: सन्तु। सर्वे सन्तु निरामया:' हा उदात्त हेतू सर्वांनीच ठेवावा यासाठी या कथांचे नित्य स्मरण असायला हवे, म्हणजेच हे पुस्तक संग्रही असायला हवे. असे झाले तर थोर संतांचा उपदेश, समर्थांचे ''जनी निंद्य ते सर्व सोडोनी द्यावे। जनी वंद्य ते सर्व भावे करावे।'' हे म्हणणे सार्थ ठरेल. 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' अशा प्रकारचे आचरण ठेवता येईल; पण त्यासाठी काम, क्रोध, मद, मत्सर, मोह, लोभ या षड्रिपूंवर मात करावी लागेल. 'मी'पण संपवून टाकावे लागेल. मगच ज्यांच्या घरी बाग असेल त्यांच्यात दोन फुले इतरांना देण्याची वृत्ती वाढेल आणि मग साहजिकच स्वत:चे आणि इतरांचे आयुष्य समृद्ध करता येईल.

- डॉ. गो. बं. देगलूरकर, कुलपती,
डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे.

अभिप्राय

चौफेर, विपुल वाचन, निवडक विचार वेचून, त्यावर चिंतन करून स्वत:चे जीवन समृद्ध करून घेतल्यानंतर 'आपणा सारीखे करिती तात्काळ' या संतवचनाप्रमाणे इतरांचेही जीवन समृद्ध व्हावे या इच्छेने, उत्कट तळमळीने, ध्यास घेऊन या मार्गदर्शक कथा श्री. जयप्रकाश झेंडे यांनी लिहिल्या आहेत.

बाजारात विविध पुस्तकांची मांदियाळी असताना "आयुष्य समृद्ध करणाऱ्या 51 प्रेरणादायी चरित्रकथा" हे श्री. झेंडे यांचे पुस्तक त्यांच्या विषयाच्या वेगळेपणाने वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे. अशा प्रकारच्या दुर्मीळ, मौलिक मार्गदर्शनाचा लाभ युवक आणि प्रौढांनी घेतला, तर आपले जीवन समृद्ध करण्यात ते नक्कीच यशस्वी होतील असा विश्वास वाटतो.

स्वत:च स्वत:चे परीक्षण करून माझ्यातही काही जमेच्या बाजू आहेत, असा विश्वास बाळगून, मी माझ्यातले कोणते दोष दूर करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत याबद्दल लेखकाने गोष्टी, प्रसंग, घटना यातून सखोल आणि मनोरंजक पद्धतीने मार्गदर्शन केले आहे. प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या जीवनाची शिल्पकार असते. आपले जीवन समृद्ध करण्यास व्यक्ती स्वत:च समर्थ आहे, अशा प्रकारचा मार्गदर्शक विचार मिळाला, तर व्यक्ती आपला न्यूनगंड नक्कीच घालवू शकेल. आपला आत्मसन्मान आपणच राखू शकतो, असा दिलासा लेखकाने या पुस्तकातून दिला आहे. त्यांचा हा प्रयत्न अभिनंदनीय, कौतुकास्पद आणि स्तुत्य आहे. त्यांच्या पुढील लेखनास हार्दिक शुभेच्छा!

- सौ. प्रतिभा भोपर्डीकर,
मुख्याध्यापिका (निवृत्त)
पी. ई. एस. मॉडर्न गर्ल्स
हायस्कूल, शिवाजीनगर, पुणे.

'आयुष्य समृद्ध करणाऱ्या 51 प्रेरणादायी चरित्रकथा' हे आपलं पुस्तक वाचायला मिळालं. आयुष्य समृद्ध करण्यासाठी लिहिलेलं हे पुस्तक खरोखरच खूपच सुंदर आहे. त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन आणि धन्यवाद. आजच्या या धावपळीच्या युगामध्ये सुखाच्या शोधात असलेल्या मानवाला शाश्वत सुख, शांती देण्याचे काम आपण आपल्या लिखाणाद्वारे करीत आहात ही खूप उल्लेखनीय गोष्ट आहे. आपले करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

खरे तर, मानवाचे आयुष्य किती दीर्घ आहे त्यापेक्षा ते तो कसे घालवितो हेच महत्त्वाचे आहे. चित्ताचं समाधान ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. जेथे चित्त समाधानी तेथे सुख, आनंद, उत्साह अशा गोष्टी निश्चितच असणार आणि हे मिळवून देण्याचा प्रयत्न आपण करीत आहात, आपण धन्य आहात.

एकंदरीत हे पुस्तक वाचकांना नक्कीच आयुष्य समृद्ध करण्यासाठी मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. पुनश्च अभिनंदन.

- ह. भ. प. अरुण

शाळू महाराज, भूम

श्री. जयप्रकाश झेंडे यांचे वाचन विपुल आहे. वाचन करता करता त्यातील विचार कृतीत आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. हे करीत असताना अशा विचारांसंबंधी त्यांचे चिंतन चालूच असते. त्यातूनच असे चांगले विचार फक्त आपल्यापाशीच न ठेवता त्यांनी छोटया छोटया गोष्टींच्या माध्यमातून, पुस्तक रूपाने ते सर्वांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. आपल्याबरोबरच इतरांचे आयुष्यदेखील सुखी व्हावे, हीच त्यांची तळमळ आहे.
या 'आयुष्य समृद्ध करणाऱ्या 51 प्रेरणादायी चरित्रकथा' मधून त्यांनी व्यक्त केलेले विचार समाजात जबाबदार नागरिक निर्माण करण्यास निश्चित मोलाचे ठरतील. त्यांना हार्दिक शुभेच्छा!

- प्रा. सदानंद केशव रुईकर
निवृत्त विभागप्रमुख
महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, पुणे.

मानवी आयुष्य हे सुखदु:खांचे मिश्रण आहे. ते पूर्णत: सुखी किंवा पूर्णत: दु:खी असूच शकत नाही. मानवाचे आयुष्य समृद्ध होते ते या मिश्रणामुळेच. श्री. जयप्रकाशजी यांचे चिंतन नेमके याच दिशेने असते. त्यांनी आपल्या या कथांच्या माध्यमातून आपण आपले आयुष्य समृद्ध कसे करू शकू हे साध्या, सोप्या आणि रंजक भाषेत आपल्याला समजावले आहे. या पुस्तकाच्या वाचनाने कोणत्याही विषम परिस्थितीत असताना आनंदाने आणि समृद्ध जीवन जगण्याची कला वाचकाला अवगत होण्यास मदत होईल असे वाटते. त्यांच्या भावी लेखनाला मनापासून शुभेच्छा.

- डॉ. दत्ता कोहिनकर
प्रमुख विश्वस्त, विश्वशक्ती
इंटरनॅशनल फाउंडेशन, पुणे.

महाराष्ट्रातील उद्योजक, जगप्रसिद्ध उद्योजकांच्या कार्यपद्धती, व्यक्तिमत्त्वविकास अशा प्रेरक पुस्तकांबरोबर 'आयुष्य सुंदर करताना' आणि आता 'आयुष्य समृद्ध करणाऱ्या 51 प्रेरणादायी चरित्रकथा' हे आयुष्य समृद्ध करणारे श्री. जयप्रकाश झेंडे यांचे साहित्य नुकतेच वाचण्यात आले. जयप्रकाश झेंडे यांचे लेखन प्रगल्भ आहे. पुन्हा पुन्हा वाचावे वाटेल असे शब्दांकन आणि आयुष्य समृद्ध करणारे प्रबळ विचार हे या पुस्तकाचे खास वैशिष्टय म्हणावे लागेल. जीवन समृद्ध करण्याची इच्छा असणाऱ्या सर्व व्यक्तींना हे पुस्तक नवनीतसारखे मार्गदर्शक ठरेल. आपल्या प्रेरक लिखाणातून संस्कृती जतन करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल श्री. जयप्रकाश झेंडे यांना धन्यवाद.

- बाजीराव गाजी
व्यवस्थापक, मानव संसाधन विभाग
कोहिनफाय प्रा. लि. चाकण, पुणे.

व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनिअर असलेली व्यक्ती इतके सुबोध सुंदर लेखन करू शकते यावर हे पुस्तक वाचण्यापूर्वी माझा विश्वास बसत नव्हता. खरोखरच आयुष्य समृद्ध करणारे हे लेखन आहे. वाचता, वाचता मी त्यात इतकी रंगून गेले की, या पुस्तकातील सगळ्या कथा संपल्यावरच मी पुस्तक खाली ठेवले. प्रसंगोपात्त गोष्टींचा एक खजिनाच झेंडे यांच्याकडे आहे आणि गोष्ट सांगण्याची कलासुद्धा. वेळेच्या नियोजनासाठी 'वेळ हीच मौल्यवान मालमत्ता' ही गोष्ट इतकी अफलातून आहे की, त्यांनी या गोष्टीवरून

केलेला बोध सर्वांसाठीच जीवनोपयोगी आहे.

- डॉ. अश्विनी धोंगडे
लेखिका, प्राचार्या (निवृत्त),
एस. एन. डी. टी. महाविद्यालय पुणे.

आईच्या सकारात्मक

अपेक्षेचे फलित

डॉ. बेंजामिन

कार्सन

प्रत्येक माणूस, मग तो कोणत्याही देशाचा, वंशाचा किंवा कोणत्याही परिस्थितीतील असो सर्वांना एकच मेंदू असतो. आपल्याला हवे ते साध्य करण्याची क्षमता प्रत्येकात असते. इतरांकडून आपल्याला प्रेरणा, प्रोत्साहन मिळते; परंतु प्रत्येकाला स्वत:चे ध्येय स्वत:च निश्चित करावे लागते. डॉक्टर बेंजामिन कार्सन यांच्या जीवनातून अडचणींवर मात करून यशाचं शिखर गाठण्याची सामर्थ्यशाली शिकवण आपल्याला मिळते. त्यांच्याप्रमाणेच आपणही आपल्या आयुष्यात काही आमूलाग्र बदल घडवून आणू शकूत का? प्रयत्न तर करून बघू या...

एक प्रचंड मोठा सत्कार सोहळा आयोजित केला होता. प्रेक्षागृह प्रेक्षकांनी खच्चून भरले होते. कार्यक्रम खूप उत्साहाने पुढे-पुढे सरकत होता. सत्कारमूर्तींचे मनोगत ऐकण्याची उत्कंठा सगळ्यांच्याच चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. इतर सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यावर सत्कारमूर्ती भाषणासाठी उभे राहिले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. हा आवाज कमी झाल्यावर त्यांनी स्वत:चे दोन्ही हात, प्रेक्षकांना आपल्या हाताचे तळवे स्पष्ट दिसतील अशा पद्धतीने उभे करून दाखविले आणि आपल्या धीरगंभीर आवाजात प्रेक्षकांना प्रश्न केला की,'आपण हे हात ओळखता का? प्रेक्षकांतून उत्साहाचा मोठा आवाज उठला,"होय, हे हात एक कुशल आणि निष्णात सर्जन डॉ. बेंजामिन कार्सन **(Dr. Benjamin Carson)** यांचे आहेत." त्यावर वक्त्याच्या चेहऱ्यावर मिश्कील भाव उमटले. पुढे ते म्हणाले, "या हातांनी माझ्या गावातील अनेक घरांच्या काचा फोडल्या आहेत. अनेक परीक्षांचे पेपर लिहिले आहेत की, ज्यामुळे त्यांना सदैव फक्त अपयशाचे धनी व्हावे लागले आहे. हे कमीच पडेल की काय; पण याच हातांनी मी माझ्या मित्रालादेखील भोसकले आहे आणि त्यासाठी पोलिसांकडून धमक्याही मिळवल्या आहेत; परंतु मी नशीबवान आहे की, मला एक खूप चांगली आई लाभली. माझ्या आयुष्यात तिने फार मोठे स्थित्यंतर घडवून आणले आणि म्हणूनच मी आज एक उत्तम सर्जन म्हणून आपल्या समोर उभा आहे. डॉक्टरांचा हा अलौकिक प्रवास ऐकून सगळी सभा अवाक झाली.

आईने घडविले

डॉ. बेंजामिनचा जन्म अमेरिकेतील डेट्रॉइट येथे 18 सप्टेंबर, 1951 रोजी झाला. तो आठ वर्षांचा असतानाच त्याचे आई-वडील एकमेकांपासून विभक्त झाले. त्यामुळे त्याची आई सोन्या यांच्यावर बेंजामिन आणि त्याचा लहान भाऊ कर्टिस यांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी आली. सोन्या यांना त्यासाठी मोलमजुरीची कामे करणे भाग पडले. शाळेत बेंजामिन हा सर्वांत मठ्ठ मुलगा म्हणून ओळखला जात असे. वर्गातील मुले त्याला चिडवीत असत. त्यामुळे बेंजामिनचा स्वभाव भयंकर रागीट झाला होता. शाळेतून बेंजामिनबद्दल अनेक तक्रारी येत असत. त्या ऐकून त्याच्या आईने त्याच्यावर अनेक बंधने घालून त्याला चांगले वळण लावण्याचा विडाच उचलला होता. त्याचे टी.व्ही. पाहणे बंद केले आणि त्याला हाताला पकडून वाचनालयात नेले. आठवड्याला दोन पुस्तके वाचून त्याचा लेखी अहवाल त्याने आईला दिलाच पाहिजे असा आईचा दंडक असे. या सर्वांचा खूपच सकारात्मक परिणाम बेंजामिनच्या स्वभावात झाला. त्याला वाचनाची आवड निर्माण झाली. तो आदळआपट न करता शाळेत जाऊ लागला. एकदा तर शिक्षकांनी दाखवलेल्या एका दुर्मीळ खडकाची ओळख वर्गातील मुलांना करून देऊन सर्वांना आश्चर्याचा धक्काच दिला. त्याचवेळी आपण मठ्ठ नाही हे बेंजामिनच्या लक्षात आले. आपल्या ज्ञानाच्या प्रभावामुळे पुढे सतत वर्गात छोटा बेंजामिन कौतुकाचा विषय होत गेला आणि परीक्षेतही सर्वप्रथम येऊ लागला. ज्ञानाच्या भुकेने त्याला पछाडले होते. त्याने यशस्वी व्यक्तींची चरित्रे वाचली. त्यामुळे आपणही काहीतरी वेगळे करून दाखवावे ही तृष्णा त्याच्या मनात जागृत झाली. अनेक पुस्तके वाचून ज्ञान संपादनाचा त्याचा उद्योग अविरत चालूच राहिला. आपण डॉक्टर व्हावे असे त्याला वाटू लागले. आपले भवितव्य उज्ज्वल घडण्यात महत्त्वाचा उडथळा असणाऱ्या त्याच्या रागीट स्वभावावर बेंजामिनने नियंत्रण मिळविले. अथक परिश्रमांनी त्यांनी 'येल' विद्यापीठातून मानसशास्त्राची पदवी मिळविली आणि ते डॉक्टर झाले. त्यांनी मिळविलेल्या यशात त्यांच्या आईचा मोठा वाटा आणि धडपड होती. बेंजामिन डॉक्टर होईपर्यंत त्यांना आपल्या आईला लिहिता-वाचता येत नाही हे माहीतच नव्हते.

यशस्वी सर्जन

पुढे त्यांनी मिशिगन विद्यापीठात प्रवेश घेतला, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, आपले हात आणि डोळे यांच्यात अतिशय उत्तम समन्वय आहे आणि थ्रिडायमेंशनल (त्रिमित) गोष्टी हाताळण्याचे उत्तम कौशल्य आपल्याकडे आहे. त्यानंतर त्यांनी सर्जन व्हायचे ठरविले. आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यावर बाल्टिमोर येथील 'जॉन हाफ्कीन हॉस्पिटल' मध्ये त्यांनी काम सुरू केले. तेथेच वयाच्या अगदी 33 व्या वर्षीच सर्वांत तरुण संचालक म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला.

1987 साली डॉ.बेंजामिन कार्सन यांनी एक इतिहास घडविला. 50 सभासद असलेल्या वैद्यकीय तुकडीचे नेतृत्व करून तब्बल 22 तास एक ऑपरेशन केले. त्यात एक मेंदू असणाऱ्या जुळ्या मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांनी दोघांनाही जीवनदान मिळवून दिले. हा वैद्यकीय क्षेत्रातील एक चमत्कार होता; कारण आतापर्यंत झालेल्या अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेत दोघांचेही प्राण त्यापूर्वी कधीच वाचले नव्हते. अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेत बहुधा दोघांचाही किंवा एकाचा तरी मृत्यू होत असे.

त्यानंतर डॉक्टरांनी वैद्यकीयशास्त्राला आव्हान देणाऱ्या अनेक शस्त्रक्रिया

यशस्वीपणे पार पाडल्या.
येल विद्यापीठातील त्यांची एक मैत्रीण ‘लॅकेना रुस्तीन’ (कॅंडी) यांच्याबरोबर बेंजामिन यांचा विवाह झाला. त्या उत्तम संगीतकार म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यामुळे डॉक्टरांनाही संगीताची आवड निर्माण झाली. डॉक्टरांना त्यांच्या देदीप्यमान कामगिरीमुळे अनेक मानसन्मान मिळाले. जवळजवळ 61 विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट पदवी देऊन सन्मानित केले आहे. त्यांना 2008 साली ‘प्रेसिडेंटल मेडल ऑफ फ्रीडम’ या अमेरिकेतील सर्वोच्च नागरी पुरस्काराने जॉर्ज बुश यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. ‘गिफ्टेड हॅंडस् ’ या त्यांच्या आत्मचरित्राबरोबरच त्यांचे वैज्ञानिक तत्त्वज्ञान, कठोर परिश्रम आणि परमेश्वरावरील श्रद्धा यांच्या जोरावर यश मिळते असे सांगणारी ‘बिग पिक्चर’, ‘टेक द रिस्क आणि ‘थिंक बिग’ ही पुस्तकेही खूप लोकप्रिय झाली आणि त्यांनी विक्रीचा उच्चांक गाठला. त्यांची जीवनगाथा सांगणारे काही चित्रपटही प्रदर्शित झाले होते.
जून 2002 मध्ये डॉक्टरांना कर्करोगाने ग्रासले. त्यामुळे त्यांना आपला दिवसाचा व्यग्र कार्यक्रम बदलावा लागला; तसेच आपल्या सार्वजनिक कार्यक्रमांवरही मर्यादा घालाव्या लागल्या. तरीही ते दरवर्षी 300पेक्षा जास्त मुलांवर शस्त्रक्रिया करतात. पूर्वी ते सकाळी 7 वाजेपासून संध्याकाळी 8वाजेपर्यंत हॉस्पिटलमध्ये काम करीत असत; परंतु आता ते सायं 6.15वाजता घरी परतण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांना आपली पत्नी आणि मुले यांच्यासाठी वेळ देता येतो. या भयंकर व्याधीमुळे त्यांनी आपल्या दैनंदिन कामात इतकाच बदल केला आहे.

उत्कृष्ट वक्ता

आपल्या वैद्यकीय कारकिर्दीबरोबरच उत्कृष्ट वक्ता म्हणूनही त्यांनी सर्वदूर लौकिक मिळविला आहे. आपला बराचसा वेळ ते तरुणांच्या घोळक्यात त्यांच्याशी मनमुराद चर्चा करत घालवितात. आपल्या भाषणातून आणि पुस्तकांतून त्यांनी सर्वसाधारणपणे पुढील मते व्यक्त केली आहेत :
• निसर्गाने प्रत्येकास बौद्धिक सामर्थ्य बहाल केले आहे. या सामर्थ्याचा आणि आपल्यातील सुप्त क्षमतांचा प्रत्येकाने विकास करायला हवा.
• जर आपण स्वच्छ आणि प्रामाणिक आयुष्य जगलो, तर आपण आपले चांगले विचार प्रकट करू शकतो व ते इतरांनाही उपयुक्त ठरू शकतात.
• इतरांशी नि:स्वार्थीवृतीने व चांगुलपणाने वागायला हवे.
• व्यक्तीने आपले ज्ञान अधिक समृद्ध करण्यासाठी सतत प्रयत्नरत असायला हवे.
• ज्ञानसंपादनासाठी शिक्षण घ्या. केवळ परीक्षांमध्ये गुण मिळविण्यासाठी धडपडू नका.
• सदैव दूरदृष्टी व व्यापक विचारसरणी बाळगा.
• थोर व आदर्श व्यक्तींच्या जीवनचरित्रांतील सद्गुणांचे आचरण करा.
• परमेश्वरापुढे सदैव नम्र राहा.
डॉक्टर बेंजामिन कार्सन यांचे जीवन आपल्याला खूप काही शिकवून जाते. त्यांची आई ‘सोन्या’ ही अशिक्षित होती. आयुष्यात कोणतेही मोठ यश वा पद तिच्याकडे नव्हते, तरी तिने आपल्या मुलाकडून सकारात्मक अपेक्षा बाळगली. आपल्या मुलाला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. शालेय अभ्यासात आधी अतिसाधारण असणारा त्यांचा मुलगा

अमेरिकेतील सर्वोच्च नागरी बहुमानप्राप्त नागरिक बनला, यामध्ये त्यांच्या आईचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या मुलांना मोठे करण्यासाठी आपण स्वत: खूप उच्चशिक्षित असायला पाहिजे असे नाही, तर आपल्या सकारात्मक अपेक्षा आणि स्वप्नं त्यांना यशासाठी लागणारी ऊर्जा मिळवून देऊ शकतात.

नोबेल पुरस्काराचे

जनक

अल्फ्रेड नोबेल

अल्फ्रेड नोबेल यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय गूढ असे होते. ते अतिशय साधे, विरक्त व तपोनिष्ठ आयुष्य जगले. त्यांनी मिळविलेल्या अमाप संपत्तीतूनच जगातील लोकप्रिय आणि प्रतिष्ठित 'नोबेल' पुरस्काराचा जन्म झाला. त्यांनी आपली सर्व संपत्ती मानवीकल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करून जगात असे काम करण्याची प्रेरणा सतत निर्माण होत राहावी यासाठी वापरली. सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या जागतिक दर्जाच्या संशोधकांचा, साहित्यिकांचा आणि शांततेसाठी काम करणाऱ्यांचा गौरव करण्यासाठी आपल्या संपत्तीचा उपयोग व्हावा, अशी शेवटची इच्छा बाळगणारे अल्फ्रेड नोबेल जगभरात अजरामर झाले.

सुमारे शंभर वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. एका माणसाने सकाळी वृत्तपत्र पाहिले. आपल्या स्वत:च्याच मृत्यूची बातमी पाहून प्रथम त्याला धक्काच बसला. नावातील साधर्म्यामुळे गफलत होऊन चुकून ही बातमी 1888 च्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती. त्यांची पहिली प्रतिक्रिया म्हणजे धक्काच होती. आपण खरंच मरण तर पावलो नाही ना? असंही त्यांना क्षणभर वाटलं असणार. या पहिल्या धक्क्यातून सावरल्यावर ते पुढे वाचू लागले. त्या बातमीत पुढे म्हटलं होतं, "विध्वंसक स्फोटकांचा जनक आणि मृत्यूचा व्यापारी मरण पावला". बातमीत पुढे असेही लिहिले होते की, "इमारती, रस्ते, पूल उद्ध्वस्त करणाऱ्या डायनामाइट या विध्वंसक स्फोटकांचा जनक, संशोधक जगभरातील अशांततेचा फायदा घेऊन आपल्या उत्पादनाच्या विक्रीने गब्बर बनलेला पैशाचा धनी कालवश झाला." त्यांनी आपल्याला लावलेली ही विशेषणे वाचली. त्यावर त्यांनी स्वत:लाच प्रश्न केला की, हीच का माझी ओळख आहे? या प्रश्नामुळे त्यांच्या हृदयाची तार छेडली गेली. आपल्या मागेही आपली कीर्ती जगभरात अजरामर राहावी यासाठी आपण काय करायला पाहिजे, याचा विचार त्यांनी सुरू केला. या विचारातून त्यांनी शांततेसाठी काम करायचे निश्चित केले आणि तशी सुरुवातही केली. त्या व्यक्तीचे नाव होते 'अल्फ्रेड नोबेल' (Alfred Nobel). आज सगळे जग त्यांना शांततेसाठी जगप्रसिद्ध असणाऱ्या नोबेल पारितोषिकाचे अत्यंत उदार जनक म्हणून ओळखते.

हुशार आणि चौकस बुद्धी

अल्फ्रेड नोबेल यांचा जन्म 21 ऑक्टोबर, 1833 रोजी स्वीडनमधील स्टॉकहोम येथे झाला. ते रसायनशास्त्रज्ञ, इंजिनिअर आणि उत्पादक होते. त्यांनी डायनामाइट आणि इतर शक्तिशाली स्फोटकांचे शोध लावले आणि नोबेल फाउंडेशनची स्थापना केली.

जगात अतिशय प्रतिष्ठेचा मानल्या जाणाऱ्या, शांततेसाठी आणि मानवतेच्या कल्याणासाठी केलेल्या संशोधनाला दिल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय नोबेल पुरस्काराची सुरुवात केली. त्यांची आई कॅरोलीना आणि वडील इमॅन्युएल हेदेखील संशोधक आणि अभियंता होते.

लहानपणी अल्फ्रेड सतत आजारी असे; परंतु आईचे अल्फ्रेडवर अतिशय प्रेम होते. तो लहानपणापासूनच अतिशय हुशार, चिकित्सक होता. त्याला स्फोटकांबद्दल खूपच आकर्षण होते आणि अभियांत्रिकीचे ज्ञान त्याने आपल्या वडिलांकडूनच मिळविले होते. सुरुवातीला अनेक व्यवसायांमधून झालेल्या प्रचंड नुकसानीमुळे इमॅन्युएल यांनी 1837 साली रशियातील पीट्सबर्ग येथे स्थलांतर केले. तेथे मात्र खाणीतील स्फोट आणि त्यासंबंधीच्या हत्यारांच्या उत्पादनात त्यांनी प्रचंड यश मिळविले. त्यांनी अल्फ्रेडला उत्तम शिक्षण दिले. अल्फ्रेडलाही अभ्यासात आणि शास्त्रीय प्रयोगात विशेष रस होता. वयाच्या 16 व्या वर्षीच तो एक कार्यक्षम केमिस्ट बनला. त्याचबरोबर इंग्रजी, फ्रेंच, जर्मन आणि रशियन या भाषांवरही त्यांनी प्रभुत्व मिळविले. स्वीडिश तर त्यांची मातृभाषाच होती.

अपयशानंतरही संशोधन सुरूच

1850 साली त्यांनी रशिया सोडले. एक वर्ष पॅरिसमध्ये राहून त्यांनी रसायनशास्त्राचा अभ्यास केला. नंतर अमेरिकेत जाऊन त्यांनी जॉन एरिक्सन या सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या मार्गदर्शनाखाली काम केले. त्यानंतर परत त्यांनी आपल्या आई-वडिलांबरोबर सैनिकी अवजारे बनविण्याच्या कारखान्यात काम करायला सुरुवात केली. युद्धानंतर पुन्हा एकदा हा व्यवसाय दिवाळखोरीमुळे बंद करावा लागला आणि हे कुटुंब मायदेशी परतले. मायदेशी आल्यावर अल्फ्रेड यांनी आपले स्फोटकांचे संशोधन सुरूच ठेवले. 1863 साली त्यांनी ‘डिटोनेटरचा’ शोध लावला, तर 1865 साली ‘ब्लास्टिंग कॅप’ विकसित केली. एका स्फोटात त्यांना आपला भाऊ गमवावा लागला. तरीही धैर्याने त्यांनी आपले संशोधन पुढे चालूच ठेवले. ते आपल्या उत्पादन विभागाचा विस्तारही करीत राहिले.

अखेर डायनामाइट गवसलेच

1867 साली त्यांना अपघातानेच ‘नायट्रोग्लिसरिन’ आणि ‘किसेलगर’ यांच्या संयोगाने एका महत्त्वाच्या नवीन रसायनाचा शोध लागला. या पदार्थाचे नामकरण त्यांनी ‘डायनामाइट’ (फ्रेंच भाषेत पावडरला डायनामाइट असे म्हणतात) असे केले. या पदार्थाचे त्यांनी अमेरिका आणि ब्रिटनकडून पेटंटही मिळवले. या शोधामुळे अल्फ्रेड नोबेल जगप्रसिद्ध झाले. डायनामाइटचा उपयोग बोगदे खणण्यासाठी, पाट तयार करण्यासाठी, रेल्वे रूळ तयार करण्यासाठी संपूर्ण जगभरात मोठ्या प्रमाणात होऊ लागला. डायनामाइटच्या उत्पादनाचे आणि विक्रीचे प्रचंड मोठे जाळे त्यांनी 1870 ते 1880 या काळात जगभर सर्वत्र पसरवले.

प्रचंड संपत्तीचे मालक

आपले संशोधन त्यांनी यापुढेही सतत चालूच ठेवले. त्यातूनच 1887 साली ‘बॅलिस्टाइट’ या शक्तिशाली आणि सोईस्कर स्फोटकाचा शोध लागला. याच काळात

त्यांच्या भावानेही तेलक्षेत्रातून प्रचंड संपत्ती गोळा केली होती. स्वतःचे संशोधन, उत्पादन आणि कंपन्यांमधील गुंतवणूक यांच्या साहाय्याने ते प्रचंड संपत्तीचे मालक झाले. 1893 साली त्यांनी स्वीडनमधील सैनिकी अवजारे, शस्त्रास्त्रे यांच्या उत्पादनात रस घ्यायला सुरुवात केली. त्यातूनच जगप्रसिद्ध 'बोफोर्स' उत्पादनाची निर्मिती सुरू झाली. स्फोटकांबरोबरच अल्फ्रेड यांनी सिल्क, इत्यादींसारखे बरेच शोध लावले. वेगवेगळ्या देशांत त्यांच्या नावाने सुमारे 350 पेटंट्स आहेत.

एक गूढ; पण विचारी व्यक्तिमत्त्व

अल्फ्रेड नोबेल यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय गूढ असे होते. व्यवसायानिमित्त ते सतत जगभर प्रवास करीत असत, तरीही त्यांना खूप एकटे आणि अलिप्त वाटत असे. अनेक वेळा ते निराशही होत असत. ते साधे, विरक्त, तपोनिष्ठ आयुष्य जगले. ते अतिशय उदार होते. इतरांचे म्हणणे ते शांतपणे ऐकून घेत असत. ते अतिशय विनोदी आणि मार्मिक होते. ते अविवाहित होते. संशोधनातच ते आनंद मानीत. आपल्या संशोधनाशी त्यांची विलक्षण गुंतवणूक आणि बांधिलकी होती. साहित्याची त्यांना खूप आवड होती. त्यांनी अनेक नाटके, कादंबऱ्या आणि कविता लिहिल्या होत्या; परंतु त्यांनी त्याला कधीच प्रसिद्धी दिली नाही. त्यामुळे हे सारे साहित्य अंधारात आणि अप्रकाशितच राहिले. त्यांच्यात आश्चर्यकारक ऊर्जेचा अखंड स्रोत होता. इतके प्रचंड काम करूनही आपण विश्रांती घ्यावी असे त्यांना कधीच वाटत नव्हते. त्यांच्या समकालीन लोकांमध्ये ते उदारमतवादी आणि समाजवादी विचारांचे म्हणून प्रसिद्ध होते; परंतु लोकशाहीवर त्यांची श्रद्धा नव्हती. स्त्रियांना मताधिकार असावा याच्या ते विरोधात होते. आपल्या अनेक कामगारांबाबत त्यांनी पितृसमान दृष्टिकोन जोपासला होता. ते आपल्या कामगारांना स्वतःच्या मुलांप्रमाणे वागणूक देत असत. अल्फ्रेड नोबेल हे मुळातच शांततावादी होते. आपण संशोधित केलेल्या स्फोटकांचा उपयोग युद्ध संपविण्यासाठी होईल अशी त्यांना आशा होती.

नोबेल पुरस्काराचा जन्म

1895 साली त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि 10 डिसेंबर, 1896 रोजी मेंदूतील रक्तस्रावामुळे त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या स्फोटके आणि दारूगोळा तयार करणाऱ्या 90 कारखान्यांचे जाळे जगभर पसरले होते. अल्फ्रेड नोबेल यांनी 27 नोव्हेंबर रोजी पॅरिस येथे आपल्या मृत्यूनंतरचे त्यांचे इच्छापत्र तयार करून स्टॉकहोमच्या बँकेत ठेवले होते. ते त्यांच्या कुटुंबीयांना, मित्रांना, आणि सर्वसामान्य जनतेलाही अतिशय आश्चर्यकारक ठरले. आपल्या सर्व संपत्तीचा विनियोग एका ट्रस्टद्वारे मानवीकल्याण करणाऱ्या संशोधकांचा, साहित्यिकांचा आणि शांततेसाठी काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी करावा अशी त्यांची शेवटची इच्छा होती. यावरून ते लोककल्याणाच्या बाबतीत अतिशय उदारमतवादी होते हे स्पष्ट झाले. अल्फ्रेड नोबेल यांनी मागे ठेवलेल्या अमाप संपत्तीतूनच जगातील सर्वांत लोकप्रिय आणि सन्मानाच्या समजल्या जाणाऱ्या 'नोबेल' पुरस्काराचा जन्म झाला.

अल्फ्रेड नोबेल अतिशय विसंगत आणि विरोधाभास असणारे गूढ व्यक्तिमत्त्व होते. अत्यंत विलक्षण बुद्धिमत्ता; परंतु एकटेपण असलेले, अर्धवट निराशावादी तरीही कल्पक व ध्येयवादी व्यक्तिमत्त्व होते. ज्यांनी आधुनिक युद्धात वापरली गेलेली अतिशय

शक्तिशाली स्फोटके निर्माण केली आणि त्याचबरोबर त्यातून मिळालेली सर्व संपत्ती मानवीकल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करून जगात असे काम करण्याची प्रेरणा सतत निर्माण होत राहावी यासाठी वापरली. अशा जागतिक कीर्तीच्या सन्मानाचेही ते जनक ठरले. मृत्युपत्रातील काही तांत्रिक अडचणींमुळे पहिले नोबेल पारितोषिक देण्यास 1901 साल उजाडले. एकीकडे शक्तिशाली स्फोटकांचा निर्माता आणि दुसरीकडे नोबेल पुरस्काराचा जनक हे समीकरण विसंगत वाटण्याजोगे असले तरीही आपण स्वबळावर मिळविलेली संपत्ती जनहितार्थ काम करणाऱ्यांचा बहुमान करण्यासाठी वापरणे हे एक विलक्षण औदार्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

दुर्दम्य महत्त्वाकांक्षा

विल्मा रुडाल्फ

‘असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे’ हे तुकाराम महाराजांचे वचन विल्मा रुडाल्फ यांनी खरे करून दाखविले. बालपणापासूनच अशक्त असलेली आणि अर्धांगवायूच्या आजाराने ग्रासलेली विल्मा *20* व्या वर्षी ऑलिम्पिकमधील सर्वांत वेगवान धावपटू बनू शकते याची कल्पना करणेदेखील खरे वाटणार नाही; परंतु हा इतिहास विल्मा रुडाल्फ या अपंग तरुणीने घडविला आहे. एखादे ध्येय साध्य करण्यासाठी जिद्द आणि आत्मविश्वास या दोन गोष्टी किती महत्त्वाच्या आहेत, याची प्रचीती आपल्याला विल्मा रुडाल्फ यांच्या जीवनातून मिळते. एखादे कार्य तडीस नेण्यात असंख्य सबबी सांगणाऱ्या व्यक्तींनी प्रतिकूल परिस्थिती म्हणजे काय असते, हे विल्माच्या या कथेतून जरूर शिकावयास हवे.

आत्मविश्वासाचे बळ

अमेरिकेतील टेनेसी प्रांतात एक झोपडीवजा घरात रेल्वेत हमाली करणारे वडील आणि धुण्याभांड्याची कामे करणाऱ्या आईच्या पोटी विल्मा रुडाल्फ **(Wilma Rudolph)** जन्मली. तिचा जन्मही अकालीच झाल्यामुळे ती खूपच अशक्त होती. 23 जून, 1940 हा तो दिवस होता. हे अशक्त मूल कसं जगणार याबद्दल सर्वांनाच चिंता आणि शंका होती; परंतु ती जे जगली ते एक मोठे आश्चर्यच होते. पुढे जेव्हा ती चार वर्षांची झाली तेव्हा तिला न्यूमोनिया आणि देवीचा तापही आला. या रोगांवर योग्य उपचार न झाल्यामुळे अर्धांगवायूचा झटका येऊन तिचा डावा हात आणि तिचा डावा पाय जवळजवळ निकामीच झाला. त्यामुळे तिला लोखंडी पट्ट्यांचा आधार घ्यावा लागला. या सर्व आघातांतून ती कशीबशी जिवंत राहिल्यावर पंधरा-वीस भावंडांबरोबर चिखलमातीत पोटाचा नगारा घेऊन ती मोठी होत होती. तिला कधीही जमिनीवर पाय ठेवता येणार नाही असं डॉक्टरांनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगून टाकलं होतं. आयुष्यभर ती पांगळीच राहणार याबद्दल सर्वांचीच खात्री झाली होती. दारिद्र्य तर फाटक्या आभाळाएवढं होतं; परंतु अशा प्रतिकूल परिस्थितीतही तिच्या आईचा आत्मविश्वास अढळ मध्यान्हीच्या सूर्यप्रकाशासारखा प्रखर होता.

धावपटू होण्याच्या स्वप्नाने जन्म घेतला

आई वारंवार आपल्या मुलीला समजावत होती, “पांगळा पाय आणि लोखंडी पट्ट्या असतानाही तू आयुष्यात काहीही करू शकशील.” आई नेहमीच विल्माला सांगत असे की, “देवाने दिलेली क्षमता, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर तू काहीही हस्तगत करू शकशील; मात्र यासाठी तुला प्रचंड धैर्य आणि ज्वलंत इच्छा निर्माण करायला हवी, मग जगातील कोणतीही गोष्ट तुला अशक्य नाही.” मुलीचं व्यक्तिमत्त्व आईनं अचूक ओळखलं होतं असं दिसतं. या शिकवणुकीचा परिणाम असा झाला की,

“मला जगातील सर्वांत वेगवान धावपटू व्हायचं आहे” अशी प्रबळ, ज्वलंत इच्छा विल्माच्या मनात तयार झाली आणि तशी घोषणाही ती करू लागली. डॉक्टरांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करीत तिने आधाराचे बूट काढून टाकले आणि आपले पहिले स्वतंत्र पाऊल उचलले. चार वर्षांच्या अविश्रांत प्रयत्नांनंतर तिच्या पावलांनी एक स्वतंत्र लय पकडली. वैद्यकीय क्षेत्रात तर हा एक अद्भुत चमत्कारच घडला होता. सगळ्यांनी तिची चेष्टा केली. तिला नाउमेद करण्याचा प्रयत्न केला. पांगळी मुलगी वेगवान धावपटू होणार म्हणे! मोठ्ठा विनोदच म्हणायचा नाही का? हा सर्व उपहास, या नकारात्मक प्रतिक्रिया तिने नाउमेद न होता सहन केल्या आणि आपले परिश्रम मात्र जिद्दीने चालूच ठेवले.

विश्वास आणि चिकाटीचे फळ

वयाच्या तेराव्या वर्षापासून ती शाळेतील धावण्याच्या शर्यतीत भाग घेऊ लागली. दर वेळेला अगदी मागे मागे राहत ती शेवटी येत होती; परंतु न चुकता ती स्पर्धेत भाग घेतच राहिली. असे करीत करीत एक दिवस ती चक्क शेवटून दुसरी आली. तिचा उत्साह वाढला. तिने एक पाऊल पुढे टाकले होते. तिच्या या प्रचंड जिद्द आणि मेहनतीमुळे ती पुढील स्पर्धांमध्ये पहिली येऊ लागली. आईचा विश्वास आणि विल्माची चिकाटी फळाला आली होती.

खरी कसोटी

वयाच्या पंधराव्या वर्षी ती तेनसी स्टेट युनिव्हर्सिटीत दाखल झाली. तिथे तिला एड टेम्पल नावाचे प्रशिक्षक मिळाले. त्यांनी या मुलीचा आत्मविश्वास आणि तेज पारखले. जगात सर्वांत वेगवान धावपटू होण्याची तिची दुर्दम्य इच्छा त्यांनी ओळखली. तिच्यातील नैसर्गिक क्षमता त्यांनी समजावून घेतल्या आणि त्याचबरोबर तिच्या उणिवांकडे दुर्लक्ष करीत त्यांनी तिला मदत करायचे ठरवले. विल्माची मेहनत आणि जिद्द त्यांनी फुलविली. त्याचा परिणाम म्हणून विल्मा एक दिवस ऑलिम्पिक स्पर्धेत दाखल झाली. ऑलिम्पिकमध्ये तर सर्वोत्तम खेळाडूंशीच तुमची स्पर्धा असते आणि तिथे तुमच्या क्षमतेचा खरा कस लागतो. 1956 साली ऑस्ट्रेलियातील मेलबोर्न येथे ऑलिम्पिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या या पहिल्याच ऑलिम्पिक स्पर्धेत विल्माने तांब्रपदक (ब्राँझ मेडल) पटकावले होते. आता तिला सुवर्णपदक मिळवून जगातील सर्वांत वेगवान धावपटू व्हायचे आपले स्वप्न पूर्ण करायचे होते.

सुवर्णपदक पटकावले

आता विल्माला विसावे वर्ष लागले होते. त्यावर्षी ऑलिम्पिक स्पर्धा फ्रान्समधील रोम या शहरात होती. यावेळी विल्माची स्पर्धा आतापर्यंत अजिंक्य ठरलेल्या जर्मनीच्या ‘जुट्टा हेन’या धावपटूशी होती. ते साल होतं 1960. स्पर्धा सुरू झाल्या. स्पर्धेतील प्रसिद्ध धावपटू ‘जुट्टा हेन’ समोर उभी होती. तिच्या समोर अपंग विल्मा म्हणजे सर्वांनाच हास्यास्पद वाटत होती. ‘जुट्टा हेन’लादेखील ही स्पर्धा आपण सहजच जिंकू असे वाटले असणार. विल्माचे मन मात्र आत्मविश्वास आणि उत्साह यांनी ओतप्रोत भरलेले जाणवत होते. प्रथम 100 मीटरची स्पर्धा होती. या स्पर्धेत विल्माच्या गळ्यात विजयश्रीची माळ पडली. विल्माने ‘जुट्टा हेन’ला हरवून सुवर्णपदक पटकविले आणि

हा विजय संपादन केला. आता दुसरी स्पर्धा होती 200 मीटरची. ती स्पर्धादेखील विल्मानेच सुवर्णपदक मिळवून जिंकली. त्यामुळे ती आता सलग दुसऱ्यांदा दोन सुवर्णपदक विजेती झाली होती.

आता शेवटचा टप्पा होता 400 मीटर्सचा. या स्पर्धेत चारही धावपटूंचा कस लागणार होता. पुन्हा एकदा विल्माची गाठ होती 'जुट्टा हेन'बरोबर. ही रिलेची शर्यत होती. अशा स्पर्धेत सर्वांत वेगवान धावपटू सर्वांत शेवटच्या टप्प्यात धावतो. विल्मा आणि 'जुट्टा हेन' या दोघीही आपापल्या संघाच्या आधारस्तंभ होत्या. स्पर्धेचा पहिला टप्पा उत्तम प्रकारे पार पडला. बॅटन व्यवस्थित पुढे-पुढे सरकत होता. विल्माच्या हातात बॅटन आला तेव्हा उत्साहाच्या भरात बॅटन खाली पडला. सगळ्यांच्याच हृदयाचा ठोका चुकला; परंतु विल्माने दुसऱ्या टोकाला 'जुट्टा हेन'ला वेग घेताना पाहिले आणि तिने पटकन बॅटन उचलला. आता नाही तर केव्हाच नाही, या ईर्षेने ती अपंग पोर धावू लागली आणि परत एकदा चमत्कार घडला. तिने ही स्पर्धाही जिंकली होती. तिने इतिहास घडवला होता. पोलिओने अपंग झालेली मुलगी 1960 सालच्या ऑलिम्पिक स्पर्धेत जगातील सर्वांत वेगवान धावपटू ठरली होती. इतकेच नाही, तर एकाच वेळी तीन सुवर्णपदके जिंकणारी ती अमेरिकेतील पहिली महिला धावपटू ठरली होती. डॉक्टरांची विल्मा चालूही शकणार नाही अशी भविष्यवाणी तिने खोटी ठरविली होती. एका अर्थाने ती खरीही होती; कारण विल्मा चालण्यासाठी नाही, तर धावण्यासाठीच जन्माला आली होती.

मुलीची जिद्द की आईची प्रेरणा?

एका ओसाड गावातील गरीब कुटुंबात जन्म झालेली विल्मा जगाच्या कौतुकाचा आणि आदराचा विषय बनली ती केवळ एका आईने आपल्या अपंग मुलीला आत्मविश्वासाचे व जिद्दीचे बळ दिले म्हणून. अथक मेहनत घ्यायला हवी ही प्रेरणा दिली म्हणून. कुणाला सलाम करावा? अहोरात्र जीवाचं रान करून आईची इच्छा पूर्ण करणाऱ्या विल्माला की अखंड रोगांशी आणि दारिद्र्याशी लढा देत विल्माला प्रचंड धैर्य आणि यशासाठी लागणारी ज्वलंत इच्छा निर्माण करणाऱ्या तिच्या अशिक्षित आईला? खरं तर या दोघींनाही सलाम करायला हवा, नाही का?

आणखी बरेच काही...

पुढे बाविसाव्या वर्षी विल्मा धावण्यातून निवृत्त झाली. 1963 साली तिने शिक्षण क्षेत्रातील पदवीही मिळविली. त्याच वर्षी तिने आपल्या एका बालमित्राबरोबर विवाह केला. यथावकाश चार मुलींना जन्म दिला. दुर्दैवाने पुढे त्यांचा घटस्फोट झाला. त्यानंतर तिने ना नफा ना तोटा या तत्त्वावर 'विल्मा रुडाल्फ' फाउंडेशनची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून मागासवर्गीय मुलांना शालेय शिक्षण आणि खेळ यासाठी मदत केली जाते. शाळा, महाविद्यालये आणि आकाशवाणी या माध्यमांतून विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी अनेक भाषणे तिने दिली. 'विल्मा' नावाचे आत्मचरित्रही प्रसिद्ध झाले. विल्माने अनेक रोगांशी यशस्वी सामना करीत अलौकिक जीवन उभे केले होते; परंतु शेवटी मेंदूच्या कर्करोगाने तिला ग्रासले आणि 12 नोव्हेंबर, 1994 म्हणजे वयाच्या अवघ्या 54 व्या वर्षी तिने इहलोकाची यात्रा संपविली.

चैतन्य जेत्याचे!

लॉरेन्स लेमी

आणि रुबेंझ गोंझालेस

ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भाग घ्यायला मिळणे आणि त्यात यशस्वी होणे, पदक मिळविणे ही त्या खेळाडूच्या आयुष्यातील एक मोलाची घटना मानली जाते. अशा संधीचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न प्रत्येक स्पर्धक करीत असतो. जिंकणे ही एक घटना आहे, तर जेता होणे हे एक चैतन्य आहे. आयुष्यात घटनांना मर्यादा असतात; परंतु चैतन्य मात्र अमर्याद असते. घटनेपेक्षा चैतन्य मोलाचे असते आणि हे चैतन्यच माणसाच्या आयुष्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन आपले आयुष्य उन्नत बनवते. जिंकण्यापेक्षा जेता ठरणेच अधिक उपकारक नाही का?

हरूनही ठरले 'जेता'

1818 साली सेउल येथील ऑलिम्पिकमध्ये एका प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचा मागोवा घेऊ. शिडांच्या बोटींची शर्यत सुरू झाली. लॉरेन्स लेमी (Lawrence Lemieux) यांनी यात भाग घेतला होता आणि सुवर्णपदक मिळविण्याची क्षमता ते बाळगून होते. स्पर्धा सुरू झाली. प्रत्येक सहभागी स्पर्धक आपापली बोट पुढे नेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. स्पर्धा मध्यावर आली होती. वारा प्रचंड वेगाने वाहत होता. त्याचा सामना करणे सर्वच स्पर्धकांना अवघड जात होते. लॉरेन्स दुसऱ्या क्रमांकावर होते. मागील अनुभवाचा विचार केला तर ते कधीही पहिल्या क्रमांकावर येऊ शकत होते. तेवढ्यात एका स्पर्धकाची बोट उलटली. तो स्पर्धक आपला जीव वाचविण्यासाठी ती बोट सरळ करण्याचा पूर्णपणे प्रयत्न करीत होता; परंतु त्यात त्याला यश मिळत नव्हतं. स्पर्धा सुरूच होती. ही गोष्ट लॉरेन्सच्या लक्षात आली. या संकटकाळी मदत करणारी बोट जवळपास कोठेच दिसत नव्हती. हे बघून लॉरेन्सने आपल्या बुडणाऱ्या प्रतिस्पर्ध्याला वाचविण्यासाठी धाव घेतली. स्पर्धा सोडून त्याने आपली बोट आपल्याच बुडणाऱ्या प्रतिस्पर्ध्याच्या दिशेने वळविली. सारे जग ही घटना पाहत होते. स्पर्धा जिंकण्याच्या आकांक्षेपेक्षा त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्याचा जीव वाचविण्यास प्राधान्य दिले. त्याला सुरक्षित ठिकाणी पोहोचवून लॉरेन्स लेमी परत आपल्या स्पर्धेत दाखल झाले. त्यांना ही स्पर्धा जिंकता आली नाही. तरीही ते 'जेता' ठरले. संपूर्ण जगाने लॉरेन्स लेमींनी दाखविलेल्या या चैतन्याचा गौरव केला.

प्रामाणिकपणा महत्त्वाचा

रुबेंझ गोंझालेस (Ruben Gonzalez) यांची ही कहाणीदेखील अशीच अनोखी आणि मार्गदर्शक आहे. ते एकदा जागतिक रॅकेटबॉल स्पर्धेतील अंतिम सामना खेळत होते.

शेवटच्या गेममध्ये मॅच पॉइंटच्या वेळी मार्क वाढविण्यासाठी गोंझालेसने एक अप्रतिम फटका मारला. रेफरी आणि लाइनमन दोघांनीही फटका बरोबर असल्याचे मान्य केले आणि रुबेंझ गोंझालेस अजिंक्य ठरले होते. गोंझालेस क्षणभर अडखळले; परंतु लगेचच त्यांनी पुढे होऊन आपल्या प्रतिस्पर्ध्याशी हस्तांदोलन केले आणि ते म्हणाले, ''माझा तो फटका चुकीचा होता.'' परिणामी त्यांनी नोकरी गमावली आणि जिंकलेला सामनाही ते हरले. स्पर्धेतील जेतेपदही त्यांनी गमावले. सर्व दर्शक गोंधळून गेले. नियमानुसार स्वत:च्या बाजूने विजय निश्चित असताना एक खेळाडू आपली चूक मान्य करून स्वत:हून सामना हरेल, अशी कल्पनासुद्धा कोणी करू शकत नव्हते; परंतु ही गोष्ट प्रत्यक्ष घडत होती! नंतर जेव्हा 'आपण असे का केलेत?' असा प्रश्न गोंझालेस यांना विचारण्यात आला तेव्हा ते म्हणाले, ''माझी सचोटी, माझा प्रामाणिकपणा आणि माझी सदसद्विवेकबुद्धी यांच्याशी मी कशी प्रतारणा करणार?'' गोंझालेस सामना हरले; पण जेता ठरले. कोणतेही पदक न मिळतादेखील माणुसकी जेता ठरू शकतो. काही पराभव हे विजयापेक्षा आयुष्य उन्नत करणारे ठरतात. हृदयातील माणुसकी विजयापेक्षाही जास्त मोलाची असते.

या दोघांनीही अंतिम पदके मिळवली नाहीत तरीही खेळांच्या इतिहासात त्यांची नावे सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली व अजरामर झाली. अनेक माणसांच्या हृदयात ही नावे कोरली गेली आहेत. खेळातील चैतन्याचा जेव्हा जेव्हा विषय निघेल तेव्हा तेव्हा ही नावे नक्कीच आठवतील. अनेक सुवर्णपदके मिळवणाऱ्यांच्या यादीत त्यांची नावे नसली, तरी लॉरेन्स लेमी आणि रुबेंझ गोंझालेस ही नावे सदैव आपल्या स्मरणात राहतील हे मात्र निश्चित.

आपल्या आयुष्यातही अनेकदा अशा प्रसंगांचा सामना करावा लागतो. कदाचित आपण खेळत असणारा खेळ वेगळा असेल. आपण वापरीत असणारी बोट किंवा बॅट वेगळी असेल; परंतु त्यामागील आव्हाने मात्र सारखीच.

स्वत:ची 'प्रगती' विरुद्ध व्यापक अर्थाचा ''चांगुलपणा' आपण यापैकी कशाला अग्रक्रम द्यायला हवा, हे आपण ठरवू शकतो का? वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून व्यापक चांगुलपणा आपण जपू शकत का? बऱ्याच वेळा आपण म्हणतो की, मोठेपणाचा मार्ग नेहमीच गटांमधून, सहकाऱ्यांमधून जातो; परंतु जेव्हा वैयक्तिक स्वार्थाचा प्रश्न येतो तेव्हा इतरांबद्दल आपल्याला किती आस्था असते? आपल्या सहकाऱ्यांपेक्षा आपल्यालाच पदोन्नती मिळावी म्हणून आपण प्रयत्नशील असतो. जेव्हा आपण वृद्ध म्हणून जगात वावरू तेव्हा इतरांना काय शिकवण देणार? आयुष्यात आपल्याला काय मिळवायचं आहे, हा विचार निश्चित करायला हवा. आपलं सुवर्णपदक कशात आहे, हे ठरवायला हवं. लॉरेन्स लेमी आणि रुबेंझ गोंझालेस यांची आठवण करा. खरा प्रश्न आपण लॉरेन्स लेमी आणि रुबेंझ गोंझालेस यांच्या जागेवर असतो तर काय केलं असतं हा नव्हे, तर आपण आयुष्यात त्यांच्या विचारांचे अनुकरण कितपत करतो, हा आहे.

अविश्रांत कार्याचा

महामेरू थॉमस

अल्वा एडिसन

कोणत्याही परिस्थितीत माघार न घेता, आपल्या जवळ नसलेल्या गोष्टींबद्दल कुरकुर वा तक्रार न करता सकारात्मक वृत्तीने सतत प्रयत्न करीत राहिल्यास माणूस अपूर्व यश आणि कीर्ती संपादन करू शकतो. प्रकाश देणाऱ्या विद्युत दिव्याचा शोध लावून संपूर्ण जगाला प्रकाशाने उजळणारे एडिसन प्रचंड सकारात्मक सातत्यप्रवण संशोधक होते. आपल्याला जेव्हा आपल्या दैनंदिन कामाला वैतागून माघार घ्यावी वाटेल तेव्हा एडिसनची आठवण करा. खरं तर आपल्याला आपल्या कामात नाही तर मनोवृत्तीत बदल करण्याची आवश्यकता भासेल.

आधुनिक जगाच्या निर्मितीत थॉमस एडिसनचे **(Thomas Edison)** अतुलनीय योगदान आहे. आधुनिक जगाला लाभलेला स्वच्छ प्रकाश देणारा दिवा, ग्रामोफोन आणि चलत् चित्र यासारख्या जवळ-जवळ 1093 साधनांची आणि कार्यपद्धतींची पेटंट्स त्यांच्या नावावर आहेत आणि त्यांच्या नावावरचा हा जागतिक विक्रम अजूनही अबाधित आहे. टेलिफोनचा शोध जरी ग्रॅहम बेल यांच्या नावावर असला तरी एडिसन यांचा यातील सहभागही तितकाच मोलाचा आहे; कारण ते समवयस्क मित्र होते आणि एकमेकांसोबत कामही करीत होते. आधुनिक जगाला मिळालेल्या भौतिक आणि सांस्कृतिक उंचीला एडिसन यांचेच सर्वांत महत्त्वाचे योगदान आहे आणि म्हणूनच प्रभावशाली शास्त्रज्ञ आणि उद्योजक म्हणून थॉमस अल्वा एडिसन यांचे नाव मोठ्या गौरवाने आणि आदराने घेतले जाते.

बालपण

सॅम्युअल आणि नॅन्सी एडिसन यांच्या पोटी थॉमसचा जन्म 11 फेब्रुवारी, 1847 रोजी मिलान, ओहिओ येथे झाला. ते या जोडप्याचे सातवे आणि शेवटचे अपत्य होते. पहिली चार वर्षे थॉमसला बोलताही येत नव्हते; परंतु त्यानंतर भेटणाऱ्या प्रत्येक मोठ्या माणसाला समोर असणाऱ्या वस्तूचे कार्य कसे चालते? हा प्रश्न तो विचारीत आणि त्याचे उत्तर सांगता न येणाऱ्या माणसाच्या नजरेत आपल्या निळ्याशार डोळ्याने खोल बघत ‘का?’ असा प्रश्न तो विचारीत असे.

मतिमंद म्हणून शाळेतून काढून टाकलेल्या या मुलाचे शिक्षण त्याच्या आईने घरी स्वत:च पूर्ण केले आणि आपल्या घराचे रूपांतर जागतिक प्रसिद्धी मिळविलेल्या प्रयोगशाळेत करणाऱ्या एडिसनच्या आयुष्यातील विकासात महत्त्वाचा वाटा उचलला.

पुस्तके वाचनात उत्तेजन

बाह्यरूपाने प्रभावी न वाटणाऱ्या; परंतु अंतर्मुख असणाऱ्या आपल्या या बाळात अद्वितीय बुद्धिमत्ता आणि प्रचंड मेहनत घेण्याची क्षमता आहे, याची खात्री एडिसनच्या आईला निश्चितपणे होती आणि त्याला योग्य आकार देण्यासाठी ती अव्याहतपणे झटली. त्याच्या वडिलांनीही त्याला प्राचीन ग्रंथ वाचण्यास उत्तेजन दिले. एक पुस्तक वाचले की, ते त्याला दहा सेंट्सचे बक्षीस देत असत. लवकरच त्याला 'जगाचा इतिहास' आणि इंग्रजी साहित्यात गोडी निर्माण झाली. काही वर्षांनी तर थॉमसला शेक्सपिअरच्या साहित्याने इतके भारावून टाकले होते की, त्याच्या मनात नट बनण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली; परंतु मोठा आवाज आणि बुजरा स्वभाव यामुळे त्याने ती कल्पना सोडून दिली. त्या कल्पनेचा पाठपुरावा त्याने केला असता तर? जगाला एक महान नट मिळाला असता; पण कदाचित आपण सर्व अंधारातच राहिलो असतो. एका महान संशोधकाला आणि त्यांच्या असंख्य उत्पादनांना मुकलो असतो. निसर्गच ही निवड नेहमी योग्य प्रकारे करीत असतो. गाणं गुणगुणणे हाही त्यांचा एक छंद होता.

गुणांची पायाभरणी

थॉमसची ज्ञानग्रहणाची अपार क्षमता पाहून आई-वडिलांनी त्याला गावातील वाचनालयाचा कसा उपयोग करावयाचा हे शिकविले. तो वाचनालयातील पहिल्या कप्प्यातील पहिल्या पुस्तकापासून ते शेवटच्या कप्प्यातील शेवटच्या पुस्तकापर्यंत सर्वच पुस्तके वाचून फस्त करीत असे. वयाच्या 12 व्या वर्षी पुस्तकांची निवड कशी करायची हे थॉमसला त्याच्या पालकांनी शिकविले. आपल्या मुलाची जिज्ञासा भागविण्यास आपण असमर्थ आहोत हे त्यांच्या लक्षात आले, तेव्हा त्यांनी अकाली प्रौढ झालेल्या आपल्या या मुलासाठी विशेष शिक्षकाची नेमणूक करून बराच पैसाही खर्च केला. या सर्व धडपडीतून एडिसनला असे वाटू लागले की, न्यूटनचे खूप महत्त्वाचे सिद्धांत लोकांनी प्राचीन आणि भ्रमनिरास करणाऱ्या भाषेतून लिहिले आहेत. गणितातली तत्त्वं सामान्य माणसांना कशी गोंधळात टाकतात हेही त्यांनी दाखवून दिले. शास्त्रीय विषयात अशी क्लिष्ट आणि उच्च दर्जाची भाषा वापरू नये असे त्यांना वाटे. अर्थात न्यूटनवरच्या या वाचनाने एक चांगला परिणाम त्यांच्यावर असा झाला की, त्यातून स्वच्छ, स्वतंत्र, वस्तुनिष्ठ विचार आणि प्रयोग करण्याची वृत्ती त्यांच्यात जोपासली गेली. या शहाण्या माणसाच्या लिखाणातून आणि अनुभवातून त्यांनीही तत्कालीन विचारप्रणालीमुळे केलेल्या चुकांमध्ये ते कसे अडकले हेही एडिसनना कळले. आपल्यापुढील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सतत कष्ट कसे घ्यायचे, आपल्या कामात सातत्य कसे ठेवायचे हे त्यांनी पूर्णत: जाणले होते. त्यातूनच पुढे त्यांनी काम करताना येणारे शारीरिक आणि मानसिक ताणतणाव कसे सहन करायचे याचे अनन्यसाधारण कौशल्य आणि सामर्थ्य आत्मसात केले. यशस्वी संशोधक होण्यासाठी लागणाऱ्या गुणांची पायाभरणी ही अशी झाली.

गुंतागुंतीच्या विषयात त्यांनी गरुडासारखा विहार केला. सारखे बदलणारे मन, कल्पनातीत स्मरणशक्ती, सुरेख कौशल्य आणि आपण तयार केलेले शास्त्रीय सिद्धांत, कल्पनांची पडताळणी करणारे प्रयोग, त्यासाठी लागणारी चिकाटी आणि सोशीकता त्यांनी स्वत:मध्ये विकसित केली. त्यांच्या समकालीन संशोधकांपेक्षा हे गुण एडिसन

यांच्यात कितीतरी पटीने अधिक होते. त्यामुळेच विद्युतशास्त्रातील संशोधनासाठी स्वत:ची ठरलेली कार्यपद्धती निर्विकार बुद्धीने आणि शांतमनाने ते विकसित करू शकले. विद्युतक्षेत्रात काम करताना कोणतीही गोष्ट आपण प्रयोगाने पडताळून पहिल्याखेरीज स्वीकारली नाही असा त्यांचा दावा होता आणि म्हणूनच व्यावहारिक विद्युतशास्त्रात पाय रोवून ते स्थिर होऊ शकले.

कामाचा श्रीगणेशा

वयाच्या 12 व्या वर्षी आईवडिलांच्या परवानगीने एडिसनने रेल्वे स्टेशनवर वर्तमानपत्रे, फळे आणि भाजीपाला विकण्याचा व्यवसाय सुरू केला. वयाच्या 14 व्या वर्षी त्याने एक छोटेखानी वृत्तपत्र चालू केले. त्यात तो युद्धपूर्व लिंकन आणि डग्लर यांच्यातील वादविवादाच्या बातम्या छापीत असे. आपल्या या आगळ्यावेगळ्या वृत्तपत्रासाठी सुमारे 300 ग्राहकही त्याने मिळवले होते. गमतीदार गोष्ट म्हणजे, अशा प्रकारचे हे पहिलेच वृत्तपत्र होते आणि त्यामुळे त्याला जगातील असंख्य घडामोडांची ओळख झाली. त्याचवेळी लिंकन हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उतरले होते आणि अमेरिकेतील गुलामगिरीविरुद्ध लढणाऱ्या या नेत्याच्या प्रचाराचे कार्य एडिसनने मोठ्या हिरिरीने आपल्या वृत्तपत्रातून लिंकन यांच्या कार्याचे गोडवे गाऊन केले. या उपक्रमात एडिसनचा बराच आर्थिक फायदा झाला. त्याचा वापर त्याने रसायन प्रयोगशाळा उभारण्यासाठी केला. आपल्या वाट्याला आलेल्या काही वैगुण्यांबद्दल त्याने कधीही त्रागा केला नाही, उलट त्यावर मात कशी करता येईल यावरच लक्ष केंद्रित केले.

एडिसनचा डावा कान पूर्ण, तर उजवा कान 85 टक्के बहिरा होता. याबद्दल त्यांची तक्रार फक्त "आपण पाखरांचे सुरेख गुंजन ऐकण्याच्या आनंदास पारखे झालो" एवढीच होती. एकदा एडिसनने जीव धोक्यात घालून रेल्वे अपघातातून एका मुलाचा जीव वाचवला. कृतज्ञता म्हणून त्या मुलाच्या वडिलांनी एडिसनला 'विद्युत संदेश' पाठविण्याची कला शिकविली आणि याच मौलिक भांडवलावर त्याची संगणकीय क्षेत्रातील शिक्षणाची सुरुवात झाली.

फोनोग्रामचा शोध आणि विवाह

वयाच्या 15 व्या वर्षी त्याने तारायंत्र वापरण्याचे उत्तम कौशल्य आत्मसात केले होते आणि या भुरळ घालणाऱ्या क्षेत्रात युद्धावर गेलेल्या एका माणसाचा बदली कामगार म्हणून त्याने कामाला सुरुवात केली. तेव्हा त्याला या कामाची गती आणि कार्यक्षमता वाढविण्याची उत्तम संधी मिळाली आणि त्याने हे यंत्र अधिक कार्यक्षम कसे करता येईल, याचाच विचार करण्यास सुरुवात केली. सोळाव्या वर्षी अनेक तार कार्यालयातून काम केल्यानंतर अनेक प्रयोग करीत एडिसनने पहिल्या 'ऑटोमॅटिक रिपीटर'चा शोध लावला. हे यंत्र दोन ठिकाणावरून मानवरहित संदेश पाठविण्याचे काम करू शकत होते. आश्चर्य म्हणजे आपल्या या पहिल्या शोधाचे पेटंट मात्र त्याने घेतले नाही. लवकरच त्याने या क्षेत्रात कर्तबगार, विनोदी आणि गमत्या सद्गृहस्थ म्हणून नाव मिळविले; परंतु अल्पावधीतच रिकाम्या हातानेच त्याला घरी परतावे लागले. त्यावेळी त्याच्या आईवडिलांची अवस्था त्याच्याहूनही बिकट झालेली होती. त्याच्या आईमध्ये मनोविकृतीची लक्षणे दिसत होती आणि प्रतिकूल परिस्थितीच्या प्रभावामुळे ती जास्तच तीव्र झाली होती. त्याच्या भावविवश पित्याने नोकरी सोडलेली होती.

परिस्थिती लक्षात घेऊन आयुष्यात प्रथमच गंभीरपणे विचार करून पैसा मिळवायचा असे त्याने ठरविले.

आपल्या मित्रांच्या मदतीने 'बोस्टन' या दूरच्या शहरात 'वेस्टर्न युनियन' या नावाजलेल्या कंपनीत त्यांनी नोकरी पत्करली. बोस्टन त्यावेळी उत्तम सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. तिथे त्यांनी अहोरात्र मेहनत करून पहिल्या मते (Votes) नोंदविणाऱ्या विद्युत यंत्राचा शोध लावला आणि त्याचे पेटंटही मिळविले. काही राजकारणामुळे त्यांचे हे यंत्र राज्यकर्त्यांनी नाकारले. काळाच्या खूप पुढे असणारी ही कल्पना तत्कालीन राज्यकर्त्यांना मानवली नसावी. त्यामुळे या साध्या आणि सरळ संशोधकाला आपल्या कल्पकतेला मुरड घालावी लागली आणि यापुढे जे विकले जाईल त्याचाच शोध मी लावेल, असा संकल्पही त्यांनी केला. याच काळात पहिला दूरध्वनी, फॅक्स मशीन आणि मायक्रोफोन यांचा शोध लागला. ग्रॅहम बेल या दूरध्वनीचा शोध लावणाऱ्या संशोधकाचे वास्तव्यही त्यावेळी बोस्टन येथेच होते.

बोस्टन येथे एडिसन यांनी काही मित्रांबरोबर भरपूर काम केले; परंतु त्यातून फारसा आर्थिक फायदा झाला नाही. कंपनीच्या कामात पूर्णपणे लक्ष केंद्रित न करता बाहेर काम करतो म्हणून कंपनीतून बाहेर काढले जाण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे त्यांनी दुसरी नोकरी करावी या विचाराने मित्राकडून पैसे उधार घेऊन न्यूयॉर्क या मोठे व्यापारी केंद्र असणाऱ्या शहरात ते दाखल झाले. सुरुवातीलाच काम न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती; परंतु एक दिवस असेच भटकत असताना एक दलाली कार्यालयातील व्यवस्थापक त्याच्या कार्यालयातील एक महत्त्वाचे यंत्र बिघडल्यामुळे खूप घाबरलेला दिसला. त्याच्या कार्यालयात खूप मोठी गर्दी जमलेली होती; पण कोणालाच त्या यंत्राची दुरुस्ती कशी करायची हे समजत नव्हते. एडिसन यांनी या संधीचा फायदा घेऊन आणि पटकन पुढे होऊन ते यंत्र दुरुस्त करून दाखविले. तो व्यवस्थापक इतका खूश झाला की, त्याने लगेचच निर्णय घेऊन एडिसनला एक मोठ्या पगाराची नोकरी देऊ केली. पगाराची रक्कम त्यामानाने खूपच जास्त होती.

पुढे अचानक गरिबी दूर करणाऱ्या या प्रसंगाची उत्कट आठवण एडिसनला नेहमीच होत असे. या कामाबरोबरच एडिसनचे संशोधनाचे काम अविश्रांत चालूच होते. येथे त्यांनी शोधलेल्या 'क्वॉड्रुप्लेक्स ट्रांसमीटर'ला एका कंपनीकडून चाळीस हजार डॉलर एवढी कल्पनातीत रक्कम मिळाली. त्यानंतर आपल्या आई वडिलांना त्यांनी मदत केली. पुढे त्यांना सतत यशच मिळत गेले. मिळणाऱ्या प्रचंड पैशातून त्यांनी न्यूयॉर्क, न्यू जर्सी येथे एक सर्व सोयींनीयुक्त अशी उत्तम प्रयोगशाळा सुरू केली. 1976 साली त्यांनी फोनोग्रामचा शोध लावला. एडिसन आणि ग्रॅहम बेल यांच्या कामात इतके साम्य होते - टेलिफोनचा शोध ग्रॅहम बेल यांनी लावला नसता तर तो एडिसनने लावला असता आणि फोनोग्राम एडिसनने शोधला नसता तर तो ग्रॅहम बेल यांनीच शोधला असता. याच काळात एडिसनची भेट मेरी स्टिलवेल यांच्याशी झाली. त्यांच्याशी विवाह करून एडिसन यांनी आपल्या कौटुंबिक आयुष्याला सुरुवात केली.

मेनलो पार्क येथे स्थलांतर

टेलिफोनच्या शोधात ग्रॅहम बेल यांनी एडिसनला मागे टाकले असले तरी एडिसनने स्वच्छ पांढरा प्रकाश देणाऱ्या विद्युत दिव्याचा शोध लावून आपल्या सर्व

प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. त्यानंतर जगाच्या विकासात मूलभूत आणि महत्त्वाच्या ठरतील आणि विद्युतप्रकाश, उष्णता, ऊर्जानिर्मिती, वहनक्षम व आर्थिक दृष्टीने परवडतील अशा विविध कार्यपद्धती विकसित केल्या. आधुनिक युगाच्या निर्मितीत त्या महत्त्वाच्या ठरल्या. एडिसनचे टीकाकारही हे मानतात की, त्यांच्या महान कार्यावरच आजच्या आधुनिक युगाचा पाया रचलेला आहे. त्यांच्या या कार्याला तोड नाही म्हणूनच ते आधुनिक युगाचे शिल्पकार ठरले आहेत.

1876 ला एडिसनने न्यूयॉर्कमध्ये असलेली सर्व उत्पादन केंद्रे विकून आपले कुटुंब आणि कारखान्यातील मदतनिसांसह न्यूयॉर्कपासून काही अंतरावर असलेल्या मेनलो पार्क या खेड्यात स्थलांतर केले आणि कोणत्याही संशोधनावर काम करता येईल अशी प्रयोगशाळा स्थापन केली. जगातील अशा पद्धतीची ती पहिलीच आणि सर्वश्रेष्ठ प्रयोगशाळा होती. संशोधनापासून ते प्रायोगिक उत्पादन निर्मितीपर्यंतची सर्व कामे तेथे केली जात होती. येथूनच एडिसन यांनी जग बदलायला सुरुवात केली. या प्रयोगशाळेतील पहिले महत्त्वाचे संशोधन म्हणजे 'टिन फाइल फोटोग्राफ' तसेच आवाज ध्वनिमुद्रित करून वारंवार प्रसारित करणारे यंत्र म्हणजेच रेकॉर्डर आणि प्लेअर. त्यामुळे एक भावनिक लहर निर्माण होऊन एडिसन जगप्रसिद्ध झाले. एडिसन यांनी 'फाइल फोटोग्राफ' घेऊन संपूर्ण देशाचा दौरा केला. त्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी एडिसन यांना अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचेही निमंत्रण आले होते.

विद्युत उपकरणांवर कार्य

विजेपासून पांढराशुभ्र प्रकाश देणारा व्यवहार्य आणि सर्वांना परवडेल असा दिवा तयार करणे हे एडिसन यांच्यापुढील महत्त्वाचे आव्हान होते. विद्युतप्रकाश ही संकल्पना काही नवीन नव्हती. अनेक शास्त्रज्ञांनी विविध प्रयोग करून काही साधनांची निर्मितीही केलेली होती; पण घरगुती वापरासाठी दुरून वापरता येईल अशा प्रकारच्या व्यवहार्य विद्युत दिव्याची निर्मिती मात्र झालेली नव्हती. एडिसनचे कार्य केवळ पांढरा प्रकाश देणारा दिवाच नाही, तर त्यासाठी उपयुक्त अशी सुरक्षित, व्यवहार्य आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारी, सहजसुलभ कार्यपद्धती शोधून काढली हेदेखील आहे. साधारण दीड वर्षांच्या अथक प्रयत्नांतून पांढरा प्रकाश देणारा कार्बनयुक्त फिलामेंट असणारा दिवा त्यांनी तयार केला. साधारणतः साडेतेरा तास तो प्रकाश देत असे. डिसेंबर 1870 साली त्याचे सार्वजनिक प्रदर्शन करण्यात आले. मेन्लो पार्कचा संपूर्ण परिसरच विद्युत प्रकाशाने झगमगून उठला होता. पुढील अनेक वर्षे एडिसन त्याच्या उत्पादनासाठी झटत होते. सप्टेंबर 1882 ला 'मॅनहटन' येथे ग्राहकांना ऊर्जा आणि प्रकाश देणारी यंत्रणा पर्ल स्ट्रीटवर सुरू करण्यात आली आणि विद्युतयुगाचा आरंभ झाला. हा प्रयोग एडिसन यांना कीर्ती आणि संपत्तीच्या अत्युच्च शिखरावर घेऊन गेला. त्यांची ही कामगिरी अजूनही असंख्य संशोधकांना आव्हान देते आहे.

जनरल इलेक्ट्रिकची स्थापना

1889 पर्यंत एडिसन यांनी काढलेल्या अनेक कंपन्या या क्षेत्रात कार्यरत होत्या. त्या सर्व एकत्र करून 'एडिसन जनरल इलेक्ट्रिक कंपनी' ची स्थापना करण्यात आली. कंपनीच्या नावात एडिसनचे नाव असले तरी एडिसन कंपनीचे नियंत्रण करीत नव्हते. ही कंपनी जेव्हा त्यांचे प्रतिस्पर्धी थॉमस होस्टन यांच्या कंपनीबरोबर विलीन करण्यात

आली तेव्हा तिला ‘जनरल इलेक्ट्रिक कंपनी’ हे नाव देण्यात आले. या अद्‌वितीय यशाला त्यांची पत्नी ‘मेरी’ यांच्या निधनाने गालबोट लागलेच. आपल्या संशोधन आणि उत्पादनाच्या व्यापात एडिसन यांचे आपल्या घराकडे अक्षम्य दुर्लक्ष होत होते. मेरीच्या निधनामुळे तर त्यात अधिकच भर पडली होती. त्यांची तीनही मुले न्यूयॉर्कमध्ये राहत होती. पुढे मीना मिलर यांच्याबरोबर एडिसन यांचा परिचय झाला. त्याचे रूपांतर प्रेम आणि लग्नात झाले. आपल्या नवीन ‘वेस्ट ऑरेंज’ या प्रासादात ते मीना मिलर यांच्याबरोबर शेवटपर्यंत राहिले. जागतिक महायुद्धाच्या वेळी त्यांनी उभारलेल्या प्रयोगशाळेत आणि कारखान्यात दहा हजारांच्या आसपास कामगार काम करीत होते आणि त्यांच्या कामाचा पसारा वीस एकरापेक्षाही जास्त जागेत व्यापलेला होता.

संशोधनातील सातत्य

आपली नवीन प्रयोगशाळा उभारल्यानंतर एडिसन यांनी पुन्हा घरगुती आणि व्यावसायिक फोनोग्राम या विषयावर संशोधनास सुरुवात केली. विजेच्या दिव्यासाठी वापरलेल्या पद्धतीप्रमाणेच फोनोग्रामची नवनिर्मिती करण्यासाठी उपयुक्त अशा सगळ्या यंत्रणा आणि कार्यपद्धती त्यांनी विकसित केल्या. रेकॉर्डरचे उत्पादन करण्याची साधने आणि यंत्रे, रेकॉर्डरच्या चकत्यांची निर्मिती वगैरे कामे ते आपल्या मृत्यूपर्यंत करीत होते. फोनोग्रामसाठी कानासारखे जसे यंत्र असते; तसेच यंत्र त्यांनी डोळ्यांसाठीही तयार केले होते. त्यांनी तयार केलेल्या पहिल्या चलत् चित्राचे प्रात्यक्षिक 1891 ला दाखवून व्यावसायिक चित्रपटांची निर्मिती करायला सुरुवात केली. त्यांचे हे काम मूलभूत आणि पुरोगामी होते. त्यानंतर त्यांनी आपण केलेल्या कामातच खूप सुधारणा केल्या; परंतु त्या कामातील भाऊगर्दी बघून त्यांनी आपला मोहरा दुसरीकडे वळवला.

त्यांनी विद्युत गाड्यांसाठी स्टोअरेज बॅटरीज तयार करण्याचे आव्हानात्मक काम सुरू केले. प्रवासी गाड्यांच्या वापराचा आनंद एडिसन यांनी उपभोगला. त्यांच्याकडे गॅस, वाफ आणि विजेवर चालणाऱ्या गाड्या होत्या. त्यांच्या मते, विजेवर चालणाऱ्या गाड्या या सर्वांत उत्तम होत्या; परंतु तत्कालीन बॅटरीज या कामासाठी पुरेशा नव्हत्या. यासाठी त्यांनी अल्कलाइनच्या बॅटरीज तयार करण्याचा सर्वांत अवघड प्रकल्प हाती घेतला होता. हा शोध लावण्यास त्यांना दहा वर्षं वाट पाहावी लागली आणि तोपर्यंत ज्या विद्युत वाहनांसाठी ही बॅटरी विकसित करण्यात आली होती त्या विद्युत वाहनांची बाजारपेठेतून हकालपट्टीही झाली होती; परंतु सुदैवाने पुढे रेल्वेतील डब्यात, सिग्नलसाठी आणि खाणीतील दिव्यांसाठी ती फारच उपयुक्त ठरल्यामुळे त्यातही एडिसन प्रचंड पैसा मिळवू शकले.

18 ऑक्टोबर, 1931 रोजी वयाच्या 84 व्या वर्षी संशोधनाच्या आणि उत्पादनाच्या आकाशात विहरणारा हा लखलखीत तारा निखळला आणि विश्वाच्या व्यापक आकाशात विलीन झाला; परंतु आधुनिक मानवतेच्या विकासासाठी प्रचंड संपत्ती मागे ठेवूनच!

एडिसन: एक प्रेरणा

थॉमस अल्वा एडिसन यांच्या चरित्रातून घ्यायचा महत्त्वाचा धडा म्हणजे कोणत्याही परिस्थितीत माघार न घेता, आपल्या जवळ नसलेल्या गोष्टींबद्दल तक्रार न करता सकारात्मक वृत्तीने सतत प्रयत्न करीत राहिल्यास माणूस अपूर्व यश आणि कीर्ती

संपादन करू शकतो. वयाच्या चौथ्या वर्षी मतिमंद म्हणून शाळेतून हाकलून दिलेल्या, सातव्या वर्षी सहकाऱ्यांकडून खाल्लेल्या मारहाणीमुळे जवळजवळ बहिरा झालेल्या, वयाच्या तेराव्या वर्षी नोकरीतून काढून टाकलेल्या या अचाट बुद्धिमत्तेच्या व्यक्तीने आपल्या तळघरातील जागेत कामाला सुरुवात केली आणि त्या तळघराचे रूपांतर साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या संशोधन केंद्रात केले. अपयश येत असतानासुद्धा मनाने ताजेतवाने राहून योग्य वृत्ती ठेवल्यास आपण प्रचंड मोठे आणि अद्वितीय कार्य उभारू शकतो, अपूर्व यश संपादन करू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे थॉमस अल्वा एडिसन. पांढरा प्रकाश देणाऱ्या विद्युत दिव्याच्या निर्मितीत हजारो वेळा अपयश येऊनही त्या प्रत्येक अपयशाकडे, ते “अशा प्रकारे विद्युत दिव्याचा शोध लावता येणार नाही हाच मला याक्षणी लागलेला शोध आहे” अशा वृत्तीने बघत असत आणि त्यानंतर निराश न होता जिद्द आणि सकारात्मक वृत्तीने दुसरा मार्ग शोधून ते पुन्हा प्रयत्न करण्यास सुरुवात करीत असत.

दुर्दम्य इच्छाशक्ती

वृद्धावस्थेकडे झुकल्यावर त्यांच्या कारखान्याला प्रचंड आग लागली होती. तेव्हा या व्यक्तीने मुलाकरवी आपल्या बायकोला घरून बोलावून घेतले. तिचा हात धरून तिला आगीजवळ नेऊन ते म्हणाले, “मीना! हे बघ, अशी आग तू उभ्या आयुष्यात बघितली नसणार! निघणाऱ्या धुराकडे नजर टाकीत ते म्हणतात, “मी माझ्या आयुष्यातील सगळ्या चुका जाळून टाकल्या आहेत. आता पुन्हा एकदा कामाला नव्याने सुरुवात करायला पाहिजे!” केवळ असे म्हणून ते थांबले नाहीत तर पुढील तीन आठवड्यांच्या आतच त्यांनी ग्रामोफोनचा शोध लावून उत्पादनही सुरू केले. हीच त्यांची प्रचंड इच्छाशक्ती आणि कार्यप्रवणता!

उतारवयातही ते रोज अत्यंत उत्साहाने 17-18 तास काम करीत असत. प्रयोगशाळा हेच एडिसन यांचे आवडते ठिकाण होते. त्यांना कामाविषयी एवढी तळमळ आणि बांधिलकी होती की, कामातून थोडी विश्रांती घेण्यासाठीदेखील ते प्रयोगशाळेचीच निवड करत असत. आपल्याला जेव्हा आपल्या दैनंदिन कामाला वैतागून काही विश्रांती घ्यावी असे वाटेल तेव्हा थॉमस एडिसनची आठवण करा. खरं तर आपल्याला आपल्या कामात नाही, तर आपल्या मनोवृत्तीत बदल करण्याची गरज असेल.

मृत्यूच्या अगदी समीप असताना त्यांना भेटायला एक गृहस्थ आले होते. त्यांनी एक हेलिकॉप्टरचे मॉडेल तयार करून आणले होते. त्यासंबंधी एडिसन बरोबर ते चर्चा करीत होते. त्यांना एडिसन म्हणाले “सर चला! आपण माझ्या प्रयोगशाळेत जाऊ या! आपल्या या मॉडेलमध्ये मी अनेक सुधारणा सुचवू शकेल.”

सुधारणांतील हा आनंद, कामातील उत्साह, तळमळ आणि अपयशातही हार न मानता यश मिळेपर्यंत सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची प्रसन्न मनोवृत्ती या गोष्टी आपण आत्मसात केल्या, तर आजही अनेक एडिसन आपण जगाला देऊ शकू.

अंधारालाही हरवणारी

हेलन केलर

आयुष्यात उत्तम मेंदूचे अद्वितीय स्थान मान्य करूनसुद्धा आपल्या मतिमंद आणि बहुविकलांग मुलांच्या पालकांपुढे असणारी आव्हाने ही हेलन केलर यांच्यापुढे असणाऱ्या आव्हानांपेक्षा कितीतरी सोपी आहेत. म्हणूनच ही जीवनकथा आपल्यापर्यंत पोहोचवून आपल्या कार्यात प्रचंड स्फूर्ती आणि प्रेरणा निर्माण करून मतिमंद आणि बहुविकलांगांच्या पुनर्वसनासाठी आपली बांधिलकी, कटिबद्धता अधिक बळकट होऊ शकते. हेलन केलर ही अंध तरुणी हे जग उघड्या डोळ्यांनी न पाहता ते अनुभवते आणि आयुष्यासमोरील प्रचंड आव्हानाला चोख प्रत्युत्तर देते. हेलन केलर या दृष्टिहीन व्यक्तिमत्त्वाच्या स्फूर्तिदायक जीवनपटातून सर्वांनीच प्रेरणेची संजीवनी घ्यायला हवी; कारण दृष्टी असूनही महान स्वप्नं नसणे, हे दृष्टिहीनतेहूनही मोठे दुर्भाग्य आहे.

''जगातील सर्वोत्तम आणि सौंदर्यवान गोष्टींची अनुभूती डोळ्याने अथवा स्पर्शाने नाही, तर हृदयाने घ्यावी लागते.''

आठवतंय का, हे हृदयस्पर्शी उद्‌गार कोणाचे आहेत ते? विसावं शतक संपवून नुकतीच आपण एकविसाव्या शतकातील नवीन दशकाच्या वाटचालीला सुरुवात केलेली आहे. मागील शतकावर आपल्या अलौकिक कार्याने आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाने ज्यांनी सखोल ठसा उमटवला, त्यातील काही नावं गतिमान कालप्रवाहामुळे कदाचित अस्पष्ट ही होतील; परंतु 'हेलन केलर' **(Helen Keller)** हे नाव मात्र काळाची सगळी बंधने ओलांडून शतकानुशतके आपल्या स्मरणात राहील. या अंध, मूक आणि बधिर महिलेच्या प्रचंड स्फूर्तिदायक जीवनपटामुळे, त्या जगभरच्या अपंगांचे श्रद्धास्थान झाल्या आहेत. नुसत्या अपंगांनाच नव्हे, तर त्यांच्या संबंधात येणाऱ्या प्रत्येक संवेदनशील धडधाकट व्यक्तींनाही प्रेरणेची संजीवनी मिळेल असेच त्यांचे आयुष्य आहे.

अंधत्व, मुकेपणा आणि बधिरत्व अशा तिहेरी अपंगत्वाशी झुंज देणाऱ्या हेलन केलर यांच्यासाठी संपूर्ण जीवन समर्पण करणाऱ्या शिक्षिकेचं नाव होतं अॅनी सुलिव्हॅन. स्वत:तील मोठ्या जिद्दीने आणि शिक्षिकेच्या मदतीने हेलन यांनी अंधाराला हरवणारे संघर्षशील जीवन उभे केले आहे.

हेलन केलरचा जन्म 27 जून, 1880 रोजी उत्तर अल्वानातील टस्कंबिया या छोट्याशा गावात झाला. लहान असताना हेलन इतर मुलांसारखीच होती. लवकरच ती चालायला लागली. आपल्या स्वाभाविक बाललीलांनी तिने घर आनंदून टाकले होते. ते बालपणीचे दिवस भराभर निघून जात होते. त्या दिवसांचे नजराणे एका आनंदी मुलीच्या चिमण्या पावलापाशी ठेवून एक भयाण आणि सुन्न दिवस उगवला. तिला एका विचित्र आजाराने गाठले. पोटात आणि मेंदूत भयंकर रक्तस्राव झाल्यामुळे हा आजार झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. या आजारातून ती वाचणार नाही असेच सर्वांना वाटले होते; पण अचानक एक दिवस हेलनला ताप आला आणि तसाच गूढपणे उतरलादेखील. सर्वांनी

जल्लोष केला. कुणालाही कल्पना नव्हती, अगदी डॉक्टरांनासुद्धा! पण हा आजार हेलनचे डोळे आणि कान घेऊन गेला. तिच्यापुढे प्रचंड शांतता आणि अंधार उभा राहिला. तरीही बालपणीच्या पहिल्या एकोणीस महिन्याने का होईना विस्तीर्ण हिरवी कुरणं, स्वच्छ निळं आकाश, झाडं, फुलं हे सारं आपण पाहिलं होतं त्याच्या आठवणी अंधारातही हेलनच्या मनात जागृत होत्या.

1887 साली अॅनी सुलिव्हॅन या शिक्षिका म्हणून केलर कुटुंबात सामील झाल्या. कशी काढली असतील ही पाच-सहा वर्षे केलर कुटुंबीयांनी! *1926* मध्ये अॅनी सुलिव्हॅन यांचा मृत्यू झाला. अखेरपर्यंत म्हणजे सुमारे *49*वर्षे त्यांनी हेलन केलर यांना साथ दिली.

प्रचंड चिकाटीने आणि अपार मेहनत घेऊन त्यांनी हेलन केलर यांच्या कर्तृत्वसंपन्न जीवनाची पायाभरणी केली. 1 जून, 1968 रोजी वयाच्या 88 व्या वर्षी हेलन केलरची प्राणज्योत मालवली आणि निरंतर कृतिशील राहून साक्षात अंधारालाही हरवणारी आणि जगभरातील अपंगांना अनेक शतके प्रेरणा देणारी संघर्षशील जीवनयात्रा थांबली.

त्यांचा हा प्रेरणादायी; परंतु अतिशय कष्टाने, जिद्दीने आणि संघर्षाने भरलेला जीवनप्रवास आपल्यापुढे कसा मांडावा हा प्रश्न माझ्यासमोर निर्माण झाला, तेव्हा तो ‘माझी जीवनकहाणी’ या अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या हेलन केलर यांच्या स्फूर्तिदायक आत्मकथेतून काही उतारे देऊन सोडवावा असे मी ठरवले.

आयुष्य घडवणारी शिक्षिका

आपल्या शिक्षिका अॅनी सुलिव्हॅन यांच्या पहिल्या भेटीचा अनुभव कथन करताना हेलन केलर म्हणतात, “माझ्या आठवणीतील आयुष्यातला सगळ्यात महत्त्वाचा दिवस म्हणजे माझ्या बाई अॅनी सुलिव्हॅन मला शिकवायला आल्या तो दिवस. दोन अगदी वेगळी आयुष्यं एकत्र येतात याचे मला आश्चर्य वाटते. दाट धुके असताना तुम्ही कधी समुद्रावर गेला आहात? अशावेळी वाटते, सहज स्पर्श करता येईल अशा पांढऱ्या अंधाराने आपल्याला वेढलेय आणि तशा धुक्यातून जहाज वाट काढून किनाऱ्याच्या दिशेने येत असते. किनारा गाठेपर्यंत ताण असतो. छाती धडधडत असते. वाटते, आता काय होणार? शिक्षणाला सुरुवात होण्याआधी माझी अवस्था त्या धुक्यात सापडलेल्या जहाजासारखी होती. फरक इतकाच की, माझ्याकडे होकायंत्र वगैरे काहीच नव्हतं आणि बंदर किती जवळ आलंय हेही कळायला काहीच मार्ग नव्हता. प्रकाश! प्रकाश हवाय मला! असे माझ्या आत्म्याचं नि:शब्द आक्रंदन चालायचं. नेमक्या याच क्षणी मी प्रेमाच्या प्रकाशात न्हाऊन निघाले. माझ्याजवळ कुणीतरी येतेय असे मला जाणवलं. आई आहे असे समजून मी हात पुढे केला, तर दुसऱ्यानेच कुणीतरी माझा हात हातात घेतला आणि मला उचलून कडेवर घेतले. याच माझ्या बाई. त्या मला शिकवण्यापेक्षा माझ्यावर मायेची पाखर घालायला आल्या होत्या.

अॅनी सुलिव्हॅन यांनी खूप कल्पकता वापरून, विविध प्रयोग करून अनंत परिश्रमाने हेलन केलर यांना घडवले. विचार कसा करायचा हे शिकवलं. सर्वसाधारण मुले भाषेची विविध अंगे आणि मानवी भावभावना, सततची पुनरावृत्ती आणि अनुकरणातून शिकतात. घरात कानावर पडणाऱ्या संभाषणातून मुलांच्या मनाला चालना मिळते. ते आपले विचार उत्स्फूर्तपणे मांडतात. दृष्टी, स्पर्श आणि बोलणे ही नैसर्गिक

आदानप्रदानाची माध्यमे. ही निसर्गाने हेलन केलर यांना नाकारली होती. सर्वसाधारण मुलांनासुद्धा व्यक्तिमत्त्वविकासाच्या तरल भावभावना शिकवणे किती अवघड असते! तर अंध, मुक्या आणि बधिर अशा हेलनला या गोष्टी बाईंनी कशा शिकविल्या असतील? हे कुटुंबातील सर्वांच्याच ज्ञान आणि कौशल्यांना प्रचंड आव्हान होते. निसर्गाने नाकारलेल्या गोष्टी हेलनला प्राप्त करून घ्यायच्या होत्या. हाताला स्पर्श करून आपल्या कानावर पडणाऱ्या संभाषणातील प्रत्येक भाग बाई तिला पुन्हापुन्हा सांगत होत्या. हातावरील स्पर्शाने, संवादाने एक माध्यमच त्यांनी तयार केले होते. प्रेमाचा अर्थ समजावून सांगताना सुलिव्हॅन म्हणत, ‘‘ढगांना स्पर्श करता येत नाही; पण पाऊस आपल्याला जाणवतो. पाऊस पडल्यावर फुले कशी आनंदी होतात. दिवसभर तापलेली जमीन कशी शांत होते, हे आपल्याला जाणवते तसेच प्रेमाचेही आहे. प्रेमालाही स्पर्श करता येत नाही; पण प्रेमामुळे सारे मोहक, गंधीत होऊन जाते. प्रेम नसते तर आपल्याला कशाचा आनंदही झाला नसता.’’

बाईंनी हेलनकडून कुठलाही बाऊ न करता हसत-खेळत अभ्यास करून घेतला. सर्वसाधारण मुलांकडून आपल्याला पाहिजे तो अभ्यास करून घेणेही किती अवघड आहे, हे आपण अनुभवतोच आहोत. मग या अंध, मूक आणि बधिर मुलीचं इतक्या उच्चकोटीचं व्यक्तिमत्त्व घडवणं, तिचं जगातील अत्यंत संवेदनशील, परोपकारी आणि इतरांना प्रेरक ठरेल अशा व्यक्तीत रूपांतर करणं किती कौशल्याचे आणि कठोर मेहनतीचे काम असेल याची कल्पनाच न केलेली बरी. हेलनला अभ्यास हा अत्यंत सुखद आठवणी आणि आनंदाचा अनमोल ठेवा वाटावा अशा पद्धतीने सुलिव्हॅन यांनी हे सर्व काम केले. बाईंचे अजून एक विशेष म्हणजे एखादी गोष्ट फुलवून सांगण्याची त्यांची हातोटी. प्रश्नांचा भडिमार न करता शास्त्रातील सूक्ष्म बारकावे स्पष्ट करीत प्रत्येक विषय जिवंत करून त्या शिकवीत असत. सकाळी लवकर उठवून बाई तिला निसर्गरम्य वातावरणात सहलीसाठी नेत असत. गवतावर आणि फुलांवर पडलेल्या दवाचा अनुभव घेऊ देत असत. गुलाबाच्या मधुर फुलांचा सुवास, मंद झुळकीच्या तालावर डोलणाऱ्या लीलीचे नृत्य. फुलांवर उडणारी फुलपाखरे, त्यांच्या पंखांची मंद थरथर असा अनुभव आपण किती जणांनी घेतला आहे? असा अनुभव हेलनला देऊन त्यांनी तिचं आयुष्य समृद्ध बनवलं. नदीवर, सागरावर नेऊन गप्पांच्या ओघातच तिला इतिहासाचे पाठ दिले. गणितासारखा रुक्ष विषयही माळेचा, मण्यांचा उपयोग करून तिची सहनशक्ती संपुष्टात न आणता शिकवला.

पन्नास वर्षांच्या अखंड प्रवासात ही दोन्हीही व्यक्तिमत्त्वे एकमेकांत इतकी मिसळून गेली होती की, हेलनची जडणघडण स्वतःच्या प्रेरणेमुळे किती आणि बाईंच्या प्रभावामुळे किती हे कोण सांगू शकणार? हेलनच्या आयुष्यातील सर्वोत्तम गोष्टी म्हणजे तिचे गुण, आकांक्षा आणि आनंदच काय; पण तिच्या साऱ्या जीवनशक्ती, बाईंची अलौकिक कल्पकता, आत्यंतिक आपुलकी आणि संकटांना न जुमानणारं!

सौंदर्यानुभूती

हेलन केलर यांनी नायगारालाही भेट दिली. नायगाराच्या नवलाईने आणि सौंदर्याने त्या अगदी मोहरून गेल्या होत्या. या भेटीचा त्यांच्या मनावर सखोल परिणामही झाला होता. बऱ्याच जणांना याबद्दल आश्चर्य वाटे. त्यातूनच

त्यांना इतरांच्या अनेक प्रश्नांचा सामनाही करावा लागे. जसे की, ‘‘एखाद्या गोष्टीचे सौंदर्य किंवा त्यातले संगीत तुला कसे जाणवते? समुद्र किनाऱ्यावर गेल्यावर किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटा तुला दिसत नाहीत किंवा त्यांची गर्जनाही तुला ऐकू येत नाही. तुला त्याचं काय?’’ हेलन केलर, या प्रश्नाचे उत्तर देताना म्हणते, ‘‘खरं तर माझ्या पद्धतीने त्या मला जाणवतात आणि अर्थपूर्णदेखील वाटतात. प्रेम, धर्म अथवा चांगुलपणा या शब्दांच्या व्याख्या मी सांगू शकत नाही किंवा थेट त्यांच्या तळाचा अंदाजही घेऊ शकत नाही. तरीही या गोष्टी मला जाणवतात. त्याचप्रमाणे समुद्र, लाटा, धबधबे, निसर्ग-सौंदर्य यांची वेगवेगळी रूपे, त्यातील विविध सुगंधही मला जाणवतात आणि आवडतातही.’’

शिक्षण व साहित्यक्षेत्रात प्रवेश

बॉस्टनमधील ‘पार्किन्स इन्स्टिटयूशन’मध्ये शिकत असतानाच त्या थोडं-थोडं बोलायला शिकल्या. पुढे त्या लिखाणही करू लागल्या. त्यात त्यांना काही वादाच्या भोवऱ्यातही गिरक्या घ्याव्या लागल्या. अनेक भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. पुढे त्यांचे शिक्षण न्यूयॉर्कमधील ‘राइट ह्यूमॅरुन स्कूल’ येथे झाले. 1986 साली त्यांनी केंब्रिज स्कूलमध्येही प्रवेश केला. अनेक प्रयत्न करून 1900 साली त्या रॅडक्लिफ कॉलेजात हजर झाल्या. कॉलेजातल्या यांत्रिक शिक्षणाबद्दल त्या जरा नाराजच असायच्या. येथे साहित्यिकांच्या साहित्यकृतीतील चैतन्याचा स्पर्श त्यांना जाणवला नाही. त्यातला गाभा त्यांच्या अंत:करणाला भिडला नाही. त्यांचे शेक्सपिअर शिकवणारे प्राध्यापक जॉर्ज किटरेज मात्र त्याला अपवाद होते. त्यांच्या शिकवण्यामुळे शेक्सपिअर भेटल्याचे समाधान हेलन यांना लाभले. गरीब-श्रीमंत यातील दरी त्यांचे मन उदास करीत असे. गरीब लोकांचे उदास आणि भकास चेहरे, घट्टे पडून ओबडधोबड झालेल्या हातांचा स्पर्श त्यांना अंतर्मुख करी. परमेश्वराने दिलेला मुक्त प्रकाश आणि ताजेतवाने हवापाणी यांच्या मुक्त उपभोगासाठी या माणसांनी शहरातला पैसा, झगमगाट आणि गोंगाट सोडून देऊन खेड्यातील, झाडाझुडपांतील साधे प्रामाणिक जीवन जगावे असे त्यांना मनापासून वाटत असे.

सामाजिक योगदान

हेलन केलर यांनी खूप प्रवास केला आणि त्यांनी स्थापन केलेल्या ‘अमेरिकन फाउंडेशन फॉर ब्लाइंड’ या संस्थेसाठी आणि महिलांच्या हक्कासाठी चळवळी उभारून मोठे समाजकार्य केले. त्यांच्या आयुष्यावर तयार केलेल्या चित्रपटात अॅनी सुलिव्हॅन आणि हेलन केलर यांच्या भूमिका करणाऱ्या दोनही कलाकारांना ऑस्कर पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. 1964 साली त्यांना ‘प्रेसिडेंट मेडल फॉर फ्रीडम’ या अमेरिकेतील सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविण्यात आले होते.

हेलन केलर या अपंग चळवळीस प्रचंड प्रेरणा देणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला माझा स्पर्श एका प्रभावी संभाषणाने झाला. एका श्रोत्याने त्यांना खालील प्रश्न विचारला होता. ‘‘दृष्टिहीनतेपेक्षा कोणते मोठे दुर्भाग्य आहे?’’ त्यावर त्यांनी खालील समर्पक उत्तर दिले होते.

‘‘दृष्टी असून ज्यांच्यापुढे महान स्वप्नं नसणे, हे दृष्टिहीनतेहूनही मोठे दुर्भाग्य आहे.’’

आश्चर्यकारक साहस

आणि निश्चय

एरिक वेनमायर

स्वीकार हीच यशाची गुरुकिल्ली आहे. व्यक्तीने निश्चयपूर्वक आपले सर्वस्व अर्पण करून चिकाटीने प्रयत्न केल्यास खऱ्या अर्थी तो आपल्या पुढील सर्व समस्यांवर मात करून यश मिळवू शकतो. आपल्या वाट्याला आलेल्या प्रतिकूल परिस्थितीचा कधीही बाऊ करू नये; कारण प्रतिकूलता ही मानवी आयुष्यातील अतिशय ज्वलंत प्रेरणा आहे. प्रतिकूलतेमुळे आपल्या चारित्र्याला आकार येतो, आपल्या प्राधान्यक्रमात स्पष्टता येते, आपण आपला योग्य तो मार्ग ठरवू शकतो आणि आपले आयुष्य समृद्ध करू शकतो. प्रतिकूलतेमुळेच आपल्यातील सुप्त क्षमतांना चेतना मिळते.

एरिक वेनमायर **(Erik Weihenmayer)** जगाला सकारात्मकतेचा एक अनोखा संदेश देऊन गेले. 25 मे, 2001 रोजी त्यांनी एव्हरेस्ट हे जगातील सर्वांत उंच शिखर सर केले. त्यात मोठे आश्चर्य ते काय? असा अनेकजण विचारही करतील. तेनसिंग नोर्गे आणि एडमंड हिलरी यांनी तर हे शिखर मानवी इतिहासात पहिल्यांदा 29 मे, 1953 सालीच सर केले होते. हिमालयाच्या साठ लाख वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदा मानवाचे पाऊल या शिखरावर पडले होते आणि त्यानंतर नियमितपणे अनेकांनी याबाबतचे वेगवेगळे उच्चांक नोंदविले आहेत. मग 25 मे, 2001 रोजी असे विशेष ते काय घडले? याच दिवशी एरिक नामक 33 वर्षीय अंध तरुणाने जगातील या सर्वांत उंच शिखरावर आपले पहिले पाऊल ठेवले. एका अंध व्यक्तीने केलेला हा पराक्रम म्हणजे इतिहासात नोंद झालेली सर्वांत विस्मयकारक घटना आहे. एक अंध माणूस जर आपल्या सकारात्मक विचारांच्या साहाय्याने जगातील सर्वोत्तम उंची गाठू शकतो तर आपण सर्वसामान्य माणसे आपल्या सकारात्मक विचारांच्या आधारे आपण स्वत: ठरवलेले कोणतेही ध्येय का गाठू शकणार नाही? याचा उत्कृष्ट धडाच नव्हे, तर एक आव्हान एरिक यांनी आपल्याला दिले आहे. एरिक येथेच थांबले नाहीत, तर जगातील सात खंडांमधील प्रत्येक खंडातील सर्वोच्च शिखर आपण सर करणार हा निश्चयच त्यांनी केला.

16 ऑगस्ट, 2008 या दिवशी 'कारस्टेन्झ पिरॅमिड' हे ऑस्ट्रेलिया खंडातील सर्वोच्च शिखर पादाक्रांत करून एरिक वेनमायर यांनी आपला हा निश्चय पूर्ण केला. या कामगिरीमुळे असा विक्रम करणाऱ्या 100 गिर्यारोहकांच्या यादीत ते दाखल झाले आणि त्यातील सर्वांत लहान, तरुण गिर्यारोहक ठरले. यापुढे जाऊन त्यांनी 'एल कॅपिटन' हा योसेमाइट व्हॅलीतील 3,300 फुटांचा धबधबा आणि 'माउंट केनया' हा 17,000 फूट उंचीचा अतिशय अवघड आणि क्वचितच सर केला जाणारा पर्वतही सर केला.

अल्कामारिनायोक पेरू येथील अतिशय देखणे 19,511 फूट उंचीचे शिखरही ते चढले. अशाप्रकारे आपल्या चमकदार कारकिर्दीवर त्यांनी सुवर्णकळसच चढवला.

साहस आणि प्रयत्न

एरिक वेनमायर याचा जन्म 23 सप्टेंबर, 1968 रोजी झाला. जन्मत:च रेटिनोस्चिसिस **(Retinoschisis)** या दुर्धर नेत्ररोगाने एरिकला पछाडले. त्यामुळे हळूहळू येणाऱ्या अंधत्वाची तो शिकार झाला. या रोगाचा प्रभाव वाढतच राहिला आणि एरिक वयाच्या 13 व्या वर्षी पूर्णत: अंध झाला. एरिकचे वडील 'एड' हे मात्र एरिकला सतत प्रोत्साहन देत असत. आंधळा माणूस काय करू शकतो आणि काय करू शकत नाही याचे मार्गदर्शन देण्यासाठी त्यांनी एरिकला तयार केले. अनेक वेळा ते एरिक आणि त्याच्या भावाला दूरच्या रपेटसाठी घेऊन जात असत. अंधांच्या अनेक साहसी शिबिरात ते एरिकला भाग घ्यायला लावीत. अशा शिबिरांमुळेच गिर्यारोहणाची सारी कौशल्ये एरिक आत्मसात करू शकला. अशाप्रकारे गिर्यारोहणातील त्यांच्या अद्‌वितीय कामगिरीची बीजे त्यांच्यात लहाणपणीच रुजायला लागली. 1987 मध्ये एरिकने पदवी संपादन केली. कुस्तीगीर म्हणून राष्ट्रीय सन्मानही मिळविला. त्यामुळे 'कनेक्टिकटचा' सर्वांत साहसी खेळाडू म्हणून एरिक ओळखले जाऊ लागले. 1995 साली बॉस्टन महाविद्यालयातून त्यांनी उच्चशिक्षणातील उच्च पदवी संपादन केली. त्याचबरोबर निसर्गावर हुकमत गाजविण्याची कलाही ते अवगत करीत राहिले आणि शाळेतही त्यांनी प्रशिक्षक म्हणून कामाला सुरुवात केली.

जगन्मान्य गिर्यारोहक

1950 साली त्यांनी 'माउंट मॅक किनले' हे उत्तर अमेरिकेतील 23,320 फूट उंचीचे सर्वोच्च शिखर सर करून अशी कामगिरी करणारा पहिला अंध गिर्यारोहक ही ओळख जगाला करून दिली. 'अमेरिकन फाउंडेशन फॉर ब्लाइंड' या संस्थेने पुरस्कृत केलेल्या या मोहिमेमुळे एरिक हे जगन्मान्य गिर्यारोहक झाले. अर्थात ही तर त्यांच्या जादुई कारकिर्दीची नुसती सुरुवातच होती. झलकच होती म्हणाना! त्यांच्या या क्षेत्रातील अजोड कामगिरीमुळे त्यांना 1996 च्या ऑलिम्पिक स्पर्धेत 'ऑलिम्पिक ज्योत' वाहून नेण्याचा बहुमान मिळाला होता. त्यानंतर एका वर्षाने म्हणजे 1997 साली एरिक यांनी 19,339 फूट उंचीच्या 'किलीमांजरो' या आफ्रिका खंडातील सर्वोच्च शिखरावर चढाई केली. ही मोहीम एरिक यांच्या दृष्टीने विशेष स्मरणीय ठरली; कारण याच मोहिमेत 13,300 फूट उंचीवर त्यांचा 'एलन रीया' या युवतीबरोबर विवाह सोहळा पार पडला. स्थानिक भाषेत 'फ्रीडम' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पर्वतावर एरिक मात्र आपले 'फ्रीडम' गमावून बसले. एरिक इतकाच एलनलाही गिर्यारोहणाचा ध्यास आहे. ते दोघेही नेहमीच स्वत:ची चाचणी घेण्यासाठी उत्सुक असतात. ते म्हणतात, "जेव्हा आपली दृष्टी जाते तेव्हा आपण काय कार्य करू शकू? असा प्रश्न आपल्याला भेडसावतो. आपल्या क्षमतांबद्दल प्रश्नचिन्ह उभे राहते. मी जेव्हा गिर्यारोहणाला सुरुवात केली तेव्हा या सर्व प्रश्नांना सामोरे गेल्याने मला त्यांची उत्तरे मिळत गेली. माझ्या या आजाराच्या मर्यादा आणि आव्हाने समजत गेले. आपण आपल्या आयुष्यापासून, जगण्यापासून काय अपेक्षा करू शकतो, याची जाणीव व्हायला लागली. डोळ्यात उच्चदाब असूनही मी पर्वत शिखरावरची एवढी उंची गाठू शकलो ही गोष्ट 'ग्लुकोमा' असणाऱ्या प्रत्येकाला प्रोत्साहित करणारी नाही का?"

जगण्याची प्रेरणा: आव्हाने

एरिक यांचे जीवन आपणा सर्वांना स्पष्ट आणि स्वच्छ जाणीव करून देते की, “योग्य कौशल्ये हस्तगत केली आणि प्रयत्नात सातत्य ठेवले तर जगात काहीही मिळवणे अशक्य नाही.” एरिकने वेगवेगळ्या खंडातील सर्वोच्च शिखरे गाठण्याचा जो निश्चय केला होता त्यातील दुसरे शिखर त्यांनी ऑगस्ट 1997 ला सर केले. एरिक यांचे चरित्र वाचायला सुरुवात केल्यावर एका प्रश्नाने माझे मन ग्रासले. तो म्हणजे, “माणसाच्या मनात साहसाचा जन्म केव्हा, कसा आणि कोठे होतो?” कारण यापूर्वी गिर्यारोहण हा विषय आला की, तो हिमालयातील एव्हरेस्ट शिखरावर संपत असे; परंतु सात खंडांमधील सात सर्वोच्च शिखरे आणि एल कॅपिटन, माउंट केनया यासारखी आव्हाने एरिक यांना कोठे दिसली? ती सर करण्याची आव्हाने त्यांनी कशी स्वीकारली? आणि ती पार पाडण्याची स्फूर्ती आणि ध्यास त्यांच्यात कसा निर्माण झाला? एरिक यांना या आव्हानातील धोके दिसत नव्हते. म्हणून ते अशी आव्हाने न घाबरता स्वीकारू शकत होते का? कारण बऱ्याच वेळा आपल्याला असे धोके अगोदरच दिसतात आणि म्हणूनच अशी आव्हाने स्वीकारण्याच्या अगोदरच आपले मनोधैर्य खचून जाते का? प्रत्यक्ष आव्हान स्वीकारण्याच्या आधीच आपण पराजय स्वीकारतो का? अंध तरुण तर सोडाच; पण एरिक यांचे चरित्र वाचणाऱ्या डोळस तरुणांनासुद्धा या चरित्रापासून यशाकडे झेप घेण्याची दुर्दम्य इच्छा झाल्याशिवाय राहणार नाही याविषयी मला गाढ खात्री आहे. ज्यांना त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळाली असेल त्यांच्या प्रेरणेला आणि उत्साहाला मग उधाणच येत असणार आणि हे बाळकडू, हे संस्कार मुलांच्या संस्कारक्षम वयात झाले, तर त्यांच्या भवितव्याला नक्कीच वेगळाच साज चढेल, यात शंका नाही.

‘नॅशनल फाउंडेशन फॉर ब्लाइंड’ या अमेरिकेतील संस्थेने एरिक यांच्यासाठी माउंट एव्हरेस्ट ही मोहीम 2001 साली पुरस्कृत करण्याचे जाहीर केले. अर्थातच तोपर्यंत एरिक यांनी उत्तर अमेरिका, आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि अंटार्क्टिका या चार खंडातील सर्वोच्च शिखरे काबीज केलेली होतीच. आव्हाने आणि थरारक साहसी कामे त्यांना नवीन नव्हती. इथे एरिक यांनी आपल्या दुर्दम्य साहसाला (अनोख्या भवितव्याला) सुरुवात करण्यापूर्वीची परिस्थिती समजून घेणे उपयुक्त ठरेल. आपले अंधत्व स्वीकारताना ते म्हणाले होते, “मी जेव्हा पूर्ण आंधळा झालेला नव्हतो तेव्हा मला खेळात भाग घेण्यासाठी खूप बंधने, मर्यादा येत असत; कारण त्यामुळे माझी रेटिना खराब तर होणार नाही ना? अशी सतत भीती असायची. आता माझ्या पूर्ण अंधत्वामुळे त्या सर्व मर्यादा संपलेल्या आहेत. दृष्टिहीन होण्यापेक्षा आता माझे जास्त नुकसान ते काय होणार आहे? एका अर्थी मी आता मुक्तच झालो, नाही का?”

अंधत्वाच्या या धक्क्यातून ते सावरत नाही तोच नियतीने त्यांच्यावर दुसरा मोठा आघात केला, तो म्हणजे, एका दुर्दैवी अपघातात त्यांच्या आईचा मृत्यू झाला. हा आघात मात्र एरिक यांना आपली दृष्टी गमावण्यापेक्षाही दु:खदायक वाटला होता; परंतु आपल्या कुटुंबातील परस्परांच्या जिव्हाळ्यामुळे आणि बांधिलकीमुळे एरिक उभे राहिले आणि आपल्या या अद्‌वितीय भवितव्याचा पाठपुरावा करू शकले. सुरुवातीला जेव्हा एरिकच्या आई-वडिलांनी त्यांना अंध तरुणांच्या कौशल्यशिबिरात दाखल होण्यासंबंधी सांगितले तेव्हा एरिक एवढे उत्सुक नव्हते; पण तरी ते शिबिरात दाखल झाले आणि त्या

शिबिरात पर्वतावर कशी चढाई करायची याचे ते अविस्मरणीय कौशल्य शिकले. ते म्हणतात, "माझ्या सर्व संवेदनाच जागृत झाल्या आणि आपण आता गिर्यारोहण करू शकतो या कल्पनेने मी भारावून गेलो. त्यानंतर मी कधीही मागे वळून पाहिले नाही आणि कोठे थांबलोही नाही."

गिर्यारोहकांच्या 'टीम'मध्ये सहभागी होताना एरिक यांचा दृष्टिकोनही वाखाणण्यासारखा होता. ते म्हणतात, "मी कोणत्याही टीमची कमकुवत कडी व्हायचे नाकारले. त्यांचेही आयुष्य मी माझ्या तळहातावर घेतले; कारण ते सर्व मला तसेच वागवत होते. मी प्रत्येक वेळी माझी जबाबदारी सांभाळून इतर सभासदांच्या बरोबरीने काम केले. पर्वताच्या शिखरावर फुटबॉलसारखे टोकावर टाकणे मला कधीच मान्य नव्हते; कारण मला शिखरावर सन्मानाने पोहोचायचे होते". एरिक किती स्वाभिमानी, स्वत:चा आणि इतरांचा आदर करणारे होते, नाही? एरिक यांचे संपूर्ण आयुष्यच साहस आणि निश्चयाने ओतप्रोत भरलेले आहे.

मीच माझा शिल्पकार

सुरुवातीला एरिक यांची दृष्टी अगदी अंधूक होती. ती हळूहळू कमकुवत होत गेली आणि वयाच्या तेराव्या वर्षी ते पूर्णपणे अंध झाले. त्यांना नैराश्यानेही घेरले होते. एकांगीही वाटू लागले होते; मित्रांपासून ते दूर राहू लागले होते; परंतु नवनवीन तंत्रज्ञानाचा आणि कार्यपद्धतांचा उपयोग करून हळूहळू त्यांनी आपल्या अंधत्वाचा स्वीकार करत त्यावर मात करायला सुरुवात केली. आपले शिक्षण चालू ठेवून खेळात सहभागी व्हायला सुरुवात केली; तसेच आपल्या शक्तीचा आणि स्वातंत्र्याचा अनुभव घ्यायलाही सुरुवात केली. कुस्तीत सहभागी होताना त्यांनी आपल्या अपंगत्वाची कधी कीव केली नाही आणि कधी अवाजवी फायदाही घेतला नाही. सराव करीत असतानासुद्धा आपल्याला सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणेच वागवावे असा त्यांचा आग्रह असे. या प्रत्येक वेळी त्यांच्याबरोबर त्यांची आई असे. शिबिरातून मिळवलेल्या कौशल्यांचा, आपल्याजवळ असणाऱ्या संवेदनशील हुशारीचा आणि सवयीने मिळविलेल्या अनुभविक अंदाजाचा उपयोग करीत त्यांनी गिर्यारोहणावर स्वामित्व प्रस्थापित केले आणि त्यातच आपले भवितव्य घडवायचे ठरविले.

एरिझोनात एरिक यांनी काही साक्षीदारांच्या मदतीने स्थानिक टेकड्या चढायला सुरुवात केली. या अनुभवाने आनंदित होऊन त्यांनी आपला बहुतेक रिकामा वेळ गिर्यारोहणात घालावयाचे ठरविले. खूप सरावानंतर मोठे साहस दाखवून त्यांनी अमेरिकेतील सर्वांत उंच पर्वतशिखर 'मॅक किनले' सर करण्याची तयारी चालू केली. सर्वसामान्य माणसासाठी खूप मोठे वाटणारे हे आव्हान होते; परंतु एरिकसारख्या अंध व्यक्तीस हे शिखर सर करण्याची इच्छा निर्माण व्हावी, हेच एव्हरेस्टची उंची गाठण्यासारखे आहे. 19 दिवसांचा हा ट्रेक एरिकने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने जून 1995 मध्ये पूर्ण केला. ही घटना कोणालाही आपल्या जीवनाचे सार्थक झाल्याचे वाटावे अशीच आहे; पण येथे थांबले असते, तर ते एरिक वेनमायर कसले? त्याच दिवशी त्यांनी जगातील गिर्यारोहकांच्या पुढे असणारी सर्व आव्हाने आपण पार करून दाखवायची असा निर्धार केला असावा. माझ्या मनातील नेहमीचाच प्रश्न परत चमकला. तो म्हणजे, अशा दिव्य कल्पना या अजब माणसांच्या मनात उत्पन्न तरी कशा होत असतील? आणि त्याचे उत्तरही मला संजीवनी मराठे यांच्या या ओळींत सापडले :

मी न कुणाला सांगायची कविता स्फुरते कशी ।
जशी अचानक जनी प्रकटते मनातली ऊर्वशी ॥

कल्पना कशा सुचतात ते सांगता येत नाही; कारण प्रतिभा म्हणजे अचानक प्रकट होणाऱ्या गोष्टी होय. याच दृष्टीने एरिक यांचे संपूर्ण जीवनच अगम्य, आश्चर्यकारक आणि दिव्य स्फूर्ती देणारे वाटते.

एरिक यांच्या या विलक्षण वाटचालीदरम्यान त्यांचे विचार, ध्येयधोरणे कशी होती, हे जाणून घेणे प्रेरक ठरेल. अंध झाल्यानंतर सुरुवातीलाच त्यांनी 'पांढरी काठी' किंवा 'ब्रेल लिपी' चा उपयोग करायचे टाळले होते; परंतु पुढील वाटचालीसाठी या गोष्टींची गरज पडणार आहे, हे त्यांनी स्वीकारले. त्यांच्या यशाची गुरुकिल्ली 'स्वीकार' हीच आहे. मला दृष्टी आहे असे ढोंग, दिखावा न करता अशा कार्यपद्धती शोधून काढायच्या की, त्यामुळे आपण दृष्टी नसतानाही उत्कृष्टता साध्य करू शकू. यासाठी त्यांनी दृष्टीपेक्षाही स्पर्श आणि संवेदना यांचा उपयोग प्रभावीपणे करता येईल अशी कार्यक्षेत्रे निवडली.

एरिक यांनी जेव्हा एव्हरेस्ट सर करायचे ठरविले तेव्हा त्यांनी हिमालयातील वातावरणाचा सखोल अभ्यास केला होता. यासंबंधी अनेक तज्ज्ञांना भेटून त्यांच्याशी अनेकवेळा चर्चा केल्या होत्या. त्याचा त्यांना चांगला फायदाही झाला. सह-गिर्यारोहकांबरोबर राहून त्यांच्यात एक सांकेतिक भाषाही तयार झाली होती. एकमेकांना इशारे देण्यासाठी घंटेचा उपयोग केला जात होता. एरिक यांना गिर्यारोहणासाठी अनेक पुरस्कर्ते मिळत होते आणि त्यांनीही यश मिळविण्याचा निश्चय केला होता; कारण त्यांच्या दृष्टीने तर ही अंध आणि सर्व पुरस्कर्त्यांची प्रतिष्ठाच होती. त्यामुळे आपला पराभव झालाच तर तो दृष्टीच्या अभावामुळे नाही तर हृदय, मेंदू, फुप्फुसामुळे व्हावा अशी काळजी ते सतत घेत होते. त्याचबरोबर आपण प्रयत्नच न करण्यापेक्षा अपयशी झालो तरी चालेल अशीच त्यांची जिद्द होती. दोन महिने अविश्रांत मेहनत घेऊन ते एव्हरेस्ट शिखराच्या अगदी जवळ पोहोचले होते. त्याचदरम्यान हवामानात अचानक प्रतिकूल बदल झाल्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली होती. जवळ-जवळ 90 टक्के गिर्यारोहक 27,500 आणि 28,750 फूट उंचीवरूनच माघारी परतत होते. पुढचा प्रवास अतिशय खडतर होता. वाऱ्याचा वेग साधारणत: ताशी 100 मैल इतका होता. पुढचा 656 फूट उंचीचा कडा लहान मुलाच्या पायाने चढावा लागतो. हा कडा पार केल्यावर 'हिलरी पायरी' लागते. हा 39 फुटांचा चढाव म्हणजे शिखरावर पोहोचण्यासाठीचा शेवटचा अडसर. त्यानंतर 45 मिनिटे या कड्यावरून चालत जावे लागते. अनंत अडचणींवर मात करीत एरिक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही आव्हाने पार केली. शिखरावर त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना हाक मारली आणि सांगितले. ''आता थोडा थांब, आपण जिंकलो आहोत. एव्हरेस्ट या जगातील सर्वांत उंच शिखरावर आपण पोहोचलो आहोत.'' सर्वचजण आनंदाने हुरळून गेले होते.

2001 ची हिमालयातील एव्हरेस्टची मोहीम सर्वांत यशस्वी ठरली होती. ती फक्त एरिक यांनी हे शिखर जिंकले म्हणून नाही, तर 'नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाइंड' यांनी पुरस्कृत केलेले 19 गिर्यारोहकही या शिखरावर पोहोचले होते आणि हा एक संघाचा त्यावेळेपर्यंतचा विक्रम होता. संघातील सर्वांत वृद्ध म्हणजे 64 वर्षं वय असणारे ''शेर्मन बुल' आणि त्यांचा मुलगा 'ब्राड' हादेखील यात सहभागी होता.

दृष्टी असलेल्या व्यक्तींनाही अतिशय अवघड वाटणारे असे यश एरिक यांनी मिळवले

होते. त्यांनी जे केले त्याची तुलना कशाशीच होणार नाही; कारण आतापर्यंत अशी कामगिरी त्यांच्यासारख्या असणाऱ्याने कोणीच केलेली नव्हती. हे अद्‌वितीय असेच यश होते. यावरून निर्विवादपणे हेच सिद्ध होते की, माणसाने निश्चयपूर्वक आपले सर्वस्व अर्पण करून, चिकाटीने प्रयत्न केल्यास तो सर्व मर्यादांचे उल्लंघन करून यश मिळवू शकतो.

अमेरिकेतील विमानतळावर पोहोचल्यावर एरिक म्हणाले होते, "हिमालयातील एव्हरेस्टवरची चढाई तर महान होतीच; परंतु मला आलेल्या अनुभवांपैकी हा एक अद्वितीय अनुभव होता." त्यानंतर आपली मुलगी 'इमा' हिच्या बरोबर चालताना त्यांच्या एका अनुभवाचे स्मरण त्यांना झाले. ते दोघे त्यांच्या पत्नीसाठी पाव खरेदी करण्यासाठी जात होते. इमा त्यांचा हात ओढत होती. तिची बोटे त्यांच्या मधल्या बोटावरून फिरत होती. तो स्पर्श आणि त्या भावना यादेखील पर्वतशिखराची एक प्रचंड उंचीच गाठत होत्या. अशी शिखरे तर आयुष्यात पदोपदी भेटतच असतात, खुणावतही असतात. फक्त कुठे बघायचे हे आपल्याला ठाऊक असायला हवे आणि त्यासाठी आपल्याला बाह्य दृष्टीची गरज असतेच असेही नाही.

एक आव्हान

सप्टेंबर 2003 मध्ये जगातील सर्व गिर्यारोहकांसाठी एक अवघड स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेत 9 दिवसांत 460 मैलांचा, 60,000 फुटांचा चढ-उतार असलेला प्रवास करावयाचा होता आणि प्रवासात विश्रांतीसाठी जवळ-जवळ वावच नव्हता. ही स्पर्धादेखील एरिक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पार केली होती. त्यानंतर या टीमने तिबेटमधील अंध तरुणांना हिमालयात 21,000 फूट उंचीपर्यंत प्रशिक्षण देऊन त्यांच्यासाठी वेगवेगळ्या संधी निर्माण केल्या. त्यानंतर अपंग सैनिकांच्या गटालाही हिमालयात 21,000 फूट उंचीपर्यंत नेऊन आणले. त्यात अंध, पाय तुटलेले आणि मानसिक आघात झालेले सैनिक होते. अपंग माणसेही संधी मिळाल्यास अवघड गोष्टी शक्य करू शकतात, हे सिद्ध करणे, हा उद्देश या मोहिमेमागे होताच.

सकारात्मक दृष्टीचे व्यक्तिमत्त्व

लेखक आणि प्रेरणादायी वक्ता म्हणून एरिक यांनी जगभर प्रवास केला. त्यांच्या व्याख्यानाचा विषय बहुधा "आपल्यासमोरील संकटाचे रूपांतर संधीत कसे करावे?" हाच असायचा. हे करत असताना जगातील अनेक नामवंत व्यक्तींबरोबर व्यासपीठावर सहभागी होण्याचा सन्मान त्यांना लाभला.

एरिक वेनमायर यांचे संपूर्ण जीवन सकारात्मकतेने खच्चून भरलेले आहे. त्यांचे जीवन आपल्याला हे शिकवून जाते की, व्यक्तीने आपल्यापुढे वाढून ठेवलेल्या, आपल्या वाट्याला आलेल्या प्रतिकूल परिस्थितीचा कधीही बाऊ करू नये. प्रतिकूलता ही तर आयुष्यातील अतिशय ज्वलंत प्रेरणा आहे. त्यामुळे आपल्या चारित्र्याला आकार येतो. आपल्या प्राधान्यक्रमांत स्पष्टता येते. प्रतिकूल परिस्थितीतील अनुभवांनुसार आपला मार्ग निश्चित करण्याची निर्णयक्षमता निर्माण होते. आपल्यातील सुप्त गुणांना स्पष्ट दिशा प्राप्त होते. एरिक यांचे आयुष्य आपण आपल्या समोरील प्रतिकूलतेचे रूपांतर शक्तिशाली प्रेरणेत कसे करू शकतो हे शिकवते. आपल्या पुढील प्रतिकूलतेचा सामना करण्याच्याही पुढे जाऊन आपले भविष्य घडविण्याची अशी

प्रेरणा देते आणि त्यामुळे प्रत्येक दिवशी आपण आपल्या प्रतिकूलतेचे रूपांतर आपल्या कार्याची, सहनशीलतेची पातळी वाढविण्यात करू शकतो. आपण आयुष्याला एक वेगळाच अर्थ प्राप्त करून देऊ शकतो. आपल्या आयुष्याला अतुलनीय उंचीपर्यंत पोहोचवू शकतो. एरिक वेनमायर यांचे जीवन आपल्याला हेच मार्गदर्शन शिकवून जाते.

अतुलनीय

आत्मविश्वास

लेगसन कायरा

माणसाने स्वत:च्या अंत:शक्तीवर श्रद्धा ठेवली आणि स्वत:कडून सकारात्मक अपेक्षा ठेवल्या, तर तो कोणत्याही परिस्थितीतून काहीही साध्य करू शकतो. बहुधा स्वत:कडून सकारात्मक वागणुकीची अपेक्षा करतो; परंतु स्वत: मात्र सकारात्मक नसतो. लेगसन कायरांनी अनवाणी पायांनी अज्ञात अमेरिकेचा प्रवास चालू केला, तेव्हा फक्त आपण हे करू शकू असा दुर्दम्य विश्वासच त्यांच्याकडे होता. इतरांकडूनही त्यांना भरपूर मदत मिळाली; पण हा ओघ त्यांच्यातले प्रगल्भ व्यक्तिमत्त्व, दुर्दम्य इच्छा आणि आत्मतेज यामुळेच सुरू झाला. प्रवास सुरू करताना लोकांनी आपल्याला मदत करावी ही अपेक्षा ठेवून त्यांनी आपला प्रवास सुरू केला नव्हता, तर त्यांच्याकडे प्रचंड आत्मविश्वास होता हे लक्षात घेण्यासारखे आहे.

लेगसन कायरा **(Legson Kayira)** यांचा जन्म 10 मे, 1942 या दिवशी आफ्रिकेतील न्सालँडमधील मॅपल या लहान गावात झाला. लेगसन जन्मत:च खूप धिप्पाड देहयष्टीचा असल्यामुळे त्याचा सांभाळ करणे त्याच्या आईला फार जड जात होते. म्हणून तिने या बाळाला डिडीमू या नदीत फेकून दिले; परंतु 'देव तारी त्याला कोण मारी' या न्यायाप्रमाणे दुसऱ्या एका महिलेने त्याला नदीतून बाहेर काढले आणि आईकडे परत आणून दिले. त्यामुळे पुढे त्याला डिडीमू हेच नाव मिळाले. त्यानंतर इंग्रजी शाळेत असताना त्यांनी इंग्रजी धर्तीवर लेगसन या नावाचा स्वीकार केला आणि लेगसन डिडीमू कायरा असे नाव धारण केले.

गरीब कुटुंबात जन्म

लेगसनचे आईवडील अशिक्षित आणि खूप गरीब होते. लेगसन यांचे असे मत होते की, 'परमेश्वराने आतापर्यंत निर्माण केलेल्या सर्वांत दरिद्री घरात माझा जन्म झाला होता.' गायी चरायला नेणे आणि रात्री धान्याच्या कोठारात झोपणे अशी त्यांची दिनचर्या होती. त्यांची आजी मात्र त्यांना रोज रात्री काही शहाणपणाच्या गोष्टी सांगत असे. बहुधा त्यांच्या आयुष्यातील वेगळेपणाची बीजे इथेच रुजली असणार. त्यांनी स्कॉटलंड मिशनरी शाळेत प्रवेश घेतला. त्यांच्या शाळेची वार्षिक फी सहा पेनी होती. अनेक महिने काबाडकष्ट करून त्यांच्या आईवडिलांना ही फी गोळा करावी लागत असे. शाळेत कागद, पेन्सिल किंवा पुस्तकेही उपलब्ध नव्हती. शाळेत शिकायला येताना विद्यार्थ्यांना शिक्षकांचे जेवणही आणावे लागे आणि त्यांची बागेतील कामेही करावी लागत असत. बऱ्याच वेळा मुले अभ्यासापेक्षा रस्ते बांधण्यातच जास्त वेळ व्यग्र असत. म्हणूनच खेड्यातील मुलांचा कल शाळेत जाण्यापेक्षा जास्तकरून गुरे

वळण्याकडेच अधिक असे. लेगसनलाही शाळा सोडण्याची खूप इच्छा होती; परंतु त्या वर्षाची फी भरलेली असल्यामुळे पालकाने त्याची शाळा सुरू ठेवण्यावरच भर दिला. पुढील शाळा या गावापासून सुमारे आठ मैल दूर होती. हे अंतर पायी कापणे तसे अवघडच होते. पावसाळ्यात तर ते जिकिरीचेच होत असे. अंगावर पुरेसे कपडे नसल्यामुळे त्याला त्या शाळेत प्रवेश नाकारला गेला होता. याही परिस्थितीत लेगसनने परीक्षेत यश मिळवून दाखविले; परंतु वय लहान आहे या सबबीवर पुढील शिक्षणासाठी त्याला प्रवेश नाकारला गेला.

पुढील शिक्षणासाठी लेगसनकडे पैसा नव्हता; पण या मुलातली चमक बघून शाळेच्या अधीक्षकाने प्रयत्न करून 200 मैलावर असणाऱ्या देशातील चार विद्यालयांपैकी 'करोंगा' येथील सुप्रसिद्ध 'लीव्हिंग स्टोनिया' या शाळेत त्याला प्रवेश मिळवून दिला. दुर्दैवाने त्याचदरम्यान त्याच्या वडिलांचे निधन झाले. त्याची आई आणि गावातल्या इतर मंडळींनी त्याला शाळा सोडायचा सल्ला दिला; परंतु आपण दारिद्र्यातून बाहेर पडण्याचा शिक्षण हा एकमेव मार्ग आहे असे लेगसनला वाटत होते. त्याची शाळेतील कामगिरीही अगदी उत्तम होती. अशा खडतर परिस्थितीत काही वर्षे त्याने आपले शिक्षण चालूच ठेवले. मिळतील ती पुस्तके लेगसन वाचत असे. त्यातूनच त्याच्या मनात अमेरिका, अब्राहम लिंकन आणि ब्रुकर वॉशिंग्टन यांच्याबद्दल प्रचंड आकर्षण निर्माण झाले. 'अप फ्रॉम स्लेव्हरी' या पुस्तकाने तर त्याला भारून टाकले होते. आता पुढे त्याने शिक्षक बनण्यासाठी प्रशिक्षण घेणे अपेक्षित होते; परंतु लेगसनच्या मनात मात्र वेगळेच काहीतरी होते.

एके दिवशी देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आयोजित केलेल्या मोर्चात ते सहभागी झाले होते. तेथे त्यांना 'डॉक्टर हेस्टिंग कामुझू' यांचे भाषण ऐकण्याची संधी मिळाली. त्यांनी सांगितले होते की, "लिंकन यांचा देश अर्थात अमेरिका ही एक अशी जागा आहे की, जेथे व्यक्तिस्वातंत्र्याला खरा अर्थ आहे. तेथे प्रत्येक व्यक्ती खऱ्या अर्थाने हे स्वातंत्र्य उपभोगू शकते." त्याचवेळी आपण अमेरिकेत जाऊनच शिक्षण घ्यायचे हे लेगसन यांनी ठरवूनच टाकले. आपण अमेरिकेत पदवी मिळवूनच मायभूमीच्या उद्धारासाठी देशात परतू असा त्यांचा निश्चय या मोर्च्यातच पक्का झाला. आपल्या न्यासालँडमध्ये तीस लाख माणसे आहेत; परंतु त्यात फक्त 22 पदवीधर आहेत. अमेरिकेतून पदवी घेणारा एकही माणूस माझ्या देशात नाही, मीच तो मान प्रथम मिळविणार हेही त्यांनी पक्के केले. पैसा नसलेली, शिक्षण नसलेली तरुण मुले कोणतेही काम मिळवू शकत नाहीत आणि मग ते चोर, लुटारू होतात आणि देशाचा सत्यानाश करतात. मी मात्र वेगळे चांगले काहीतरी करणार आहे असा विचार त्यांच्या मनात ठाम होता.

मोठे व्हायचे असेल तर अमेरिकेत जाऊन उच्चशिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे या विचाराने त्यांना घेरले; परंतु आपण अमेरिकेत कसे जाणार? असा विचार डोक्यात आल्यावर त्यांना त्याचे एकच उत्तर मिळत होते आणि ते म्हणजे चालत जाणे. एक दिवस मनाचा निश्चय करून त्यांनी अमेरिकेच्या दिशेने चालायला सुरुवात केली. या प्रवासाचे वर्णन त्यांनी आपल्या 'आय विल ट्राय' या आत्मचरित्रात केले आहे. आफ्रिकेतील जीवनावर त्यांनी पाच उत्तम कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

अमेरिकेच्या दिशेने

एके दिवशी 'लेगसन कायरा' यांनी 14 ऑक्टोबर, 1958 या दिवशी आपण अमेरिकेला पायी जायला निघणार असल्याचे जाहीर करून टाकले. अमेरिका कोठे आहे याची त्या गावातील कोणालाच कल्पना नव्हती. पाच दिवस पुरेल एवढी शिदोरी त्यांच्या आईने लेगसनबरोबर बांधून दिली. अनवाणी पायांनी, खिशात दमडीही नसताना शाळेच्या पोशाखात लेगसनने अमेरिकेकडे प्रस्थान केले. आफ्रिकेचा नकाशा, जगाचा नकाशा, एक छोटी कुऱ्हाड, एक ब्लँकेट आणि 'पिलग्रीम्स प्रोग्रेस' व 'बायबल' ही पुस्तके एवढेच भांडवल त्यांच्या जवळ होते. उत्तरेकडे जाऊन न्यूयॉर्ककडे जाणाऱ्या एखाद्या बोटीवर काम मिळवून अमेरिका गाठण्याचा त्यांचा मनोदय होता.
तीन दिवसांतच त्यांनी न्यासालँडची सीमा ओलांडली आणि टांझानियातून मजल दरमजल करीत आपला प्रवास सुरू ठेवला. ऊन, पाऊस, वादळ, वारा, घनदाट जंगल यांचा सामना करीत ते चालतच होते. प्रवासात ते अनेक लोकांशी मैत्री जोडत होते. कधी ते हमरस्त्याने, कधी खेड्यांना जोडणाऱ्या पायवाटेने प्रवास करीत असत, तर कधी रेल्वे रुळाच्या कडेने वाट चालत असत. चालताना नक्कीच त्यांच्या मनात येत असणार की, पैसे असते तर आपण याच रेल्वेने प्रवास करू शकलो असतो. बऱ्याच वेळेला रस्ता शोधण्यासाठी कोणीच मदत करू शकत नव्हते. मात्र त्यांनी ठरविले होते की, आपण उत्तरेकडे चालत राहायचे आणि उत्तर दिशा ही आपल्या उजव्या हाताला आहे.
पोट भरण्यासाठी त्यांनी हमालीची कामेही केली. जेव्हा त्यांना जास्त पैसे मिळत तेव्हा त्यातील काही पैसे ते घरी आपल्या भावंडांसाठीही पाठवीत असत; कारण तसे वचनच त्यांनी आपल्या आईला दिले होते. जेव्हा पुरेसे अन्न मिळत नसे तेव्हा ते साखरेचे पाणी पिऊन दिवस काढीत असत. प्रवासात येणाऱ्या अडचणी बघता आपण आपल्या घरी परतावे अशी तीव्र इच्छाही त्यांना होत असे. पुढील शहरात पोहोचल्यावर जेव्हा त्यांना वर्तमानपत्र पहायला मिळाले तेव्हा आफ्रिकेतील स्वातंत्र्यचळवळीचे नेते बंडा यांना अटक झाली आणि तेथे दंगे सुरू झाले आहेत या बातमीने ते निराश झाले. आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेची त्यांना खूपच काळजी वाटू लागली; परंतु त्यांनी माघार घेतली नाही.

स्कॅगीट व्हॅली कॉलेजात प्रवेश

एक वर्षापेक्षा अधिक काळ बहुतांशी पायी प्रवास करीत ते एक हजार मैलाचे अंतर कापून कस्टमला चुकवून युगांडात दाखल झाले होते. तेथे अमेरिकेने चालवलेले एक मोठे वाचनालय होते. त्याचा उपयोग ते करू लागले. एक दिवस अचानकच त्यांना अमेरिकेतील कॉलेजांची मार्गदर्शिका सापडली. त्यात पहिलेच नाव 'स्कॅगीट व्हॅली कॉलेज' चे होते. लेगसनने त्या कॉलेजला पत्र पाठविले. दोन आठवड्यातच त्यांचे उत्तर आले. त्यांनी लेगसनला दोन वर्षांसाठी संपूर्ण शिष्यवृत्ती आणि नोकरी शोधून देण्यास मदत करण्याची तयारी दाखविली होती; परंतु त्यांना न्यासालँडचा पासपोर्ट आणि सुदानचा व्हिसा मिळेपर्यंत काही काळ प्रतीक्षा करावी लागली. त्यानंतर आयुष्यातील पहिली बुटाची जोडी खरेदी केली आणि परत पायी चालायला सुरुवात केली. मिळेल तेथे सायकल; कार यांचीही मदत घेतली. अमेरिकेला स्टुडंट व्हिसा मिळविण्यासाठी पैसा आणि पुरस्कर्ता असण्याची आवश्यकता होती; परंतु वकिलातीतील एक कॉकसन नानाचे

अधिकारी ‘कॉकसन’ हे लेगसन कायरा यांच्या व्यक्तिमत्त्वाने एवढे प्रभावित झाले होते की, त्यांनीच स्कॅगीट व्हॅली कॉलेजशी संपर्क साधून तेथील विद्यार्थी आणि नागरिकांकडून निधी उभा केला आणि त्यातूनच लेगसन कायरा अमेरिकेत पोहोचले. एवढेच नाही तर तिथल्या एका कुटुंबाने त्यांच्यासाठी घरही उपलब्ध करून दिले होते.

एक सुप्रसिद्ध (हिरो) म्हणून अमेरिकेत आगमन

अमेरिकन वकिलातीने दिलेला सूट परिधान करून 16 डिसेंबर, 1960 रोजी लेगसन कायरा यांनी न्यूयॉर्कला जाणाऱ्या विमानात प्रवेश केला. अत्यंत मृदूपणे लेगसन कायरांनी हवाई मदतनिसांकडे पॅराशूटची विचारपूस केली असणार, नाही? विमानतळावर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले होते, “मी आता नॅसालँडमध्ये परतताना पदवीधर झालेला असेल. त्यानंतर मी राजकारणात जाणार आहे. मी जेव्हा निवडणूक हरेल तेव्हा परत शिक्षकाचा पेहराव चढवेल. आपण शिक्षणावरच श्रद्धा ठेवू शकतो, नाही का? ” टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कथेमुळे न्यूयॉर्क विमानतळावर त्यांच्याभोवती पत्रकारांचा गराडा पडला होता. एक पत्रकार तर त्यांच्याबरोबर कॉलेज कॅम्पपर्यंत आला होता. संपूर्ण कॉलेजने दाराजवळ येऊन लेगसन कायरांचे स्वागत केले.

अशा प्रकारे लेगसन कायरा हे एक प्रसिद्ध व्यक्ती झाले होते. राष्ट्रीय टेलिव्हिजन आणि रीडर्स डायजेस्टमध्ये ते झळकले होते. सबंध जगातून त्यांच्यावर स्तुतिसुमने वाहणारी अनेक पत्रे येत होती. अनेकदा पत्रांबरोबर पैसेही येत होते. कायरा पूर्ण वेळ विद्यार्थी असले तरी व्याख्यानासाठी त्यांना अनेक निमंत्रणे येत होती. वेळेअभावी त्यांना अनेक निमंत्रणांना नकारही द्यावा लागत असे. पुढील मोठ्या सुट्टीत त्यांनी अनेक शहरांना व्याखानाच्या निमित्ताने भेटी दिल्या. त्यातून जमलेल्या मानधनामुळे त्यांची शिक्षणाची सोय झाली. आपल्याजवळ जमलेल्या जादा पैशांचा विनियोग त्यांनी अमेरिकेत शिक्षणासाठी येणाऱ्या आफ्रिकेतील मुलांसाठी केला.

लेगसन कायरा लेखक झाले

‘स्कॅगीट व्हॅली’तून त्यांनी 1963 साली पदवी संपादन केली. त्यानंतर 1965 साली वॉशिंग्टन विद्यापीठातूनही बी. ए. ही पदवी संपादन केली. सहा वर्षांच्या अमेरिकेतील वास्तव्यानंतर ते टाइम्सच्या पत्रकारांसमवेत नॅसालँडच्या स्वातंत्र्य महोत्सवात सहभागी होण्यासाठी मायदेशी परतले. आता नॅसालँडचे रूपांतर ‘मलावी’ या देशात झाले होते. त्यांच्या ग्रामस्थांनी लेगसन कायरांना आता आपण नोकरी स्वीकारून लग्न करून गावातच स्थायिक व्हावे असा सल्ला दिला होता; परंतु लेगसन कायरांनी मात्र केंब्रिज विद्यापीठाची शिष्यवृत्ती स्वीकारून इंग्लंडमध्ये आपले शिक्षण सुरू ठेवायचे ठरविले.

1965 मध्ये त्यांनी ‘आय विल ट्राय’ हे आपले आत्मचरित्र प्रकाशित केले. ते खूप गाजले आणि त्याला नॉर्थवेस्ट नोटिफिकेशनचे बक्षीसही मिळाले. यथावकाश त्याच्या पेपरबॅक आवृत्त्याही निघाल्या. अनेक ठिकाणी स्फूर्तिदायी लेखक म्हणून त्यांचा गौरवही झाला. पुढे त्यांनी लुमिंग सँडो, जिंगला डाउबलडे, थिंग्ज बॅक अॅण्ड ब्यूटिफुल, दि सिव्हिल सर्व्हंट लॉगमन आणि होमकमिंग या पाच कादंबऱ्या लिहिल्या. यातील पहिली कादंबरी त्यांनी आईच्या सान्निध्यात पूर्ण केली. त्यांच्या लिखाणाचे अनेक भाषांत अनुवाद झाले. विरोधाभास म्हणजे मालवीत बंडा हे अध्यक्ष झाल्यावर लेगसन कायरा

यांच्या लिखाणावर बंदी घातली गेली. लेगसन कायरा लंडनमध्ये ‘प्रोबेशन अधिकारी’ म्हणून स्थायिक झाले. त्यांच्या पत्नीचे नाव ‘कॅराल लॉसन’ असे आहे. त्यांना एक मुलगीही आहे. पुढेही त्यांनी आपले लिखाण चालूच ठेवले.

माणसाने स्वत:च्या अंत:शक्तीवर श्रद्धा ठेवली आणि स्वत:कडून सकारात्मक अपेक्षा ठेवल्या, तर तो कोणत्याही परिस्थितीतून काहीही साध्य करू शकतो.

जिवंत स्वयंप्रेरणा

कारोली टॅकाचस

ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजीचे सुवर्णपदक मिळविणे याचा संबंध हाताशी नाही, तर आपल्या मनाशी जास्त जवळचा आहे, हे कारोलींनी निर्विवादपणे सिद्ध करून दाखविले. आयुष्याचेही असेच आहे. यशाचा संबंध कौशल्यापेक्षा दृष्टिकोनाशी जास्त जवळचा असतो. कारोलींनी हेही निर्विवादपणे सिद्ध करून दाखविले की, निष्ठा असेल तर कौशल्ये निर्माण करता येतात. उजवा नाही तर डावा हात आवश्यक ती कामे करू शकतो. मला तर असे वाटते की, कारोलीसारखी प्रखरनिष्ठा असेल तर ज्याने आपले दोन्ही हात गमावले आहेत असा माणूसदेखील आपल्या हातांऐवजी पायानेही नेमबाजी करू शकेल आणि सुवर्णपदक मिळवून दाखवेल. अशी असते जेत्याची मानसिकता आणि मनोभूमिका!

सकारात्मक माणूस जेव्हा बंद घड्याळाकडे बघतो तेव्हा त्याच्या मनात येते की, अरे! हे घड्याळ तर दिवसातून दोनदा अचूक वेळ दाखविणारे घड्याळ आहे; कारण बंद घड्याळाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन मात्र सकारात्मक असतो. आपल्याला खरी सकारात्मकता अंगी बाळगायची असेल, तर अनेक खेळाडूंचे जीवन जवळून बघायला हवे, त्यांची जीवनचरित्रे अभ्यासायला हवीत. आपण आज अशाच एका अलौकिक चरित्रात डोकावून पाहणार आहोत.

सकारात्मक दृष्टिकोनाचे फळ

कारोली टॅकाचस **(Karoly Takacs)** हे हंगेरिअन सैन्यात सार्जंट या पदावर काम करीत होते. 1938 साली ते देशातील सर्वोत्तम पिस्तुलातून गोळी मारणारा खेळाडू (शूटर) म्हणून ओळखले जाऊ लागले. जवळ-जवळ सगळीच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानांकने त्यांनी मिळविली होती. 1940 साली टोकिओ येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेतील संभाव्य सुवर्णपदक विजेता म्हणून सारे जग त्यांच्याकडे मोठ्या आशेने बघत होते; परंतु एक अनपेक्षित आणि दुर्दैवी घटना घडली. सैन्यातील एका प्रशिक्षण सत्रात कारोली यांच्या उजव्या हातात हॅन्ड ग्रॅनेडचा स्फोट झाला आणि त्यात त्यांचा उजवा हात निकामी झाला. या दुर्दैवी अपघातामुळे त्यांचे केवळ ऑलिम्पिक विजयाचे स्वप्नच नव्हे, तर नेमबाजी करण्यात निष्णात असणारा उजवा हातच त्यांना गमवावा लागला.

सर्वसामान्य माणसाची यावर काय प्रतिक्रिया असेल? माझ्याच बाबतीत असे का झाले? माझेच दैव खोटे का निघाले? विजयश्रीच्या इतक्या जवळ नेऊन परमेश्वराने मला ही शिक्षा का दिली? इत्यादी आणि कारोलींनेही असेच प्रश्न विचारले असते तरी आपण त्यांना नक्कीच माफ केले असते; कारण एवढा मोठा दुर्दैवी आणि कारुण्यपूर्ण प्रसंग त्यांच्यावर कोसळला होता. ते कुणाचेतरी आश्रित झाले असते तरी ते आपण मान्य केले असते. माणसाने केलेल्या योजना, पाहिलेली स्वप्नं परमेश्वर कसे विच्छिन्न करतो याचे कारोली हे एक उत्तम आणि जिवंत उदाहरण म्हणून आपण त्यांच्याकडे

पाहिले असते; परंतु कारोलींना यातील काहीही नको होते. त्यांनी वरील गोष्टींपैकी काहीही केले नाही; कारण ते वेगळ्याच विचारांनी घडलेले होते. आपण काय गमावले आहे (म्हणजे खात्रीपूर्वक सुवर्णपदक मिळवून देणारा उजवा हात) यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी आपल्याकडे अजून शिल्लक असणाऱ्या उत्तमस्थितीतील डाव्या हातावर लक्ष केंद्रित करावयाचे त्यांनी ठरविले. त्यांचे मनोबल प्रचंड कणखर होते. त्यांची मनोभूमिका जेत्याची होती. विजयी होण्याची प्रचंड जिद्द आणि धगधगता अंगार त्यांच्या हृदयात अजूनही धुमसत होता. पूर्णपणे कार्यक्षम असा आपला डावा हात अजूनही आपल्याजवळ शिल्लक आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यांनी विचार केला की, उजवा हात निकामी झाला याचे दु:ख करीत बसण्यापेक्षा आपण आपल्या डाव्या हाताला प्रशिक्षण देऊन जगातील सर्वोत्तम नेमबाज म्हणून तयार करू शकतो. याच विचाराने ते पछाडले गेले. जवळपास एक महिना त्यांनी रुग्णालयात घालवला. आसपासच्या माणसांच्या प्रतिक्रियांचा अंदाज कारोलींना आला होता. त्यामुळे जगाच्या झगमगाटापासून दूर जाण्याचे त्यांनी ठरविले. परिचितांपासून स्वत:ला वेगळे करून त्यांनी आपल्या डाव्या हाताने नेमबाजीचा सराव चालू केला. शरीराला होणाऱ्या सर्व यातना, डाव्या हातावर पडणारा ताण या सर्वांकडे त्यांनी पूर्ण दुर्लक्ष करून उजवा हात जे जे करीत होता ते आपल्या डाव्या हाताकडून करून दाखवायचे याचा त्यांनी निश्चय केला होता. आपल्या या ध्येयावर त्यांनी संपूर्ण लक्ष केंद्रित केले होते. आपल्या निश्चयाप्रमाणे अखंड प्रयत्नांनी कारोलींने आपल्या डाव्या हाताला तयार केले.

एकहाती; पण सर्वोत्कृष्ट नेमबाज

एका वर्षानंतर कारोली हंगेरीतील नेमबाजीच्या राष्ट्रीय मानांकन स्पर्धेत हजर झाले. त्यांना तेथे बघून स्पर्धेसाठी हजर असलेल्या सर्व खेळाडूंना अत्यानंद झाला. अपघातानंतर सर्वांना पहिल्यांदाच त्यांचे दर्शन होत होते. त्यांनी दाखविलेल्या धैर्याबद्दल सर्वांनाच त्यांचे खूप कौतुक वाटत होते; कारण ते आपल्याला प्रोत्साहन देण्यासाठीच येथे आले आहेत अशीच सर्वांची समजूत झाली होती. त्यामुळे सर्वांनाच धन्यता वाटत होती; परंतु जेव्हा कारोलींनी हे स्पष्ट केले की, मी येथे आपला प्रतिस्पर्धी म्हणून आलो आहे आणि या स्पर्धेतील राष्ट्रीय मानांकन मिळविण्याचा मी निश्चय केला आहे, हे ऐकल्यानंतर मात्र सर्व प्रतिस्पर्ध्यांना आश्चर्याचा चांगलाच धक्का बसला.

कारोलींनी सर्व प्रतिस्पर्ध्यांपुढे चांगलेच आव्हान उभे केले आणि स्पर्धेत प्रथम मानांकन मिळवले. त्याचबरोबर आपला उजवा हात निकामी झाल्यावर केवळ एका वर्षातच आपल्या डाव्या हाताचा वापर करून स्पर्धेचे जेतेपददेखील त्यांनी मिळवून दाखवले. ते खरोखरच जेता ठरले होतो. इतरांच्या नजरेआड जाऊन एकांतात सराव करण्याचा कारोलींचा निर्णय किती अचूक आणि महत्त्वपूर्ण होता हे त्यांनी सिद्धच करून दाखविले होते. त्यांना समजले होते की, आपण बघितलेली खूप मोठी स्वप्नंसुद्धा समाजाला सहन होत नाहीत, आवडत नाहीत. अशी स्वप्नं त्यांच्या डोळ्यावर येतात आणि स्वप्नं बघणारा त्यांच्या टीकेचा शिकार बनतो. त्यामुळे तो अधिकच निरुत्साही होतो. आपल्या दु:खात डुंबत राहणे खूपच सोपे असते; कारण त्यामुळे आपल्याला सहानुभूतीच्या लाटेवर आरूढ होऊन प्रवास करता येतो; परंतु प्रखर स्वयंप्रेरणा असणारी कारोलीसारखी माणसे मात्र यापासून दूर राहतात.

मानांकन मिळूनही कारोलीचे ऑलिम्पिकमधील विजयाचे स्वप्न मात्र दुर्दैवाने काही वर्षं मृगजळच ठरले; कारण लागोपाठ दोन वेळेस, म्हणजेच सलग आठ वर्षे ऑलिम्पिक स्पर्धा जागतिक महायुद्धामुळे रद्द केल्या गेल्या होत्या. त्यानंतर 1948 सालच्या लंडन येथील ऑलिम्पिकसाठी कारोलींची निवड झाली आणि त्यात आपल्या डाव्या हाताने नेमबाजी करीत त्यांनी सुवर्णपदक पटकावले.

कल्पना करा- सुवर्णपदकाचा संभाव्य विजेता अपघातात आपला उजवा हातच गमावून बसतो. अचानक कोसळलेल्या आपत्तीनंतर तो आपल्या डाव्या हाताला प्रशिक्षण देतो, त्याला आपल्या उजव्या हाताइतकाच कार्यक्षम बनवितो. ही क्षमता असूनही रद्द झालेल्या स्पर्धा पुन्हा सुरू होण्याची प्रतीक्षा करतो आणि स्पर्धा सुरू होताच आपल्या डाव्या हाताने त्या स्पर्धेतील सुवर्णपदकाचा मानकरी ठरतो, तेही विशेष गुणवत्तेसह! इतकेच नाहीतर त्यानंतरच्या स्पर्धेतही पुन्हा एकदा सुवर्णपदक खेचून आणतो! खरे जेते कर्तृत्वभावनेने पछाडलेले असतात. परिस्थिती कोणतीही असो, त्यांच्यात जेत्याचे चैतन्य जागे असते आणि आपले ध्येयं गाठण्यासाठी ते अखंड, अथक आणि अविश्रांत परिश्रम घेतात. यावरून हे सिद्ध होते की, ‘परिस्थिती अनुकूल आहे का? यापेक्षा आहे त्या परिस्थितीला आपण कसे सामोरे जातो हे जास्त परिणाम मिळवून देणारे आहे.

स्वगुणांना ओळखा

आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असे प्रसंग येतात. आपण मोठ्या यशाच्या, गौरवाच्या, कीर्तीच्या, मोठेपणाच्या अगदी जवळ जातो आणि अचानक दुर्दैवाने हे सारं गमावून बसतो. सगळं जग जणू आपल्या विरुद्ध कटच करीत आहे अशी भावना आपल्या मनात निर्माण होते. आपण उराशी बाळगलेली स्वप्नं पूर्णपणे बेचिराख होतात, भंग पावतात. आपण पराजित होतो आणि आक्रोश करतो की, हे असे माझ्या बाबतीतच का? असा प्रसंग यदाकदाचित आपल्यावर ओढवलाच तर कारोलांची आठवण करा, त्यांचे स्मरण करा. आपण काय गमावले आहे याची चिंता सोडा. आपल्या जवळ अजूनही काय शिल्लक आहे यावर सारे लक्ष केंद्रित करा. त्यावरच जोर द्या. आपल्या जवळ असणारी ताकद, कणखरपणा याचाच विचार करा. जगातील कोणतीही ताकद या गोष्टी आपल्यापासून हिरावून घेऊ शकत नाही यावर संपूर्ण श्रद्धा असू द्या. अंतिम विजय आपलाच होईल.

आपल्यावर एखादा दुर्दैवी प्रसंग आला तर स्वत:ची कीव करीत बसू नका, पश्चात्ताप करीत बसू नका; कारण पश्चात्ताप ही नकारात्मक ऊर्जा आहे; तसेच आपण आपला भूतकाळ बदलू शकत नाही हे एक शाश्वत सत्य आहे. वेळ न दवडता लगेचच त्यातून बाहेर पडा. अशावेळी प्रत्येक क्षण महत्त्वपूर्ण आणि निर्णायक असतो. कारोलींनी आपल्या दुर्दैवी अपघातानंतर नकारात्मक प्रतिक्रिया टाळत केवळ एका महिन्यातच सरावाला पुन्हा सुरुवात केली होती. जेव्हा आपण पडतो, डगमगतो, घायाळ होतो तेव्हा बॉक्सरसारखा विचार करा. जेव्हा तो घायाळ होतो तेव्हा त्याला दहा सेकंदांच्या आत स्वत:ला सावरून पुन्हा युद्ध सुरू करणे आवश्यक असते. एक सेकंदही जास्त लागला तर ते घातक ठरू शकते, याची जाणीव त्याला ठेवावी लागते. जेतेदेखील याबद्दल जागरूक असतात. ते अशी वेळ कधीही येऊ देत नाहीत. कठीण परिस्थितीतून ते स्वत:ला पटकन सावरतात. तेव्हा पुन्हा आपले ध्येय निश्चित करा आणि ते गाठण्यासाठी, कटिबद्ध व्हा!

ध्येय समोर असले की शरीर आणि मन संघटित होते आणि उद्दिष्टप्राप्तीसाठी जोरकसपणे कामाला लागते; तसेच गतकाळात झालेल्या नुकसानीबद्दल काळजी करत बसत नाही. अर्थातच नकारात्मक विचार बाजूला टाकणे वाटते तितके सोपे नाही. त्यासाठी सकारात्मक विचारांची प्रचंड शक्ती निर्माण करावी लागते. आपल्या ध्येयावरची प्रखरनिष्ठाच नकारात्मक विचारांना आपल्या प्रवाहात वाहून नेते आणि नामशेष करते.

याचे नाव स्वयंप्रेरणा

दशरथ मांझी

'स्वयंप्रेरणेने आणि दृढनिश्चयाने मनातील कोणतेही ध्येय साध्य करणे कोणत्याही व्यक्तीला शक्य आहे,' याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे दशरथ मांझी. एकटा माणूसही जिद्दीने इतरांच्या आयुष्यात बदल घडवून आणू शकतो हेच दशरथ मांझी यांच्या जीवनाचे सार आहे, हाच त्यांचा अखिल मानवजातीला एक अनमोल संदेश आहे. आपल्याला आलेल्या अनुभवातून शिकून इतरांसाठी मोठे कार्य करणे सोपे नाही; पण तरीही माघार न घेता आत्मविश्वासाने वाटचाल करणारे अगदी विरळच असतात. त्यापैकी एक म्हणजे दशरथजी होय.

बहुतांश सर्वसाधारणपणे "माझा हा देश माझ्यासाठी काय करतो? हे सरकार माझ्यासाठी काय करते? ही कंपनी माझ्यासाठी काय करते? असे प्रश्न विचारतो. यावर अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉन. एफ. केनडी यांनी फार छान उत्तर दिले आहे. ते असे की, स्वत:ला एक खरा प्रश्न विचारा की, "मी माझ्या देशासाठी काय करतो?" यावर आम्हा भारतीयांचे असे उत्तर असते की, आपण एकटे या मोठ्या प्रक्रियेत काय करू शकतो? आपला देश, आपली कंपनी एवढी मोठी आहे की, माझ्या एकट्याच्या प्रयत्नाने काय फरक पडणार आहे? माझ्या क्षमता त्या किती? माझी कुवत ती किती? मित्रहो! बिहारमधील आपलाच एक बांधव दशरथ मांझी यांनी आपल्या या प्रश्नांना अगदी खणखणीत उत्तर दिले आहे. ते आपण या कथेद्वारे जाणून घेऊया.

ही एक अद्भुत सत्यकथा आहे. एकटा माणूस काय करू शकतो याचे हे आश्चर्यकारक उदाहरण आहे. एका व्यक्तीची शक्ती किती अफाट असते, एक माणूस अख्खा पर्वत कसा हलवू शकतो हे या कहाणीतून कळते.

बिहारमधील गेहलोर हे गाव चहूबाजूंनी खडकाळ डोंगरांनी वेढलेले आहे. या गावाच्या सर्वांत जवळचे शहर 7 किलोमीटर अंतरावर आहे; परंतु तेथे पोहोचण्यासाठी या गावकऱ्यांना 70 किलोमीटर अंतर चालून जावे लागे; कारण शहराकडे जाणारा रस्ता उंच अशा डोंगररांगांनी वेढलेला होता. गेली अनेक वर्षे हे डोंगर म्हणजे गेलहोरवासीयांच्या जीवनातला मोठा अडथळाच बनलेला होता; परंतु एके दिवशी याच डोंगरावर दशरथसाठी जेवण घेऊन येत असणाऱ्या त्याच्या पत्नीला म्हणजे फाल्गुनीदेवीला एका दुर्दैवी अपघाताचा सामना करावा लागला. तात्काळ औषधोपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीचा त्यांच्या डोळ्यासमोरच मृत्यू झाला. तिला वेळेवर प्रथमोपचार करण्यापुरतीही सुविधा गावात उपलब्ध नव्हती. पत्नीकडे पाहत टाहो फोडत दशरथने शहराकडे जाणारा जवळचा रस्ता मी स्वत: तयार करेन असा संकल्प केला आणि त्यानंतर सलग बावीस वर्षे तो डोंगर फोडीत राहिला. आपल्या पत्नीवर आली तशी वेळ इतर कोणावरही येऊ नये म्हणून त्याने अख्खा डोंगर फोडून रस्ता तयार केला. शहाजहानच्या कामगिरीलाही मागे टाकेल अशी दशरथ यांची कामगिरी आहे. त्यामुळे

दशरथ हा एक अवलिया, लोकगीतांचे नायक बनले.

नि:स्वार्थ समाजप्रेम

दशरथ मांझी यांना औपचारिक शिक्षणाचा, अध्यात्माचा अगर संस्कृतीचा वारसा उपजतच मिळालेला नव्हता. तरीही त्यांनी केलेल्या अजोड, नि:स्पृह, कामगिरीवर विश्वास बसणे खूपच अवघड आहे. त्यांची ही कामगिरी सर्वसामान्य माणसाच्या कल्पनाशक्तीच्या बाहेरची आणि तर्काच्या पलीकडची आहे. एक सामान्य माणूस असे साहस, असा दृढनिश्चय, असा संयम, असे सातत्य, अशी निष्ठा, मानवजातीवरचे प्रेम दाखवून अशक्य अशी कामगिरी आपल्या एकटयाच्या अविरत श्रमाने शक्य करून दाखवू शकतो, केवढे मोठे आश्चर्य आहे हे! आपण अनेकवेळा ऐकतो, ''माणसाने मनात आणले तर तो पर्वतही हालवू शकतो.'' उपदेशासाठी हे ठीक आहे असे म्हणून आपण अशा गोष्टी एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडूनही देतो; परंतु आज मात्र आपण अशा एका माणसाची माहिती घेणार आहोत, ज्याने आपल्या स्वत:च्या बळावर प्रत्यक्ष पर्वत राजालाच नमविले आणि तेही अगदी नि:स्पृहबुद्धीने, समाजावरच्या निरपेक्ष प्रेमासाठी. या कार्याबद्दल बक्षीस म्हणून मिळालेली पाच एकर जमीनदेखील त्यांनी सरकारला परत करून त्या जागेत हॉस्पिटल बांधण्याची विनंती केली. कशी निर्माण होते ही नि:स्पृहता? अशा व्यक्ती ज्या प्रेरणेने काम करतात त्याला म्हणायचं स्वयंस्फूर्ती, स्वयंप्रेरणा. ही आहे आपल्या पत्नीबद्दलची प्रेमभावना, हेच आहे आपल्या आसपासच्या व्यक्तींवरील नि:स्वार्थ प्रेम.

विचारचक्राचे कृतीत रूपांतर

दशरथ आपल्या पत्नीवर अतिशय प्रेम करीत होते. तिच्या वियोगाने ते अतिशय हळवे झाले होते. या घटनेनंतर त्यांचे विचारचक्र सुरू झाले. त्यांना वाटले की, जर आपल्या पत्नीला वेळेवर वैद्यकीय मदत मिळू शकली असती तर तिचे हे अकाली आणि दुर्दैवी मरण टाळता आले असते. परत असा प्रसंग आपल्या आसपासच्या कुणाही व्यक्तीच्या आयुष्यात येता कामा नये. या विचाराने त्यांना पछाडले. नजीकच्या शहराचे अंतर कसे कमी करता येईल, या दिशेने त्यांचे विचारचक्र सुरू झाले. या विचारमंथनादरम्यान त्यांना असे लक्षात आले की, शहराच्या वाटेत आड येणारा एक मोठा डोंगर आहे. हा डोंगर कसा दूर करता येईल? असाच विचार करीत एका रात्री ते विहिरीजवळ झोपलेले असताना त्यांच्या मनात आले की, आपण तो डोंगरच फोडून टाकूयात. यामुळे शहराचे अंतर 70 किलोमीटर वरून 7 किलोमीटरवर येईल. ते अंतर आपणच कमी करायला हवे, ही भीष्मप्रतिज्ञाच त्यांनी त्या दिवशी केली. हे काम सोपे नव्हते. आजवरच्या इतिहासात असे काम कोण्या मानवाने केल्याची नोंद नव्हती. आपण हे काम केले नाही तर हे काम कधीच होणार नाही याचीही त्यांना खात्री होती. हे प्रचंड काम करण्यासाठी आपल्याला आपले दैनंदिन काम सोडावे लागणार. मग आपला आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कोण करणार, याचा विचारही त्यांनी जुमानला नाही. आपल्या जवळच्या शेळ्या विकून, त्यांनी त्या पैशात छिन्नी, हातोडा आणि फावडे खरेदी केले. आपली झोपडीही डोंगराजवळ हलविली आणि कामाला सुरुवात केली. अर्थातच गावातल्या लोकांनी त्यांना वेडयात काढले हे वेगळे सांगायला नकोच.

अजिंक्य पर्वताला नमविले

कोणत्याही टीकेने विचलित न होता अहोरात्र त्यांचा कामाचा सपाटा सुरू झाला. दर दिवसाच्या शेवटी, आठवड्याच्या शेवटी, महिन्याच्या शेवटी किती काम पूर्ण झाले असेल? हे काम अखंड चालू ठेवण्यासाठी त्यांनी कोठून प्रेरणा मिळविली असेल? ती कशी टिकून ठेवली असेल? सलग 22 वर्षे कामात सातत्य कसे राखले असेल? सगळेच अतर्क्य आहे, नाही का? हे अशक्य वाटणारे काम पूर्ण करण्यासाठी दशरथ मांझी यांना 22 वर्षं अहोरात्र परिश्रम घ्यावे लागले. हे काम त्यांनी 1982 साली पूर्ण केले. आपल्या एकट्याच्या अविश्रांत मेहनतीतून त्यांनी अजिंक्य पर्वताला नमविले. हा पर्वत फक्त आपल्या छिन्नी आणि हातोडीच्या साहाय्याने फोडून त्यातून 360 फूट (110 मीटर) लांब, 25 फूट (7.5 मीटर) उंच आणि 30 फूट (9.1 मीटर) रुंद असा रस्ता तयार केला. म्हणजे त्यांनी 2,50,000 घनफूट इतका दगड एकट्याने फोडला. त्यांच्या या प्रयत्नामुळे नजीकच्या शहराचे अंतर केवळ 7 किलोमीटरवर आले. आपली स्वप्नपूर्ती झाल्याच्या आनंदाने त्यांचा ऊर भरून आला असेल. तेथील लोकांना या सोप्या रस्त्यावरून सहजपणे नजीकच्या शहराकडे जाताना पाहून त्यांची छाती अभिमानाने आणि समाधानाने भरून आली असेल. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळले असतील. आपल्या पत्नीचा आनंदलेला चेहरा त्यांच्या डोळ्यापुढून सरकून गेला असेल. या रस्त्याने प्रवास करणाऱ्या व्यक्तींना दशरथ मांझीच्या त्यागाची, श्रमाची, जिद्दीची आणि दूरदर्शीपणाची कल्पना तरी येत असेल का?

प्रेम आणि साहस हीच प्रेरणा

दशरथजी आपल्या या कामाबद्दल म्हणतात, “माझ्या या कामाची पहिली प्रेरणा म्हणजे माझे माझ्या पत्नीवर असणारे प्रेम. तिनेच ही ज्योत माझ्या हृदयात पेटविली. त्याचबरोबर आजूबाजूची माझी माणसे विनासायास आपल्या दररोजच्या कामासाठी सहजपणे शहराकडे जात आहेत हे माझ्या डोळ्यापुढे येणारे दृश्यच मला दररोजच्या कामासाठी प्रेरणा देत होते. त्यामुळेच मी हिंमत, साहस करून मनात येणाऱ्या भीतीवर मात करीत हे काम पूर्णत्वास नेले; कारण मला खात्री वाटत होती की, मी जर हे काम केले नाही तर हे काम कोणीच करणार नाही. सरकार तर नाहीच नाही; कारण या सर्वांजवळ आवश्यक इच्छाशक्तीचा, निश्चयाचा आणि विश्वासाचा अभाव होता. म्हणूनच मी निश्चयाने आणि विश्वासाने हे काम हाती घेतले आणि ते पूर्णही केले.”

त्यांच्या या कामगिरीमुळे दशरथ मांझी यांचे नाव पिढ्यान् पिढ्या अढळ निष्ठा आणि प्रेमाचे अद्वितीय प्रतीक म्हणून घेतले जाईल, हे निश्चित. त्यांनी आपल्याबरोबरच फाल्गुनीदेवींनाही अमर केले. ताजमहाल आणि हा रस्ता व्हायला सारखाच काळ म्हणजे 22 वर्षे लागली हा अजब योगायोग. पत्नीवरील प्रेम हा या दोन्ही घटनांमधील समान धागा असला तरी दशरथ मांझीने एकट्याने स्वत:च्या परिश्रमाने हे स्मारक उभे केले. शहाजहानच्या पाठीशी प्रचंड संपत्ती आणि 20,000 कारागिरांचा ताफा तैनात होता. ताजमहालाला फक्त सौंदर्यमूल्य आहे, तर दशरथ मांझीने उभारलेल्या कामाला उपयुक्ततामूल्य आहे. दररोज असंख्य लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात त्याचा प्रत्यक्ष उपयोग होत आहे. मला दशरथजींचे हे कार्य फार विलक्षण वाटते.

मार्गदर्शनापेक्षा कृती

श्रेष्ठ

रतन टाटा

अनेक आव्हानांचा सामना करीत, जगातील अनेक तज्ज्ञांना मागे सारीत रतन टाटांनी अशक्य ते शक्य करून दाखविले. 'वचन म्हणजे वचन' या बाण्याने 'एक लाखाची' कार हे स्वप्न सत्यात उतरवून जगाला त्यांनी चकित केले.
केवळ भारतातीलच नव्हे, तर संपूर्ण जगभरातील असंख्य गरीब व्यक्ती 'नॅनो' सारख्या कारचे धनी झाले आहेत. कदाचित त्यांना माहितीही नसेल की, जागतिक पातळीवर गाजणारी व मोठी होणारी व्यक्तिमत्त्वे अतिशय सर्वसामान्य प्रसंगांमधूनही गेलेली असतात. अवघ्या जगात मोठमोठे उद्योगसमूह चालवणाऱ्या व्यक्ती अतिशय कर्तव्यदक्ष आणि कृतिप्रवण असतात.
मी टाटा मोटर्समध्ये असताना एका मित्राने सांगितलेली ही एक प्रत्यक्ष घटना. त्यावेळी रतन टाटा हे नुकतेच टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष झाले होते. घटना अगदी सर्वसाधारण असली तरी एका सुस्तावलेल्या मोठ्या उद्योग समूहाचे रूपांतर जागतिक दर्जाच्या नामवंत उद्योग समूहात करण्यासाठी कसा नेता असावा लागतो, याचं खूप छान उदाहरण घालून देणारी ही घटना आहे. रतन टाटा यांनी अत्यंत दूरदृष्टीचे, आग्रही आणि पाठपुरावा करणारे नेतृत्व देऊन जगातील सर्वांत स्वस्त आणि दिमाखदार मोटार गाडी बनविण्याचं आपलं स्वप्न पूर्ण करून वाहननिर्मिती क्षेत्राला एक नवीन दिशा दिली.

कृतीला महत्त्व देणारे नेतृत्त्व

अमेरिकेतून जे.आर.डी. टाटांनी त्यांना जेव्हा भारतात बोलावले तेव्हा त्यांच्याकडे 'नेल्को' या टाटा समूहातील कंपनीची जबाबदारी देण्यात आली होती. त्याचदरम्यान 'नेल्को'तील उच्च व्यवस्थापकांची एक मीटिंग नाशिक येथे आयोजित केली होती. त्यासाठी रतन टाटा इतर काही उच्च व्यवस्थापकांबरोबर नाशिकला जायला निघाले होते. महामार्गावरून जात असतानाच अचानक त्यांच्या मोटारीचे टायर पंक्चर झाले. काय झाले आहे, ते पाहण्यासाठी ड्रायव्हर खाली उतरला तेव्हा रतन टाटा यांच्यासह सर्व अधिकारीही पाय मोकळे करण्यासाठी बाहेर पडले. ड्रायव्हर मात्र आपल्या कामाला लागला.
काही अधिकाऱ्यांना हा बदल बरा वाटला. त्यामुळे त्यांना प्रवासाचा शीण कमी करायला जरा उसंत मिळणार होती; तसेच विनोद, थोड्या अवांतर गप्पाही मारता येणार होत्या. त्याचवेळी एका अधिकाऱ्याच्या लक्षात आले की, रतन टाटा कुठे दिसत नाहीत. "कोठे गेले असतील हे?" त्यांनी आपल्या इतर सहकाऱ्यांना विचारले. कुठेतरी

झाडाखाली किंवा एखाद्या जवळच्या हॉटेलात कॉफी तर पीत बसले नसतील ना? परंतु रतनजी असे काहीच करीत नव्हते.
सहकाऱ्यांनी शोध घेतल्यावर थोडया अधीरतेने ते सर्वजण मोटारीकडे परतले, आणि बघतात तर काय, आपण इकडे तिकडे वेळ घालवीत असताना रतन टाटा मात्र आपल्या बाह्या सावरून, टाय बाजूला काढून ड्रायव्हरला टायरचे पंक्चर काढून चाक बदलायला मदत करीत होते. कौशल्याने जॅकचा पान्हा हाताळीत होते. टायर आपटून त्यातील हवा तपासून पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावर थोडा घामही दिसत होता; परंतु त्याचबरोबर छानसं हसूही होतं आणि आपल्या सहकाऱ्याला मदत केल्याचं समाधानही. यावर इतर अधिकाऱ्यांची काय प्रतिक्रिया होती? याची मला कल्पना नव्हती; परंतु मला वाटते की, व्यवस्थापनातील एक सुंदर धडा ते नक्कीच शिकले असतील; कारण प्रत्यक्ष कृती ही नुसत्या सिद्धांतापेक्षा जास्त उद्बोधक आणि दीर्घकाळ स्मरणात राहणारी, मनावर काहीतरी बिंबवणारी असते. मोटार ड्रायव्हर मात्र हा प्रसंग आयुष्यात कधीच विसरणार नाही. उलट तो ही गोष्ट इतरांना आवर्जून सांगत असेल हे निश्चित.
मोठे नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती प्रत्यक्ष कृतीद्वारे नेतृत्व करीत असतात आणि आपल्या 'टीम' मधील व्यक्तींना उत्तम धडे घालून देतात. 'सोईचीरो होंडा' आणि 'जे. आर. डी. टाटा' यांच्या चरित्रग्रंथांतही अशी काही उदाहरणे वाचल्याचे मला आठवते. आपल्या सहकाऱ्यांबरोबर खांद्याला खांदा लावून काम केल्याने सर्वांनाच एक वेगळी प्रेरणा मिळते. ते चैतन्याने भारून जातात. उच्चनीचतेचा भेद न ठेवता आपल्या नेत्याने पुढे ठेवलेले ध्येय संपादन करण्यासाठी पेटून उठतात. त्यामुळे आपल्या कामावरची आपली निष्ठा वाढते. आपल्यावर कोणीतरी नजर ठेवतंय म्हणून नाही, तर मला मनापासून वाटतं म्हणून मी काम करतो ही भावनाही वाढीस लागते. अशा नेतृत्वासाठी खूप मोठी संधी, मोठा संघर्ष किंवा मोठे आव्हान यांची वाट पाहण्याची गरज नाही, तर अगदी रोजच्या, साध्या-साध्या घटनांमधून नेतृत्वाचे मोठेपण दिसत असते. पंक्चर काढणाऱ्या ड्रायव्हरला मदत करण्यासारखे प्रसंग आपल्या दैनंदिन कामकाजात अनेकदा येत असतात. नेते अशा प्रसंगात आपल्या 'टीम'मधील सहकाऱ्यांशी कसे वागतात हे नेतृत्वगुणांचे मोजमाप करणारे आहे आणि कठीण प्रसंगी नेते कसे वागतील, याचे भाकीतही करता येण्यासारखे आहे.

वचन म्हणजे वचन

सर्वसाधारणपणे आजचे तरुण व्यवस्थापक आपल्या वरिष्ठांना कसे खूश ठेवायचे यातच आपली शक्ती आणि बुद्धी खर्च करतात. हे जरी आवश्यक असले तरी आपल्या 'टीम' मधील सहकाऱ्यांवर योग्य लक्ष ठेवून त्यांना मदत केल्यास आपली कार्यक्षमता जास्त उपयुक्त आणि परिणामकारक ठरू शकेल, याकडेही योग्य लक्ष द्यायला हवे. रतन टाटांच्या या दृष्टिकोनामुळेच आपल्या सहकाऱ्यांना आणि 'टीम'मधील तरुण, होतकरू अधिकाऱ्यांना प्रेरित करून 'टाटा नॅनो'सारखे, जगाने आदर्श मानावे असे उत्पादन ते तुम्हा-आम्हाला देऊ शकले आणि जागतिक कीर्ती संपादन करू शकले; कारण त्यांच्या या 'टीम' मधील प्रत्येक व्यक्ती एकमेकांना साहाय्य करून काम करीत होती. 'एक संघ, एक ध्येय' हा बाणा क्षणोक्षणी जाणवत होता आणि म्हणूनच जगातील सर्वांत स्वस्त म्हणजे 'एक लाखाची' कार ते तयार करू शकले. नेतृत्वाचे किती अनोखे उदाहरण त्यांनी

घालून दिले. अनेक आव्हानांचा सामना करीत, अनेक तज्ज्ञांना मागे सारीत रतन टाटांनी अशक्य ते शक्य करून दाखविले. ‘वचन म्हणजे वचन’ या बाण्याने ‘एक लाखाच्या’ कारचे हे स्वप्न सत्यात उतरवून त्यांनी जगाला चकित केले.
केवळ भारतातीलच नव्हे, तर संपूर्ण जगभरातील असंख्य गरीब व्यक्ती ‘नॅनो’ सारख्या कारचे धनी झाले आहेत. कदाचित त्यांना माहितीही नसेल की, जागतिक पातळीवर गाजणारी व मोठी होणारी व्यक्तिमत्त्वे अतिशय सर्वसामान्य प्रसंगांमधूनही गेलेली असतात.

मानवता धर्म

श्रेष्ठ धर्म

साधारणतः आपण व्यक्तींचा वापर करतो आणि वस्तूंवर प्रेम करतो; परंतु खरे तर आपण वस्तू वापरायला आणि माणसांवर प्रेम करायला शिकले पाहिजे. कितीतरी व्यक्ती आपल्या आयुष्यात येतील आणि जातील. त्यांना आपण बिनशर्त स्वीकारून प्रेमाचा ईश्वरीय संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवायला हवा. मानवाप्रति असलेले प्रेम, सहानुभूती ही आयुष्यातील सर्वांत महान गोष्ट आहे. मानवाचा आणि मानवतेचा विकास होतो तो यामुळेच. प्रत्येक मानवात ईश्वरीय शक्ती वास करीत असतेच. आपण फक्त या शक्तीला प्रयत्नपूर्वक प्रवाहित करून ज्यांना या शक्तीची गरज आहे अशा व्यक्तींपर्यंत ती पोहोचवायची असते. या मानवतेच्या प्रवाहात आपण सर्वांनीच पावन व्हायला हवे; कारण यामुळेच मानवाच्या जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो.

अकल्पिता तीन मुलांची आई होती आणि नुकतेच तिने पदवीपर्यंतचे शिक्षणही पूर्ण केले होते. तिने ऐकलेले शेवटचे व्याख्यान समाजशास्त्राचे होते. या विषयाच्या शिक्षिका अतिशय प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या होत्या आणि वर्गातही त्यांनी खूप चैतन्य निर्माण केले होते. अकल्पिताच्या पदवी अभ्यासक्रमातील शेवटच्या प्रकल्पाचे नाव होते,'आनंदवाटा'. त्यांच्या शिक्षिकेने सर्वांना बोलावून सांगितले, "आता बाहेर जाऊन इतर व्यक्तींसोबत गप्पा मारा, त्यांच्याबरोबर हसा आणि त्यांच्या प्रतिक्रियांची नोंद करा."

गरजूंना मदत

अकल्पिता पटकन कोणाशीही मैत्री करण्यात तरबेज होती. आपण होऊन इतरांशी गप्पा मारणे, विनोद करणे हे तर तिला अगदी सहज जमत असे. पदवीसाठी मिळालेल्या या प्रकल्पावर अकल्पिता अतिशय खूश होती. त्याच दिवशी तिने आपला नवरा आणि मुलांबरोबर मोठ्या हॉटेलमध्ये जेवायला जायचे ठरवूनही टाकले. अशाच प्रकारे ती आपल्या मुलांबरोबर नेहमीच आनंद साजरा करीत असे. प्लेट्स हातात घेऊन सर्वजण रांगेतून मागे हटताना दिसत होते. तिचा नवरादेखील मागे येत होता. स्वतः अकल्पिता मात्र एक इंचही मागे हटली नाही. आतून मात्र ती खूपच घाबरली होती. तिने दचकूनच काय घडले आहे, ते शोधण्याचा प्रयत्न केला. एका मलिन माणसाच्या अंगांतून येणाऱ्या दुर्गंधीची तिला एकदम जाणीव झाली. अकल्पिताच्या मागेच दोन गरीब आणि बहुधा बेघर असावीत अशी माणसे उभी होती. तिने मागे बघितल्यावर त्यातील बुटका माणूस अकल्पिताकडे बघून छान हसला. त्याच्या निळ्याशार डोळ्यांतून ईश्वरीय हास्य बाहेर पडते आहे असाच भास अकल्पिताला झाला. कोणीतरी आपला स्वीकार करावा असा भाव त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटला होता. त्याच्या बरोबरचा दुसरा माणूस मात्र पहिल्या माणसाच्या मागे उभा राहून हाताच्या बोटांवर चाचपडत काही हातवारे करीत होता. तो मतिमंद असावा हे अकल्पिताच्या पटकन लक्षात आले. निळ्या डोळ्यांचा

माणूस त्याची काळजी घेत होता, तो त्याचा पालक असावा.
त्यांच्याजवळ उभी असताना अकल्पिता आपल्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंना रोखण्याचा प्रयत्न करीत होती. काउंटरवर सेवा देणाऱ्या तरुण वेटरने त्यांना काय हवे आहे म्हणून विचारले. त्यावर निळ्या डोळ्याच्या माणसाने ''बाई, आम्हाला फक्त 'कॉफी' हवी आहे,'' म्हणून उत्तर दिले. त्या हॉटेलात फक्त तेवढीच गोष्ट त्यांना परवडण्यासारखी होती. हॉटेलमध्ये थोडावेळ बसून स्वत:ला थंडीपासून वाचविण्यासाठी, थोडी ऊब मिळविण्यासाठी त्यांना काहीतरी घेणे आवश्यक होते. खरंतर त्यांना थोडी ऊबच हवी होती. त्यांना पाहून अकल्पिताचे हृदय करुणेने भरून आले. अशा व्यक्तींसाठी काहीतरी करायला हवे ही प्रेरणा तिच्यात इतकी प्रचंड होती की, ती स्वत:ला थांबवू शकली नाही. तिने पटकन पुढे होऊन त्या निळ्या डोळ्यांच्या माणसाला सहानुभूतीने मिठी मारली.
अकल्पिताच्या या कृतीकडे हॉटेलमधील सर्वांच्या नजरा रोखल्या गेल्या होत्या. तेथील माणसे उत्सुकतेने आणि आश्चर्याने अकल्पिताच्या प्रत्येक हालचालींची नोंद घेत होती. अकल्पिताने हसत पुढे होऊन काउंटरवरील बाईंकडे दोन स्वतंत्र जादा न्याहारींची ऑर्डर नोंदविली. कोपऱ्यातील एका टेबलवर त्या दोघांना बसवलं. दोन्ही थाळ्या त्यांच्यापुढे ठेवल्या आणि थंडीमुळे गारठलेले त्यांचे हात हातात घेऊन त्यांना शांतपणे न्याहारी करण्याची विनंती केली.

आशेचा किरण

निळ्या डोळ्यांतून अश्रू टपकत असताना अकल्पिताकडे कृतज्ञतेने बघून, ''बाईसाहेब, धन्यवाद'' असे उद्गारही त्या माणसाच्या तोंडून बाहेर पडले. अकल्पिताने त्यांचा हात हातात घेऊन थोपटला आणि ती म्हणाली, ''मी हे सर्व आपल्यासाठी केले नाही. परमेश्वराने माझे माध्यम वापरून आपल्यासाठी आशेचा किरण दाखविलेला आहे.'' नवरा आणि मुलांच्या टेबलकडे जाताना अकल्पिताच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. ती समोर बसल्यावर तिच्या नवऱ्याच्या चेहऱ्यावर अभिमानाचा आनंद दिसत होता. तो आनंदाने म्हणाला, ''मला आता समजलं की, परमेश्वराने तुला माझ्यासाठी का पाठवलं ते. प्रिये! खरंच मला आशेचा किरण देण्यासाठी तू माझ्या आयुष्यात आली आहेस ना.'' त्या दोघांनी एकमेकांचे हात हातात घेतले. त्यांना याच गोष्टीची अनुभूती झाली की, इतरांची गरज बघून त्यांना ते देण्याची वृत्ती परमेश्वराने आपल्याला सदैव द्यावी.

इतरांचा बिनशर्त स्वीकार

अकल्पिता आणि तिचे कुटुंबीय अगदी नित्यनियमाने मंदिरात जाणारे नव्हते; परंतु परमेश्वराच्या शक्तीवर त्यांचा विश्वास होता. आज त्यांना परमेश्वराच्या अस्तित्वाची आणि प्रेमाची खरी अनुभूती आली होती. दुसऱ्या दिवशी अकल्पिता तिच्या विद्यालयात गेल्यावर शेवटच्या दिवशी आपल्या प्रकल्पाचा अहवाल तिने आपल्या शिक्षिकेला सादर केला. त्यांनी तो वाचला आणि अकल्पिताला विचारले, ''मी हा अहवाल वर्गात वाचून दाखवला तर चालेल का?'' अकल्पिताने होकारार्थी मान हलवल्यावर बाईंनी तो अहवाल सर्वांना वाचून दाखविला. वर्गातील सर्वांचे लक्ष त्या अहवालाने वेधून घेतले. तेव्हा अकल्पिता मनोमन विचार करीत असावी की, ''प्रत्येक मानव परमेश्वराचाच अंश आहे म्हणून प्रत्येकाने गरजू लोकांची गरज भागवून त्यांच्या दु:खाची तीव्रता कमी

करण्याचा प्रयत्न करायला हवा. मी माझ्या पद्धतीने त्या हॉटेलमध्ये आणि वर्गात उपस्थित असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या हृदयाला स्पर्श करून त्यांच्या मनापर्यंत परमेश्वराचा हा संदेश पोहोचवला आहे. माझ्या आयुष्यातील एक मौल्यवान बोध मी घेतला आहे. तो म्हणजे इतरांना आपण बिनशर्त स्वीकारायला हवे.''

आदर्श कोण?

विद्यार्थी की शिक्षिका?

आपण ठरवलं तर नक्कीच बदल घडवून आणू शकतो. आपण इतरांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठीही प्रयत्न करावयास हवा. ज्यांनी आपले आयुष्य उज्ज्वल करण्यात सहकार्य केले त्यांच्याविषयी सदैव कृतज्ञ राहावयास हवे. तेव्हाच आपण इतरांसाठी आदर्श ठरू शकतो. ज्या व्यक्तीपासून काहीतरी प्रेरणा आणि उत्साह मिळवून जीवनात परिवर्तन घडून आणता येते, अशी व्यक्ती आपल्यासाठी आदर्श ठरते.

मालविका पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा पहिलाच तास घेत होती. कदाचित सर्व शिक्षकांसारखेच तिने आपल्या सर्व विद्यार्थ्यांना खोटेच सांगितले. ती आपल्या विद्यार्थ्यांकडे तोंड करून उभी राहिली. त्या वर्गात पहिल्याच रांगेत प्रदीप सातपुते नावाचा एक एकटा पडलेला मुलगा बसला होता. मालविकाने त्या मुलाचे मागील वर्षापासूनच निरीक्षण केलेले होते. तेव्हाच काही गोष्टी तिच्या लक्षात आल्या होत्या. तो इतर मुलांबरोबर मिळूनमिसळून खेळत नव्हता. त्याचे कपडे अजागळासारखे होते आणि स्वच्छ राहण्यासाठी त्याला सतत अंघोळ करावी लागत असे. त्यामुळे तो वर्गातील इतर मुलांना फारसा आवडत नसे.

प्रदीपचे प्रगती पुस्तक

मालविकाने त्याची सर्व कागदपत्रं मागवून घेतली आणि त्यावर काही खुणाही केल्या होत्या. या शाळेची एक चांगली प्रथा होती, ती म्हणजे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे आधीच्या वर्गातील प्रगतीचे अहवाल शिक्षिकेने अभ्यासणे आवश्यक होते. प्रदीपची कागदपत्रे जेव्हा तिने अभ्यासली तेव्हा मात्र ती अगदी चकित झाली. त्याच्या पहिल्या वर्गातील शिक्षिकेने लिहिले होते - ‘प्रदीप हा अत्यंत हुशार मुलगा आहे. त्याच्या चेहऱ्यावर सतत गोड हसू असते. तो त्याचा अभ्यास आणि वर्गपाठ अत्यंत नीटनेटकेपणाने पूर्ण करतो. त्याची वागणूक आणि सवयीही चांगल्या आहेत. त्याचे आजूबाजूला असणेच खूप आनंददायक वाटते’. दुसऱ्या वर्गातील शिक्षिकेने लिहिले होते. - ‘प्रदीप हा खूप चांगला, उत्तम मुलगा आहे. तो त्याच्या वर्गातील सगळ्या मुलांना खूपच आवडतो; परंतु त्याची आई गंभीर आजाराने ग्रस्त असल्यामुळे त्याला चांगलाच त्रास होतो आहे. त्याला घरी खूपच झगडावे लागते आहे असे जाणवते.’ त्याच्या तिसऱ्या वर्गाच्या शिक्षिकेने लिहिले होते - ‘प्रदीपच्या आईच्या मृत्यूचा मोठा आघात त्याच्यावर झाला आहे. चांगला अभ्यास करण्यासाठी तो त्याच्यापरीने खूप मेहनत घेत असतो; परंतु त्याच्या वडिलांना त्याच्या बाबतीत फारसा रस नसावा. अशातच काही उपाय योजला नाही, तर त्याच्या घरच्या वातावरणाचा त्याच्यावर गंभीर परिणाम होईल असे वाटते’.

प्रदीपच्या चौथ्या इयत्तेच्या शिक्षिका लिहितात, - ‘प्रदीप अगदी हताश झालेला

दिसतो. त्याला अभ्यासात आणि शाळेतही फारसा रस वाटत नाही. त्याला वर्गात फारसे मित्र नाहीत आणि तो कधीकधी वर्गात झोपतही असतो.'

अनमोल भेट

हे सर्व अहवाल वाचल्यावर मालविकाला प्रदीपची समस्या लक्षात आली. त्याबद्दल तिला वाईट वाटले. दिवाळीच्या सुट्टीअगोदर वर्गातील मुले आपल्या शिक्षिकेला काहीतरी भेट देत असत. सर्व मुले छान-छान कागदात बांधलेल्या भेटवस्तू मालविकाला देत होते. त्याच वेळी एका जाडयाभरडया खाकी कागदात गुंडाळलेली भेट प्रदीपने मालविकाला दिली. सर्व भेटी एकत्र केल्यावर मालविकाने त्या सर्व भेटींतून प्रदीपने दिलेली भेट सर्वांसमक्ष बाहेर काढली. काही मुले हसायला लागली. मालविकाला त्या कागदात कृत्रिम हिऱ्यांनी जडवलेले मनगटातील एक कंकण आणि अर्धवट भरलेली एक अत्तराची बाटली मिळाली. कंकणातील काही हिरे पडलेलेही होते. मुलांच्या हसण्याकडे दुर्लक्ष करीत ती प्रदीपला म्हणाली,

"किती छान आहे हे कंकण!" आणि तिने ते कंकण स्वत:च्या हातात घालून हातावर थोडे अत्तरही शिंपडले.

त्या दिवशी संध्याकाळी मालविकाला भेटण्यासाठी प्रदीप बराच वेळ थांबला आणि त्यांना भेटून म्हणाला,"बाई, आज आपण मला अगदी माझ्या आईच्या रूपात भेटलात, आपल्या बोलण्याने तुम्ही मला आईचीच आठवण करून दिलीत." या भेटीनंतर सर्व मुले वर्गातून निघून गेल्यावर मालविका बराच वेळ अश्रू पुसत रडत बसली होती. त्या दिवसापासूनच तिने मुलांना केवळ लिहिणे, वाचणे आणि गणित शिकवण्याऐवजी मुलांना घडवायचे कामही स्वीकारले.

प्रदीपची प्रगती

मालविकाने प्रदीपकडे विशेष लक्ष द्यायचे ठरवले. तिने प्रदीपबरोबर अभ्यासाला सुरुवात केली. प्रदीपचे मन प्रफुल्लित झाले. जसजशी ती त्याला प्रोत्साहित करीत होती तसतसा त्याचाही उत्तम प्रतिसाद मिळत होता. वर्षाच्या अखेर तो वर्गातला अत्यंत हुशार मुलगा ठरला. आपण सर्व मुलांवर सारखे प्रेम करतो असं तिने साऱ्या मुलांना वचन दिले असले तरी प्रदीप मात्र मालविकाचा अधिक लाडका विद्यार्थी झाला होता.

वर्षाच्या शेवटी आणि सहा वर्षांनंतर मालविकाला प्रदीपकडून एक पत्रं आले होते. त्यात त्याने लिहिले होते, 'आपण मला माझ्या आयुष्यात भेटलेल्या सर्वोत्तम शिक्षिका आहात. चार वर्षांनंतर पुन्हा तिला प्रदीपचे पत्र मिळाले. त्यात त्याने लिहिले होते, 'बाई, आयुष्य वाटते तितके सोपे नाही. त्यात नेहमीच चढउतार येत असतात; परंतु मी न डगमगता माझे शिक्षण चालूच ठेवले आहे आणि लवकरच मी उत्तम मार्क्स मिळवून पदवीधर होणार आहे.' मालविकेला त्याने पुन्हा एकदा खात्री दिली की, अजूनही त्या त्याच्या संपूर्ण आयुष्यात त्याला भेटलेल्या सर्वोत्तम शिक्षिका आहेत. चार वर्षांनंतर पुन्हा मालविकाला प्रदीपचे अजून एक पत्र आले. त्यात त्याने लिहिले होते,"मला पदवी मिळाल्यावर पुढे मी उच्चशिक्षण घ्यायचे ठरविले आहे. त्या पत्रातही त्याने न चुकता लिहिले होते की, अजूनही त्याला त्याच्या आयुष्यात भेटलेल्या त्याच सर्वोत्तम शिक्षिका आहेत; परंतु आता मात्र त्याची पदवी मोठी झाली होती. त्याने त्याच्या

नावापुढे एम.डी. ही पदवीही लिहिली होती.
प्रदीपची गोष्ट इथेच संपत नाही, त्याच वर्षात मालविकाला प्रदीपकडून एक पत्र मिळाले. त्यात त्याने लिहिले होते की, आता त्याच्या आयुष्यात एक गोड मुलगी आली असून तिच्याशी विवाह करायचे त्याने नक्की केले आहे. त्यात त्याने दोन वर्षांपूर्वीच आपल्या वडिलांचा मृत्यू झाल्याचेही नमूद केले होते. मालविकाला एक आग्रहाची विनंती केली होती. ती म्हणजे तिने त्याच्या लग्नात त्याच्या आईची जागा घ्यायची. अर्थातच प्रदीपने तिला प्रेमाने केलेली विनंती मालविकाने मान्य केली.

बदल शक्य आहे

शाळेत असताना जे कंकण आणि अत्तर प्रदीपने मालविकाला भेट दिले होते, ते प्रदीपच्या आईचेच होते. त्या दोघांनी लग्नानंतर एकमेकांना मिठी मारली आणि प्रदीप त्यांच्या कानात हळू आवाजात कुजबुजला, "बाई, माझ्यावर आपण जो विश्वास दाखविलात त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. आपण मला जो आत्मसन्मान दिलात आणि आयुष्यात मी काहीतरी परिवर्तन घडवून आणू शकतो, हा आत्मविश्वास दिलात त्याबद्दल मी आपले उपकार आयुष्यभर विसरणार नाही."
मालविकालाही आपल्या डोळ्यांतील अश्रू आवरता आले नाहीत. त्याही प्रदीपच्या कानात कुजबुजल्या, "प्रदीप, तुझा काहीतरी गैरसमज झाला आहे. खरंतर तूच तो मुलगा आहेस की, ज्याने 'आपण ठरवलं तर नक्कीच बदल घडवून आणू शकतो', हे ब्रीद खरं करून दाखवलं. तू आपल्या हृदयात ही ज्योत धगधगत ठेवून इतरांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठी आता प्रयत्न करायला हवास."
आपण इतरांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठीही प्रयत्न करावयास हवा आणि ज्यांनी आपले आयुष्य उज्ज्वल करण्यात सहकार्य केले त्यांच्याविषयी सदैव कृतज्ञ राहावयास हवे.

विचार बदला,

आयुष्य बदलेल

धीरूभाई अंबानी

व्यापक विचार करा, जलद गतीने विचार करा. कल्पनांवर आणि स्वप्नांवर कोणाचीही मक्तेदारी नाही. आपण स्वत:ची प्रगती करण्यासाठी कोणाच्याही निमंत्रणाची वाट बघायला नको.
प्रयत्न कधीही थांबवू नका. आपल्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा. आपण कायदे बदलू शकत नाही; परंतु ज्या पद्धतीने कायदे आपले नियंत्रण करतात ती पद्धत आपण बदलू शकतो. आपण जर अचूकतेने आणि निष्ठेने काम केले, तर यश आपोआपच आपल्या मागे येते.
कितीही अडचणी आल्या, तरी आपली ध्येयावरची निष्ठा ढळू देऊ नका. अडचणींचे रूपांतर संधींमध्ये करा.
आपले नशीब अजमावयाला तरुण एडनला गेला. पेट्रोल पंपावर त्याने एक साधारण नोकरी मिळवली. विचारांच्या तंद्रीत असताना दुसऱ्या कामगाराने त्याला विचारले. “काय, एखादा पेट्रोल पंप विकत घेण्याचा विचार आहे काय?” तेव्हा या प्रश्नावर तो तरुण उत्तरला, “छे छे! पेट्रोल पंप नाही. तो काय कोणीही विकत घेऊ शकेल. एखादी पेट्रोल कंपनी कशी विकत घेता येईल, याचा विचार करतोय.” महिना 80 रुपये पगार घेणाऱ्या या तरुणाने हे उत्तर दिले. या मुलाने भविष्यात खरोखरच जगातील एक मोठी कंपनी स्थापन केली आणि हजारो कोटी रुपयांच्या साम्राज्याचा तो धनी झाला.
मनाचा निर्धार आणि त्याला नियोजनपूर्वक अथक प्रयत्नांची जोड या बळावर त्यांनी ही गरुडझेप घेतली.
या मुलाचे नाव ‘धीरूभाई अंबानी’. हे उद्योगविश्वात धीरूभाई ‘दीपस्तंभ’ म्हणून ओळखले जातात.
यांच्या जीवनातून हेच सिद्ध होते की, जी माणसे मोठी स्वप्ने बघण्याचे धाडस करतात ती माणसे संपूर्ण जग जिंकू शकतात. सर्वसाधारणपणे बऱ्याच व्यक्ती परिस्थितीपुढे नमतात, हरतात; परंतु धीरूभाईंनी परिस्थितीला आपल्यापुढे नमवायला लावले.
गुजरातमधील एका लहान गावात त्यांचा जन्म झाला. वयाच्या 16 व्या वर्षी त्यांनी आपला देश सोडला. आपल्या शब्दकोशातून त्यांनी ‘अशक्य’ या शब्दालाच पळवून लावले. आपल्या आवतीभोवतीच्या माणसांसाठी अशक्य ते शक्य करण्याची प्रेरणा दिली. आव्हान स्वीकारण्याची शक्ती आणि चेतना दिली. जगात परिश्रम घेणाऱ्यांसाठी अमर्याद संधी आहेत याचे आश्वासन दिले. आपल्याजवळ धैर्य आणि धोके पत्करण्याची तयारी हवी, हे दाखवून दिले. त्यांनी आयुष्यात प्रचंड धोके पत्करून कामे केली. म्हणूनच व्यापक विचार करा, जलद गतीने विचार करा. कल्पनांवर कोणाचीही मक्तेदारी नाही.

स्वत:चा फायदा करण्यासाठी कोणाच्याही निमंत्रणाची वाट बघायला नको. प्रयत्न कधीही थांबवू नका. आपल्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा. आपण कायदे बदलू शकत नाही; परंतु ज्या पद्धतीने कायदे आपले नियंत्रण करतात ती पद्धत आपण बदलू शकतो. आपण जर अचूकतेने आणि निष्ठेने काम केले, तर यश आपोआपच आपल्या मागे येते.

इतरांसाठी जगा...

आयसिस जॉन्सन

आपण एकटे इतरांसाठी फारसे काही करू शकणार नाही असे आपल्यातील प्रत्येकाला वाटत असते आणि इथेच आपण मोठी चूक करीत असतो. आयुष्याची शोकांतिका तर हीच आहे की, आपण उच्च ध्येय गाठू शकत नाही या भावनेनेच आपण निराश होतो आणि ध्येयच मुळात खूप लहान आणि तोटके ठरवून घेतो. इतरांना मदत करण्यासाठी, त्यांच्या आयुष्यात बदल घडविण्यासाठी आपली संपत्ती द्या. ते शक्य नसेल तर आपला वेळ द्या, आपले श्रम द्या आणि तेही शक्य नसेल तर आपला आनंद, आपले हसू आपण त्यांना नक्कीच देऊ शकतो. त्यांच्या सुखदु:खांमध्ये सहभागी होऊ शकतो.

आयसिस जॉन्सन **(Isis Johnson)** यांची कथा सामान्य व्यक्तीतही असामान्य बनण्याची ऊर्मी निर्माण करणारी आहे. या मुलीने ती चार वर्षांची असताना एक उंच भरारी घेतली आणि समाजावर एक प्रदीर्घ ठसा उमटवून गेली.

इथोपियातील जनता त्यावेळी एका भयानक दुष्काळाचा सामना करीत अतिशय कठीण परिस्थितीतून जात होती. अन्नाच्या अभावाने अनेक पुरुष, महिला आणि मुले तडफडून मरत होती. अमेरिकेतील अनेक लहान मुले दूरदर्शनवर ही भयावह दृश्ये बघत होती. अनेकांची हृदये दु:खाने विदीर्ण होत होती. हे सर्व बघून छोटी आयसिस आपल्या आजीला म्हणाली, “आपण या इथोपियातील मुलांसाठी आपले उरलेले अन्न नाही का पाठवू शकणार?” “अरे बाळा! इथोपिया आपल्या गावापासून फार फार दूर आहे आणि तिथे पोहोचेपर्यंत आपले सर्व अन्न नासून जाईल.” आजीने मोठ्या प्रेमाने आयसिसची समजूत काढली; परंतु आयसिस इतक्या सहजपणे हे समजावून घेऊन शांत बसणारी मुलगी नव्हती. ‘तर मग आपल्या शहरात अशी भुकेली मुले नाहीत का? आपण त्यांना आपले अन्न नाही का देऊ शकणार?’ या प्रश्नाने तिला झपाटले. आपण हे नक्कीच करू शकतो हे तिला जाणवले आणि ती कामाला लागली. आयसिसने आपल्या आसपासच्या लोकांकडे जाऊन गरीब मुलांसाठी अन्न जमवायला सुरुवात केली आणि ते गरीब मुलांपर्यंत पोहोचवायला लागली. अशाप्रकारे ‘आयसिस जॉन्सन फाउंडेशन’ ची स्थापना झाली.

आता हे फाउंडेशन अमेरिकेतील हजारो गरीब मुलांना कपडे, अन्न आणि इतर आवश्यक गोष्टी पुरवते. हे सर्व करीत असताना छोट्या आयसिसने डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगून आपल्या आयुष्याला आकार देण्यास सुरुवात केली आहे. अर्थात आजारी आणि रोगग्रस्त जीवांना दिलासा देणे हीच तिच्या या निश्चयाची प्रेरणा आहे. ही चिमुकली म्हणते, “आपण कोण आहोत याने काहीही फरक पडत नाही. आपण गरीब आहोत की श्रीमंत यानेही काही फरक पडत नाही. आपल्यातील प्रत्येक जण जगात काहीतरी करून बदल घडवून आणू शकतो. प्रत्येक जण इतरांना मदत करू शकतो, यासाठी

आपल्याला फक्त इतरांबद्दल आस्था असायला हवी.''

साधी राहणी,

उच्च विचारसरणी

व्यक्तीच्या पोशाखावरून तिची व्यावहारिक, वैचारिक पातळी, बुद्धिमत्ता व कर्तृत्व ठरवता येत नाही. अतिशय सामान्य वेशभूषा असणाऱ्या व्यक्तीदेखील उच्चविचारी व श्रीमंत असू शकतात, हे कुणीही विसरता कामा नये. व्यक्तीची महानता ही तिच्या ज्ञान आणि कर्मानुसार ठरत असते. शक्तिशाली विचार असणारी व्यक्ती सामर्थ्यवान असते. हे सामर्थ्य त्यांनी केलेल्या विधायक कार्यांमधून प्रकट होत असते, पोशाखावरून नव्हे.

आपल्या लाडक्या मुलाचे निधन झाल्यामुळे दु:खी झालेले आई-वडील त्याच्या विद्यापीठात जाऊन कुलगुरूला भेटतात आणि 'विद्यापीठाच्या परिसरात आपल्या लाडक्या मुलाचे स्मारक उभारायची आमची मनापासून इच्छा आहे', असे सांगतात. त्यावर कुलगुरू जे सांगतात ते ऐकून त्यांना धक्काच बसतो. ते म्हणतात, "बाईसाहेब! हॉर्वर्ड विद्यापीठात दाखल झालेल्या आणि नंतर मृत्यू पावलेल्या प्रत्येक व्यक्तीचे स्मारक आम्ही आमच्या प्रांगणात उभारू शकत नाही. तसे केले तर आमचे प्रांगण हे एक स्मशानच बनेल."

ताबडतोब त्या मुलाची आई म्हणते, "नाही, नाही, आमच्या मुलाचा पुतळा उभारण्याचा आमचा अजिबात मानस नाही. हॉर्वर्ड विद्यापीठासाठी एक आलिशान इमारत बांधून देण्याचा आमचा विचार आहे."

स्टॅन्डफोर्ड विद्यापीठाची निर्मिती

कुलगुरू आपल्या भुवया उंचावीत जोडप्याने घातलेल्या सुती आणि साध्या कपड्यांकडे आश्चर्याने बघत म्हणाले, "ओ! इमारत!!"

"इमारतीची काय किंमत असेल याची पुसटशी तरी कल्पना आपल्याला आहे का? हॉर्वर्डमधील इमारतीची किंमत 75 लाख डॉलर्सपेक्षाही जास्त असेल बरं का?"

त्या मुलाची आई स्तब्ध झाली. कुलगुरूंना वाटले आता मात्र या गरीब दांपत्यापासून आपली सुटका होणार. त्यानंतर त्या मुलाच्या आईने आपली नजर आपल्या पतीकडे वळवली आणि ती म्हणाली, "अहो, इमारतीची किंमत इतकी कमी असेल, तर आपण आपले स्वतंत्र विद्यापीठच काढूया!

पतीराजांनी होकारार्थी मान हालवली.

बाह्यरुप म्हणजे खरे व्यक्तिमत्त्व नव्हे

कुलगुरूंचा चेहरा मात्र गोंधळून कोमेजल्यासारखा झाला होता. ते जोडपे म्हणजे श्री. आणि सौ. लेलँड स्टॅन्डफोर्ड. काही दिवसांतच त्यांनी कॅलिफोर्नियातील पालो आल्टो येथे एका विद्यापीठाची स्थापना केली आणि त्याचे नामकरण 'स्टॅन्डफोर्ड विद्यापीठ' असे करून आपल्या मुलाला अजरामर केले. हॉर्वर्ड विद्यापीठाने मात्र ही मोठी संधी

गमावली होती. बऱ्याच वेळा व्यक्तींची पारख आपण त्यांच्या पोशाखावरून, चेहऱ्यावरून म्हणजेच त्यांच्या बाह्यांगावरून करतो आणि नेमक्या याच गोष्टी आपल्याला फसवतात. याच गोष्टींवरून आपण इतरांशी वाईट, वागतो आणि त्यांना तुच्छ समजतो. अशाप्रकारे आपण आपले उत्तम मित्र, हितचिंतक, ग्राहक आणि कामगार यांना मुकतो.

व्यक्तीच्या पोशाखावरून तिची व्यावहारिक, वैचारिक पातळी, बुद्धिमत्ता व कर्तृत्व ठरवता येत नाही. अतिशय सामान्य वेशभूषा असणाऱ्या व्यक्तीदेखील उच्चविचारी व श्रीमंत असू शकतात, हे कुणीही विसरता कामा नये.

तुझे आहे तुझपाशी

आयुष्याच्या लढाईत अंतिम यशाची खात्री बाळगा; कारण परमेश्वर आपल्याला आपल्या गरजा भागवण्यासाठी भरपूर गोष्टी मुक्तहस्ताने देत असतो; पण तो आपला हव्यास पूर्ण करू शकत नाही याचीही जाण ठेवा. आपल्यात कमतरता असतात आणि म्हणूनच आयुष्यात चढ-उतारांचा सामना आपल्याला करावाच लागतो. आपल्या कुटुंबीयांचेही मूल्य जाणा. आपल्याला सर्वोत्तम काय करता येईल ते करीत राहा. स्वत:ला एकांगी पाडून समाजापासून तोडू नका. आयुष्यात सच्चे आणि सकारात्मक मित्र जोडा. आयुष्य उत्तम व अर्थपूर्ण करण्यासाठी परमेश्वरावर श्रद्धा असणे अनिवार्य आहे. यामुळे आपले मनोबल वाढते आणि आपण उत्तमप्रकारे दैनंदिन समस्यांचा सामना करू शकतो.

बबनराव हे एक छोटे उद्योजक होते. व्यवसाय म्हटला म्हणजे त्यात चढ उतार आलेच. अशाच एका बिकटप्रसंगी बबनराव आपल्याकडे असणारी एक मालमत्ता विकायची ठरवितात. आपला लेखकमित्र दत्ता याच्या लेखनकौशल्याची त्यांना आठवण होते. ते त्याची मदत घ्यायची ठरवतात. त्याला भेटून आपले शेत विकायची इच्छा ते प्रकट करतात आणि त्याला एक विनंतीही करतात की, या शेताला चांगली किंमत मिळावी, यासाठी मी वर्तमानपत्रात जाहिरात देणार आहे. कृपया तू या जाहिरातीचा मजकूर मला लिहून देशील का?”

खरी किंमत

दत्ताजींना त्या शेताची चांगलीच माहिती होती; कारण ते बबनरावांबरोबर अनेक वेळा त्या शेतावर गेले होते. एक-दोन दिवसांतच दत्ताजींनी खालीलप्रमाणे जाहिरात केली आणि बबनरावांकडे पाठविली. ती अशी होती,

‘विकणे आहे. एक सुंदर मालमत्ता! जिथे एका वनराईत सूर्योदयाच्या वेळी पक्षी गाणे गातात. शेताच्या मध्यातून एक निर्मळ आणि अवखळ असा झरा खळखळ वाहतो. उगवता सूर्य संपूर्ण धरित्रीला न्हाऊन काढतो. इथली गर्द वनराई दुपारच्या वेळी शांत सावली देते. संध्याकाळी घराच्या ओसरीवरून मोहक हवा वाहते. रात्रीच्या प्रशांत वातावरणात माणसं सुखानं निद्रेच्या आधीन होतात.’

काही दिवसांनंतर जेव्हा दत्ताजी बबनरावांना भेटले तेव्हा सहजच त्यांनी विचारले, “अरे, तुझी मालमत्ता विकली गेली का?” त्यावर बबनराव त्याला म्हणाले, “तू तयार केलेला मजकूर जेव्हा मी वाचला तेव्हा माझ्या मालमत्तेच्या समृद्धीची मला कल्पना आली. तिची खरी किंमत माझ्या लक्षात आली आणि ती मालमत्ता न विकण्याचा मी निर्णय घेतला.”

आयुष्यभर आपण सारेच मृगजळामागे वेगाने धावत असतो आणि या दिशाहीन धावपळीमुळे अगदी थकून जातो. शांतपणे विचार केला तर जवळ असलेल्या अनमोल गोष्टींची जाणीव आपल्याला होते. बऱ्याच वेळा आपले जवळचे मित्र आपल्याला या गोष्टींची जाणीव करून देत असतात आणि त्यामुळे आपल्याकडे असलेल्या समृद्धीची, सामर्थ्याची आपल्याला जाणीव होते, आपल्या सुप्त क्षमतांचीही जाणीव होते.

अनेक वेळा काही गोष्टींच्या प्राप्तीसाठी माणसं आपल्या मुलांचा, कुटुंबीयांचा,

मित्रांचा आणि व्यावसायिक सहकाऱ्यांचा त्याग करतात. ही गोष्ट ते अगदी सहजपणे करीत असतात. आयुष्यात अतिशय काळजीने, कष्टाने आपण या गोष्टी मिळवलेल्या आहेत आणि त्या जतन केलेल्या आहेत याचे भानही त्यांना राहत नाही.

अमूल्य ठेवा

आजूबाजूला बघा, आपल्याकडे जे काही आहे त्याकडे जरा सूक्ष्मपणे, कौतुकाने बघा. आपले घर, आपल्यावर प्रेम करीत असणारी माणसे, विश्वासू मित्रमंडळी, आपण मिळवलेले ज्ञान, जमवलेली मालमत्ता, कमवलेले उत्तम आरोग्य आणि आपण जमा केलेल्या अनेक सुंदर- सुंदर गोष्टी. हा सर्व आपल्याजवळ असलेला अमूल्य आणि विनिमय न करता येणारा ठेवा आहे. त्याची नुसती किंमत करू नका, तर त्याचे मूल्य जाणा!

आपल्या समस्या नित्यनेमाने परमेश्वराजवळ बोलून दाखवा. त्यासाठी मंदिर, मशीद, गुरुद्वारा यांचाच आश्रय घेण्याची गरज नाही. परमेश्वराचा वास आपल्या हृदयातच आहे हे विसरू नका. मात्र त्याला नित्यनियमाने साद घालण्याची, त्याच्या संपर्कात राहण्याची गरज आहे. दु:ख, निराशा यांना आपल्या आसपासही फिरकू देऊ नका. परमेश्वराशी नाते जोडा. तो आपल्याला आयुष्य सुंदर करण्यासाठी आवश्यक असणारं मनोधैर्य नक्कीच देईल. आयुष्याच्या लढाईत अंतिम यशाची खात्री बाळगा; कारण परमेश्वर आपल्याला आपल्या गरजा भागवण्यासाठी भरपूर काही मुक्त हस्ताने देत असतो; पण तो आपली हाव पूर्ण करू शकत नाही याचीही जाण ठेवा. आपल्यात कमतरता असतात आणि म्हणूनच आयुष्यात येणाऱ्या चढ-उतारांचा आपल्याला सामना करावाच लागतो. आपल्या कुटुंबीयांचेही मूल्य जाणा. आपल्याला जे काही सर्वोत्तम करता येईल ते करीत रहा. आपल्यात असणाऱ्या कमतरतांसाठी स्वत:ला एकांगी पाडून समाजापासून तोडू नका. आयुष्यात सच्चे आणि सकारात्मक मित्र जोडा. आयुष्य उत्तम व अर्थपूर्ण करण्यासाठी परमेश्वरावर श्रद्धा असणे अनिवार्य आहे. मग त्याला काहीही नाव द्या. यामुळे आपले मनोबल वाढते आणि आपण उत्तमप्रकारे दैनंदिन समस्यांचा सामना करू शकतो. माझी आपल्याला एक विनंती आहे की, ‘परमेश्वराबरोबर राहा आणि परमेश्वरदेखील सदैव आपल्यासोबतच आहे असा विश्वास बाळगा.’

संयमी व्हा!

एखाद्या गोष्टीचे योग्य निदान करण्याअगोदर आपण निर्णय घेत असतो. खरंतर निदान करण्याच्या अगोदर तो प्रश्न खोलवर समजावून घेण्यासाठी काही वेळ द्यायला हवा. आपण तिथे कमी पडतो आणि अधीरतेमुळे आपल्या हातून चुका होतात. आपण संयम बाळगायला हवा. प्रथमत: आपण इतरांना समजावून घ्यायला हवे आणि त्यानंतरच इतरांनी आपल्याला समजावून घ्यावे, अशी अपेक्षा करायला हवी. कुठल्याही गोष्टीची किंवा समस्येची संयमाने शहानिशा न करता जहाल प्रतिक्रिया देणे हे असंयमी व्यक्तिमत्त्वाचे लक्षण आहे.

एका तातडीच्या ऑपरेशनसाठी डॉक्टरांना फोन करून बोलाविण्यात आले. लगबगीने ते हॉस्पिटलमध्ये येऊन परस्पर ऑपरेशन थिएटरमध्ये पोहोचले. डॉक्टरांना बघताच मुलाचे वडील त्यांच्यावर ओरडले, "आपण यायला इतका उशीर का केलात? आपल्याला माहीत नव्हते का, माझ्या मुलाचे आयुष्य धोक्यात आहे. आपल्याला काही जबाबदारीची जाणीव आहे का?" यावर डॉक्टर फक्त हसले आणि म्हणाले, "माफ करा! मी हॉस्पिटलमध्ये नव्हतो आणि फोन आल्याबरोबर मला शक्य झाले तेवढ्या लवकर मी आलो आहे. आता मला असे वाटते की, आपण शांत राहावे म्हणजे मला माझे काम करता येईल." "शांत राहा? यावेळी ऑपरेशनच्या टेबलवर तुमचा मुलगा असता तर तुम्ही काय केले असते? तुम्ही शांत राहिला असता का? तुमच्या मुलाचा मृत्यू झाला असता, तर तुम्ही काय केले असते?" अत्यंत रागाने मुलाचे वडील डॉक्टरांवर ओरडत होते.

डॉक्टर पुन्हा स्मितहास्य करीत म्हणाले,"पवित्र बायबलमध्ये जे सांगितलं आहे तेच शब्द मी उच्चारले असते. आपण मातीतूनच आलेले जीव आहोत आणि मातीतच जाणार आहोत. आशीर्वाद देण्याचं काम भगवंताचं आहे, डॉक्टर कोणाचंही आयुष्य वाढवू शकत नाही."

मुलाचे वडील पुटपुटले,"जेव्हा प्रत्यक्ष गोष्टीशी आपला संबंध नसतो तेव्हा सल्ला देणे फार सोपे असते".

ऑपरेशन काही तास चालले.

डॉक्टर खुशीतच बाहेर आले आणि म्हणाले, "देवाच्या चांगुलपणाला धन्यवाद द्या, आपल्या मुलाचे आयुष्य वाचले आहे." त्यानंतर घाईघाईने मुलाच्या वडिलांच्या प्रतिक्रियेचीही वाट न बघता डॉक्टर निघून गेले. जाताना फक्त म्हणाले,"आपल्याला काही शंका असतील तर नर्सला विचारा." डॉक्टर निघून गेल्यावर एक-दोन मिनिटातच त्यांची नर्सही बाहेर आली. "काय मग्रूर आणि उद्धट आहेत हो तुमचे डॉक्टर. एक-दोन मिनिटे थांबून माझ्या मुलाचं ऑपरेशन कसे झाले, आता त्याची प्रकृती कशी आहे हे मला प्रत्यक्ष सांगण्याचं सौजन्यसुद्धा त्यांना दाखविता आलं नाही!" नर्सच्या डोळ्यातून अश्रू ओघळले आणि जड स्वरात ती म्हणाली, "कालच रस्त्यावरील अपघातात डॉक्टरांच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. मी तुमच्या मुलाच्या ऑपरेशनसाठी जेव्हा त्यांना फोन केला तेव्हा ते स्मशानातच होते आणि आता ते तुमच्या मुलाचा जीव वाचवून घाईघाईने आपल्या मृत मुलाचे अंत्यसंस्कार करण्यासाठी परत स्मशानात गेले आहेत!"

समाधानी राहा

मुंगीची चाल वारूळ बांधण्यासाठी उपयोगी पडते, तर झाडाचे स्थैर्य त्याला उत्तम मुळे धरण्यास उपयुक्त ठरते. प्रत्येक गोष्टीची योजना ही विशिष्ट हेतूने केली गेलेली आहे आणि तेच त्याचे खास वेगळेपण आहे. या वैशिष्ट्याचा उपयोग करून आपल्याला जे काही साध्य करायचे आहे ते आपण करू शकतो, आपण आपलं काम अधिक यशस्वीरीत्या करू शकतो. आहे त्या परिस्थितीत स्थिर राहून संयमी वृत्तीने उत्तम कार्य करण्याचा प्रयत्न करायला हवा. स्थितप्रज्ञ बनूनच प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देणे योग्य ठरते.

एकदा एक राजा सकाळी लवकर उठून आपल्या बागेत फिरायला गेला; पण समोरचे दृश्य बघून तो खूपच हताश होता; कारण सर्व बाग कोमेजून जाऊ लागली होती. बागेच्या दारातच त्याची गाठ एका ओक वृक्षाशी झाली. असं का होतंय, या विचारानं राजाला घेरून टाकलं, तेव्हा त्याच्या लक्षात आलं की, हे झाडच आयुष्याला कंटाळलं होतं आणि या निराशेमुळंच त्यानं मरायचं असं मनात घेतलं असावं.

असमाधानी वृत्ती

आपण पाइन वृक्षासारखं उंच आणि सुंदर नाही असं ओक वृक्षाला वाटायचं. जेव्हा तो पाइन वृक्षाजवळ गेला तेव्हा त्याच्या लक्षात आलं की, पाइन वृक्षाचं हे दु:ख होतं की, त्याला द्राक्षाच्या वेलीसारखे सुमधुर द्राक्षं येत नाहीत. त्याने जेव्हा द्राक्षाच्या वेलीची भेट घेतली तेव्हा त्याला कळलं की, द्राक्षाच्या वेलीचं दु:ख इतर झाडांसारखं सरळ उभं राहता येत नाही आणि पीच वृक्षाप्रमाणे सुंदर, गुलाबी फळंही लागत नाहीत हे आहे. बागेतील रानटी फुलांची झाडे चिडली होती; कारण त्यांना सदाफुलीसारखी फिकट गुलाबी आणि हसरी फुले येत नव्हती. सगळ्या बागेतील चित्र असंच होतं.

जीवनाचा आनंद घ्या

पुढे गेल्यावर त्याच्या लक्षात आलं की, तिथे एक सुंदर फूल होतं. ते मात्र नेहमीसारखं अगदी आनंदात आणि उत्साहात डुलत होतं. राजाही आनंदून त्याला म्हणाला, “अरे तुला बघून मला किती आनंद झाला आहे! छोट्या फुला, तू किती शूर आहेस; कारण या निराशाजनक वातावरणातदेखील तू आपला नेहमीचा आनंद आणि उत्साह टिकवून ठेवला आहेस.” यावर ते छोटंसं फूल म्हणालं, “हो, खरंतर मी इथे कोणाच्याच खिजगणतीत नाही; परंतु महाराज, मला असं वाटतं की, तुम्हाला या जागी पाइन, ओक, पीच किंवा सदाफुली हवी असती तर तुम्ही माझ्याऐवजी तीच झाडे लावली असती. या ठिकाणी तुम्हाला मीच हवा होतो म्हणून तुम्हीच मला इथे लावले आहे आणि म्हणूनच मी आहे तसाच आहे. माझ्यापरीने मला जितकं चांगलं जगता येईल तितकं आनंदानं जगायचं, बागडायचं असं मी ठरवलं आहे.”

किती सुरेख संदेश हे फुलाचं झाड आपल्याला देतंय, नाही का? सध्याची आपली परिस्थिती आपल्याला आवडणारी आणि हवी तशी नसेलही. कदाचित त्यामुळे आपण असमाधानी, निरुत्साही असाल; पण अशा वेळी परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवा. त्याला तुम्हाला दुसऱ्या परिस्थितीत पाठवायचे असेल तर तो तुम्हाला तिकडे घेऊन जाईल.

आपण स्वत:ला त्याच्या इच्छेवर सोडून द्या. कदाचित आज आपण ज्या परिस्थितीत आहोत तिथेच असावे अशी त्याची इच्छा असेल आणि म्हणूनच त्या परिस्थितीत सामावून जाण्यासाठी तो तुम्हाला मदतही करेल. मात्र आपण त्याच्यावर तशी श्रद्धा ठेवायला हवी.

आपल्याला जे करायचंय ते उत्तमातील उत्तमपद्धतीने करायला शिका. आपल्याकडे असणाऱ्या क्षमतांचा आपण परिस्थितीनुसार उत्तम उपयोग करू, तेव्हाच आपण समाधानी राहू शकू. आहे त्या परिस्थितीत चांगले वागल्यानंतर आपण परिस्थितीत अधिक सुधारणा केल्याचे समाधानही आपल्याला मिळेल.

परमेश्वर आर्त

प्रार्थना ऐकतो

जेव्हा कुणीतरी दु:खी असेल
तेव्हा त्याचे अश्रू आपण पुसावे
जेव्हा कुणी भयभीत असेल
तेव्हा त्याला धीर द्यावा
जेव्हा कुणी चिंतेत असेल
तेव्हा त्याला आशा द्यावी
जेव्हा कुणी अंधारात असेल
तेव्हा त्याला प्रकाश द्यावा
जेव्हा आपणच हरवून जाऊ
आवतीभोवती अंधार पाहू
तेव्हा आपल्यासाठीही कुणीतरी
प्रकाश होऊन उभे राहील
आपल्या अडचणीतही नक्कीच कुणीतरी
परमेश्वर बनून धावून येईल.

राधिकाचं आपला लहान भाऊ तन्मयवर खूप प्रेम होतं. एके दिवशी झटकन उठून तिने आपल्याजवळ असलेली; परंतु लपवून ठेवलेली पैशांची पेटी जमिनीवरच रिकामी केली. त्यातील पैसे काळजीपूर्वक मोजले. दोनदा-तीनदा मोजून ते नेमके किती आहेत याचा नीट अंदाज घेतला. पैसे परत पेटीत टाकले. पेटीचे झाकण लावले आणि हळूच घराच्या मागच्या दरवाजाने घराबाहेर पडली. तिने तडक एका औषधाच्या दुकानाचा रस्ता धरला. एका मोठ्या दुकानमालकाच्या पुढे जाऊन ती उभी राहिली व त्याचे आपल्याकडे केव्हा लक्ष जाईल याची प्रतीक्षा करू लागली. त्या क्षणी तो खूप व्यस्त होता, तेव्हा तिने पायाचा आवाज केला, घसा मोठ्याने साफ केला; पण व्यर्थच. शेवटी तिने आपल्या पैशांचा दुकानाच्या समोरील काचेवर मोठ्याने आवाज केला. तेव्हा मात्र त्याचे लक्ष या छोट्या मुलीकडे गेले.

चमत्काराची खरी किंमत

त्रासलेल्या आवाजात दुकानदाराने विचारले, "काय हवे आहे तुला? मी शिकागोमधील माझ्या भावाशी बोलतो आहे. अनेक वर्षांत आमची भेटही झालेली नाही." त्यावर राधिका म्हणाली, "हो का? मलापण तुमच्याशी माझ्या भावाबद्दल बोलायचे आहे, माझा भाऊ खरोखरच खूप आजारी आहे आणि त्याचा आजार बरा करण्यासाठी मला तुमच्याकडून चमत्कार विकत घ्यायचा आहे." "माफ कर! काय म्हणालीस तू?" दुकानदाराने विचारणा केली.

“माझ्या भावाचे नाव आहे तन्मय आणि तो एका विचित्र आजाराने ग्रासला आहे, त्याच्या मेंदूत काहीतरी विचित्र गोष्ट वाढते आहे. माझे वडील म्हणत होते की, काहीतरी चमत्कारच त्याचा आजार बरा करू शकेल म्हणून.”
“काय किंमत आहे या चमत्काराची?” “अगं बाळ, आम्ही या दुकानात चमत्कार विकत नाही. मला वाईट वाटत आहे की, मी तुला काही मदत करू शकत नाही.” जरा मृदू आवाजात तो दुकानदार म्हणाला.
“हे बघा! त्यासाठी लागणारे पैसे माझ्याजवळ आहेत आणि हे पुरणार नसतील तर मी तुम्हाला आणखी पैसे आणून देईल. फक्त मला सांगा किती पैसे लागणार आहेत ते.”
तितक्यात चांगली वेशभूषा असलेला, जवळच उभा असणारा दुकानदाराचा भाऊ पुढे येत त्या चिमुरडीला म्हणाला, “तुझ्या भावासाठी कोणता चमत्कार हवा आहे?” आपले डोळे उंचावत चिमुरडी म्हणाली, “मलाही नक्की सांगता येणार नाही. मला फक्त माझ्या आईकडून असं समजलं की, त्याला शस्त्रक्रियेची गरज आहे; परंतु त्यासाठी लागणारा पैसा माझ्या बाबांकडे नाही... आणि म्हणून मी माझ्याजवळचे पैसे त्यासाठी वापरायचे ठरवले आहे.” “तुझ्याजवळ किती पैसे आहेत?” दुकानदाराच्या भावाने विचारले. “माझ्याजवळ चांगले एकशे एक रुपये आहेत,” चिमुरडी जरा दबलेल्या आवाजातच म्हणाली, “सध्या तरी माझ्याजवळ इतकेच पैसे आहेत; पण गरज लागल्यावर मी अजून थोडे पैसे जमवू शकेल,” “ओ! काय योगायोग आहे एकशे एक रुपये! तुझ्या भावासाठी लागणाऱ्या त्या चमत्काराची अगदी योग्य किंमत तुझ्याजवळ आहे हं! ”असे म्हणत त्या दुकानदाराच्या भावाने चिमुरडीच्या हातातील पैसे घेतले. तिचा हात पकडला आणि म्हणाला, “मला तुझ्या भावाकडे घेऊन चल, मला त्याला आणि तुझ्या आई-वडिलांना भेटायचे आहे. चल, बघूयात तुला हवा असणारा चमत्कार मी तुला देऊ शकतो का?”

निर्व्याज प्रेमाचा संकल्प

दुकानदाराचा हा भाऊ म्हणजेच डॉ. नीलेश आपटे हे पुण्यातील सुप्रसिद्ध न्यूरो सर्जन होय. त्यांनी कोणतीही फी न आकारता चिमुरडीच्या लाडक्या भावाचे ऑपरेशन केले आणि तो लवकरच रुग्णालयातून घरी परतला. दैनंदिन व्यवहारदेखील करू लागला. त्या मुलाचे आई-बाबा आपल्या आवतीभोवतीच्या माणसांना डॉक्टरांनी घडवलेल्या या चमत्काराचा वृत्तांत अगदी कौतुकाने सांगत राहिले. एका शेजाऱ्याला याबद्दल सांगताना मुलाची आई म्हणाली, “ती शस्त्रक्रिया म्हणजे माझ्या बाळासाठी खरोखर एक चमत्कारच होता. मला अजूनही आश्चर्यच वाटते की, किती पैसे मोजावे लागले असते यासाठी?” यावर जवळच उभी असलेली चिमुरडी हसली; कारण तिला या चमत्काराची खरी किंमत अचूक माहीत होती आणि ती होती एकशे एक रुपये. आपली श्रद्धाही त्या चिमुरडीने त्यात मिसळली होती. मला आशा आहे की, आपण सर्वजण हे चैतन्य, हा चांगुलपणा, हे प्रेम, ही श्रद्धा सतत जिवंत ठेवाल. चला, आज आपण एक संकल्प करूया. आपल्याला जे शक्य आहे ते आपण गरजवंतांसाठी अगदी निर्व्याज प्रेमाने करूया. परमेश्वराकडून आपल्याला मिळालेल्या संधीचा आपण पुरेपूर उपयोग करूया.

सत्कृत्याची परतफेड

दैनंदिन जीवन जगताना एखाद्या व्यक्तीस अनाहूतपणे आपल्या मदतीचा हात देणे आवश्यक असते. संकटात सापडलेल्या व्यक्तीस नि:संकोचपणे अहंभाव सोडून सहकार्य करावयास हवे. संकटकाळी इतरांना मदत करणे गैर नाही. आपण एखाद्या व्यक्तीस मोठ्या संकटातून वाचवू शकलो, तर ती घटना त्या व्यक्तीसाठी अविस्मरणीय असते.

आपल्यावर एखादे संकट ओढवले की, आपण इतरांकडून मदतीची अपेक्षा करतो. अगदी त्याचप्रमाणे आपणही कठीण प्रसंगात सापडलेल्या व्यक्तींना मदत करावयास हवी. इतरांचे भविष्य उज्ज्वल होण्यात आपण आनंद मानायला हवा. आपल्या प्रयत्नांमुळे एखाद्या व्यक्तीस जीवनदान मिळत असेल, तर खरोखरच ते सत्कृत्य आहे. आपण नि:स्वार्थ वृत्तीने गरजूंना केलेल्या सहकार्याची पावती आपल्याला जरूर मिळते.

लंडनमधील एक कुटुंब आपली उन्हाळ्याची सुट्टी साजरी करण्यासाठी स्कॉटलंडला आलं होतं. आई-वडील आपल्या तरुण मुलाबरोबर ग्रामीण भागातील सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेत होते.

प्राण वाचविले

एक दिवस हे सर्व कुटुंब भान हरपून जंगलातून हिंडत असताना त्यांचा तरुण मुलगा रस्ता चुकला आणि फारसा वापरात नसलेल्या एका तलावाजवळ येऊन पोहोचला. त्याच्या तारुण्यसुलभ स्वभावात अनोखा अनुभव घेण्याची ऊर्मी उत्पन्न झाली आणि कपडे काढून त्याने पाण्यात उडी घेतली. पुढे जे काही घडणार होते त्याची कल्पनादेखील त्याने कधीच केलेली नव्हती. अचानक त्याचे अंग आखडू लागले आणि त्याला असह्य वेदना होऊ लागल्या. यातनांमुळे पाण्यावर तरगंत राहणे त्याला अशक्य होऊ लागले. आता आपण मरणार या भीतीने जीव वाचवण्यासाठी तो ओरडू लागला.

सुदैवाने, शेजारच्याच शेतात एक शेतकरी काम करत होता. त्याने या करुण किंकाळ्या ऐकून पाण्याकडे धाव घेतली आणि त्या इंग्रजी मुलाला पाण्यातून बाहेर काढून त्याचा जीव वाचवला. ही कथा ऐकून मुलाच्या वडिलांचे हृदय कृतज्ञतेने भरून आले. दुसऱ्याच दिवशी त्यांनी आपल्या मुलाचा जीव वाचविण्याऱ्या शेतकऱ्याची भेट घेतली. त्याच्याशी बोलत असताना त्याच्या मुलाला त्यांनी विचारले, "भविष्यात काय करणार आहेस!" निराशेने मुलाच्या तोंडून उत्तर आले की, "काय करणार! मला माझ्या वडिलांसारखेच शेतकऱ्याचे जीवन जगावे लागणार आहे." इंग्लिश पित्याने विचारले, "दुसरे काहीतरी करावे असे तुझ्या मनात आहे का?"

परतफेड

"हो! खरंच, डॉक्टर होण्याची माझी खूप मनापासून इच्छा आहे; परंतु माझं कुटुंब गरीब असल्याने या शिक्षणासाठी लागणारा पैसा ते मला देऊ शकणार नाहीत." "अरे, असा उदास होऊ नकोस," इंग्लिश पिता म्हणाले. "तुझ्या मनातील इच्छा पूर्ण होईल. तू तुझ्या पुढील शिक्षणाची मानसिक तयारी कर. खर्चाची जबाबदारी मी स्वीकारील."

अशाप्रकारे स्कॉटलंडमधल्या शेतकऱ्याचा मुलगा डॉक्टर झाला. काही वर्षांनंतर म्हणजे

डिसेंबर 1943 साली विन्स्टन चर्चिल यांना उत्तर आफ्रिकेत असताना न्यूमोनिया या दुर्धर रोगाने पछाडले. ज्यांनी 'पेनिसिलीन' या जादुई औषधाचा शोध लावला होता, अशा सुप्रसिद्ध डॉक्टरांना पाचारण करण्यात आले. हे डॉक्टर म्हणजेच अॅलेक्झांडर फलेमिंग. डॉ.फलेमिंग लंडनहून धावून आले आणि त्यांनी विन्स्टन चर्चिल यांचा जीव वाचवला.

कथेतील स्कॉटिश शेतकरी म्हणजेच डॉ. अॅलेक्झांडर फलेमिंग यांचे वडील आणि डॉ.फ्लेमिंग यांचं शिक्षण करणारे कृतज्ञ इंग्लिश गृहस्थ म्हणजेच ब्रिटनचे सुविख्यात पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांचे वडील रुडाल्फ चर्चिल हे होते. ही घटना सत्य आहे की, अपघाताने तयार झालेली आहे, यावर वाद होऊ शकतील. कदाचित इतिहास ही घटना नाकारेलही; परंतु ही घटना आपल्याला अमूल्य शिकवण देऊन जाते. 'आपण केलेल्या चांगल्या गोष्टीची परतफेड अगदी निश्चित आणि अनेक पटींनी होतेच. चांगुलपणा कोणत्या स्वरूपात आपल्याकडे परत येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आपण सतत चांगली कृत्ये आणि गरजूंना मदत करीत राहावे.'

ग्राहक समाधान

एक आदर्श

ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी स्वयंनिर्णय आणि निर्धार लागतो. व्यवसायात ग्राहकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्राहकांचे समाधान हेच व्यावसायिकांचे समाधान आहे. ग्राहक म्हणजे व्यावसायिकांचे दैवत. आपल्या ग्राहकांना सौजन्याने वागणूक देणे, त्यांच्याशी उत्तम परस्परसंबंध जोपासणे, त्यांच्या अपेक्षेनुसार त्यांना नवीन ग्राहक मिळविणे; तसेच मिळविलेल्या ग्राहकांना समाधानी ठेवून त्यांना टिकवून ठेवणे हे व्यवसायातील अत्यंत मोलाचे कौशल्य आहे. सेवा पुरविणे यातच व्यवसायवाढीचे सूत्र सामावलेले असते.

हॅरिस हा मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह एका विमानतळावर टॅक्सीच्या प्रतीक्षेत उभा होता. त्याच्या समोर एक टॅक्सी उभी राहिली. हॅरिसच्या पटकन लक्षात आले की, टॅक्सी अतिशय स्वच्छ आणि चकचकीत आहे. काळी पँट आणि पांढरा शर्ट, त्यावर छान शोभेल असा टाय घातलेला ड्रायव्हर तत्परतेने खाली उतरला. त्याचा पोशाख अगदी नीटनेटका जाणवत होता. त्याने हॅरिससाठी पटकन पुढे होऊन मागचे दार उघडले. लॅमिनेटेड कार्ड हॅरिसच्या हातात देत तो म्हणाला, “सर, मी ‘विली’ आपला वाहनचालक. मी आपले सामान टॅक्सीत ठेवतो, तोपर्यंत आपण हे कार्ड वाचा. हे माझे ‘मिशन स्टेटमेंट’ आहे”. आश्चर्यानेच हॅरिसने ते कार्ड वाचले. ते असे होते :

“माझ्या ग्राहकांना सुरक्षितपणे, जलदगतीने, शक्य तेवढ्या स्वस्तदरात आणि मैत्रीच्या वातावरणात त्याच्या इच्छित स्थळी पोहोचवणे.” गाडीच्या बाहेरील स्वच्छतेप्रमाणेच गाडी आतूनही अतिशय स्वच्छ होती हे बघून हॅरिस आश्चर्यचकित झाला. चाकाचा ताबा घेत विली म्हणाला, “साहेब! आपल्याला कॉफी घ्यायला आवडेल? माझ्याकडे दोन थरमॉस आहेत.” गमतीने हॅरिस म्हणाला,“मला कोल्ड्रिंक घ्यायला आवडेल.” विली हसत म्हणाला, “सर, काही हरकत नाही, माझ्याकडे फँटा आणि कोकाकोलाही उपलब्ध आहे.” जड जिभेनेच हॅरिस म्हणाला, “मला कोकाकोला चालेल.”

सेवातत्पर विली

कोकाकोला हॅरिसच्या हातात देत विली म्हणाला, “आपल्याला काय वाचायला आवडेल? माझ्याकडे तीन वर्तमानपत्रं आहेत.” पुढे जात असतानाच विलीने हॅरिसच्या हातात अजून एक कार्ड सरकवले. “माझ्या रेडिओवर ही केंद्रे उपलब्ध आहेत, त्यावर हे संगीतही उपलब्ध आहे. हवे असेल ते केंद्र आपण लावू शकता.” हे सर्व कमी पडेल की काय असे वाटून विली परत म्हणाला, “सर, माझ्या गाडीतील तापमान आपल्याला योग्य वाटते ना? आरामदायी आहे ना? आणि आपल्याला हवे असेल तर रस्त्यावर येणाऱ्या काही स्थळांची माहितीही मी आपल्याला देऊ शकेन. आपल्याला जर शांत बसणे पसंत असेल तर आपण आरामही करू शकता.” असेही तो म्हणाला.

समाधानाने हॅरिस म्हणाला, ‘‘विली, मला सांग, तू ग्राहकांशी नेहमीच असा वागतो का?’’

स्वत:मधील वेगळेपण

रिअर व्हिह मिररमधून हॅरिसने विलीच्या चेहऱ्यावरील हसू बघितले. विली म्हणाला, ‘‘नाही. मी आधी असा नव्हतो. मागच्या दोन वर्षांत मी स्वत:मध्ये या सुधारणा केल्या आहेत. माझ्या व्यवसायातील पहिली पाच वर्षं मी माझ्या इतर ड्रायव्हर मित्रांसारखीच कुरकुरत काढली. नंतर ‘वैयक्तिक उन्नती कशी करावी?’ या विषयावर एका महान गुरूचं भाषण मी रेडिओवर ऐकलं. नंतर त्यांची काही पुस्तकंही माझ्या वाचनात आली. त्यातून मला असं कळलं की, आपण सकाळी आजचा दिवस वाईट जाणार अशा भावनेने उठलो, तर बहुधा तो दिवस वाईटच जातो. त्यांचा सल्ला असा होता की, तक्रार करणं थांबवा. आपल्या व्यवसायातील इतर व्यक्तींपेक्षा स्वत:मध्ये एक वेगळेपण निर्माण करा. सदैव तक्रार करणारे बदक होऊ नका, तर मुक्त संचार करणारा गरुड बना. बदक नेहमी कुरकुरत असते, तर गरुड मात्र ढगांना पार करून उंच जातो आणि मुक्त संचार करतो. ही गोष्ट माझ्या हृदयाला भिडली आणि डोक्यातही पक्की बसली. गुरुजी माझ्याबद्दलच बोलताहेत असं मला कळलं. मी नेहमी इतरांबद्दल तक्रारच करीत नव्हतो का?

मी माझा दृष्टिकोन बदलायचा असं ठरवलं. मला गरुड व्हायचं होतं. मी माझ्या व्यवसायातील वातावरणाकडे नजर टाकली. आजूबाजूच्या गाड्या आणि ड्रायव्हर्सचे निरीक्षण केले. गाड्या अस्वच्छ होत्या, ड्रायव्हर्समध्ये मैत्रीभावनेचा अभाव होता. त्यामुळे ग्राहकही त्यांच्यावर नाखूश होते आणि म्हणून मी यात बदल घडवायचा असे ठरवले आणि प्रत्येक वेळी मी थोडा थोडा बदल करत गेलो. माझ्या ग्राहकांना ते आवडले. त्यांनी मला उत्तम प्रतिसाद दिला. त्यानंतर मी माझ्या व्यवसायात अधिक सुधारणा करीत गेलो.’’

‘‘तुला त्याचा नक्कीच फायदा झाला असणार?’’ हॅरिसने विचारले.

‘‘नक्कीच’’, विली म्हणाला.‘‘मी जेव्हा गरुडासारखं काम करू लागलो, त्यावर्षीच माझे उत्पन्न दुप्पट झाले. यावर्षी बहुधा ते चौपट होईल. आपण आज मला अनपेक्षितच भेटलात. मी आता बहुधा टॅक्सी स्टँडला थांबत नाही. माझे ग्राहक हल्ली माझ्या सेल फोनवरून वेळ ठरवून मला बोलावतात. मी त्यांना उपलब्ध होऊ शकलो नाही, तर माझ्या विश्वासू मित्रांना त्यांच्याकडे पाठवतो आणि त्याबद्दल थोडा मोबदलादेखील घेतो.’’

ग्राहक समाधान हेच उद्दिष्ट

विली असाधारण वाटतो. तो नुसता टॅक्सीच चालवीत नाही, तर उत्तम सेवा पुरवतो. आपल्या टॅक्सी आणि रिक्षाचालकांना ही गोष्ट सांगता येईल का? त्यातून योग्य तो बोध घेऊन, आहे त्या परिस्थितीबद्दल तक्रार न करता विधायक बदल घडवून आपले आणि प्रवाशांचेही आयुष्य ते आनंददायी करतील का?

शिथिलीकरण आणि उदारीकरण हे शब्द भारतातील व्यवसायक्षेत्रात परवलीचे बनले आहेत. त्यामुळे व्यवसायात ग्राहकाला खूप महत्त्व आहे. दररोजच्या व्यवहारात भाजीवालेदेखील ग्राहकांशी सौजन्याने बोलू लागले आहेत. परवाच माझा एक मित्र माझ्याकडे आला होता. गप्पांच्या ओघात वितरक (सेवा देणारा) आणि ग्राहक यांचे

संबंध कोणती उच्चपातळी गाठू शकतात याचा परदेशात घडलेला एक किस्सा त्याने सांगितला. या संदर्भात आपल्याला भेटणाऱ्या टॅक्सी किंवा रिक्षाचालकांची वागणूक कशी असते याचा विचार करा म्हणजे आपल्यात किती आणि कशी सुधारणा करायला वाव आहे हे आपल्या लक्षात येईल. ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी फक्त आपला स्वत:चाच निर्धार लागतो. व्यवसायात ग्राहकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्राहकांचे समाधान हेच व्यावसायिकांचे समाधान आहे. ग्राहक म्हणजे व्यावसायिकांचे दैवत. आपल्या ग्राहकांना सौजन्याने वागणूक देणे, त्यांच्याशी उत्तम परस्परसंबंध जोपासणे, त्यांच्या अपेक्षेनुसार सेवा पुरविणे यातच व्यवसायवाढीचे सूत्र सामावलेले असते.

दृष्टी तशी सृष्टी

संधी प्राप्त करण्यासाठी सभोवतालचे जग बदलण्याची आपल्याला आवश्यकता नाही. ज्या दृष्टीने आपण जगाकडे बघतो ती दृष्टी बदलण्याची गरज आहे. आपला दृष्टिकोन आपल्याला आलेल्या अनुभवांवरून निश्चित होतो. आपले पूर्वग्रह दोषपूर्ण असतात आणि त्यातूनच इतरांबद्दल फारसा विचार न करता आपण मते बनवीत असतो. आपण जर चांगल्याच गोष्टी शोधण्याचा प्रयत्न केला, तर आपल्याला चांगल्याच गोष्टी भेटतात. मिळालेल्या संधींकडे नेहमी आशावादी नजरेने बघायला हवे. म्हणजेच आपली दृष्टी बदलायला हवी. यापुढे, जेव्हा आपण इतरांबद्दल काही मते बनवाल तेव्हा जरा थांबून विचार करा. कदाचित आपल्या दृष्टिकोनात परिवर्तन करण्याची हीच वेळ असू शकते.

एक आजोबा आपल्या गावाबाहेरील चौकात बसले होते. ज्ञानाचे आणि शहाणपणाचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. रस्त्याने जाणाऱ्या एका तरुणाने त्यांना विचारले, "आजोबा, या गावातील माणसे कशी आहेत? कारण मी माझं गाव सोडून दुसऱ्या गावात राहण्याचा विचार करतो आहे." त्या जाणत्या आजोबांनी विचारलं, "ज्या गावातून बाहेर पडण्याचा तू विचार करतो आहेस, त्या गावातील माणसे कशी आहेत?" त्या तरुणाने उत्तर दिले, "तेथील माणसे स्वार्थी, दुष्ट आणि उद्धट आहेत." आजोबा म्हणाले, "या गावातील लोकसुद्धा स्वार्थी, दुष्ट आणि उद्धट आहेत." योगायोग असा की, थोड्या वेळाने त्याच ठिकाणी दुसरा एक तरुण आला. त्यानेही आजोबांना तोच प्रश्न विचारला. आजोबांनी परत त्याला विचारले, "ज्या गावातून तुला बाहेर पडायचे आहे त्या गावातील माणसं कशी आहेत? दुसरा तरुण उत्साहाने म्हणाला, "आजोबा! खूप प्रेमळ, अतिशय नम्र आणि चांगली माणसं आहेत ती." आजोबांनीही त्याच उत्साहात उत्तर दिलं, "तर मग या गावातली माणसंही अगदी तशीच आहेत."

जसे आपण तसे जग

इतर माणसे आपल्याला दुर्जनांप्रमाणे वाटतात. ज्या रंगाच्या काचेतून आपण जगाकडे बघतो तसेच जग आपल्याला भासते. हा लोकांचा नाही तर आपल्या काचेच्या रंगाचा प्रश्न आहे. सामान्यपणे आपल्याला जग जसे आहे तसे दिसत नाही; तर आपण जसे आहोत तसे दिसते. बहुतेक वेळा इतर माणसांची वागणूक ही आपल्या वागणुकीची प्रतिक्रिया असते. याबाबत मला राहुलनं सांगितलेली त्याची स्वत:चीच एक गोष्ट आठवली.

राहुल नुकताच आपल्या नवीन सदनिकेत स्थलांतरित झाला होता. समोरासमोर अनेक इमारती होत्या. एकदा स्वयंपाकघरात असलेल्या सुषमाचे म्हणजेच त्याच्या पत्नीचे लक्ष समोरील इमारतीवर वाळत घातलेल्या कपड्यांकडे गेले आणि धुऊन वाळत घातलेल्या त्या कपड्यांकडे तिने निरखून पाहिले. ती पटकन राहुलला म्हणाली, "मला नाही वाटत या माणसांना कपडे कसे धुवावे हे कळत असेल म्हणून, किती अस्वच्छ वाटताहेत हे कपडे!" त्यावर राहुल म्हणाला, "कदाचित त्यांनी वापरलेली कपडे धुण्याची पावडर हलकी असेल." राहुलची मान मात्र अजूनही वृत्तपत्रातून बाहेर आलेली नव्हती. काही

आठवड्यानंतर ती दोघं अशीच बसलेली असताना, सुषमाची नजर पुन्हा समोरच्या कपड्यांकडे गेली. पुन्हा तेच मळलेले कपडे समोर होते. सुषमाने शेजारच्या अकार्यक्षम जोडप्यावर टीका केली.

त्यानंतर काही दिवसांनी रविवारी सकाळी चहा घेताना सहजच सुषमाने खिडकीतून बाहेर डोकावले, तेव्हा अगदी स्वच्छ असलेले कपडे वाळताना तिच्या नजरेस पडले आणि आश्चर्याने तिच्या तोंडातून उद्गार बाहेर पडले, ''शेवटी समोरच्या जोडप्याने कपडे स्वच्छ करण्याचं तंत्र शिकून घेतलेलं दिसतंय, कदाचित कोणीतरी त्यांना ते शिकवलं असणार''. त्यावर राहुल म्हणाला,''बाईसाहेब, आज सकाळी लवकर उठून मीच आपली समोरची खिडकी स्वच्छ केली आहे, काच साबणाने स्वच्छ पुसून काढली आहे.''

चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा

आश्चर्य वाटले ना? राहुल आणि सुषमा यांच्या बाबतीतलं सत्य आपणा सर्वांनाच लागू पडतं. मानसशास्त्रज्ञांनी सांगितलेले पुरातन सत्यच यातून आपल्या पुढे येते. बऱ्याच गोष्टी आपण जशा असतात तशा बघत नाही; पण आपण जसे असतो तशाच त्या आपल्याला दिसतात. आपण जगाकडे, आपल्या स्वत:च्या चश्म्यातून बघत असतो. जर आपण दोषांवरच लक्ष केंद्रित केले तर आपल्याला दोषच दिसतात. आपण जर चांगल्या गोष्टी शोधण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला चांगल्याच गोष्टी भेटतात. आपण इतरांबद्दल पूर्णपणे विचार न करता मत बनवू नये. त्यामुळे कदाचित दोष नसतानाही काही लोक दोषी ठरवतात.

हे फक्त इतरांबद्दलच नाही तर आपल्या आयुष्याच्या बाबतीतही खरे आहे. आपण जर अपयशाच्या भीतीने आपले आयुष्य घेरून घेतले, तर आयुष्यातील प्रत्येक संधीत आपल्याला धोकेच दिसतील. त्यामुळेच अपयशाच्या शक्यता संभवतील. याउलट जो अशा संधींकडे आशावादी नजरेतून बघेल त्याला काळ्या ढगाची सोनेरी कडा दिसेल.

स्पर्धेपेक्षा

सहकार्य श्रेष्ठ

अपयशानंतरही निराश न होता सतत प्रयत्न चालू ठेवा.
गतिशीलता आणि सातत्य हे संथपणा आणि निष्क्रियतेवर नेहमीच मात करतात.
आपल्या प्रमुख क्षमतांप्रमाणे आपले कार्यक्षेत्र निवडा.
प्रतिस्पर्ध्याशी परिस्थितीनुरूप लढा द्या.
साधनसामग्रीचा योग्य वापर करीत गटाने काम करणे हे एकट्याच्या कामापेक्षा जास्त प्रभावी ठरते. आपापसात स्पर्धा करण्यापेक्षा एकत्रित येऊन परिस्थितीवर मात करणे श्रेष्ठत्वाचे ठरते.
...तर मग चला, एकमेकांना सहकार्य करू या, अधिक मजबूत गट तयार करून कामाला लागू या.
कासव आणि ससा यांच्यात कोण जास्त जोरात पळून एखादे स्थान गाठू शकतो याबद्दल वाद निर्माण होतो. ससा आणि कासव, दोघेही "मी हे लक्षय लवकर साध्य करू शकतो" असा दावा करतात. शेवटी प्रत्यक्ष शर्यत घेऊन हा वाद मिटवावा असे ते ठरवतात. शर्यतीची जागाही ठरते आणि शर्यत सुरू होते.

सातत्य महत्त्वाचे

ससा सुरुवातच खूप जोरात पळून करतो, तेव्हा काही अंतर कापल्यावर तो थोडा थकतो. तो बघतो तेव्हा कासव बरेच दूर राहिलेले असते. ससा विचार करतो की, आपण झाडाखाली थोडी विश्रांती घ्यावी आणि ताजेतवाने झाल्यावर शर्यत पूर्ण करावी. कासव इतके मागे पडले आहे की, ते आपली बरोबरी कधीच करू शकणार नाही.
ससा एका झाडाखाली थांबतो. अंग टाकल्यावर त्याला झोप लागते. मोठ्या कष्टाने चालत येणारे कासव सशाला मागे टाकीत आपली शर्यत पूर्ण करते आणि साहजिकच ठरवलेली स्पर्धा जिंकते.
ससा जागा होतो आणि आपण हरलो आहोत हे बघून दु:खीही होतो.
तात्पर्य : शांतपणे आणि सातत्याने काम करणारे शर्यत जिंकतात.
या परंपरेने चालत आलेल्या कथेची इतर अनेक विकसित रूपे आपण पाहणार आहोत. विकासाकडे आपण जाणार आहोत.

गती महत्त्वाची

स्पर्धेच्या अनपेक्षित निकालामुळे व्यथित झालेला ससा आत्मपरीक्षण करतो. त्याच्या लक्षात येते की, आपल्या फाजील आत्मविश्वासामुळे, निष्काळजीपणामुळे आणि आळसामुळे आपण ही शर्यत हरलो आहोत. काही गोष्टी गृहीत धरल्या नसत्या तर आपण शर्यत हरलो नसतो. ससा कासवाकडे जातो आणि त्याला पुन्हा शर्यतीसाठी आव्हान देतो. कासवही शर्यतीस तयार होते आणि पुन्हा त्यांची शर्यत सुरू होते. या वेळला ससा कुठेही न थांबता, गाफील न राहता सुरुवातीपासून शेवटपर्यंत सतत धावतो

आणि कासवाला बरेच मागे टाकून शर्यत जिंकतो.
तात्पर्य: सातत्य आणि जलदगती असणारा संथ गती असणाऱ्याला नेहमीच हरवतो.
...पण ही गोष्ट इथेच संपत नाही.
आता परत कासव असा विचार करते की, ज्या पद्धतीने आपण स्पर्धेचे आयोजन केले त्या पद्धतीने आपण शर्यत कधीच जिंकू शकणार नाही. मग आपण काय केले पाहिजे? आपण शर्यत कशी जिंकू शकू याचा तो विचार करतो आणि परत सशाकडे जातो. आपण वेगळ्या मार्गावर परत शर्यत घेऊ असा प्रस्ताव तो सशापुढे मांडतो. ससाही त्याच्याशी सहमत होऊन स्पर्धेसाठी तयार होतो.

क्षमता ओळखा

ससा आणि कासव यांची शर्यत उत्साहाने सुरू होते. ससा सातत्य आणि जलदगतीने मार्गक्रमण करीत असतो, तर कासव संथपणे आपल्या मार्गाने चालत असते; परंतु शर्यत संपायच्या दोन-तीन किलोमीटर आधी एक नदी लागते. नदी बघून ससा चांगलाच बुचकळ्यात पडतो आणि 'आता काय करावे?' या विचारात अडकतो. तेवढ्यात कासव खुरडत, खुरडत येते आणि नदीतून पोहत जात शर्यत पूर्ण करते. अर्थात पुन्हा एकदा कासव ही शर्यत जिंकते.
तात्पर्य : प्रथम आपल्या उत्तम क्षमता जाणून घ्या. आपल्या क्षमतांना पूरक असे कार्यक्षेत्र निवडा. आपण काम करीत असलेल्या संस्थेत आपण उत्तम वक्ते असाल, तर त्यासाठी योग्य संधी शोधा आणि आपले हे कौशल्य व्यवस्थापनाच्या नजरेत आणून द्या. गोष्टींचे पृथक्करण करून निर्णय घेण्याची उत्तम क्षमता आपल्यात असेल तर तसेच काम मिळवा, तसे रिपोर्ट तयार करून वरिष्ठांकडे पाठवा. आपल्या प्रमुख क्षमतांप्रमाणे काम केल्याने आपण इतरांना नुसते लक्षातच राहणार नाही, तर याद्वारे आपण आपल्यासाठी उत्तम संधी निर्माण करून निश्चितच योग्य प्रगती साधू शकतो.
...अजूनही गोष्ट संपत नाही.

सहकार्यही गरजेचेच

जगात स्पर्धा जरी महत्त्वाची असली तरी परस्परांना मदत करून परिस्थितीवर मात करणे अधिक महत्त्वाचे आहे. लढा एकमेकांविरुद्ध नाही, तर तो उत्पन्न झालेल्या परिस्थितीशी हवा. संघर्षापेक्षा सहकार्य मोलाचे आहे. ते त्यात भाग घेणाऱ्या सर्वांनाच जास्त यश देऊन जाते. शर्यतीच्या या काळात ससा आणि कासव यांचा चांगलाच परिचय झालेला असतो. त्यांची चांगलीच गट्टी जमलेली असते. आपण संपवलेली शेवटची स्पर्धा आपण जास्त चांगल्या पद्धतीने पार पाडू शकलो असतो असा विचारही त्यांच्या डोक्यात येतो. म्हणूनच ते पुन्हा एकदा अशाच स्पर्धेचे आयोजन करावयाचे ठरवतात; परंतु यावेळी ही स्पर्धा एक 'गट' म्हणून पार पाडायची असेही ते ठरवतात.
ही कल्पना दोघांनाही खूप आवडते आणि मोठ्या उत्साहाने त्यांची शर्यत पुन्हा एकदा सुरू होते. यावेळी सुरुवातीला पळताना ससा कासवाला पाठीवर घेऊन उत्तम गती घेत मार्गक्रमण करतो आणि नदीच्या काठापर्यंत पोहोचतो. त्यानंतर मात्र कासव सशाला पाठीवर घेते आणि पोहतपोहत नदी पार करते. नदीच्या पैलतीरावर पोहोचल्यावर परत ससा कासवाला पाठीवर घेतो आणि दोघेही पूर्वीपेक्षा खूपच कमी वेळेत शर्यत पार

पाडतात.
व्यक्तिगत क्षमता आणि हुशारी असणं चांगलंच; पण आपण एक गट म्हणून काम करणे त्याहीपेक्षा उत्तम. आपणा सर्वांजवळ असणाऱ्या विविध क्षमतांचा वापर करीत कामे केली नाहीत, तर कामातील उत्कृष्टता आपण गाठू शकणार नाही. गटात काम करताना अशी वेळ येणारच की, जेव्हा आपल्या काही क्षमता कमी पडतील तेव्हा आपल्याला इतरांच्या क्षमतांचा उपयोग करून घेता येईल.
गटात काम करताना प्रसंगानुरूप ज्याच्याकडे ज्या योग्य क्षमता असतील त्यानुसार तो पुढाकार घेऊन आपल्याला यश मिळवून देतो.
ससा आणि कासवाने आपल्या अपयशानंतरही हार मानली नाही. सशाने अपयशानंतर जास्त मेहनत घेऊन सातत्याने काम करायचे ठरवले. कासव तर सुरुवातीपासूनच मेहनत करीत होते. अपयशानंतर त्याने आपली युक्ती आणि डावपेच बदलले. आयुष्यातही आपण जेव्हा अपयशी होतो तेव्हा जास्त मेहनत घेऊन काम करणे योग्यच असते. कधी कधी आपली धोरणे, आपले डावपेजच बदलून नवीन कहीतरी युक्ती लढवणे फायद्याचे ठरते. बऱ्याच वेळा दोन्हींचाही योग्य वापर करावा लागतो.
ससा आणि कासव आपल्याला अजूनही एक धडा शिकवतात की, काही वेळा प्रतिस्पर्ध्यांशी स्पर्धा करणे थांबवून एकत्र येऊन परिस्थितीवर मात केली, तर आपण खूप काही साध्य करू शकतो.

संपूर्ण गुंतवणूक 3 एच

आपण करीत असलेल्या कार्यात आपली शारीरिक, मानसिक व भावनिक गुंतवणूक असावी. आपल्या कार्याचा उद्देश आपल्याला पूर्णपणे ठाऊक असावा. आपले काम म्हणजे केवळ उपजीविका भागविण्याचे साधन नसून त्याची व्यापक अर्थाने काय उपयुक्तता आहे हे जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. जेव्हा आपण करीत असलेल्या कामाचा अंतिम परिणाम आपल्या लक्षात येतो तेव्हा आपल्यात संपूर्ण गुंतवणूक करण्याची वृत्ती निर्माण होते. आपला दृष्टिकोन बदलतो. आपल्या कामाची उपयुक्तता आणि दर्जाही उंचावतो. स्वत:चा व्यवसाय असो की नोकरी, आपल्या कामात संपूर्ण गुंतवणूक असेल तर एखादे कठीण ध्येयदेखील आपण साध्य करू शकतो.

एक निसर्गसौंदर्याने नटलेलं छोटंसं गाव होतं. गावाबाहेरून एक छानशी नदी वाहत होती. गाव हमरस्त्यावर असल्यामुळे अनेक विद्वान आणि संतपुरुष गावाला सदिच्छा भेट देत असत. असेच एक संतपुरुष एकदा सकाळच्या वेळी गावातील नदीकाठावरून मार्गक्रमण करीत होते. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, जवळपास अनेक माणसे दगड फोडण्याचे काम करीत आहेत. त्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली म्हणून त्यांनी जवळच्याच एका कामगाराला विचारले, “आपण काय करीत आहात?” त्यावर थोड्या रागातच त्याने उत्तर दिले, ‘दिसत नाही का, मी दगड फोडतो आहे ते?” कामगाराचे हे उत्तर ऐकून त्यांना जरा वाईट वाटले; परंतु ते तसेच पुढे गेले आणि त्यांनी तोच प्रश्न दुसऱ्या कामगाराला विचारला. त्याने मात्र असे उत्तर दिले की “महोदय! मी माझ्या आणि माझ्या कुटुंबीयांच्या उपजीविकेसाठी दगड फोडण्याचे काम करतो आहे.” या उत्तरामुळे त्यांचे थोडे समाधान झाले; परंतु एवढ्या मर्यादित उद्देशाने ही माणसे काम करतात का? असे त्यांना वाटले असावे. त्यांनी आपला शोध पुढे चालूच ठेवला. तिथल्याच तिसऱ्या कामगारापुढे जाऊन त्यांनी विचारले, “आपण काय करीत आहात?” तो कामगार म्हणाला, “सर! आम्ही आमच्या गावातील लोकांच्या सोईसाठी येथे एक मंदिर बांधतो आहोत आणि त्यासाठी लागणारे दगड घडविण्याचे काम मी करतो आहे.” संतपुरुषाला हे उत्तर ऐकून खूपच समाधान झाले आणि त्या आनंदातच ते पुढे चालत गेले.

पहिला ‘एच’

आता आपण या प्रत्येक माणसाने दिलेली उत्तरे, त्यावरून त्यांची मानसिकता आणि त्यामुळे होणारे एकूण परिणाम यांचा मागोवा घेऊया. पहिला माणूस फक्त एक ‘एच’ म्हणजे हात वापरून आपले काम करीत होता. त्यामुळे त्याला डोळ्यापुढे सतत दगडच दिसत असणार आणि अशा कामाने तो खूपच थकत असणार. परिणामस्वरूप तो घरी गेल्यावर आपला राग आपल्या कुटुंबीयांवर काढीत असेल. त्यामुळे कुटुंबीयांनाही त्याच्याबद्दल फारसे प्रेम, आदर वाटत नसणार.

दुसरा ‘एच’

दुसरा माणूस काम करताना सतत कुटुंबीयांचाच विचार करीत असणार. कामानंतर

आनंदाने घरी परतत असणार. कुटुंबीयही घरी त्याची आतुरतेने वाट पाहत असणार. एक ‘एच’ वाढल्यामुळे हा फरक पडला.

तिसरा ‘एच’

तिसऱ्या माणसाबद्दल सांगायचे झाले तर कामाच्या ठिकाणी, घरी आणि एकूणच समाजातसुद्धा तो हवाहवासा वाटत असणार. याचाच अर्थ असा होतो की, पहिल्या कामगाराची त्याच्या कामातील गुंतवणूक फक्त एक ‘एच’ हातांची म्हणजेच शारीरिक आहे. दुसऱ्या कामगाराची तीच गुंतवणूक दोन ‘एच’- हात आणि डोके म्हणजेच, शारीरिक आणि मानसिक आहे, तर तिसऱ्या कामगाराची ‘तीन एच’ म्हणजे शारीरिक मानसिक आणि भावनिक अशी संपूर्ण गुंतवणूक आहे. यावरून असे दिसते की, अशा संपूर्ण गुंतवणुकीमुळे हा तिसरा माणूस आपले काम उत्तमप्रकारे करून सर्व कामगारांत कामाचे जास्त समाधानही मिळवीत असावा. म्हणजेच उत्तम गुणवत्तेचे काम हवे असणाऱ्या व्यवस्थापकांनी अशा प्रकारची माणसं निर्माण करण्यासाठी योग्य वातावरण तयार करण्याचे प्रयत्न करावयास हवेत.

आता विचार करा की, आपल्या हाताखालची आणि आपल्या बरोबरीने काम करणारी माणसं आपल्या कामाकडे कसे बघतात. पहिल्या माणसासारखं, दुसऱ्या माणसासारखं की, तिसऱ्या माणसासारखं? ही सारी माणसं आपल्या कामाची संपूर्ण भूमिका अंतिम टप्प्यापर्यंत समजावून घेऊन काम करतात का? मी टाटा मोटर्समध्ये असताना कामगारांना नेहमी एक प्रश्न विचारीत असे, “टाटा मोटर्स काय करते असे आपल्याला वाटते?” त्यावर “लाखो वाहनांची निर्मिती” अशीच उत्तरे बहुदा मिळत असत. मग मी त्यांना समजावून सांगत असे की, आपल्याला माहिती आहे का की, आपले एक वाहन जेव्हा बाजारात जाते तेव्हा सात व्यक्तींना उपजीविकेचे साधन मिळते. याचाच अर्थ असा होतो की, लाखो वाहनांची निर्मिती करून आपण सारे जण आपल्या देशातील गरिबी दूर करण्यासाठी वाहनांचा हातभार लावतो आहोत.

उत्तम व्यवस्थापनाचे रहस्य

जेव्हा आपण करीत असणाऱ्या कामाचा अंतिम परिणाम आपल्या लक्षात येतो तेव्हा त्या तिसऱ्या माणसासारखी संपूर्ण गुंतवणूक आपल्यात निर्माण होते. आपल्या कामाची उपयुक्तता आणि दर्जाही उंचावतो आणि अशा प्रकारच्या कामातील सहभागामुळे आपल्याला उच्चकोटीचे समाधानही लाभते. आपण स्वत: नक्कीच अशी गुंतवणूक करू शकतो. यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. आपल्या संस्थेचे अंतिम ध्येय, उद्देश सर्व कामगारांपर्यंत पोहोचवणे आणि त्यात त्यांचा सहभाग घेणे हेच तर उत्तम व्यवस्थापनाचे मर्म आहे. ही गोष्ट उत्तम प्रकारे करण्यात आली तरच सर्वसाधारण संस्थेचे रूपांतर उत्तम, आदर्श संस्थेत होऊ शकेल.

संपूर्ण गुंतवणूक महत्त्वाची

थोडक्यात, असे म्हणता येईल की, संस्थेतील प्रत्येक व्यक्ती स्वत:चे काम व्यवस्थितपणे समजून आणि संपूर्ण गुंतवणुकीने करेल तेव्हाच संस्थेचा विकास होईल. माझ्या कामाचा परिणाम आपल्या संस्थेच्या संपूर्ण कामगिरीवर कसा होणार आहे हे लक्षात घेऊन ते काम व्यक्ती करतील तेव्हाच अद्वितीय कार्य करणाऱ्या संस्था निर्माण

होतील आणि आपला देश प्रगतिपथावर आगेकूच करेल. अमेरिकेचे भूतपूर्व अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांच्या आयुष्यातील एका प्रसंगाची येथे तीव्रतेने आठवण होते.
फलोरिडा येथील ‘केनेडी रिसर्च सेंटर’ त्यावेळी मानवाला चंद्रावर उतरविण्याच्या योजनेवर काम करीत होते. त्याची पाहणी करण्यासाठी जॉन. एफ. केनेडी एकदा भेटीसाठी तेथे गेले असताना एक महिला कामगार जरा लाजूनच त्यांच्याकडे कटाक्ष टाकीत होती. केनेडी स्वत: तिच्याजवळ गेले आणि त्यांनी तिला विचारले, ‘‘आपण येथे काय काम करीत आहात?’’ आपल्या हातांनी आपले केस सावरीत त्या महिलेने उत्तर दिले, ‘‘अमेरिकेच्या, चंद्रावर माणूस पाठविण्याच्या स्वप्नाला मी हातभार लावते आहे.’’ याचाच अर्थ असा होतो की, आपला आणि आपण ज्या संस्थेत काम करतो आहोत त्या संस्थेच्या कामाचा मुख्य उद्देश आपल्याला पूर्णपणे समजला आहे. थोड्याच दिवसात अमेरिकेने नील आर्मस्ट्राँग यांना चंद्रावर उतरवले आणि आपले स्वप्न पूर्ण केले. दगड फोडणाऱ्या तिसऱ्या माणसासारखी अनेक माणसे या कामात सहभागी झाली होती. आपले स्वप्न या प्रत्येक कामगाराच्या मनात उतरविण्यात केनेडी प्रशासन यशस्वी झाले होते आणि अमेरिकेच्या मानवाने चंद्रावर पाय ठेवावा हे स्वप्न तेथील प्रत्येक कामगार पाहत होता. या कामात प्रत्येक कामगाराची संपूर्ण गुंतवणूक (तीन ‘एच’) होती आणि म्हणूनच हे अवघड स्वप्न ते सत्यात उतरवू शकले होते.

आसक्ती सोडा

आवतीभोवती अशा अनेक गोष्टी आपल्याला असतात ज्यांचा मोह आपल्याला आवरता आवरत नाही. जे इतरांकडे आहे ते आपल्याकडेही असावे किंवा त्याहीपेक्षा जास्त आपल्याला मिळावे असा मोह आपल्याला निर्माण होतो. मग आपण ते मिळवण्यासाठी प्रयत्न करतो; पण आयुष्यात सर्वच काही मिळते असे नाही. आपल्याकडे जी गोष्ट नाही त्याबद्दल दु:ख करण्यापेक्षा आपल्याला मिळालेल्या अनमोल अशा जीवनाचा स्वीकार करून आनंदी राहिल्यास आपण इतरांपेक्षा जास्त सुखी आणि समाधानी राहू शकतो.

एक संन्यासी आणि त्याचा शिष्य यात्रेला निघाले होते. गावोगावी जायचं, धर्मशाळा दिसली की मुक्काम करायचा, कधी भजन, कधी प्रवचन, कधी काही विषयांवर चर्चा, असं सातत्यानं चाललं होतं. हिमालयात जाऊन स्थायिक व्हायचं, असा त्यांचा विचार होता. एका गावात एका धनिकाने त्यांचा आदर- सत्कार करून त्यांना एक छोटीशी सोन्याची वीट भेट म्हणून दिली. त्या संन्याशाने ती सन्मानपूर्वक परत केली; पण शिष्याला त्या विटेचा मोह आवरला नाही आणि गुरूचं न ऐकता ती वीट शिष्याने स्वत:जवळ ठेवून घेतली. तेव्हापासून शिष्याचं ध्यानधारणा, प्रवचन सगळ्यांतून लक्ष उडालं. चोवीस तास त्या शिष्याला सोन्याच्या विटेचाच ध्यास लागलेला असायचा. कापडावर कापड गुंडाळून त्याने ती वीट एका झोळीत ठेवली. धर्मशाळेत मुक्काम केला की, त्याची झोप उडायची. बाहेरून हात लावून, जाता-येता त्या गाठोड्याला स्पर्श करून तो स्वत:शी हसायचा. एके दिवशी संधी साधून त्या गुरूने ती वीट फेकून दिली. शिष्याला मात्र या गोष्टीचा पत्ता लागलाच नाही; कारण गुरूने त्या विटेऐवजी त्याच आकाराचा फरशीचा तुकडा तिथे ठेवला होता.

मोह आवरा

सहा-सात महिने उलटून गेले. एके दिवशी शिष्याला तो सोन्याचा तुकडा पाहावासा वाटला. त्याने गाठोडे सोडले आणि पाहतो तो काय, सोन्याच्या विटेऐवजी फरशीचा तुकडा! हे पाहून तो आक्रोश करू लागला. गुरूने त्याला समजावले, "आपण संसाराकडे पाठ फिरवलेली माणसे, आपण धनलोभ कशासाठी करायचा? एक सोन्याची वीट मी सहा नव्हे, आठ महिन्यांपूर्वी फेकून दिली." शिष्याने विचारले, "मग हा फरशीचा तुकडा सोन्याचा समजून मी इतकी महिने ऐटीत हिंडत होतो का?" असं म्हणून तो पुन्हा आक्रोश करू लागला. गुरुजी म्हणाले, "आपल्यापाशी सोनं आहे या केवळ कल्पनेवर जर तू आठ महिने राहू शकतोस, तर उरलेले दिवस घालवू शकणार नाहीस का? आपल्याकडे ईश्वरीय विचारांचा अनमोल ठेवा आहे. आपल्याला ही आसक्ती कशाला हवी? तू अकारण ओझे मिरवत होतास. मला ते बघणे अशक्य झाले. त्यापेक्षा दहाच्या-दहा बोटांत अंगठ्या तरी करावयाच्या होत्यास." शिष्य जे समजायचे ते समजला.

आहे त्यात समाधानी राहा

आपल्या आवतीभोवती अशा अनेक गोष्टी असतात की, ज्यांचा मोह आपल्याला आवरता आवरत नाही. जे इतरांकडे आहे ते आपल्याकडेही असावे किंवा त्यापेक्षा जास्त

आपल्याला मिळावे असा मोह निर्माण होतो. मग आपण ते मिळवण्यासाठी प्रयत्न करतो; पण आयुष्यात सर्वच काही मिळते असे नाही.
आपल्याकडे जी गोष्ट नाही त्यांचे दु:ख करण्यापेक्षा आपल्याला मिळालेल्या अनमोल अशा जीवनाचा स्वीकार करून आनंदी राहिल्यास आपण इतरांपेक्षा जास्त सुखी राहू शकतो.

स्वत:ला ओळखा...

या जगात जन्माला येणारी अशी असंख्य माणसं असतात जी आजूबाजूच्या नकारात्मक परिस्थितीमुळे स्वत:ला दुर्बल समजतात आणि स्वत:मधील सुप्तशक्तींना न ओळखताच या जगाचा निरोप घेतात. पालक, शिक्षक आणि समाजातील जाणकार व्यक्तींनी आपल्या मुलांचा आत्मविश्वास वाढवून सकारात्मक वृत्ती वाढवण्याचे प्रशिक्षण भाविकर्तृत्वसंपन्न नागरिकांना द्यायला हवे. तरुणांच्या सुप्तक्षमतांचा विकास करून त्यांचे भवितव्य उज्ज्वल करण्याची जबाबदारी घ्यायला हवी. त्यातूनच आपण त्यांचे आणि भारताचे भवितव्य उज्ज्वल करू शकू.

एका व्यक्तीला गरुडाचे अंडे सापडते. ते तो एका कोंबडीच्या खुराड्यात ठेवून देतो. कोंबडीच्या त्या खुराड्यात इतर पिलांबरोबर गरुडाचे पिल्लूही जन्मते आणि त्यांच्याबरोबरच ते हळूहळू वाढते.

त्या गरुडाच्या पिलाला आपण कोंबडीच आहोत असे वाटू लागते. कोंबडीची पिल्ले जशी वागत तसेच गरुडाचे पिल्लूही हुबेहूब त्यांचीच नक्कल करीत त्यांच्यासारखेच राहत असे. कोंबडीची पिल्ले आजूबाजूला असणाऱ्या घाणीत धान्याचे दाणे शोधीत असत आणि त्यातीलच बारीकसारीक किडे शोधून आपली गुजराण करीत असत. इतर पिलांसारखेच ते ओरडत जमिनीवरच हिंडत असे. आपले पंख पसरून पाय वर घेत ते गरुडाचे पिल्लू जमिनीपासून फार तर दोन तीन फूट उंचीवर उडत असे.

काल्पनिक मर्यादा ओळखा

अनेक वर्षे लोटली. गरुडाचे पिल्लू मोठे झाले. एक दिवस त्याला एक मोठा पक्षी ढगांच्याही वरून स्वच्छंदपणे उड्डाण करताना दिसला. वाऱ्याच्या प्रचंड झोताबरोबर तो अत्यंत दिमाखात विहार करीत होता. अधूनमधून तो आपल्या कणखर आणि सोनेरी पंखांची सुरेख हालचाल करीत होता. कोंबड्यांच्या थव्यातील गरुड आपल्या आसपासच्या कोंबड्यांना म्हणाला, “वा! किती सुरेख पक्षी आहे, कोणता पक्षी आहे हा?”

“अरे, तो तर गरुड पक्षी आहे. तो सर्व पक्षयांचा राजा आहे; परंतु तुला त्याच्यासारखं आकाशात कधीच उडता येणार नाही”. त्या सर्वांच्या अशा बोलण्यामुळे गरुडाने उंच उडण्याचा कधी प्रयत्नही केला नाही. आपण एक साधं कोबंडीचं पिल्लू आहोत, असा विचार करीतच शेवटी ते गरुडाचे पिल्लू मरून गेलं. आकाशात उंच उड्डाण करण्यासाठी, आयुष्यात यशस्वी होण्यासाठी जन्माला आलेल्या या गरुडाला त्याच्या भोवतालच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या काल्पनिक मर्यादांमुळे अयशस्वी जीवन जगावं लागलं.

सुप्त शक्तींना ओळखा आणि यशस्वी व्हा

या जगात असंख्य माणसं जन्माला येतात. आजूबाजूच्या नकारात्मक परिस्थितीमुळे स्वत:ला दुर्बल समजतात आणि स्वत:मधील सुप्त शक्तींना न ओळखताच या जगाचा निरोप घेतात. ही तर आयुष्यातली खरी शोकांतिका आहे. अनेक लोक आपल्या सुप्तक्षमतांचा वापर करीत नाहीत. किंबहुना त्यांना क्षमतांची जाणीवच नसते, म्हणून गरुडासारखी क्षमता असणाऱ्या व्यक्तीही कोंबडीसारखं जीवन जगणं पसंत करतात.

आपल्या क्षमतांचा उपयोग करून आपले आयुष्य यशस्वी करण्याचा फारसा प्रयत्न त्यांच्याकडून केला जात नाही.
या परिस्थितीस जबाबदार असलेलं महत्त्वाचं कारण असं आहे की, त्यांचे आई-वडील, शिक्षक, मित्र, नातेवाईक आणि सर्वसाधारण समाज त्यांच्यावर सतत नकारघंटेचाच मारा करीत असतो. 'तू हे करू नकोस, ते तुला जमणार नाही.' आपण अशाप्रकारे 'तू उगाचच फार मोठी उडी मारण्याचा प्रयत्न करू नकोस, ते धोकादायक ठरेल' आपण सतत आपल्या मर्यादेतच राहावं असा गजर आपल्या मुलांभोवती करीत असतो. किती सहजपणे आपण आई वडील, शिक्षक, मित्रमंडळी सर्व आपल्या भावी पिढीच्या कपाळावर असे नकारात्मक शिक्के मारीत असतो. या मंडळींच्या हे लक्षातही येत नाही का, त्यांच्या अशा नकारघंटांमुळे कितीतरी मुलांची आयुष्यं हिरमुसून जातात. ते यशाऐवजी अपयशाचेच धनी होतात.

आकाशी झेप घे रे...

आपण ज्या रटाळ, जुनाट गोष्टींना चिटकून आहोत त्या तोडून मुक्त व्हा आणि ससाण्यासारखे डौलाने आणि आनंदाने उंच आकाशात राजेशाही उड्डाण करायला लागा. आयुष्याचे वैभव लुटा. आपल्यातील सुप्तक्षमतांचा विकास करणे हे आपल्या आयुष्याचे एक कर्तव्य आहे. त्यासाठीच आपला जन्म झाला आहे. आपल्या आयुष्याचा बहुतांशी भाग रटाळपणे घालवण्यापेक्षा सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारून कार्यतत्पर व्हा. तुमच्या अंगात निश्चयाचे बळ संचारू द्या. तुम्हाला आकाशही ठेंगणे पडेल.

आटपाट नगर होतं. जनतेवर प्रेम करणारा आणि त्यांचे हित जपणारा असा राजा तेथे होता. साहजिकच जनतेचेही त्याच्यावर उदंड प्रेम होते. राज्यातील लोक दूरदूरहून त्याची भेट घेण्यासाठी येत असत आणि येताना आवर्जून राजासाठी काहीना काही नजराणाही आणत असत. राजाही प्रेमाने आणलेल्या भेटीचा आनंदाने स्वीकार करीत असे. अशाच एका माणसाने राजाचे पक्षीप्रेम लक्षात घेऊन राजाला अरेबियातून आणलेल्या दोन सुंदर बहिरी ससाण्यांची जोडी भेट म्हणून दिली. आकाशात विहार करणारे असे सुंदर बहिरी ससाणे राजाने यापूर्वी कधीच पाहिलेले नव्हते. त्याने ही भेट देणाऱ्या व्यक्तीचे आभार मानले आणि ही अनमोल ससाण्यांची जोडी पक्षयांचा सांभाळ करणाऱ्या प्रमुखाकडे सोपवून त्यांना उत्तमप्रकारे प्रशिक्षण देण्याची आज्ञा दिली.

काही महिने उलटले. दोन ससाण्यांपैकी एका ससाण्याचे प्रशिक्षण पूर्ण झाले आणि तो अतिशय दिमाखात आकाशभ्रमणही करू लागला. दुसरा ससाणा मात्र आलेल्या दिवसापासून तसाच फांदीवर बसून राहत असे.

राजाचे असफल प्रयत्न

या ससाण्याची काळजी घेण्यासाठी राजाने आपल्या राज्यातील संबंधित तज्ज्ञांना निमंत्रित केलं; परंतु त्या ससाण्याला आकाशात उडते करण्यात कोणीही यशस्वी झाला नाही. आपल्या दरबारातील अधिकाऱ्यांचीही त्याने या कामासाठी नेमणूक केली. दुसऱ्या दिवशी राजाने जेव्हा आपल्या प्रासादाच्या खिडकीतून बघितले तेव्हा राजाच्या लक्षात आले की, अजूनही तो आहे तसाच बसतो आहे. बसलेच्या फांदीवरून जरासुद्धा हालत नाही. सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्याचे पाहून राजाने स्वत:शीच विचार केला की, या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी आपल्याला पक्षयांशी अधिक परिचित असणाऱ्या व्यक्तीचा शोध घ्यावा लागणार आहे. त्याने आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा केली की, गावाकडे जा आणि एखाद्या चांगल्या आणि जाणत्या शेतकऱ्याला घेऊन या.

स्व-क्षमतांना ओळखा

दुसऱ्या दिवशी जेव्हा राजा आपल्या प्रासादाच्या खिडकीतून आकाश न्याहाळीत होता तेव्हा त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याला तो दुसरा ससाणा आपल्या उद्यानातून उंच आकाशात विहार करताना दिसत होता. ज्या शेतकऱ्याने हा चमत्कार केला त्याला दरबारात घेऊन येण्याची राजाने आज्ञा केली.

अधिकारी त्या शेतकऱ्याला राजासमोर घेऊन आले. त्याला राजाने विचारले, “त्या

अचल ससाण्याला आपण उडते कसे केलेत?"

शेतकरी नम्रतेने म्हणाला, "महाराज, हे तर अगदीच सोपे होते. मी फक्त तो ज्या झाडावर बसला होता ती फांदीच कापून टाकली आणि लगेचच, तो ससाणा आकाशात उडाला आणि सुदंर विहार करू लागला."

आपल्या लक्षात आलेच असेल, आपला सर्वांचा जन्म असाच यशाच्या आकाशात उंच आणि मनसोक्त विहार करण्यासाठीच झाला आहे. आपल्यातील अविश्वसनीय क्षमतांचा विकास करून घेण्यात आनंद असतो; पण हे करण्याऐवजी आपण मात्र आपल्या वाट्याला आलेल्या फांदीवरच बसून राहतो. ज्या गोष्टी आपल्याला परिचयाच्या असतात, त्यांनाच आपण घट्ट पकडून बसतो. आपल्यापुढे अनंत शक्यता उपलब्ध आहेत; परंतु आपल्यापैकी बहुतेक जण या शक्यतांविषयी अनभिज्ञ राहतात. परिचित असणाऱ्या आणि सुखकर वाटणाऱ्या फांद्यांवरच आपण चिटकून राहतो.

आपण आपल्या आयुष्याचा बहुतेक भाग उत्स्फूर्ततेने आणि कृतार्थतेने न जगता अगदी रटाळपणे जगत असतो.

ज्ञानाविना वाचाळता व्यर्थ आहे!

आपल्या उतावीळपणावर जर आपण योग्य नियंत्रण ठेवले तर संधींची अनेक दालने आपल्यासाठी उघडली जातील. एखाद्या नवीन गोष्टीबद्दल आपण अज्ञानी असाल तर त्याबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता अवश्य असावी; पण अनावश्यक मतप्रदर्शन नको. इतरांशी बोलताना, चौकशी करताना, एखादी माहिती जाणून घेताना योग्य तो संयम बाळगायला हवा. असंयमीपणा आणि उतावीळपणा यामुळे नुकसान आपलेच होते हे मात्र खरे आहे.

एक सुंदर शहर होतं. तिथे एक संगणकतज्ज्ञ राहत होता. तो संगणकासाठी विविध प्रणाली तयार करीत असे. या सर्व कामासाठी त्यावेळी उपलब्ध असणारं सर्वांत उत्तम संगणकयंत्र 'पेंटियम' याचा तो वापर करीत असे. तो संगणकतज्ज्ञ हरहुन्नरी असल्यामुळे काम करण्यासाठी सतत चार भिंतीत बंदिस्त वातावरणात राहणे त्याला आवडत नसे. म्हणून तो कधी बागेत, कधी नदीच्या काठी, कधी समुद्रकिनाऱ्यावर तर कधी टेकडीवर बसून आपले कल्पक काम करीत असे. असाच एकदा तो नदीच्या काठी झाडाखाली बसून अशीच एक प्रणाली तयार करीत होता. उत्तम प्रणाली तयार करण्याच्या आनंदात चुकून त्याचा संगणक नदीत पडला. संगणकतज्ज्ञाला पोहता येत नव्हतं आणि त्यामुळं त्याला 'आता काय करायचं?' हा मोठा प्रश्न पडला. नदीवर कोणी माणसंही दिसत नव्हती. संगणकतज्ज्ञाला आजीने सांगितलेली 'लाकूडतोडयाची' गोष्ट आठवली. त्याने जलदेवतेची प्रार्थना करायचे ठरवले. अतिशय आर्ततेने त्याने जलदेवतेची प्रार्थना केली.

जलदेवता प्रसन्न झाली

अशी प्रार्थना करणारे लोकही कमीच झाले होते. त्यामुळे आनंदून जाऊन जलदेवताही त्याच्या समोर प्रकट झाली आणि तिने "वत्सा! तुला माझ्याकडून काय हवे आहे?" अशी विचारणा केली. अर्थातच या वत्साने आपला पाण्यात पडलेला संगणक परत मिळावा म्हणून विनंती केली.

जलदेवतेला त्याचा प्रामाणिकपणा तपासावा असे वाटले. तिने पाण्यात बुडी मारून एक छोटी पट्टी वर काढली आणि संगणकतज्ज्ञाला विचारले, "बाळ! हा तुझा संगणक आहे का?"

जलदेवतेच्या या प्रश्नावर तज्ज्ञ नाराज झाला; परंतु जलदेवतेला संगणकाबद्दल ज्ञान कमी असणार असा विचार करून त्याने 'नाही' असे उत्तर दिले.

जलदेवतेने पुन्हा नदीत उडी मारली आणि खिशातील कॅल्क्युलेटरसारखे यंत्र तिने बाहेर काढीत तज्ज्ञाला विचारले, "हा तुझा संगणक आहे का?" त्यावर जरा रागातच तज्ज्ञ उद्गारला, "नाही नाही, मुळीच नाही!

शेवटी जलदेवतेने संगणकतज्ज्ञाचे 'पेंटियम यंत्र' वर काढले आणि विचारले, "हेच का तुझे ते यंत्र?" आता मात्र तज्ज्ञाकडे काही पर्यायच नव्हता. थोडा नाराज होतच तो 'होय' म्हणाला. जलदेवता त्याचा प्रामाणिकपणा बघून आनंदली. ती त्याला सर्वच वस्तू भेट देण्याचा विचार करत होती; परंतु ती असे करण्यापूर्वीच तज्ज्ञ उतावीळतेने

जलदेवतेला म्हणाला, “तुझ्या लक्षात कसे येत नाही? माझा स्वत:चा संगणक आणण्याअगोदर सर्व मौल्यवान वस्तू आणि आधुनिक संगणक तू माझ्यासाठी आणायला हवे होतेस ना...!”

अकारण बोलण्याचा परिणाम

त्याच्या या प्रश्नाला होकारार्थी उत्तर देत जलदेवता म्हणाली, “गाढवा! मला ते माहीत आहे, पहिल्या ज्या दोन गोष्टी मी तुला दाखविल्या त्या ‘त्रिलिनियम’ आणि ‘बिलिनियम’ या आय.बी.एम.च्या सुधारित संगणकाच्या आवृत्या होत्या.!” असे म्हणत जलदेवता संगणकतज्ज्ञाचा ‘पेंटियम’ संगणक देऊन अदृश्य झाली.

आपल्याला जर अद्ययावत तंत्रज्ञानाबद्दलची योग्य माहिती नसेल तर आपण आपले तोंड गप्प ठेवायला नको का?

पहिलं प्रेम

भूतकाळाला कवटाळून बसण्यात आणि घडून गेलेल्या घटनांचे दु:ख करीत बसण्यात काहीच अर्थ नाही. भूतकाळातील शिकवण वर्तमानात उपयोगात आणून वर्तमान उज्वल करावा; परंतु भूतकाळामुळे वर्तमान कलुषित करण्यात काहीच अर्थ नाही. त्यामुळे आयुष्याचे वाळवंट होऊन बसते. आयुष्यभराच्या सहवासासाठी जी माणसं मिळाली आहेत त्यांच्यावर नितांत प्रेम करून आयुष्यात आनंद निर्माण करायला हवा.

वि.स. खांडेकर म्हणतात, 'एखादे स्वप्न भंगले तर रक्ताळलेल्या हातांनी दुसऱ्या स्वप्नामागे धावणे हा मनुष्यस्वभाव आहे आणि व्यक्तिजीवनाला अर्थ प्राप्त होतो तो यामुळेच.'

रात्रीचा जवळजवळ एक वाजला होता. मी घराच्या दारावरची बेल वाजवली. नेहमीसारखीच माझी बायको जागी होती. तिने निमूटपणे दरवाजा उघडला. रात्रीबेरात्री माझ्यासाठी वाट पाहत जागणं हे तिच्यासाठी नित्याचंच झालं होतं. घरात थोडी गडबड असणार हा माझा अंदाज चुकीचा ठरला. घर नेहमीसारखंच निवांत होतं. मी माझ्याजवळचा 'लॅपटॉप' जागेवर ठेवला आणि तडक माझी झोपायची खोली गाठली. हात, पाय आणि तोंड धुऊन तरतरीत झालो आणि 'देह झाला चंदनाचा' हे पुस्तक वाचण्यात गर्क झालो.

हातात केकचा तुकडा घेऊन माझी बायको आत आली. "आम्ही जवळ-जवळ नऊ वाजेपर्यंत तुमची वाट पाहिली. खूपच उशीर झाला होता आणि तुमच्या आई-वडिलांनीही आग्रह केला त्यामुळे आम्ही कार्यक्रम उरकून घेतला." केकची बशी माझ्या हातात देत बायको म्हणाली. आज आमच्या मुलीचा पहिला वाढदिवस होता, याची मला एकदम आठवण झाली.

आपल्याला एक मुलगी आहे हे मी जवळजवळ विसरलोच होतो, या भावनेने मला अपराधी वाटले. आपल्याला हा केक खाण्याचा काहीही अधिकार नाही असेही मला वाटून गेले. त्यामुळे त्या केकचा घास माझ्या गळ्याखाली उतरत नव्हता.

'विनायक', ती मला याच नावाने बोलावत असे. "माझ्याकडे बघ", पुस्तकातले माझे लक्ष तिने आपल्या चेहऱ्याकडे वेधले. तिच्या डोळ्यांतले अश्रू मला दिसले. "गेल्या दोन वर्षांत तू घरी उशिरा का येतोस, याबद्दल एका शब्दानेही मी तुला कधी विचारले नाही. तू मला तुझ्याबरोबर फिरायला घेऊन जात जा असेही मी कधी म्हटले नाही. दर आठवड्याला तू देवळात जातोस, तिथेही मला घेऊन जावे अशी अपेक्षाही मी कधी केली नाही. तुझ्याशिवाय आपल्या कौटुंबिक समारंभात भाग घेताना मला काय वाटत असेल याबद्दल मी तुला एका शब्दानेही काही म्हटले नाही." तिच्या या बोलण्याकडे दुर्लक्ष करून मी माझी नजर परत पुस्तकाकडे वळवली. "विनायक, कृपया माझ्याकडे बघ, बघशील का माझ्याकडे? आज मला याचे उत्तर हवे आहे."

या प्रसंगाचा एक ना एक दिवस आपल्याला सामना करावा लागणार याची मला कल्पना होतीच."नाही! मी हे सांगितले तरी तुला त्याची कल्पनादेखील येणार नाही," "हो खरंच! काय आहे ते कृपया सांग मला! स्वत:च्या आई-वडिलांना नाराज करायचे नाही म्हणून तू

आपल्या लग्नाला मान्यता दिली आहेस याची कल्पना मला आहे. त्याचबरोबर मी तुझी बायको आहे हेही मला जाणवते आहे; परंतु या सर्वांचे दु:ख अनिताने का भोगायचे? तिला तुझी मुलगी म्हणून घ्यायचा अधिकार आहेच ना?''

''माधवी, मला खरोखरच माफ कर! तुला हे सारं कसं सांगावं हेच मला कळत नाही. याबद्दल तुझी प्रतिक्रिया कशी असेल याचाही मला अंदाज नाही. तू माझ्या आयुष्यातली पहिली स्त्री नाहीस. माझ्या आयुष्यात सर्वप्रथम एका सुंदर स्त्रीने प्रवेश केला होता, त्यापूर्वी कोणत्याच स्त्रीला माझ्या मनात स्थान नव्हते. तेव्हापासून मी ठरवून टाकले की, फक्त ती आपल्या आयुष्यातील पहिलीच स्त्री नाही तर एकमेव स्त्री असावी. तिच्याशिवाय मी माझ्या आयुष्याची कल्पनाच करू शकत नव्हतो.

''तुझ्या आईने हे सर्व मला सांगितले आहे. मला हे सर्वच माहिती झाले आहे; पण मला हे तुझ्या तोंडून ऐकायचे होते.'' ती मध्येच माझे बोलणे तोडून म्हणाली. मलाही त्याचे आश्चर्य वाटले नाही. कुटुंबात अशी गुप्तता राहण्यासाठी दोन वर्षे हा फारच मोठा काळ होता. असे वाटले की, काहीतरी करून मीच या विषयाला हात घालायला हवा होता. त्यानंतर मात्र तिने सुरुवात केली.

''विनायक, माझाही कुणीतरी असाच विश्वासघात केला आहे. तोही माझ्या आयुष्यातील पहिलाच आणि एकमेव पुरुष असेल असे मलाही वाटले होते; पण मी तुला आतापर्यंत याची पुसटशीही जाणीव कधी होऊ दिली का?'' क्षणभर तिच्या या प्रश्नाने मी गोंधळलोच. ती माझ्याबद्दलच बोलत आहे का?'' मी माझ्याशीच पुटपुटलो. ती म्हणाली, ''तू माझ्या आयुष्यातील पहिला पुरुष नाहीस; कारण मला पहिल्यांदा भेटलेला 'तो'च एकमेव पुरुष माझ्या आयुष्यात असणार अशीच स्वप्नं मीसुद्धा रंगविली होती;'' परंतु आमचं नातं साखरपुड्यानंतर पाच महिन्यांत तुटलं; त्यावेळी मला असं कळलं होतं की, त्याचं लग्न अगोदरच झालेलं होतं. माझ्या आई-वडिलांना जेव्हा हे कळलं तेव्हा तर ते एकदम कोसळलेच! खूपच हतबल झाले होते; कारण त्यांनीच कुठल्याशा लग्न जुळवणाऱ्या संस्थेमधून त्या मुलाचे स्थळ माझ्यासाठी शोधून आणले होते. याचा माझ्या मनावर फारच विपरीत परिणाम झाला. मी मानसिकदृष्ट्या फारच खचून गेले होते. आत्महत्येच्या विचारांनी माझे मन घेरले होते. खरंतर तसा प्रयत्नही मी दोनदा केला होता; पण त्यातूनही मी कशीबशी बचावले इतकेच.''

''बघा! परमेश्वरालाही तसे होऊ द्यायचे नव्हते, म्हणून मी जगायचं ठरवलं. आयुष्य जसं जगवील तसं जगायचं ठरवलं. आयुष्यातील भूतकाळ विसरायचा म्हटलं तरीसुद्धा विसरता येत नाही, हे माहिती असूनदेखील मी जगायचं ठरवलं.''

''मी खूप गोंधळले होते, घाबरले होते. गाळ तळाशी बसायला थोडा वेळ लागतोच. मी स्थिर राहण्याचा निश्चय केला आणि माझे जीवन हळूहळू स्थिरावू लागले.

''विनायक! तूदेखील तुझ्या आयुष्यातील सर्व प्रेम तिला दिलंस हे मला माहीत आहे. तिने मात्र तुझ्या प्रेमाची प्रतारणाच केली. तुझ्या प्रेमाला प्रतिसाद दिला नाही, तू तिच्यासाठी सर्वस्वाचा त्याग करायला तयार असूनही तिने तुला आपला पती म्हणून स्वीकारले नाही; पण प्रेम हे दोन्ही बाजूने वाहणारे असावे लागते हे तुला समजायला नको का? आपल्या पत्नीवरही प्रेम करायला हवे, हा विचार तुझ्या मनाला स्पर्श करीत नाही का? विनायक! आता तो माझा अधिकार नाही का? मला आशा आहे की, तुझ्या हृदयातील एक कोपरा अजूनही माझ्यासाठी रिकामा असावा, तसं मला तुझ्या

डोळ्यांतही दिसत आहे.
“जेव्हा तुझ्या डोळ्यात, मी खोलवर डोकावून बघते तेव्हा त्यामध्ये प्रचंड दु:ख आहे, असे मला वाटत नाही. मला सतत असा भास होतो की, तुला मी नकोशी झालेली नाही. विनायक म्हणून आज तू तिला केलेली विनंती मी तुला करते आहे.” “कृपया, मला संधी दे” विनायक म्हणाला. “तुझे माझ्यावर तिळभरही प्रेम नाही असे तू मला सांगू नकोस. मला खात्री आहे की, तुझे माझ्यावरही प्रेम आहे आणि आपली अनिता त्याचा साक्षात पुरावा आहे.” माधवी निर्धाराने बोलली.
यानंतर मी काहीही बोलू शकत नव्हतो आणि माधवीही स्तब्ध झाली होती. तिने आपले डोके माझ्या खांद्यावर टेकवले. मी तिच्याकडे बघतच राहिलो. अनाहूतपणे मी माझे ओठ तिच्या कपाळावर टेकवले. आयुष्यात पहिल्यांदाच असे सुख विनायक आणि माधुरी अनुभवत होते.

काखेत कळसा

गावाला वळसा

आपल्याजवळ असणाऱ्या गोष्टींना आपण वेळीच ओळखत नाही आणि त्या शोधण्यात आयुष्य घालवतो. आपल्याकडे जे आहे ते अधिक सुंदर बनवण्याचा प्रयत्न करायला हवा. आपल्याला सर्वोत्तमाची प्राप्ती व्हायलाच हवी अशा अट्टाहासी स्वभावामुळे चांगले आणि उत्तमही गमवावे लागते.
लक्षात ठेवा, आपल्या सर्वांच्या आवतीभोवती प्रचंड प्रमाणात विकासाच्या संधी आहेत. आपण फक्त त्यांचा शोध घ्यायला हवा आणि अविरत प्रयत्न करण्याची तयारी करायला हवी. एखादी संधी जर चालून आलीच तर तिचे सोने करण्यात मानवीजीवनाची कृतार्थता आहे.
हॉर्वर्ड विद्यापीठाने एका अभ्यासचाचणीतून असा निष्कर्ष काढला आहे की, एखाद्या व्यक्तीला नोकरी मिळते तेव्हा त्यात त्याच्याजवळ असणाऱ्या ज्ञानाचा वाटा 15 टक्के, तर त्याच्या दृष्टिकोनाचा वाटा 85 टक्के असतो. यात आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, आपली शिक्षणावर खर्च होणारी संपूर्ण रक्कम ही केवळ माहिती आणि आकडेवारी शिकण्यासाठी खर्च केली जाते. प्रत्यक्ष नोकरी मिळवण्यासाठी ही माहिती फक्त 15 टक्के उपयुक्त ठरते. कोणत्याही व्यक्तीचा योग्य दृष्टिकोन हाच त्याच्या यशाचा पाया असतो.

हिऱ्याचा शोध

दक्षिण आफ्रिकेतल्या एका सुखी आणि समाधानी शेतकऱ्याची ही कथा आहे. एकदा त्याच्याकडे एक विद्वान गृहस्थ पाहुणे म्हणून आले होते. गप्पांच्या ओघात हिऱ्यांच्या सौंदर्याचे आणि सामर्थ्याचे वर्णन करताना ते म्हणाले, "तुझ्याकडे अंगठ्याएवढ्या आकाराचा हिरा असेल, तर तू एक शहर विकत घेऊ शकशील. तुझ्याकडे मुठीच्या आकाराचा हिरा असेल, तर तू आपल्या देशाचाही मालक बनू शकशील." या वाक्याने शेतकरी भारावून गेला. त्याची झोप उडाली. सतत त्याच्या मनात हिऱ्याचाच विचार ठाण मांडून बसला. आपले सर्व शेत विकून त्याने तशा प्रकारच्या हिऱ्याचा शोध घ्यायचे ठरवले.
हिऱ्याच्या शोधात त्याने संपूर्ण आफ्रिका खंड पालथा घातला. सुखी, समाधानी शेतकरी रानोमाळ वणवण भटकत होता. संपूर्ण युरोपातही त्याने हिऱ्याचा शोध घेतला. तो जेव्हा स्पेनमध्ये गेला तेव्हा मात्र त्याचे आर्थिक, शारीरिक; तसेच मानसिक संतुलन संपूर्णपणे बिघडले. तो उद्ध्वस्त झाला आणि त्याने बार्सिलोना नदीत उडी घेऊन आत्महत्या केली. एका सुखी समाधानी जीवनाचा करुणामय असा अंत झाला.

तुज आहे तुजपाशी...

इकडे त्याचे शेत विकत घेणारा माणूस आपल्या उंटाला पाणी पाजण्यासाठी शेतातून

वाहणाऱ्या पाटाजवळ थांबला होता. सूर्याच्या प्रकाशात चमकणाऱ्या एका दगडाने त्याचे लक्ष वेधून घेतले. त्याने अगदी सहजच तो दगड उचलला. त्याला वाटले, हा दगड आपल्या दिवाणखाण्याची शोभा वाढवेल म्हणून त्याने तो दगड आणून दिवाणखाण्यात ठेवला. काही दिवसांनी योगायोगानेच तो विद्वान गृहस्थ त्या दिवाणखाण्यात आला. तो दगड बघून त्याला आश्चर्य वाटले आणि त्याने विचारले, ''हाफिज परत आला का?''
''नाही!'' नवा शेतकरी म्हणाला. ''परंतु आज आपण हा प्रश्न का विचारता आहात?''
त्यावर ते विद्वान गृहस्थ म्हणाले, ''समोर दिसतो आहे तो दगड म्हणजे मौल्यवान हिरा आहे. हाच तो मौल्यवान हिरा आहे, ज्याच्या शोधात हाफिज बाहेर निघून गेला होता.''
नवीन मालक म्हणाला, ''कसं शक्य आहे? हा तर दगड आहे, तो मला पाटाजवळ मिळाला आणि तिथे तर असे लहान मोठे अनेक दगड आहेत.''
त्या दोघांनीही शेतात हिंडून असे आणखी काही दगड गोळा केले आणि तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले. तपासणीत ते दगड नसून खरोखरच हिरे असल्याचे सिद्ध झाले. म्हणजेच हाफिजचे स्वत:चे शेत ही एक हिऱ्याची खाणच होती तर!

योग्य दृष्टिकोन

जर आपला दृष्टिकोन योग्य असेल तर हिरेमाणकांपेक्षाही मौल्यवान गोष्टी आपल्याला आपल्या जवळच सापडतील. फक्त अशी संधी ओळखून त्या संधीचे सोने करावयाचे कौशल्य आपण आत्मसात करायला हवे. अशी कौशल्ये तर आपल्या आतच दडून बसलेली असतात. अशा सुप्तकौशल्यांना वाव मिळायला हवा. बऱ्याच वेळा अति हव्यासापायी आपल्याला असे वाटते की, आपल्याजवळ जे आहे त्याचा त्याग करून आपण यशाचा, उत्तम भवितव्याचा, संधीचा शोध घ्यायला हवा. नोकरी बदलली तरच आपल्याला यश मिळेल अशी आपण कल्पना करतो.
हिरा जेव्हा नैसर्गिक अवस्थेत असतो तेव्हा तो ओबडधोबड स्वरूपात असतो म्हणून त्याची ओळख पटणे अवघड जाते. हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम कष्टाचे आणि कौशल्याचे आहे. चालून येणाऱ्या अनेक संधींकडे आपण कठीण किंवा अशक्य गोष्ट म्हणून बघतो आणि त्या सोडून देतो. स्वत:चे कौशल्य अजमावून अशा संधींचे सोने करण्यातच कृतार्थता आहे.

मुक्त करा

आपल्यातील जेता

आपण आपल्या बुद्धिमत्तेचा योग्य तो उपयोग करून आपल्यात दडलेल्या जेत्याला बाहेर काढा. त्याच्या आसपासच्या निरुपयोगी गोष्टींना दूर करा. आपल्यातील जेत्याला प्रत्यक्षात आणण्याचे काम हे केवळ आपलेच आहे आणि ते आपणच करायला हवे. प्रत्येकात काहीतरी गुणवैशिष्ट्य दडलेले असते. फक्त त्याला ओळखून विकसित करण्याचा प्रयत्न करावयास हवा. आपल्यातील सुप्तगुणांना वेळीच योग्य ती संधी प्राप्त करून द्यायला हवी.

जगप्रसिद्ध मूर्तिकार मायकेल अँजलो आपल्या परिचयाचा आहे. त्याने अनेक उत्कृष्ट पुतळ्यांची निर्मिती केलेली आहे. आजही त्या पुतळ्यांना तोड नाही. इटलीतील फलॉरेन्स येथील 'डेव्हिड' या पुतळ्याची गणना त्याच्या पहिल्या दहा कलाकृतीत होते. संगमरवरात कोरलेला 18 फूट उंचीचा हा पुतळा 500 वर्षांपूर्वीचा असला तरी तो जगभरातील लाखो लोकांचे लक्ष वेधून घेतो. येथे येणारी प्रत्येक व्यक्ती त्या पुतळ्याकडे बघून आश्चर्यचकित आणि कृतार्थ होऊनच परतते, मायकेल अँजलोच्या या अभिजात कलाकृतीने रसिकांचे मन थक्क होते; पण या सर्वांनाच या अजोड कलाकृतीचा इतिहास माहीत असतोच असे नाही.

आपल्यातील देवदूत

18 फूट उंचीचा काळा संगमरवरी दगड हजारो वर्षांपासून येथे पडलेला होता. मायकेलच्या जन्मापूर्वीपासून तो तसाच पडलेला होता. लिओनार्डोसारख्या अनेक नामवंत कलाकारांना त्याचा उपयोग करण्यासाठी आमंत्रित केले होते; परंतु हा दगड निरुपयोगी आहे आणि यापासून कसलीही निर्मिती होऊ शकणार नाही, असेच सर्वांचे मत होते. अनेक वर्षांनंतर मायकेल अँजलोला या निरुपयोगी दगडावर काम करण्याची संधी मिळाली आणि त्यातूनच त्याने एका अत्यंत सुरेख आणि अजरामर पुतळ्याची निर्मिती केली. त्या पुतळ्याचे काम करीत असताना एका छोट्या मुलाने त्याला विचारले होते,"आपण या दगडावर असे क्रूरपणे घाव का घालता आहात?" त्यावर अँजलो म्हणाले होते,"अरे बाळ या खडकात एक देवदूत दडून बसलेला आहे. त्याला मुक्त करण्यासाठी मी हा प्रयत्न करतो आहे. त्याच्या आजूबाजूला असलेले दगड दूर करतो आहे."

या गोष्टीचा आपण थोडा विचार केला, तर आपल्या असे लक्षात येईल की, आपण सर्वजण त्या संगमरवरी शिळेसारखेच आहोत. आपल्या प्रत्येकाच्या आत असाच एक देवदूत आहे. अपूर्व बुद्धी, अलौकिक शक्ती असलेली प्रतिभासंपन्न व्यक्ती मुक्ततेची वाट पाहत दडून बसलेली आहे. आपल्यातील कोणीही निरुपयोगी नाही. आपण सर्वजण हे संस्कृत सुभाषित चांगलेच जाणतो.

"अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।

अयोग्य: पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभ: ॥”

असे एकही अक्षर वर्णमालेत नाही की, ज्याचा वापर मंत्राची रचना करताना होणार नाही. वनस्पतीचे असे एकही मूळ नाही की, ज्याच्यापासून औषध निर्माण करता येणार नाही, ज्याचा काहीही उपयोग नाही किंवा ज्याची काहीच कार्यक्षमता नाही. फक्त या सर्वांमधील सुप्तगुण ओळखणारी योजक व्यक्ती मात्र दुर्मीळ असते. अशी व्यक्ती आपण बनायला हवे.

प्रत्येक व्यक्ती ‘विशेष’ असते

आपण आपल्या बुद्धिमत्तेचा योग्य तो उपयोग करून आपल्यात दडलेल्या जेत्याला मुक्त करा, बाहेर काढा. त्याच्या आसपासच्या निरुपयोगी गोष्टी दूर करा. आपल्यातील जेत्याला बाहेर काढण्याचे, अस्तित्वात आणण्याचे काम हे केवळ आपलेच आहे आणि ते आपणच करायला हवे.

प्रत्येकात काहीतरी गुणवैशिष्ट्य दडलेले असते. फक्त त्याला ओळखून विकसित करण्याचा प्रयत्न करावयास हवा. आपल्या सुप्तगुणांना वेळीच योग्य ती संधी प्राप्त करून द्यायला हवी.

निरपेक्ष प्रेम

आपल्याला आनंदी व्हायचे असेल, तर आपल्या आसपासच्या व्यक्तींना शक्य असेल ती मदत करावी. त्यांचं दु:ख कमी करून त्यांना आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करावा. या कामात कधीही कोणतीही परतफेडीची अपेक्षा ठेवू नये. असे केल्यास आपण आपोआपच आनंदी होऊ. आपली निराशा दूर पळून जाईल.

गरजवंतांना आपल्यापरीने मदत केल्याने आपले जीवनही आनंदी बनू लागते. परस्परसंबंध जुळतात. आपले दु:ख, निराशा, एकटेपणा या गोष्टी आपल्या जीवनातून पळ काढतात. मानवतेची सेवा केल्याचे समाधान लाभते. निरपेक्ष प्रेम केल्याची अनुभूती येते.

सर्वसामान्य व्यक्तीचं आयुष्य, खरंतर कोणत्याही व्यक्तीचं आयुष्य चांगलं-वाईट, सुख-दु:ख, आशा-निराशा, उत्साह-निरुत्साह या गोष्टींनी भरलेलं असतं. कधी ते सुखाच्या उच्चशिखरावर विराजमान होतं, तर कधी स्वत:ला दु:खाच्या खाईत झोकून देतं. बऱ्याच वेळा जेव्हा असं घडतं तेव्हा त्याला त्याच्या आजूबाजूची परिस्थिती कारणीभूत असतेच असे नाही, तर त्या परिस्थितीबद्दलची त्याची प्रतिक्रियाही कारणीभूत असू शकते. म्हणजेच त्या व्यक्तीची मानसिक पातळी हे सर्व ठरवीत असते.

एका शहरातील एका उच्चभ्रू घरात राहणाऱ्या सुशिक्षित सुंदर महिलेची ही कथा आहे. शहरातील गजबजलेल्या रस्त्यावर एका प्रशस्त इमारतीत एका सुप्रसिद्ध मनोविकार तज्ज्ञाचा छोटेखानी दवाखाना होता. तिथे बसून रुग्ण आपला क्रमांक कधी येईल, याची प्रतीक्षा करीत होते. अतिशय उत्तम पोशाख असलेली एक महिलाही त्यात होती. मनातील तगमग, अस्वस्थता तिच्या सुंदर चेहऱ्यालाही लपवता येत नव्हती. तज्ज्ञाच्या मदतीने आपल्याला जीवनात हवा असणारा आनंद आपण मिळवू शकू का? याविषयी तिला उत्सुकता वाटत असावी.

मदतनीस महिलेने तिचे नाव पुकारले. त्या महिलेला आपल्या डोक्यावरचे ओझे थोडे कमी झाल्यासारखे वाटले. लगबगीनेच तिने तज्ज्ञांच्या खोलीत प्रवेश केला. त्यांनीही तिचे हसून स्वागत केले. काही औपचारिकता उरकल्यावर महिला डॉक्टरांना म्हणाली, “सर, माझ्या आयुष्यात काहीच राम राहिला नाही, अशी खंत मला वाटते आहे. यात बदल घडवून आनंदी आयुष्य कसं जगता येईल, यासाठीच मी आपल्याकडे आले आहे.

खऱ्या आनंदाची अनुभूती

डॉक्टरांनी बेल वाजवली आणि स्वच्छतेचं काम करणाऱ्या आजीबाईंना आत बोलावले. त्यानंतर डॉक्टर त्या उच्चभ्रू महिलेला म्हणाले, “मी या आजींना, त्यांनी त्यांच्या आयुष्यात आनंद कसा मिळवला त्याची गोष्ट तुम्हाला सांगायला लावणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, कृपया आपण त्यांची कहाणी मनापासून ऐकावी”.

लक्ष्मीबाईंनी हातातली झाडणी आणि फरशी पुसण्याचे फडके एका बाजूला ठेवले आणि त्या महिलेला शेजारच्या खुर्चीत बसवून त्यांनी तिला आपली कहाणी सांगायला सुरुवात केली.

“बाईसाहेब, माझा नवरा मलेरिया झाल्यामुळे मरण पावला आणि त्यानंतर तीनच

महिन्यांनीच अपघातात माझ्या एकुलत्या एक मुलाचाही मृत्यू झाला. मला कोणीही नातेवाईक नव्हते आणि त्यावेळी माझ्याकडे काहीच शिल्लक राहिलेले नव्हते. खाण्या-पिण्यावरची माझी वासनाच उडाली होती आणि मला धड झोपही लागत नसे. माझ्या चेहऱ्यावरचं हसू गायब झालं होतं. इतर लोकांकडेही मी अगदी भकास चेहऱ्यानं बघत असे. आत्महत्येच्या विचारांनी मला घेरलं होतं.''

असंच एकदा माझे काम संपवून मी घरी जाताना एक दिवस मांजरीचं एक पिल्लू माझ्या मागोमाग माझ्या खोलीवर आलं. वातावरणात जरा गारवा होता. का कोण जाणे; पण मला त्या पिलाबद्दल वाईट वाटले आणि मायाही वाटू लागली. मी त्याला खोलीत घ्यायचे ठरवले. घरातले थोडे दूधही त्याला प्यायला दिले. पिलाने दुधाची वाटी जिभेने पुसून स्वच्छ केली. जिभल्या चाटत आणि प्रेमात गुरफटत ते त्याचं अंग माझ्या पायावर घासू लागलं.

मला खुदकन हसू आलं, कितीतरी महिन्यांनी मी हसले असेन. त्यानंतर झोप लागण्याच्या आधी माझ्या मनात एक विचार आला. या छोट्याशा मांजराला जराशी मदत केल्यामुळे माझ्या चेहऱ्यावर हसू फुललं. गरजू माणसांना जर मी मदत केली, त्यांची सेवा केली तर कदाचित त्यामुळे मी आनंदी होऊ शकेल.

इतरांवरील निरपेक्ष प्रेमातील आनंद

दुसऱ्या दिवशी सकाळी मी उत्साहाने उठले. नेहमीची कामे उरकून मी थोडे पोहे केले आणि माझ्या शेजारी राहत असलेल्या एका आजारी आजोबांसाठी ते घेऊन गेले. झोपून असणाऱ्या आजोबांनी ते आवडीने खाल्ले आणि त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून मला किती बरे वाटले म्हणून सांगू! झालं, मला हा छंदच लागला. दररोज कुणाला तरी मदत करण्यासाठी मी काहीतरी कारणच शोधून काढू लागले. गरजवंतांना आपल्यापरीने मदत करता करता माझे जीवनही आनंदी बनू लागले. माझा एकटेपणा, निराशा, दु:ख कुठे गायब झालं हे माझ्या लक्षातच आलं नाही. आज मी इतक्या शांत आणि आनंदी मनाने झोपते की, दुसऱ्या कुणालाच इतकी शांत झोप लागत असेल असे मला वाटत नाही. आता मला वाटू लागले आहे की, आपल्याला आनंदी व्हायचे असेल तर आपल्या आसपासच्या व्यक्तींनाही शक्य असेल ती मदत करावी. त्यांचं दु:ख कमी करून त्यांना आनंदी करण्याचा प्रयत्न करावा. या कामात कधीही परतफेडीची कोणतीही अपेक्षा ठेवू नये. आपण आपोआपच आनंदी होऊ. आपली निराशा दूर पळून जाईल.

क्लिनिकमध्ये आलेली महिला पटकन उठली आणि लक्ष्मीबाईंना तिने नमस्कार केला आणि सल्लागारांचे आभार मानले. नव्या उत्साहाने ती त्या क्लिनिकच्या बाहेर पडली. जगण्यातील आनंद शोधण्याचा निश्चय तिच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित होत होता. तिच्या चालण्यातही आत्मविश्वास जाणवत होता.

अमूल्य निसर्गनियम

निसर्गाने सर्व प्राणिमात्रांवर विशिष्ट बंधने घातलेली आहेत. प्रत्येकाला काही नियम ठरवून दिलेले आहेत. त्या सृष्टिनियमांचे उल्लंघन करता येत नाही. परंपरेनुसार चालत आलेले कर्मकांड सृष्टिनियमांना आव्हान देऊ शकत नाही. इहलोक सोडून गेलेल्या जिवाला स्वर्गात पाठवायचे की नरकात, हे कोणीही निश्चित ठरवू शकत नाही. सदैव सत्कृत्ये करणाऱ्या सदाचारी व्यक्ती चांगल्या ठिकाणी अर्थात स्वर्गातच वास करतात. स्वर्ग आणि नरक या संकल्पना मानवानेच निर्माण केलेल्या आहेत. दुष्कृत्यापासून वाचवून प्रत्येकास सत्कर्म करावयास भाग पाडण्यास आपण या संकल्पनांचा सकारात्मक उपयोग करू शकतो; निसर्गनियमांना आव्हान देण्यासाठी नव्हे.

क्रियाकर्म आणि ईश्वराची प्रार्थना म्हटलं की, गुरुजी आणि त्यांची दक्षिणा या गोष्टी अपरिहार्य ठरतात. असेच एक गुरुजी होते आणि ते लोकांना आश्वासनं देत असत की, माझ्याकडून पूजा आणि प्रार्थना करून घेतली तर आपल्या मृत नातेवाइकांची नरकातून मुक्तता होईल आणि त्यांची रवानगी स्वर्गात होईल. या क्रियेच्या वेळी गुरुजी एक मातीचा घडा छोटया छोटया दगडांनी भरीत असत आणि सर्व विधी पूर्ण झाल्यावर त्या मातीच्या घड्यावर एका लोखंडी हातोडीचा जोरदार प्रहार करीत असत. त्यामुळे घडा फुटून जर दगड बाहेर पडले तर कर्मकांड करणाऱ्या माणसांचे नातेवाईक नरकातून मुक्त होऊन स्वर्गात प्रवेश करतील, असा सर्वांचा समज होत असे.

कर्मकांडाचा पगडा

भगवान गौतम बुद्धांच्या काळातही या प्रथेचा मोठा पगडा जनमानसांत होता. बहुतेक माणसे अशाच निरर्थक कर्मकांडात अडकलेली होती. एके दिवशी एक तरुण रडत-रडत भगवान बुद्धांकडे आला.

बुद्धांनी त्याला विचारले, "काय झाले? का रडतो आहेस?"

"भगवान, माझे वृद्ध वडील काल मरण पावले."

"खरंच! मग मी काय करू शकतो? मरण पावलेल्या व्यक्तीला रडण्याने परत आणू शकत नाही." "होय महाराज, रडून काही माझे वडील परत येऊ शकणार नाहीत, हे मी समजू शकतो; परंतु भगवान, मी आपल्याकडे एक विशेष विनंती करण्याकरिता आलो आहे. कृपया माझ्या मृत पित्यासाठी आपण काहीतरी करा." "अरे, मी तुझ्या मृत पित्यासाठी काय बरं करू शकतो?" "महाराज, आपण नाही म्हणू नका. कृपया काहीतरी करा. आपण नक्कीच हे करू शकाल. हे छोटे-छोटे धर्मगुरू, पुरोहित, पंडित वगैरे मंडळी मृत माणसाच्या मुक्तीसाठी बरेच कर्मकांड करतात आणि सर्व विधी केल्यानंतर मृत माणसासाठी स्वर्गाचे दार उघडले जाते असे सांगतात. भगवान, आपण तर थोर आणि सामर्थ्यवान आहात. आपण जर माझ्या मृत पित्यायाठी काही कर्मकांड केले तर त्यांना स्वर्गात नुसता प्रवेशच नाही, तर कायमचेच वास्तव्य करण्याची सवलतही मिळू शकेल. आपण त्यांच्यासाठी जरूर काहीतरी करावे, अशी माझी आपल्याला अगदी कळकळीची विनंती आहे."

तो तरुण इतका भावनाविवश झाला होता की, कोणतीही तात्त्विक चर्चा किंवा तर्कसंगत

स्पष्टीकरण तो समजू शकला नसता. त्याला सत्य गोष्टी समजाव्यात यासाठी बुद्धांना दुसराच उपाय अवलंबणे जरुरीचे वाटले म्हणून ते त्याला म्हणाले, “ठीक आहे, बाजारात जा आणि दोन मडकी घेऊन ये.”

भगवान बुद्ध आपल्या मृत पित्यासाठी काही कर्मकांड करण्यास तयार झालेले पाहून त्या तरुणाला खूप समाधान वाटले. तो धावतच बाजारात गेला आणि दोन मडकी घेऊन आला.

भगवान बुद्ध, त्याला म्हणाले,“फारच छान! आता एक मडके तुपाने भर.” तरुणाने एका मडक्यात तूप भरले.“दुसरे मडके गारगोटयांनी भर.” तरुणाने तीही कामगिरी पूर्ण केली.

“आता त्यांची तोंडे उत्तमप्रकारे बंद कर.” त्याने सांगितल्याप्रमाणे केले. “आता ही मडकी समोरच्या तलावात नेऊन ठेव.” तरुणाने दोन्ही मडकी पाण्यात टाकल्यावर, ती दोन्हीही मडकी पाण्यात बुडाली.

“आता एक लांब काठी घेऊन ये आणि त्या मडक्यांवर मारून ती फोड.” भगवान बुद्ध म्हणाले.

या तरुणाला भगवान बुद्धांनी आपल्या मृत पित्यासाठी केलेले हे आश्चर्यजनक कर्मकांड पाहून खूपच समाधान वाटले

जुन्या परंपरेप्रमाणे माणसाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा त्याचे मृत शरीर स्मशानात नेत असे. ते शरीर चितेवर ठेवून त्याला अग्नी दिला जात असे. चितेभोवती मुलगा पाण्याने भरलेले मडके घेऊन प्रदक्षिणा घालत असे. प्रदक्षिणा घातल्यावर दगडाने ते मडके हळूहळू फोडले जात असे. त्या काळी समाजात अशी धारणा होती की, मृतात्म्यासाठी कर्मकांड केल्यास, त्याला स्वर्गात प्रवेश मिळतो.

काल आपल्या वडिलांना अग्नी दिला आणि आज भगवान बुद्धांनी आपल्या मृत वडिलांना मुक्ती मिळावी म्हणून ही मडकी फोडायला सांगितले असणार, असे त्या तरुणाला वाटले. तो या कर्मकांडामुळे फारच संतुष्ट झाला होता.

बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे त्या तरुणाने एक काठी घेऊन ती दोन्ही मडकी मोठ्या त्वेषाने फोडली. त्याचबरोबर एका मडक्यातले सर्व तूप वर येऊन पाण्यावर पसरून तरंगू लागले, तर दुसऱ्या मडक्यातील गारगोटया मात्र तळाशीच राहिल्या.

वास्तविकतेची ओळख

त्यानंतर भगवान बुद्ध म्हणाले, “छान! तरुण गृहस्था, मी तुझ्यासाठी एवढे केले. आता तुझ्या त्या तांत्रिकांना, मांत्रिकांना आणि पुरोहितांना बोलव आणि अशी प्रार्थना करावयास अगर मंत्र म्हणावयास सांग की, “हे गारगोटयांनो, वर या! आणि हे तुपा! तू मात्र खाली जा, मला तरी बघू दे की हे कसे घडते?”

“महाराज! आपण तर माझी थट्टा करावयास सुरुवात केलीत. आपण म्हणता आहात की, प्रार्थनेने तूप खाली जावे आणि गारगोटया मात्र वर याव्यात. हे कसे शक्य आहे भगवान? गारगोटया पाण्यापेक्षा जड आहेत त्यामुळे त्या पाण्याच्या वर येणे शक्यच नाही. तूप हे पाण्यापेक्षा हलके असते आणि त्यामुळे ते पाण्यावर तरंगणारच. ते पाण्याच्या तळाशी जाऊच शकणार नाही.”

“तरुण गृहस्था, तुला निसर्गनियमांची बरीच माहिती असूनही तू व्यक्तीबाबतच्या निसर्गनियमांना कसा समजू शकत नाहीस? जर संपूर्ण आयुष्यात तुझ्या पित्याने केलेली

कामे या गारगोटयासारखी जड असतील तर ती त्यांना अधोगतीलाच नेणार. त्यांना कोण वर काढू शकेल? जर त्यांनी तुपासारखी हलकी-फुलकी सत्कर्मं केली असतील तर त्यांना सद्गतीच मिळणार.

मानवीजीवन असेच सृष्टिनियमांना धरून चालत असते. ते आपण उत्तम प्रकारे समजून घ्यायला हवे. या नियमांनाच आपण धर्म म्हणून संबोधित असतो. या नियमांत आपल्याला बदल करता येत नाही; हे समजून घेऊन त्याप्रमाणे आपल्या आयुष्याचा मार्ग सुकर करून घेण्यातच प्रत्येकाचे हित असते.

पैसा म्हणजेच सर्वस्व नव्हे!

पैशांच्या मोहापायी काही अविचारी व्यक्ती कोणत्याही स्तरापर्यंत जाऊ शकतात, अशा व्यक्तींच्या हृदयात मानवतेला काडीमात्र किंमत नसते. मानवतेला विकून पैसा मिळविण्यातच अशा व्यक्तींना सौख्य मिळते. यामध्ये आपल्या हातून काही विपरीत तर घडत नाही ना, याचा विचारदेखील अशा व्यक्तींच्या मनात येत नाही. आपल्या स्वार्थासाठी इतरांच्या भावनांशी खेळणे म्हणजे पैशांसाठी माणुसकी विकणेच होय. अशा व्यक्तींमुळे मात्र इतर मानवांचा परस्परांवर व मानवताधर्मावर असणारा विश्वास नष्ट होत चालला आहे. हे इतरांच्या विश्वासाची हत्या करण्यासारखेच आहे.

एका गावात एक साधू राहत होते. गावातील एक आदर्श व्यक्ती म्हणून त्यांचा दरारा होता. अनेक माणसं अडीअडचणांच्या प्रसंगी त्यांचा सल्ला घेत असत. त्या साधूकडे एक अतिशय उमदा, देखणा आणि चपळ घोडा होता. त्याच्यावर नजर पडल्यास कोणालाही असा घोडा आपल्याकडे असावा असे वाटणे खूप स्वाभाविक होते. गावाच्या जवळच एक चोर राहत होता. त्याची नजर एकदा त्या उमदा घोड्यावर पडली. त्याने साधूकडे त्या घोड्याची मागणी केली. अर्थातच अपेक्षेप्रमाणे साधूने त्यास नकार दिला. चोर बेचैन झाला. साधू ताकदवान होता. गावात नामांकित आणि प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून प्रसिद्धही होता. त्यामुळे त्यांच्याकडून बळजबरीने घोडा घेणे तसे अवघडच होते.

खरे साधुत्व

चोराने एक शक्कल लढविली. साधूच्या माळरानातील वाटेवर तो आजारी माणसाचे सोंग घेऊन बसला. दुरूनच साधू येताना पाहून त्याने पवित्रा घेतला. साधू जवळ आल्यावर जोराने कन्हत, "मी आजारी आहे, मला डॉक्टरांकडे पोहोचवा." अशी कळकळीची विनंती त्याने साधूला केली. 'साधूच तो; गरजवंताने केलेली विनंती तो कशी फेटाळणार? साधूने त्या आजारी माणसाला घोड्यावर बसवून घेतले आणि तो वेगाने गावाकडे निघाला. थोडे अंतर पार केल्यावर चोराने साधूला खाली पाडले आणि चोर घोडा घेऊन पसार होऊ लागला.

"हा घोडा मी तुला दिला; परंतु माझी एक विनंती आहे," असे सांगून साधूने चोराला माघारी बोलावले. साधू सत्यवचनी आहे हे त्याला माहिती होते, त्यामुळे तोही माघारी आला. साधूने चोराला विनंती केली की, "कृपया, हा घोडा तू कसा मिळवलास हे मात्र कोणालाही सांगू नकोस. आता तू घोडा घेऊ जा."

घोडा कसा मिळवला हे जर लोकांना माहीत झाले असते, तर लोकांचा आजारी माणसांवरचा विश्वास उडाला असता आणि आजारी माणसांना मदत करावयाचे त्यांनी टाळले असते. म्हणून साधूमहाराजांनी आपल्या घोड्याचा त्याग केला होता. माणसाला साधुत्व येते, ते अशाच त्यागाने आणि दूरदृष्टीने.

वरील गोष्टीच्या संदर्भात सौ. सुधा मूर्ती यांनी सांगितलेला एक अनुभव घेण्यासारखा आहे तो असा -

आश्रयदायी व्यक्तिमत्त्व - सुधा मूर्ती

एकदा त्या ऑफिसमध्ये आपल्या कामात व्यग्र असताना त्यांच्या सेक्रेटरीने त्यांना भेटायला आलेल्या दोन माणसांना वेळ द्या म्हणून विनंती केली. अचानक आणि पूर्ववेळ न ठरवता आलेल्या माणसांना भेटणे तसे अवघडच होते; परंतु त्यातील एका वृद्ध माणसाचे वय आणि एकंदरीत परिस्थिती पाहून त्यांनी त्या दोन व्यक्तींना भेटायला बोलावले.

वृद्धाचे वय 70 च्या आसपास होते. अशक्तपणा असाहाय्यता आणि चिंता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. त्याच्या हातात एक मळकट पिशवी होती. त्यांच्याबरोबर एक मध्यम वयाचे गृहस्थही आत आले. तेही थोड्या विवंचनेतच होते. सुधा मूर्तींनी वेळ न घालवता पटकन त्यांना विचारले,"सांगा मी तुमच्यासाठी काय करू शकते?" त्यावर वृद्ध गृहस्थांनी शब्द न उच्चारता फक्त सोबतच्या माणसाकडे बघितले आणि तो म्हणाला, "बाईसाहेब मी या वृद्धाला एका बसस्थानकावर बसलेले बघितले. मला असे वाटते, यांना कोणीही नातेवाईक नाहीत आणि त्यांना आधाराची गरज आहे. दुर्दैवाने त्यांच्याकडे पैसेही दिसत नाही." त्याने या गोष्टीचे स्पष्टीकरण द्यायला सुरुवात केली. सुधाजींनी त्याला मध्येच थांबवून विचारले, "मला सांगा, माझ्याकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत? "बाईसाहेब, मी आपल्याबद्दल बरेच ऐकले आहे. आपण या वृद्धाला आश्रय द्यावा असे मला वाटते." त्यावर सुधाजींनी वृद्धाकडे बघत विचारले, "आपल्याला कोणी नातेवाईक आहेत का?" डोळ्यातील अश्रू पुसत सद्गृहस्थाने नकारार्थी मान डोलवली, "आपल्या कुंटुबाचे काय? "सुधाजींचा प्रश्न. "नाही! मला कोणीही नाही," वृद्धाचे स्पष्टीकरण. त्यावर सुधाजींनी त्या वृद्धाला अनेक प्रश्न विचारले आणि त्यानेही त्याची समर्पक उत्तरे दिली.

खिशात पैसा नाही. मदतीसाठी जवळचा कोणी नातेवाईकही नाही. त्या वृद्धाची ही अवस्था पाहून कुणालाही दया आली असती. सुधाजींनी आपल्या परिचयाच्या वृद्धाश्रमात फोन करून या वृद्धाला प्रवेश मिळवून दिला. या सर्व गोष्टी घडल्यावर सोबत आलेला गृहस्थ सुधाजींना म्हणाला, "बाईसाहेब, आपण काळजी करू नका मी त्यांच्याबरोबर वृद्धाश्रमापर्यंत जातो आणि तेथूनच परस्पर मी माझ्या कामावर रुजू होईन."

त्यानंतर सुधाजी आपल्या नेहमीच्या कामात बुडून गेल्या. अर्थातच अधून- मधून त्या वृद्धाश्रमात फोन करून आपण पाठविलेल्या वृद्धाची चौकशी करीत होत्या. त्यांना दर महिन्याला न चुकता पैसेही पाठवीत होत्या. एके दिवशी अचानक त्यांना वृद्धाश्रमातून निरोप आला की, ते वृद्ध खूप आजारी आहेत आणि ते आता थोड्याच दिवसांचे सोबती आहेत. सुधाजींनी वृद्धाला विचारले, "आता आपल्याला कोणाला भेटावेसे वाटते का? अगदी जवळचे कोणी नसले तरी दूरचा कोणी मित्र वगैरे आहे का? त्यांचा काही संपर्क असेल तर आम्हाला सांगा आम्ही त्यांना आपल्या भेटीसाठी बोलावून घेतो." थरथरत्या हातानेच वृद्धाने एक नंबर लिहून दिला. ज्याने तो फोन घेतला त्याला ताबडतोब वृद्धाला रुग्णालयात येऊन भेटण्याची विनंती करण्यात आली. थोड्याच वेळात तो माणूस रुग्णालयात आला. त्याच्या चेहऱ्यावर चिंता आणि काळजी दिसत होती. तो सरळ वृद्धाच्या पलंगाकडे गेला. त्या गृहस्थाला कुठेतरी भेटल्याची जाणीव सुधाजींना होत होती; परंतु प्रयत्न करूनही स्पष्ट ओळख पटत नव्हती. तेवढ्यात डॉक्टरांनी येऊन वृद्धाने अखेरचा श्वास घेतल्याची माहिती दिली. सुधाजींचा आणि त्या वृद्ध माणसाचा

काही संबंध आला नव्हता किंवा त्याची फारशी माहितीही त्यांना नव्हती तरी त्यांच्या मृत्यूचे त्यांना फार दु:ख झाले.

पैशांसाठी विश्वासघात

थोड्याच वेळात, त्या वृद्धाला भेटायला आलेले गृहस्थही बाहेर आले. त्यांच्याही डोळ्यांत अश्रू होते. ते बाहेर येऊन शांतपणे बाकावर बसले. वातावरण अगदी खिन्न वाटत होते. सुधाजी, वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक आणि वृद्धाला भेटायला आलेल्या गृहस्थांनी वृद्धाजवळ असलेल्या पिशवीची चौकशी करायला सुरुवात केली. ‘‘कोणती पिशवी?’’ सुधाजींची उत्सुकता अधिक वाढली. या व्यक्तीला त्या पिशवीबद्दल कशी माहिती आहे? त्यांनी शिपायाला वृद्धाश्रमात पाठवून ती पिशवी मागावून घेतली. जेव्हा ती पिशवी आली तेव्हा ती पिशवी बघण्यासाठी तो व्यक्ती खूपच अधीर असल्याचे जाणवले; परंतु सुधाजींनी ती पिशवी त्याला देण्याचे नाकारले. त्या म्हणाल्या, ‘‘ती पिशवी अजिबात उघडू नका. त्याआधी आपण आपली ओळख पटवून द्या आणि या पिशवीबद्दल आपल्याला माहिती कशी मिळाली ते प्रथम मला सांगा.’’ त्या गृहस्थाला हा प्रश्न फारसा आवडला नाही. तो म्हणाला, ‘‘मीच या वृद्धाला वृद्धाश्रमात सोडायला आलो होतो;’’ ‘‘परंतु आपण कोण आहात?’’ सुधाजींनी विचारले. ‘‘मी त्यांचा मुलगा आहे.’’ त्या गृहस्थाने उत्तर दिले.

सुधाजींना बसलेल्या आश्‍चर्याच्या धक्क्याची कल्पना आपण नक्कीच करू शकाल. त्याचवेळी त्या वृद्धगृहस्थाबरोबर आपल्याकडे आलेला तो माणूस हाच होता, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी हा वृद्ध बसस्टॉपवर मला बसलेला दिसला म्हणून आपल्याला सांगितल्याचेही त्यांना आठवले. त्या अतिशय अस्वस्थ झाल्या आणि रागानेच त्यांनी त्या गृहस्थांना विचारले, ‘‘आपण माझ्याशी खोटे का बोललात?’’ अर्थातच त्यांनी त्यामागील काही अडचणीही सांगितल्या. अस्वस्थपणे त्या म्हणाल्या, ‘‘आपल्या समस्या सोडविण्याचा काय हा गलिच्छ मार्ग!’’ त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली की, ‘‘आम्ही अनाथ माणसांना मदत करतो; मुले असणाऱ्या निराश्रित माणसांना नाही.’’

जेव्हा ती पिशवी उघडली गेली तेव्हा त्यात काही कपडे, औषधे आणि बँकेचे एक पासबुक मिळाले. पासबुक बघून तर सुधाजींना धक्काच बसला. त्या पासबुकात त्या वृद्धाच्या नावावर एक लाखापेक्षा अधिक रक्कम शिल्लक होती आणि त्या वृद्ध माणसाने आपल्या या मुलाला वारसदार म्हणून नेमले होते. त्याच मुलाच्या नावे हे पैसे ठेवले होते, ज्या मुलाने आपल्या वडिलांना त्यांच्या शेवटच्या असाहाय्य परिस्थितीत ते अगदी अनाथ आहेत, असे म्हणून सुधाजींना विनंती करून या वृद्धाश्रमात आणून सोडले आणि आपली स्वत:ची सुटका करून घेतली. त्याने अगदी निर्दयीपणे खोटे बोलून आपल्या वडिलांना या अनाथालयात दाखल केले होते. तोच मुलगा आपल्या वडिलांच्या एक लाख रुपयांवर आपला हक्क सांगण्यासाठी येथे आला होता.

मृत पावलेल्या त्या वृद्धाकडे बघा. ज्यांच्या मुलाने त्या वृद्धाला या जगात कोणीही नाही अशी बतावणी करून आपल्या पित्याची रवानगी अनाथालयात केली होती. त्यानेही मृत्यूनंतर आपला पैसा आपल्याच मुलाला मिळावा अशी व्यवस्थासुद्धा करून ठेवली होती. त्यांना असे का वाटले नाही की, या कृतघ्न मुलापेक्षा आपल्याला अखेरच्या परिस्थितीत ज्या वृद्धाश्रमाने आधार दिला त्यांनाच या रकमेचे वारसदार करायला हवे.

थोड्या पैशांसाठी या पिता-पुत्राने रचलेले नाटक तर लाजिरवाणे होतेच; परंतु अपेक्षा करता तेव्हा त्यांच्याकडेही लोक संशयाने बघतात.
पैशांच्या मोहापायी काही अविचारी व्यक्ती कोणत्याही स्तरापर्यंत जाऊ शकतात. अशा व्यक्तींच्या हृदयात मानवतेला काडीमात्र किंमत नसते. मानवतेला विकून पैसा मिळविण्यातच अशा व्यक्तींना सौख्य मिळते. यामध्ये आपल्या हातून काही विपरीत तर घडत नाही ना, याचा विचारदेखील अशा व्यक्तींच्या मनात येत नाही. आपल्या स्वार्थासाठी इतरांच्या भावनांशी खेळणेसुद्धा म्हणजे इतरांच्या विश्वासाची हत्या करण्यासारखेच आहे.

खरे प्रेम

दृष्टिहीन किंवा इतर शारीरिक व्यंग असणाऱ्या व्यक्तीदेखील मनाने खूप सुंदर असतात. अशा व्यक्तींवरही आपण मनोमन प्रेम करायला हवं. आपल्या घरातील एखाद्या व्यक्तीस शारीरिक व्यंग असले म्हणून ती कुरूप किंवा निरुपयोगी होईल असा विचारही मनाला स्पर्श करू देऊ नये. कुटुंबातील सर्वच व्यक्तींवर आपण सारखेच प्रेम करायला हवे. केवळ शरीराने नव्हे, तर मनाने सुंदर बनायला हवे. इतरांच्या शारीरिक सुंदरतेवर प्रेम न करता त्यांच्या मनावर प्रेम करायला हवे. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवायला हवी की, इतरांना प्रेम देत राहिल्यास त्याचा प्रवाह तसाच आपल्याकडेही येत राहील.

एक सुंदर तरुणी पांढरी काठी हातात घेऊन बसमध्ये आपल्या जागेकडे जात होती. बसमधील सर्वच प्रवाशी तिच्याकडे सहानुभूतीने बघत होते. त्या तरुणीने कंडक्टरला पैसे दिले आणि आपल्या हाताने अंदाज घेत ती आपल्या बसण्याच्या जागेकडे जाऊ लागली. कंडक्टरने सांगितलेली जागा रिकामी असल्याची खात्री केली आणि आपली सुटकेस आणि काठी मांडीवर घेऊन ती शांतपणे त्या जागेवर बसली.

अनपेक्षित अंधत्त्व

वयाच्या 34 व्या वर्षीच डॉक्टरांच्या चुकीच्या निदानामुळे त्या तरुणीला म्हणजेच मनोरमाला अंधत्व आले होते. एका भयंकर अशा अंधाऱ्या जगात तिने प्रवेश केला होता. त्यामुळे ती अतिशय निराश झाली होती आणि तिला स्वत:चीच कीव येत होती. एके काळी अतिशय स्वावलंबी असणारी मनोरमा आयुष्यात दुर्दैवाने अचानक ओढवलेल्या या संकटामुळे शक्तिहीन झाली होती. कुटुंबातील माणसांवर एक विचित्र ओझे ठरली होती.

"माझ्या बाबतीतच असे कसे झाले?" असा जेव्हा ती विचार करू लागली तेव्हा तिच्या हृदयात संतापाची लाट उठत असे. त्याचबरोबर आता आपण कितीही रडलो, त्रागा केला, परमेश्वराची प्रार्थना केली तरी आपली दृष्टी परत येणार नाही, याची तिला जाणीव होती. अतिशय सकारात्मक वृत्तीच्या मनोरमाला निराशेच्या ढगांनी ग्रासून टाकले होते. येणारा प्रत्येक दिवस तिच्यासाठी कष्टाचा आणि निराशेचाच ठरत होता. आता मात्र पूर्णपणे तिला आपल्या नवऱ्यावर म्हणजेच 'माधव' अवलंबून राहावे लागणार होते.

माधव हा सैन्यात अधिकारी होता. मनोरमावर त्याचे अगदी मनापासून प्रेम होते. जेव्हा मनोरमाची दृष्टी गेल्याचे पहिल्यांदा त्याला कळले तेव्हाच तिची तगमग त्याच्या लक्षात आली होती. तिला ताकद आणि आत्मविश्वास देऊन पुन्हा आत्मनिर्भर करायचे हे त्याने तेव्हाच ठरवून टाकले होते. अशी नाजूक, संवेदनशील परिस्थिती कशी हाताळायची याचे प्रशिक्षण त्याने सैन्यातच घेतलेले होते. ही अतिशय कठीण लढाई आपल्याला जिंकायची आहे, याचीही त्याला कल्पना होती.

आता आपण कामावर परतायला हवे अशी इच्छा असतानाही तिथपर्यंत आपण एकटे कसे जाणार? या विचाराने मनोरमा बेचैन झाली होती. आपल्या कामाची दिशा अगदी

उलटी असली तरी रोज आपण आपल्या कारने मनोरमाला तिच्या कामावर सोडून आपण आपल्या कामावर जाऊ असा निश्चय माधवने केला. अर्थातच या योजनेमुळे मनोरमाला आराम आणि संरक्षण दोन्हीही मिळणार होते; परंतु थोड्याच दिवसात त्यांच्या लक्षात आले की, ही व्यवस्था वेळ आणि पैशांचा अपव्यय करणारी आहे.

स्वावलंबनाची शिकवण

माधवने स्वत:शीच विचार केला की, मनोरमाने आता दररोज बसनेच प्रवास करायला हवा; परंतु याबद्दल मनोरमाशी बोलण्यासाठी मात्र त्याचे धाडस होत नव्हते. कारण मनोरमा अजूनही थोडी हळवी आणि रागातच होती. तिची प्रतिक्रिया काय असेल? याबद्दल मात्र त्याची खात्री होत नसल्याने तो हा विषय टाळत होता.

एक दिवस धाडस करून माधवने या विषयाला वाचा फोडली. आपण आता बसने एकटीनेच प्रवास करायचा, या कल्पनेनेच मनोरमा अस्वस्थ झाली. ''मी आंधळी आहे!'' अतिशय कडवटपणाने ती म्हणाली. मी एकटी कसा प्रवास करणार? मी कोठे जाते आहे हे मला कसे कळणार? मला तर आता असे वाटायला लागले आहे की, तुझे माझ्यावरचे प्रेम कमी झाले आहे आणि तू मला सोडून द्यायचे ठरवले आहे.'' हे ऐकल्यावर माधवला अतिशय दु:ख झाले; पण अशाही परिस्थितीत आपण कसे वागायचे हे त्याला पक्के माहिती होते. त्याने मनोरमाला समजावले की, तुला प्रवासाचा सराव होऊन आत्मविश्वास येईपर्यंत दररोज सकाळ-संध्याकाळ मी तुझ्याबरोबर प्रवास करीत राहील. त्यानंतर हे नेमके तसेच घडले. पुढे संपूर्ण दोन आठवडे माधव आपल्या सैनिकीवेशात प्रत्येक दिवस मनोरमाबरोबर त्याच बसमध्ये प्रवास करीत होता. डोळ्याअभावी याच कामासाठी आपल्या इतर इंद्रियांचा, संवेदनांचा प्रामुख्याने कानाचा कसा उपयोग करायचा याबद्दल त्याने तिला प्रशिक्षण दिले. त्यात आपण कोठे आहोत, बदललेल्या परिस्थितीचा अंदाज कसा घ्यायचा याचेही धडे माधवनेच मनोरमाला दिले.

प्रवास करताना तिला मदत करू शकेल अशा ड्रायव्हरशी मैत्रीचे संबंध कसे प्रस्थापित करायचे, हेही तिला त्याने समजावून सांगितले. या कठीण परिस्थितीचा आनंदाने कसा सामना करायचा, याचे कौशल्यही माधवने मनोरमाला शिकवले. बसमध्ये कसे चढायचे, आपली जागा कशी मिळवायची, आपली पर्स कशी सांभाळायची, बसमधून उतरून घरी कसे यायचे या सर्व गोष्टींत मनोरमा तरबेज झाली. प्रत्येक दिवशी माधव मनोरमेबरोबरच बसने जात असे.

जरी हा दिनक्रम पूर्वीच्या दिनक्रमापेक्षा जास्त दमछाक करणारा आणि खर्चीक असला, तरी थोड्याच दिवसात या गोष्टी स्वतंत्रपणे करण्यास मनोरमा तरबेज होणार याची माधवला खात्री होती. दृष्टी जाण्यापूर्वी मनोरमा आपल्या समोरील प्रत्येक आव्हान किती शिताफितीने आणि निर्भयपणे पार पाडीत होती, हे माधवला चांगल्या प्रकारे माहीत होतं. यशस्वी होण्यासाठी संघर्ष करण्याची तिची तयारी असून सर्व गोष्टी ती व्यवस्थितपणे करू शकेल, याची त्याला खात्री होती.

कर्तव्यपरायण पती

एक दिवस माधवने निर्णय घेतला की, आता मनोरमा स्वतंत्रपणे कार्यालयात जाण्यासाठी तयार झाली आहे. तो सोमवारचा दिवस होता. एकटीने प्रवास करण्यापूर्वी

काही दिवस सहप्रवासी झालेल्या पतीबद्दलच्या कृतज्ञतेने तिचे डोळे भरून आले. माधवची तिच्यावरील निष्ठा, प्रामाणिकपणा, सहनशीलता व प्रेमच जणू काही तिच्या अश्रूंतून दिसत होते. आज बऱ्याच दिवसांनंतर ती दोघे विरुद्ध दिशेनं आपापल्या कार्यालयात जाणार होती. त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला. मनोरमालाही आता छान वाटत होते. ती तिचा प्रवास एकटीच करीत होती आणि व्यवस्थित कार्यालयातही पोहोचत होती. मनोरमाने नेहमीप्रमाणे आपली बस पकडली आणि ती कंडक्टरला आपल्या तिकिटाचे पैसे देत असताना बस कंडक्टर न राहवून तिला म्हणाला, "बाईसाहेब, मला तुमचा हेवा वाटतो'. पहिल्यांदा मनोरमाच्या लक्षातच आले नाही की तो कंडक्टर कोणाला उद्देशून असे म्हणतो आहे; कारण या जगात जगण्यासाठी धडपडणाऱ्या अंध महिलेचा हेवा कोण करेल? आश्चर्यानेच तिने कंडक्टरला विचारले, "आपल्याला माझा हेवा वाटतो असे आपण का बरं म्हणालात?" त्यावर कंडक्टर म्हणाला, "आपली जी काळजी घेतली जाते, आपल्याला जे संरक्षण दिले जाते ते बघून मला आपला खरोखरच हेवा वाटतो आहे." मनोरमाला मात्र तो काय म्हणतो आहे, हे कळतच नव्हते. तिने परत कंडक्टरला विचारले, "आपल्याल्या नेमके काय म्हणायचे आहे?"

त्यावर कंडक्टरने स्पष्ट केले की, "एक आठवड्यापासून सैनिकाच्या वेशातील एक देखणा माणूस कोपऱ्यात उभा राहून आपण बसमधून उतरेपर्यंत अगदी कटाक्षाने आपल्या प्रत्येक हालचालीची नोंद घेत असतो. आपण सुरक्षितपणे रस्ता पार करून कार्यालयाच्या इमारतीत व्यवस्थितपणे पोहोचता आहात ना, यावर त्याची कटाक्षाने नजर असते. तो दुरुनच आपला पापा घेतो, आपल्याला सैनिकी थाटात सलाम करतो आणि निघून जातो. बाईसाहेब, आपण खरोखरच नशीबवान आहात."

मनोरमाच्या गालावरून आनंदाश्रू वाहत होते. ती त्याला प्रत्यक्ष तिच्या डोळ्याने बघू शकत नव्हती; परंतु दररोजच्या या प्रवासात माधव सतत आपल्या जवळ आहे, आसपासच आहे, असा भास मात्र सतत तिला होत होता. आता मात्र मनोरमाला वाटले की, खरोखरच आपण किती नशीबवान आहोत! परमेश्वराने आपल्याला दृष्टीपेक्षाही किती मोठी देणगी दिली आहे! प्रेमाची ही देणगी अगदी दाट अंधारातही आपल्याला जगण्याचा प्रकाश देते. (आपण आपल्या बायकोवर, ती सुंदर दिसते म्हणून प्रेम करीत नाही, तर आपण प्रेम करतो म्हणून ती सुंदर दिसते.)

आपली पत्नी दृष्टिहीन झाली तरीही तिच्यावरील प्रेम किंचितही कमी न होऊ देणारा माधव खरोखरच महान आणि पतिधर्म पाळणारा आहे. व्यक्तीची सुंदरता ही तिच्या मनावर अवलंबून असते. केवळ शारीरिक, बाह्य सुंदरता चिरकाल टिकणारी नसते.

नात्यातील पूल

बांधा

नाते म्हटले की, त्यात राग-रुसवा, प्रेम, भांडण, ताण-तणाव आलेच. आपल्या नातेसंबंधात जेव्हा ताणतणाव निर्माण होतात तेव्हा नात्यात भिंत बांधणे फारच सोपे असते. त्यामुळे दुसऱ्या व्यक्तीला आपल्यापासून दूर करणेही सोपे जाते. आपल्यामध्ये नातेसंबंध जोडण्यासाठी नात्यातील दुरावा कमी करणाऱ्या व्यक्तीही असतातच.

काही संघर्षमय प्रसंगात आपल्या पुढे दोनच पर्याय असतात. एक म्हणजे भिंत बांधणे आणि दुसरा म्हणजे संबंध जोपासणे. अशा परिस्थितीत संबंध जोपासायला हवेत. तीच आपल्यातील माणुसकीची खरी ओळख आहे. असे प्रसंग, संघर्ष आपण कसे हाताळतो यावरच आपले व्यक्तिमत्त्व आणि परस्परसंबंध कसे आहेत हे ठरत असते, हे मात्र निश्चित.

दिनकरराव म्हणजेच गावातील एक सधन आणि प्रतिष्ठित शेतकरी. त्यांना राम आणि श्याम ही दोन मुले होती. आई वडिलांच्या छत्राखाली अतिशय प्रेमाने वाढलेली. दोघांचेही एकमेकांवर अतिशय प्रेम होते आणि आई-वडिलांनीही ते काळजीपूर्वक जोपासले होते. मुलांमध्ये असेच प्रेम कायम राहावे म्हणून दिनकररावांनीदेखील आपल्या हयातीतच आपल्या शेताचे दोन भाग करून त्याची योग्य वाटणीही दोघांमध्ये केलेली होती. दिनकररावांच्या निधनानंतर दोघे भाऊ शेजारी शेजारी मोठ्या गुण्यागोविंदाने राहत असत. शेतीसाठी लागणारे सामान, यंत्रे आणि नोकरचाकर यांची देवाणघेवाण अतिशय समजूतदारपणे चालू असे. चाळीस वर्षांच्या या प्रेमळ सहवासात व्यत्यय येऊन काही किरकोळ कारणाने त्यांच्यात बेबनाव होतो. भांडण होते. थोडासा तंटा निर्माण होतो. त्यामुळे दोघांमध्ये असणारी सहकाराची भावना एकदम कमी होते. खरंतर अगदीच क्षुल्लक कारणाने अशी दरी तयार होत असते. नंतर ती वाढतच जाते आणि शेवटी अनियंत्रित होते. त्यातून खूप मोठा तंटा उभा राहतो. शिवीगाळ, वाईट शब्दांची देवाणघेवाण होते आणि त्यानंतर अनेक आठवडे शांतता पसरते.

परस्परसंबंध जोपासणारा युवा-सुतार

एक दिवस अचानक राम, जो की दोघा भावांमध्ये मोठा असतो, त्याच्या दारावर टकटक असा आवाज होतो. राम दार उघडतो तेव्हा त्याला आपली अवजारांची पेटी गळ्यात अडकवलेला एक सुतार दिसतो. रामला थोडे आश्चर्यच वाटते आणि तो त्याला विचारतो, “आपले माझ्याकडे काय काम आहे?” त्यावर सुतार म्हणतो, “साहेब, मी सुतार आहे आणि काही दिवसांसाठी थोडे काम मिळेल का ते बघतो आहे, कदाचित आपल्याकडे काही छोटी मोठी कामे असतील असे मला वाटले म्हणून मी आपल्याकडे आलो आहे. आहे का, आपल्याकडे काही काम? मी ती कामे चांगल्याप्रकारे करू शकेल.” त्यावर राम म्हणाला, “होय, माझ्याकडे तुमच्यासाठी एक काम आहे. समोरच्या शेताकडे बघा. तेथे आपल्याला एक छोटा ओढा दिसतो आहे का? त्याच्या पलीकडे माझा शेजारी

राहतो. खरं तर तो माझा लहान भाऊच आहे. मागच्या आठवड्यात आमच्यात काही वाद झाले, त्याने एक बुल्डोझर आणला आणि नदीसारखा एक छोटा नालाच तेथे तयार केला. त्यामुळे आमची शेते वेगवेगळी झाली. त्याने कदाचित मला त्रास देण्यासाठी हे केले असेल; परंतु मी यापेक्षा अधिक चांगले काहीतरी करावे असा माझा विचार आहे. बघा, समोरच तुम्हाला फळकुटयांचा एक मोठा डोंगर दिसतो आहे का? तुम्हाला माझ्यासाठी त्या फळ्या वापरून एक आठ फूट उंचीचे कुंपण तयार करायचे आहे. त्यामुळे मला त्याच्या शेताचे दर्शन होणार नाही आणि त्याचा चेहराही पाहावा लागणार नाही.''
त्यावर सुताराने उत्तर दिले की, ''साहेब मला असं वाटतं की, तुमची ही सर्व परिस्थिती माझ्या नीट लक्षात आली आहे. मला आता काम सुरू करण्यासाठी लागणारे इतर साहित्य कोठे आहे ते दाखवा म्हणजे मी लगेचच माझ्या कामाला सुरुवात करू शकेल.''
रामला काही महत्त्वाच्या कामासाठी लगेचच बाहेरगावी जावे लागणार होते. त्यामुळे त्यांनी सुताराला आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी दिल्या आणि तो निघून गेला. सुतारही लगेचच कामाला लागला. त्याने फळ्या तासून घेतल्या, खड्डे खणून घेतले. पाहिजे तेथे खिळे ठोकून घेतले. त्याने कामासाठी दोन-तीन दिवस भरपूर मेहनत घेतली. आपल्या मनाप्रमाणे त्याने ते काम पूर्ण केले.

नाते जोपासण्यातील आनंद

राम आपले काम संपवून संध्याकाळच्या वेळी घरी परतला आणि बघतो तर काय, तेथे कुंपणाचा पत्ताच नव्हता. निरखून बघितल्यावर त्याला असे दिसले की, सुताराने श्यामने तयार केलेल्या ओढ्यावर एक सुंदर पूल तयार केला होता. त्यामुळे राम आणि शामची शेते उत्तम प्रकारे जोडली गेली होती. पुलाचे कामही खूपच देखणे झालेले होते. रामलाही क्षणभर वाटून गेले की काय अजब माणूस आहे हा! आपल्या मनातला खरा हेतू ओळखून त्याने हा सुंदर पूल तयार केला. रामच्या डोळ्यांपुढे त्याचा भूतकाळ वेगाने तरळत होता. किती प्रेम केले आपण आपल्या छोट्या भावावर, श्यामवर! त्याचेही माझ्यावर खूप प्रेम होते. दादा म्हणून माझा किती आदर करीत होता! कसे? का? पण अगदी क्षुल्लक कारणावरून आपल्यात बेबनाव झाला आणि किती मोठी दरी निर्माण झाली! क्षणार्धात अविवेकाने राज्य केले आपल्यावर. झाले ते झाले; पण आता यात आपणच मोठेपणा दाखवायला नको का? क्षमा ही शत्रुत्वापेक्षाही मोठी असते आणि मोठा भाऊ म्हणून मीच ती करायला नको का? या विचाराने सुताराने तयार केलेल्या रामने पुलावरून छोटा भाऊ श्यामच्या शेताकडे चालायला सुरुवात केली. छोट्या भावाने जेव्हा हे बघितले तेव्हा त्याचाही राग क्षणार्धात ओसरला आणि तो आपले हात रुंदावून रामकडे, आपल्या दादाकडे धावतच येऊ लागला. दोघेही भाऊ एकमेकांकडे प्रेमाचे भरते येऊन चालत येत होते. पुलाच्या मध्यावरच त्यांची भेट झाली. आवेगाने त्यांनी एकमेकांना प्रेमाने आलिंगन दिले. दोघांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. दोघांनीही हात हातात घेऊन सुताराकडे नजर टाकली, तेव्हा आपली सामानाची पेटी गळ्यात अडकवून सुतार बाहेर पडण्याच्या तयारीत होता. रामने त्याला जोरात हाक मारली आणि तो म्हणाला, ''सुतारदादा, आता असे परतू नका. अजून एक-दोन दिवस आमच्या बरोबर थांबा. तुम्ही आमच्यासाठी किती महत्त्वाचे काम केले आहे याची कदाचित तुम्हाला कल्पनाही नसेल. आपण यापुढेही आमच्याबरोबर राहिलात तर

यापेक्षाही आणखी चांगले काहीतरी येथे घडू शकेल.'' यावर सुतार म्हणाला, ''साहेब मला येथे राहायला नक्कीच आवडेल; परंतु माझे येथील काम तर आता पूर्ण झाले आहे आणि मला असेच अनेक पूल बांधायची कामे करावयाची आहेत. तेव्हा आता मला कृपया आग्रह करू नका. माझी पुढची कामेही आपल्याइतकीच महत्त्वाची आहेत.''

खरंच नात्यात कोणत्याही कारणाने दुरावा आला, तर आपण अविचाराने काहीही करून बसतो; पण सुतार दादांसारख्या व्यक्ती हा दुरावा कमी करतात आणि नाते जोपासतात. राम आणि श्यामला असा नात्यात पूल बांधणारा माणूस भेटला; पण अशी व्यक्ती प्रत्येकालाच भेटते असे नाही. त्यामुळे नाते जोपासा.

पेराल तेच

उगवेल

आपण जेव्हा प्रामाणिकपणा पेरतो तेव्हा त्या वृक्षाला विश्वासाची फळे लागतात. नम्रता पेरतो, तेव्हा मैत्रीची फळे लागतात. चिकाटी पेरतो, तेव्हा सफलतेची फळे लागतात. विचार पेरतो, तेव्हा यथार्थतेची फळे लागतात.

कठोर मेहनत पेरतो, तेव्हाच त्याला यशाची फळे लागतात. क्षमा पेरतो, तेव्हाच समेटाची फळे लागतात. आपण जसे पेराल तसेच उगवेल, हा निसर्गनियम आहे. तो लक्षात ठेवूनच आपण आपल्या आयुष्याची जडणघडण करायला हवी. आपण केलेल्या चांगल्या कामांची फळेही चांगलीच मिळतात.

श्री. रावसाहेब हे एक यशस्वी उद्योगपती होते. परिस्थितीशी कडवी झुंज देऊन शून्यातून त्यांनी आपला व्यवसाय उभा केला होता. प्रयत्नात सातत्य राखून त्यांनी त्यांचा विकास केला होता आणि प्रसिद्धीही मिळविली होती; परंतु आता वाढत्या वयाचा विचार करून रावसाहेबांना निवृत्तीचे वेध लागले होते. त्यांनी आपला व्यवसाय सांभाळण्यासाठी आपल्या वारसदाराचा शोध घ्यायचे ठरवले. आपली मुले किंवा संचालकांना हे पद द्यावे असे त्यांना वाटत नव्हते. आपण काहीतरी वेगळे करावे असे त्यांना नेहमी वाटायचे. त्यांनी आपल्या व्यवसायातील सर्व तरुण असणाऱ्या वरिष्ठ व्यवस्थापकांना एकत्र बोलावले आणि ते त्या सर्वांना उद्देशून म्हणाले, "आता माझ्या निवृत्तीचा काळ जवळ आला आहे म्हणून मला माझ्या या पदावर मुख्य कार्यकारी अधिकारी नेमावयाची ही योग्य वेळ आहे असे मला वाटते. यासाठी मी आपल्यातील एका अधिकाऱ्याची निवड करावयाचे ठरविले आहे." सगळे तरुण अवाक झाले; परंतु साहेबांनी आपले भाषण पुढे सुरूच ठेवले. "मी आजच आपल्यातील प्रत्येक अधिकाऱ्याला एका खास वनस्पतीचे बी देणार आहे. आपण सर्वांनी हे बी मातीत पेरायचे आहे. त्याला पाणी घालायचे आहे, त्याची उत्तम देखभालही करायची आहे, मी आपल्याला दिलेल्या या बीजाचे आपण कसे संवर्धन करता आहात याची चाचणी मी बरोबर एक वर्षाने याच दिवशी, याच सभागृहात स्वत: करणार आहे. आपण बरोबर आणलेल्या रोपाची पाहणी करून सर्वाधिक चांगले रोप कोणते हे मी ठरविणार आहे. यावरून मी ज्या अधिकाऱ्याची निवड करेल तो 'मुख्य कार्यकारी अधिकारी' म्हणून माझी जागा घेईल."

प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवा

त्या अधिकाऱ्यांमध्ये हरिश्चंद्र नावाचा एक अधिकारी होता. इतर सर्व अधिकाऱ्यांबरोबरच त्यालाही एक 'बी' मिळाली. तो घरी आला आणि अतिशय उत्साहाने त्याने आपल्या बायकोला ही सगळी हकीकत सविस्तरपणे सांगितली. त्याचा प्रफुल्लितपणा बघून तिनेही त्याच्यासाठी एक कुंडी तयार केली. हरिश्चंद्राने त्यात

माती, खत वगैरे घालून त्यात साहेबांनी दिलेली 'बी' लावली. दररोज तो त्या कुंडीत पाणी घालून ती 'बी' अंकुरित झाली का? याची चाचपणी करीत असे. जवळ जवळ तीन आठवड्यांनंतर काही अधिकारी त्या बिया आणि उगवलेल्या रोपाबद्दल बोलू लागले.
हरिश्चंद्र मात्र आपली कुंडी रोज तपासत होता; त्याच्याजवळ असलेले बीज अजून अंकुरलेही नव्हते; परंतु तीन आठवडे, चार, पाच, सहा, आठवडे होऊन गेले तरी त्याच्या कुंडीत काहीच उगवलेले नव्हते. त्यामुळे आपण पराजित झाल्याची भावना त्याच्या मनात अंकुरत होती.
सात महिने लोटले तरी हरिश्चंद्राची कुंडी रिकामीच होती. आपल्या कुंडीतले बीज आपल्याच हातून मारले गेले आहे असे त्याला वाटू लागले. इतर प्रत्येकाच्या कुंडीत मात्र झाडे उगवली होती आणि ती उंचही वाढली होती अशी माहिती त्याच्या कानावर येत होती; परंतु हरिश्चंद्राच्या कुंडीत काहीही न उगवल्यामुळे तो गप्पच राहत असे. आपल्या मित्रांना किंवा सहकाऱ्यांना काहीही सांगायचे नाही असेच त्याने ठरवले होते. असे असले तरी तो कुंडीत पाणी आणि खत अगदी नियमितपणे घालत राहिला. त्याला आपल्या कुंडीत रोप येऊन त्याचे सुंदर झाड व्हावे अशी आशा वाटत होती. असे करता करता शेवटी वर्ष संपले आणि सर्व अधिकाऱ्यांनी आपापली झाडे आपल्या 'मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यां'कडे तपासणीसाठी आणावीत अशी आज्ञा झाली.

प्रामाणिकतेची लाज नको

हरिश्चंद्र आपल्या बायकोला म्हणाला, "मला वाटत नाही की अशी रिकामी कुंडी मी माझ्या साहेबांकडे घेऊन जावी;" परंतु त्याच्या बायकोने त्याला आग्रह केला की, तुम्ही प्रामाणिकपणे आपली कुंडी जशी आहे तशीच घेऊन जायला हवी. हरिश्चंद्र मात्र अतिशय निराश झाला होता. आपल्या आयुष्यात हा मोठाच क्लेशकारक प्रसंग आला आहे असे त्याला वाटत होते; परंतु आपल्या बायकोने दिलेला सल्लाही योग्यच आहे अशी त्याची भावना होती. तो सभागृहात आपली रिकामी कुंडी घेऊन गेला.
हरिश्चंद्र जेव्हा सभेच्या ठिकाणी आला तेव्हा त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याने आपल्या सहकाऱ्यांची कामगिरी आणि त्यांच्या कुंड्यातील विविधतेने नटलेली झाडे पाहिली. खरोखरच खूप रंगरूपाची झाडे होती ती. या झाडांची आपले 'मुख्य अधिकारी' क्रमावारी तरी कशी लावणार याबद्दल हरिश्चंद्रला चिंताच वाटत होती. त्या सर्वांच्या सुंदरसुंदर रोपांच्या कुंड्यांजवळ हरिश्चंद्राने आपली रिकामी कुंडीही ठेवली. त्याचे काही सहकारी त्याला हसू लागले, तर काहींना त्याच्याबद्दल वाईटही वाटत होते.
काही वेळातच रावसाहेब सभास्थानी आले. त्यांनी आपल्या सर्व तरुण अधिकाऱ्यांना अभिवादन केले. हरिश्चंद्र मात्र जरा शरमेनेच मागे उभा राहिला होता. सर्व कुंड्या बघून रावसाहेबांना आश्चर्यच वाटले. ते म्हणाले, "माझ्या मित्रांनो किती छान! आपण फारच सुरेख रोपे, झाडे आणि फुलेही निर्माण केली आहेत. आजच तुमच्यापैकी एकाची नियुक्ती मी माझा वारसदार म्हणून करणार आहे. अचानक त्यांनी आपली नजर पाठीमागे उभ्या असणाऱ्या हरिश्चंद्राकडे वळवली. आपल्या अर्थविभागाच्या प्रमुखाला सांगून मागे उभ्या असणाऱ्या हरिश्चंद्राला पुढे घेऊन येण्याची त्यांनी आज्ञा केली. हरिश्चंद्र मात्र खूपच घाबरला होता. त्याच्या मनात आले की, मी अपयशी ठरलो आहे. आज आपले मुख्य कार्यकारी अधिकारी नक्कीच आपल्याला कामावरून काढून टाकणार! जेव्हा

हरिश्चंद्र पुढे आला तेव्हा त्यांनी त्याला विचारले की, ‘‘बाबारे, काय झाले तुझ्या रोपाचे?’’ त्यांनतर मात्र घाबरत हरिश्चंद्राने घडलेली सर्व हकिगत त्यांना सांगितली. मुख्य अधिकाऱ्याने हरिश्चंद्राखेरीज इतर सर्वांना खाली बसायला सांगितले. त्यांनी पुन्हा एकदा हरिश्चंद्राकडे नजर टाकली आणि इतर सर्व तरुणांकडे बघत त्यांनी हरिश्चंद्राच्या पाठीवर हात ठेवीत जाहीर केले की, ‘‘हा हरिश्चंद्र आजपासून तुम्हा सर्वांचा ‘मुख्य कार्यकारी अधिकारी’ आणि माझा वारसदार झाला आहे.’’

सत्यवादी हरिश्चंद्र

हरिश्चंद्र मात्र गोंधळला. आपण काय ऐकतो आहोत यावर त्याचा विश्वासच बसेना. आपण एखादे स्वप्न तर पाहत नाही ना? क्षणभर त्याला असेच वाटले. त्याचा या निकालावर विश्वासच बसत नव्हता; कारण त्याच्या कुंडीतले ‘बी’ अंकुरलेच नव्हते. सर्वांनी एकच प्रतिक्रिया व्यक्त केली, ‘‘सर आपण आपला वारसदार कशाप्रकारे निवडलात?’’ यावर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले, ‘‘आज बरोबर एक वर्ष झाले. याच दिवशी, याच सभागृहात मी आपल्या प्रत्येकाला एक-एक खास ‘बी’ दिले होते. मी आपल्याला सांगितले होते की, हे ‘बी’ घ्या, ते लावा, त्याला दररोज पाणी घाला आणि बरोबर एका वर्षाने ते परत माझ्याकडे घेऊन या; परंतु मी आपल्या सर्वांना पाण्यात उकळून वाळवलेल्या बिया दिल्या होत्या. त्या सर्व बिया मृत होत्या. त्यांच्यातून रोप अंकुरणे केवळ अशक्यच होते.

एक हरिश्चंद्र सोडला तर आपण सर्वांनी मी दिलेल्या बियांऐवजी दुसरे ‘बी’ लावले. हरिश्चंद्र हा एकटाच असा अधिकारी ठरला की, त्याच्याजवळ धैर्य आणि प्रामाणिकपणा आहे. त्यामुळेच मी दिलेले ‘बी’ लावलेली रिकामी कुंडी त्याने आपणा सर्वांच्या पुढे ठेवली. म्हणूनच तो माझा वारसदार आणि तुम्हा सर्वांचा नवा ‘मुख्य कार्यकारी अधिकारी’ म्हणून निवडला गेला आहे.

अर्थात आपण जे काही पेरतो ते पेरताना आपण त्यावेळी सजग राहायला हवे. बहुतेकवेळा आपण पेरणी करताना बेसावध असतो आणि जेव्हा त्याला फळ येते तेव्हा मात्र खडबडून जागे होतो; कारण मिळालेली फळे दु:खद वाटतात आणि त्यामुळेच ती आपल्याला नको असतात. निसर्गाचा असा अटळ नियम आहे की, आपण जे पेरतो तेच उगवते. आपण जर कडुनिंबाच्या बिया पेरल्या तर त्याला कडूच फळे येणार; परंतु आपण जर ऊस लावला तर गोड रस देणारा ऊसच निसर्ग आपल्याला देइल. कडुनिंबाची बी लावून त्याला सुमधुर आंबे यावेत अशी अपेक्षा केली, तर जगातील कोणतीही शक्ती किंवा प्रत्यक्ष परमेश्वरदेखील असे घडवून आणू शकणार नाही. हा निसर्गनियम नीट समजावून घेऊन आपण आपल्या आयुष्याची उभारणी केली पाहिजे. आपण जसे पेरू तशीच फळे आपल्याला मिळतील. हे आपण सदैव लक्षात ठेवले पाहिजे.

कुऱ्हाडीला

धार लावा

आज आपण जी नवीन माहिती शिकतो ती काही दिवसांनी नक्कीच जुनी होणारी असते. त्यामुळे आपण सतत जागरूक राहून स्वत:वर नवनवीन माहितीचे संस्करण स्वत:च करायला हवे. आपल्याजवळ जे ज्ञान आहे, त्याला सदैव नित्यनूतन ठेवणे म्हणजेच आपल्या बुद्धिरूपी कुऱ्हाडीला नवीन ज्ञानाची धार लावणे होय. वेळोवेळी नवनवीन साहित्याचे वाचन, मनन केल्याने मन व बुद्धी या दोन्हींचा विकास साधून आपण सदैव अद्ययावत राहू शकतो. हाच अद्ययावतपणा आपल्या जीवनविकासात साह्यभूत ठरू शकतो.

एका गावात एक अतिशय बलवान लाकूडतोड्या राहत होता. गावाच्या जवळील जंगलात एक नवीनच कंपनी सुरू झाली होती. ही कंपनी लाकडांचा व्यापार करीत असे. लाकूडतोड्याने कंपनीत चौकशी केली आणि त्याला त्या कंपनीत नोकरीही मिळाली. कंपनीत कामासाठी मिळणारा पगारही चांगला होता. भरपूर काम करायचे आणि भरपूर पैसा मिळवायचा, असा निश्चय करून लाकूडतोड्याने उत्साहाने कामास सुरुवात केली. त्याच्या अधिकाऱ्याने त्याला उत्तम कुऱ्हाड दिली आणि जंगलातील त्याच्या कामाची जागाही दाखवली.

पहिल्याच दिवशी लाकूडतोड्याने18झाडे तोडली. त्याच्या अधिकाऱ्यालाही आनंद झाला. त्याने लाकुडतोड्याचे अभिनंदन केले आणि असेच काम नेहमी करीत राहा अशी अपेक्षाही व्यक्त केली.

साहेबांच्या प्रशंसेने लाकूडतोड्या अधिक उत्साहित झाला. दुसऱ्या दिवशी त्याने अधिक चांगले काम करण्याचा प्रयत्न केला. अधिक मेहनत घेतली; पण तरीही तो फक्त 15च झाडे तोडू शकला. तिसऱ्या दिवशी त्याने त्यापेक्षा अधिक मेहनत घेतली; परंतु तो फक्त 10च झाडे तोडू शकला. दिवसेंदिवस झाडे तोडण्याची संख्या कमी-कमी होत गेली. आपली ताकतच दिवसेंदिवस कमी होत असावी असा तो मनोमन विचार करू लागला.

त्याने आपल्या साहेबांकडे जाऊन दिलगिरी व्यक्त केली. ‘‘माझं उत्पादन का कमी होत आहे हे मला कळत नाही. मी तर दररोज जास्तीतजास्त श्रम घेत असतो.’’

काही दिवसांनी मात्र साहेबांनी कामासाठी ‘बबन’ नावाच्या अजून एका लाकूडतोड्याची नियुक्ती केली. बबनही उत्साहाने कामाला लागला. पहिल्या लाकूडतोड्यापेक्षा बबनच्या कामात सातत्य टिकून होते. ही कंपनी उत्पादकतेवर जोर देणारी होती. अर्थातच ही गोष्ट कंपनीच्या अस्तित्वाकरिता आवश्यक होतीच. बबनची उत्पादकता पाहून कंपनीने थोड्याच अवधीत बबनला पगारवाढ दिली. ही बातमी ऐकून साहजिकच पहिल्या लाकूडतोड्यास राग आला. त्याने याबद्दल आपल्या साहेबांकडे निषेध नोंदविला. त्यावर साहेबांनी त्याचा खुलासा केला की, आपली कंपनी वैयक्तिक

उत्पादकतेवर जोर देते. तू आमचा जुना कामगार आहेस; परंतु तुझी उत्पादकता बबनपेक्षा बरीच कमी आहे. म्हणून आम्ही पगारवाढीसाठी तुझा विचार करू शकत नाही. यावर तो लाकूडतोड्या म्हणाला, "साहेब! मी अतिशय प्रामाणिकपणे काम करतो. कोणत्याही प्रकारची टाळाटाळ न करता सतत काम करीत असतो. तरीही मी आहे त्यापेक्षा जास्त उत्पादन करू शकत नाही." यावर साहेब म्हणाले, "असे असेल तर तू तुझाच सहकारी मित्र बबन याचा सल्ला घेणे योग्य ठरेल."

तो लाकूडतोड्या बबनकडे गेला आणि उत्पादकता वाढविण्यासाठी तू काय करतोस, याबद्दल त्याचा सल्ला विचारला. त्यावर बबन म्हणाला, "दोन झाडे कापल्यावर मी थोडी विश्रांती घेतो आणि या वेळात मी माझ्या कुऱ्हाडीला धारही लावतो. तू तुझ्या कुऱ्हाडीची धार कधी लावली होतीस हे तुझ्या लक्षात तरी आहे का?" यावर लाकूडतोड्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडतो. नंतर थोड्याच दिवसात त्यालाही हवी असणारी पगारवाढ मिळाली, हे वेगळे सांगायला नको! कारण आतापर्यंत या लाकूडतोड्यास वाटत होते की, आपण आपल्या कामातच इतके व्यग्र आहोत की, कुऱ्हाडीला धार लावायला कोठून वेळ काढणार?

स्वत:चे ज्ञान अद्ययावत ठेवा

आपलेही आयुष्य असेच नाही का? आपण बराच वेळ आपल्या कामात इतके व्यग्र असतो, की बुद्धिरूपी कुऱ्हाडीला धार लावायला, थोडा वेळ द्यायला हवा हेच आपण विसरून जातो.

आधुनिक काळात आपण अतिशय व्यग्र झालो आहोत आणि तितकेच दु:खी आणि असमाधानीही. असे का बरे होते आहे? चुणचुणीत आणि तल्लख कसे राहायचे हेच आपण विसरलो आहोत. अर्थात कामात सतत व्यग्र राहणे आणि कष्ट करणे यात काहीही वावगे नाही; परंतु याचा अर्थ असा नाही की, आयुष्यातील सर्वांत महत्त्वाच्या गोष्टींकडे संपूर्णत: दुर्लक्ष करायचे. जसे की- आपले वैयक्तिक आयुष्य, दैनंदिन आणि प्रासंगिक वाचन, विश्रांती, हवा पालट, सहली, मौज-मजा, ध्यान-धारणा या गोष्टींसाठी वेळ देणे; तसेच नवनवीन गोष्टी शिकून स्वत:चा विकास साधणे. या माध्यमातून आपण बुद्धिरूपी कुऱ्हाडीला सतत धार लावली नाही, तर आपण निस्तेज बनू शकतो. आपली कार्यक्षमता कमी होऊ शकते. तेव्हा आतापासूनच आपण आपल्या कुऱ्हाडीला नियमितपणे धार लावण्याची महत्त्वाची सवय लावायला हवी. आपण आपली कार्यक्षमता वाढविणाऱ्या विविध गोष्टींबद्दल विचार करून आपल्या कामात सुधारणा व उत्तम जीवनमूल्यांचे संवर्धनही करायला हवे.

प्रयत्नांती परमेश्वर

संधी आणि प्रयत्न यांचा जेव्हा समन्वय होतो तेव्हाच आपल्याला नशिबाची साथ मिळते. प्रयत्न आणि तयारी नसेल तर नशीब कुचकामी ठरते. हातात आलेल्या संधीला योग्य तो प्रतिसाद देऊन त्या संधीचं सोनं करता आलं पाहिजे. प्रयत्नांची कास धरून ईश्वरावर श्रद्धा ठेवली पाहिजे. यामुळेच तुम्ही ध्येय गाठू शकाल आणि यशस्वीही व्हाल. स्वत: मात्र कोणतेही प्रयत्न न करता देवावर किंवा नशिबावर अवलंबून राहणे म्हणजे त्याला अविचारीपणाचा कळसच म्हणावा लागेल.

एका गावातील नदीला पावसाळ्यात खूप पूर आला होता. सर्वजण गाव सोडून सुरक्षित स्थळी जात होते. त्याला सुखदेव मात्र अपवाद होता. तो म्हणाला, ‘‘माझा देव मला वाचवेल असा माझा विश्वास आहे.’’ पाण्याची पातळी वाढल्यावर एक माणूस जीप घेऊन त्याला वाचविण्यासाठी आला. त्याला नकार देत तो म्हणाला, ‘‘माझा देव मला वाचवेल असा माझा विश्वास आहे.’’ पाण्याची पातळी वाढतच होती, पाण्याच्या भीतीने सुखदेव दुसऱ्या मजल्यावर गेला. एक माणूस होडी घेऊन त्याच्या मदतीला आला, तेव्हाही सुखदेव त्याला म्हणाला, ‘‘माझा देव मला वाचवेल असा माझा विश्वास आहे.’’ पाण्याची पातळी तशीच वाढत राहिली आणि सुखदेव छतावर चढला. त्याला वाचविण्यासाठी एक हेलिकॉप्टर आले; परंतु सुखदेवने आपला हेका काही सोडला नाही. तो हेलिकॉप्टरमधल्या माणसाला म्हणाला, ‘‘माझा देव मला वाचवेल असा माझा विश्वास आहे.’’ शेवटी तो पाण्यात बुडाला. सुखदेव जेव्हा देवाच्या घरी पोहोचला तेव्हा देवाला तो रागाने म्हणाला, ‘‘माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास होता; परंतु तू मात्र माझ्या विश्वासाला तडा जाऊ दिलास आणि माझ्या प्रार्थनेकडे संपूर्ण दुर्लक्ष करून मला बुडवून टाकलं. तू असं का केलंस?’’ देवाने मोठ्या प्रेमाने उत्तर दिलं, ‘‘अरे बाळा! तुझ्यासाठी जीप, होडी, हेलिकॉप्टर कोणी पाठवलं होतं असं तुला वाटतंय?’’

‘‘तुझा माझ्यावर विश्वास होता म्हणून त्यांच्यारूपाने मीच तुझ्याकडे आलो होतो; पण तू तुझा हेका सोडतच नव्हतास. त्यामुळे मी तरी काय करणार? आणि बाळा, माझ्यावर विश्वास ठेवून तू काहीही प्रयत्न न करता आपल्यासाठी कुणीतरी धडपड करेल, अशी अपेक्षा कशी करू शकतोस? तुला देवावरील श्रद्धा आणि स्वत:चे प्रयत्न यांच्यावर विश्वास ठेवूनच मार्गक्रमण करावं लागेल.’’

संधी आणि प्रयत्न यांचा जेव्हा समन्वय होतो तेव्हाच आपल्याला नशिबाची साथ मिळते. प्रयत्न आणि तयारी नसेल तर नशीब कुचकामी ठरते. हातात आलेल्या संधीचं सोनं करता आलं पाहिजे, प्रयत्नाची कास धरून ईश्वरावर श्रद्धा ठेवली पाहिजे. यामुळेच तुम्ही ध्येय गाठू शकाल आणि यशस्वीही व्हाल.

निःस्वार्थ प्रेम

या जगात ज्या व्यक्ती स्वत:च्या स्वार्थासाठी जगतात त्या सदैव आनंदी असतातच असे नाही. ज्या व्यक्ती इतरांवर प्रेम करतात आणि त्यांच्या आनंदासाठी आपल्या सर्वस्वाचा आनंदाने त्याग करतात त्याच व्यक्ती आपले संपूर्ण आयुष्य आनंदी करतात. आयुष्य हे क्षणभंगुर आहे. आयुष्यातील डामडौल, दिमाख किती क्षणिक असतो नाही! परंतु इतरांच्या दु:खाने ज्यांचे हृदय व्याकुळ होते आणि त्यांच्या यातना कमी करण्यासाठी जे आपल्या सुखाची आहुती द्यायला आनंदाने तयार होतात तेच खऱ्या अर्थाने जीवन जगतात. इतरांच्या दु:खाचा प्रामाणिक स्पर्श जेव्हा आपल्या हृदयाला होतो तेव्हा आपल्या हृदयातील 'मी'पण संपते, स्वार्थ संपतो.

"किती वेळ वर्तमानपत्रात डोकं खुपसून बसणार आहात? कृपया जरा इकडे येऊन आपल्या लाडक्या लेकीला जेवण करून घ्यायला सांगणार आहात का?" बायको ओरडली. मी पेपर फेकून जेवणाच्या खोलीत धावलो. माझी एकुलती एक कन्या खूपच घाबरलेली दिसली. तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. दहिभाताने भरलेली एक वाटी तिच्यापुढे ठेवलेली होती. सिंधू ही एक चांगली आणि तिच्या वयाच्या मानाने अतिशय तल्लख मुलगी होती. तिने वयाचे आठवे वर्ष नुकतेच पूर्ण केले होते. तिला दहीभात मात्र अजिबात आवडत नव्हता.

अनपेक्षित मागणी

मी म्हणालो, "सिंधू बेटा! थोडा दहिभात खाऊन घे ना? आपल्या लाडक्या बाबासाठी खाणार ना हा दहीभात." "बरं बाबा, तुमच्यासाठी थोडाच काय; पण संपूर्ण वाटीभर दहिभात खाईन." सिंधू जरा अडखळतच म्हणाली. "बाबा; पण मी तुमच्याकडून जे मागेन ते तुम्ही मला द्याल का?" "हो खरंच बेटा, तू काय मागशील ते देईन तुला, तसं मी तुला वचन देतो." हळूहळू; परंतु अनिच्छेनेच सिंधूने संपूर्ण दहिभात संपवला. भात घशाखाली घालताना होणाऱ्या यातना तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या. सिंधूला न आवडणाऱ्या गोष्टी खायची तिच्यावर बळजबरी का करता? म्हणून मी मनातून माझ्या बायकोवर आणि आईवरही जाम भडकलो होतो. भात खाऊन संपल्यावर सिंधू माझ्याकडे आली. तिच्या डोळ्यात अपेक्षेची चमक जाणवत होती. आम्हा सर्वांचंच लक्ष तिच्याकडे होतं. "बाबा या रविवारी मला माझ्या डोक्यावरचे सगळे केस काढून टाकायचे आहेत!" अशी ठाम मागणी सिंधूने केली. माझी बायको जवळ जवळ किंचाळलीच. मुलीने आपल्या डोक्यावरचे सगळे केस साफ करायचे! चकोर करायचे! "अशक्य! आपल्या कुटुंबात आजपर्यंत कोणीही असे केलेले नाही," माझी आई रागातच म्हणाली.

"सिंधू! बेटा तू माझ्याकडून दुसरे काहीतरी का मागून घेत नाहीस? आम्हाला सर्वांना तुझे असे डोके बघून अतिशय यातना होतील गं!" "नाही बाबा! मला तुमच्याकडून दुसरे काहीही नको." निर्वाणीच्या सुरात सिंधूने सांगितले. "बाबा, तुम्ही प्रत्यक्ष बघितलेच आहे, वाटीभर दहीभात खाणे किती अवघड गेले. सिंधूच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. आणि तुम्ही मला मी जे मागेल ते द्यायचे कबूलही केले होते!"

आता मात्र दिलेले वचन निभावण्याची वेळ माझ्यावर आली होती. "तू वेडी तर झालेली

नाहीस ना?'' माझी आई आणि बायको एका सुरात गरजल्या. आता आपण आपला शब्द मागे घेतला तर सिंधूचा वचनांवरचा विश्वास कायमचा उडून जाईल असे मला वाटले आणि मी अगदी आश्वासक आणि धीरगंभीर आवाजात म्हणालो, ''सिंधू बेटा तुझी इच्छा पूर्ण होईल.''

इतरांच्या दुःखात आपला सहभाग

सोमवारी सकाळी मी सिंधूला शाळेत सोडायला गेलो होतो. केसविरहित डोक्याने सिंधूला वर्गात जाताना पाहणं हे जरा अद्भुतच होतं. तिने मागे वळून बघितलं आणि मला 'बाय' केलं. मीदेखील हसतच तिला निरोप दिला. तेवढ्यात एका कारमधून एक मुलगा खाली उतरला. तो जोरात ओरडला, ''सिंधू कृपया माझ्यासाठी थांब.'' त्या मुलाच्या डोक्यावरही केस नसल्याचं माझ्या पटकन डोळ्यात भरलं. कदाचित नवीन फॅशन येऊ घातली असेल असे मला वाटले. ''महाशय आपली सिंधू म्हणजे एक महान मुलगी आहे हं!'' मला आपली ओळख न करून देता त्या मुलाबरोबर कारमधून उतरणाऱ्या महिला म्हणाल्या, ''तुमच्या मुलीबरोबर जो चालतो आहे ना तो माझा मुलगा आहे, त्याचे नाव हरीष आहे. त्याला 'लुकेमिया'ने पछाडले आहे'' गळ्यातला हुंदका आवरत बाई म्हणाल्या. ''हरीष मागील संपूर्ण महिना शाळेत येऊ शकला नाही, केमोथेरपीचा परिणाम म्हणून त्याचे सर्व केस गळून गेले आहेत. त्यामुळेच त्याने शाळेत यायला चक्क नकार दिला होता. नकळत मुलांकडून होणाऱ्या चेष्टेला तो घाबरत होता. मुले लहान असली तरी अशी चेष्टा म्हणजे एक दुष्टपणाच वाटतो ना!
मागच्या आठवड्यात सिंधू, सुजाता आमच्या घरी हरीषला भेटायला आल्या होत्या, तेव्हा सिंधू अतिशय प्रेमाने हरीषला म्हणाली होती, 'तू अशा चेष्टेला घाबरू नकोस. मी त्याची काळजी घेईल; पण तू शाळेत यायला सुरुवात कर. मी सोमवारी तुझी वाट बघते हं!' परंतु ती अशा तऱ्हेने स्वतःचे सुंदर केस कापून शाळेत येईल याची मी कल्पनादेखील केली नव्हती. माझ्या मुलासाठी केवढा मोठा त्याग या चिमुरडीने केला आहे.'' बाईंना हुंदका आवरणं कठीण झाले होते. सिंधूबद्दल वाटणाऱ्या प्रेमामुळे त्यांचा ऊर भरून आला होता. ''महोदय, सिंधूसारख्या मुलीला जन्म देणाऱ्या तुम्हा आई-वडिलांना परमेश्वर सुखी ठेवो. यापेक्षा वेगळे शब्दच मला सुचत नाहीत.'' मी तर स्तिमित झालो आणि मला चक्क रडूच कोसळले.
या लहान मुलांच्या बाबतीत घडलेला हा प्रसंग बरेच काही शिकवून जातो. आपला मित्र शाळेत यावा म्हणून सिंधूनेही त्याच्यासारखे केस कापणे ही कृती म्हणजे इतरांच्या दुःखात आपण सहभागी व्हायला हवे, याचे प्रतीकात्मक उदाहरण आहे.

विविधरंगी आयुष्य

मानवाचे आयुष्य हे विविधरंगी आहे. मानवी आयुष्यात केवळ एकाच गोष्टीला अवास्तव महत्त्व देऊन आयुष्य परिपूर्ण होत नाही. आपल्या आयुष्यात रंग भरण्यासाठी निसर्ग, कुटुंब, मित्रपरिवार, आपले आरोग्य या सगळ्याच गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. या छोट्या वाटणाऱ्या गोष्टी आपल्याला खूप काही देऊन जातात. या सर्वच गोष्टींना जो योग्य न्याय देईल त्यालाच आपले आयुष्य समृद्ध करण्याची कला अवगत झाली असे म्हणता येईल.

दर्शनशास्त्राचे प्राध्यापक वर्गात आले आणि ते विद्यार्थ्यांना म्हणाले, आज मी तुम्हाला "जीवनातील एक उत्कृष्ट धडा शिकविणार आहे. त्यांनी आपल्याबरोबर एक काचेची बरणी आणली होती. ती त्यांनी विद्यार्थ्यांच्या समोर टेबलावर ठेवली. त्या बरणीत त्यांनी टेबल टेनिसचे चेंडू टाकायला सुरुवात केली. त्या बरणीत इतके चेंडू टाकले की, त्यापुढे एकही चेंडू बरणीत बसणे शक्य नव्हते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न केला, "बरणी पूर्ण भरली आहे का?" विद्यार्थ्यांनी मोठ्या आवाजात प्रतिसाद दिला, "होय सर, बरणी पूर्ण भरली आहे."

त्यानंतर प्राध्यापकांनी बरणीत छोटे छोटे दगड टाकायला सुरुवात केली. बरणी थोडी हलविली की, जिकडे जागा मिळेल तिकडे ते दगड जात होते. बरेच दगड बरणीत बसल्यावर प्राध्यापकांनी विचारले, "आता बरणी भरली आहे का?" विद्यार्थ्यांनी पुन्हा हो! हो! म्हणून उत्तर दिले. प्राध्यापकांनी नंतर आपल्या जवळची वाळूची पिशवी उघडली आणि त्यांनी ती वाळू हळूहळू बरणीत भरायला सुरुवात केली. जिथे जागा मिळेल तिथे बारीक वाळूचे कण जात होते. आता मात्र विद्यार्थ्यांना आपल्या अज्ञानाची जाणीव झाली आणि त्यांचंच त्यांना हसू आलं. परत प्राध्यापकांनी विचारले, "आता तरी ही बरणी पूर्ण भरली आहे का?" सर्वांनी एक सुरात दाद दिली, "हो! हो! आता तर नक्कीच ही बरणी पूर्ण भरली आहे."

यानंतर प्राध्यापकांनी आपल्या टेबलखालून चहाने भरलेले दोन कप उचलले आणि ते बरणीत रिकामे केले. त्या कपातील चहा बरणीत जिरून गेला.

त्यानंतर प्राध्यापकांनी बरणी रिकामी केली. ती परत वाळूने पूर्ण भरली. त्यानंतर त्या बरणीत टेनिसचे चेंडू आणि खडे भरण्याचा प्रयत्न केला. आता मात्र या दोन्हीही गोष्टी बरणीत जाऊ शकत नव्हत्या.

असे बनवा परिपूर्ण आयुष्य

प्राध्यापक महाशयांनी आपल्या धीरगंभीर आवाजात विद्यार्थ्यांना या प्रयोगातील निष्कर्ष समजावून सांगायला सुरुवात केली, "या काचेच्या बरणीला आपण आपले जीवन समजा. टेबल टेनिसचे चेंडू म्हणजे आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टी आहेत असे समजा. जसे की परमेश्वर, कुटुंब, मित्रपरिवार, आपले आरोग्य, छंद, इत्यादी. आपली नोकरी, गाडी, मोठं घर, यासारख्या गोष्टी या छोटचा-छोटचा दगडांसारख्या आहेत आणि रुसवा, फुगवा, मतभेद हे या बारीक वाळू सारखे आहेत. जर आपण या छोटचा-छोटचा गोष्टींना अवास्तव महत्त्व देऊन त्यामागे धावत राहिलो आणि आपली सर्व

क्षमता त्यामध्ये खर्च केली, तर मोठ्या गोष्टींसाठी आपल्याकडे जागाच शिल्लक राहणार नाही. निखळ आनंदासाठी कशाची गरज आहे याबद्दलचा निर्णय आपल्यालाच घ्यायला हवा.

एका विद्यार्थ्याने प्रश्न केला, सर! या चहाच्या कपाबद्दल तर आपण काहीच सांगितलं नाही. प्राध्यापक हसून म्हणाले, ''मी तोच विचार करीत होतो की, अजून हा प्रश्न कोणी कसा विचारला नाही? त्याचं उत्तर असं आहे की, जीवन आपल्याला कितीही परिपूर्ण वाटलं, संतोषमय वाटलं तरी आपल्या जिवलग मित्रांबरोबर दोन कप चहा पिण्यासाठी जागा ठेवणं नेहमीच आवश्यक आहे. त्याशिवाय आयुष्याला पूर्णत्व नाही. हे मात्र निश्चित. आयुष्य परिपूर्ण असणे म्हणजे माणुसकीकडे दुर्लक्ष करणे नव्हे.''

मानवी आयुष्यात केवळ एकाच गोष्टीला अवास्तव महत्त्व देऊन आयुष्य परिपूर्ण होत नाही. या आयुष्यात रंग भरण्यासाठी निसर्ग, कुटुंब, मित्रपरिवार, आपले आरोग्य या सगळ्याच गोष्टी फार महत्त्वाच्या ठरतात. या आपल्याला छोट्या वाटणाऱ्या गोष्टी खूप काही देऊन जातात. या सर्वच गोष्टींना जो योग्य न्याय देईल त्यालाच आपले आयुष्य समृद्ध करण्याची कला अवगत झाली असे समजावे.

समस्या सुटते ती युक्तीनेच!

प्रत्येक व्यक्तीला विचार करण्याची एक निसर्गदत्त शक्ती मिळाली आहे. त्या विचारांच्या साहाय्याने कोणत्याही कठीण परिस्थितीत मार्ग शोधायचे असतात; कारण समस्येला भिऊन समस्या सुटत नाहीत. त्या युक्तीनेच सोडवाव्या लागतात. समस्या कितीही गंभीर असली, तरी त्यापासून परावृत्त होणे हाच त्यावरील उपाय आहे असे कुणीही समजू नये. कठोर निश्चय आणि आत्मविश्वासानेच आपण कोणत्याही समस्येचे निवारण करू शकतो; तसेच ज्ञानाला युक्तीची जोड हवीच!

अशोक तसा हुशार मुलगा. कॉलेजला सुट्टी असली की, हा कधीही घरी स्वस्थ बसणार नाही. सुट्टीचा उपयोग तो डोंगरमाथे किंवा गर्द जंगले धुंडाळण्यात घालवीत असे. असाच एकदा तो जंगलातून हिंडत असताना त्याला फळांनी लगडलेले एक झाड दिसले. त्या फळांचा सुगंध आसमंतात दरवळत होता. त्याने अशोकची भूक अधिकच उत्तेजित झाली. तो चटकन झाडावर चढला आणि त्याने काही फळे तोडून खाल्ली. वरती बघितल्यावर त्याच्या लक्षात आले की, वरच्या फांदीवर अजून चांगली पिकलेली फळे दिसत आहेत. त्याला मोह आवरेना. तो वरती चढला. तेव्हा ती वरची फांदी त्याचा भार पेलू शकली नाही आणि ती फांदी तुटायला लागली.

अशोकने प्रसंगावधान राखून कशीबशी दुसरी फांदी पकडली आणि त्या फांदीला लटकला. तो खूप घाबरला होता; कारण आता काय करायचे हेच त्याला सुचत नव्हते. जेव्हा त्याने खाली बघितले तेव्हा तर त्याने डोळेच बंद केले. आपला प्राण वाचविण्यासाठी कुणीतरी आपल्याला मदत करेल या आशेने तो जोरजोरात ओरडू लागला. त्याच्या हाताला घाम येऊ लागला. त्यामुळे आपल्या हातांची पकड सैल होईल आणि आपण खाली पडू अशी भीती त्याला वाटू लागली.

एक वृद्ध गृहस्थ तेथून जात होते. अशोकच्या आवाजाने त्यांचे लक्ष झाडाकडे गेले. तेव्हा झाडाला एक मुलगा लटकला आहे असे त्यांच्या लक्षात आले; पण त्याला वाचवण्यासाठी काय करावे हे त्यांच्या लक्षात येईना. थोडा विचार करून ते पटकन खाली वाकले. त्यांनी एक दगड उचलला आणि तो अशोकच्या अंगावर भिरकावला. अशोक दु:खाने कळवळला. खाली बघतो तो त्याला हे वृद्ध गृहस्थ दिसले. तो रागाने त्यांना म्हणाला, ‘‘इथे मी मरणाच्या दारात आहे, मदतीसाठी आकांत करतो आहे आणि तुम्ही मात्र मला मदत करण्याच्याऐवजी निर्दयीपणे दगड मारता आहात? काय म्हणावे? काही कळतं का तुम्हाला?’’ त्या वृद्धाने अशोकच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. हातात दुसरा दगड घेतला आणि परत अशोकच्या अंगावर फेकला. आता मात्र अशोक भयंकर चिडला. त्याने खूप प्रयत्न करून स्वत:ला वर ढकलले आणि कशीबशी वरची एक फांदी पकडली. त्याचबरोबर त्याने त्या वृद्ध गृहस्थाला तंबी दिली की, मी खाली आल्यावर तुमच्याकडे बघतोच! त्यानंतर परत त्या वृद्ध गृहस्थाने अशोककडे पूर्ण दुर्लक्ष करीत तिसरा दगड भिरकावला. याचा परिणाम असा झाला की, अशोकचा राग आणखी वाढला. त्याने अतिशय त्वेषाने अजून वरची फांदी पकडली. आता त्याची भीती पार पळून गेली होती,

त्याला नव्याने हुरूप आला होता. तो या फांदीचा आधार घेत पटकन खाली उतरला. खाली आल्यावर अशोकने त्या वृद्धाला गाठले. तो ओरडून त्यांना म्हणाला, “मी खूप घाबरलो होतो आणि मृत्यूच्या भीतीने तुम्हाला मदतीसाठी विनंती करीत होतो. मदत करण्याऐवजी, तुम्ही मात्र मला दगड मारीत होतात? काय म्हणावे तुम्हाला?”

प्रतिकूल परिस्थितीला विचारपूर्वक हाताळा

वृद्ध गृहस्थ हसतच मोठ्या प्रेमाने अशोकला म्हणाले “अरे बेटा! तुझ्या लक्षात आले नाही, मी तर तुला शक्य होती तेवढी मदतच करीत होतो.” त्यांच्या या विधानामुळे अशोक मात्र बुचकळ्यात पडला. त्यानंतर समजावणीच्या सुरात वृद्ध गृहस्थ अशोकला म्हणाले,“अरे, मी जेव्हा तुला पहिल्यांदा बघितले तेव्हा तू तर भीतीने गोठलाच होतास. तुझे डोळेदेखील तू बंद करून घेतले होतेस. भीतीने तुझी बुद्धी काहीच काम करीत नव्हती. मी जेव्हा तुझ्या अंगावर दगड फेकत होतो तेव्हाच तुझी भीती कमी होत होती. तू जरी माझ्यावर चिडत होतास तरी तुझा मेंदू कामाला लागलेला होता. तू मला शिक्षा कशी करायची याचा विचार करायला लागलास आणि जेव्हा तू विचार करायला लागलास तेव्हाच आपली सर्व शक्ती एकवटून स्वत:लाच झटके देत वरची फांदी पकडण्याचा तू प्रयत्न केलास आणि धीर एकवटून आणखी वरची फांदी पकडून खाली उतरलास. सुरुवातीला, ‘आपण स्वत:ला वाचवू शकू का?’ याचा आत्मविश्वास तुझ्याकडे अजिबात नव्हता. कसा वाचला असतास तू? खाली पडत असताना तुला पकडणेदेखील मला शक्य नव्हते. त्यामुळे मी फक्त तुझा गमावलेला आत्मविश्वास जागृत करण्याचा प्रयत्न करीत होतो. त्याला तू योग्य प्रतिसाद दिलास त्यामुळेच तू स्वत:ला वाचवू शकलास. माझे काम झाले, येतो मी.” असे म्हणून ते वृद्ध गृहस्थ आपल्या वाटेने चालू लागले.

थोडा विचार केल्यानंतर अशोकच्यादेखील लक्षात आले की, कोणत्याही त्रासदायक परिस्थितीत नुसतेच घाबरण्यापेक्षा जर त्या परिस्थितीतून आपली सुटका कशी करून घ्यायची याचा विचार सुरू केला, वेगवेगळे मार्ग, वेगवेगळ्या युक्त्यांचा शोध घेतला, तरच आपण कोणत्याही संकटातून सहीसलामत बाहेर पडू शकतो. जसे, सूर्यप्रकाशात बर्फ वितळून जातो तशाच आपल्या सर्व समस्या आपल्या ज्ञानप्रकाशात, आपल्या आत्मविश्वासाच्या जोरावर पार वितळून जातात.

हव्यास म्हणजे दु:खच!

वाईट आणि विकृत विचारांमुळे दु:खच वाट्याला येते. 'काही वेळेला तुम्हाला पाहिजे ते मिळणं जे पाहिजे ते न मिळण्यापेक्षाही अधिक दु:खदायक वाटू लागतं.

गरजेपेक्षा जास्त हव्यास किंवा आसक्ती करणे नेहमीच दु:खप्रद ठरते. काहीतरी बनण्याची महत्त्वाकांक्षा असावी; पण अनावश्यक गोष्टींचा हव्यास नसावा. वाढत्या हव्यासामुळे गरजा आणखी वाढतात. या गरजा क्षमतेपेक्षाही अधिक असतात. परिणामी भ्रष्टाचाराचा जन्म होतो आणि असमाधानी वृत्ती वाढू लागते.

लोभी राजा मिडास याची गोष्ट तर आपल्या सर्वांनाच माहीत असेल. मिडास राजाकडे खूप सोने होते; परंतु त्याला जितके अधिक सोने मिळायचे तेवढी त्याची सोन्याची हाव अधिकाधिक वाढत होती. त्याने आपले सर्व सोने खजिन्यात ठेवले होते. बऱ्याच वेळा विरंगुळा म्हणून तो आपल्या सोन्याच्या साठ्याकडे बघत वेळ काढीत असे. हा तर त्याचा छंदच झाला होता.

अनोखे वरदान मिळाले

मिडास राजा एकदा सकाळच्या वेळी आपल्या बागेत फिरत होता तेव्हा त्याच्यासमोर अचानक एक अपरिचित व्यक्ती प्रकटली. ती राजाला म्हणाली, “वत्सा! तुला काय हवे आहे ते माग!” राजा आश्चर्याने स्तिमित झाला. क्षणभर काय घडते आहे हेच त्याला समजेना; परंतु भानावर आल्यावर आनंदाने तो त्या अपरिचित व्यक्तीला म्हणाला, “मी ज्याला स्पर्श करेन त्याचे सोने होऊ दे.” त्या व्यक्तीने चेतावणीच्या सुरात विचारले, “नक्की तुला हेच हवं आहे ना?” राजाने होकार दिला. त्यावर ती व्यक्ती म्हणाली, “ठीक आहे, उद्या सकाळी सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबर तुला ही सिद्धी प्राप्त होईल. तू ज्या वस्तूला हात लावशील त्या सर्व सोन्याच्या होतील.” असे म्हणून ती व्यक्ती अदृश्य झाली.

राजाला मिळालेल्या या वरावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. आपण बहुधा स्वप्न पाहिले असावे असेच त्याला वाटत होते. तो अस्वस्थतेने सकाळ होण्याची वाट पाहत, बिछान्यावरच पडून होता. उठल्यावर प्रथम त्याने पलंगाला आणि नंतर आपल्या कपड्यांना स्पर्श केला. क्षणात त्यांचं सोन्यात रूपांतर झालं. त्याने खिडकीतून बाहेर पाहिले तेव्हा त्याची लाडकी मुलगी आनंदाने बागेत खेळत होती. त्याने तिला हा चमत्कार दाखवून आश्चर्यचकित करायचे ठरविले. हा चमत्कार बघून तिला आनंद होईल असे राजाला वाटले; परंतु बागेत जाण्यापूर्वी त्याला एक पुस्तक दिसलं. त्याने ते हातात घेतलं. त्या पुस्तकाला राजाच्या हाताचा स्पर्श होताच ते पुस्तकही सोन्याचं झालं. तो नाष्टा करायला गेला तेव्हा त्याने ज्या ज्या फळांना, भांड्यांना स्पर्श केला त्या सर्व वस्तू सोन्याच्या झाल्या. त्याला भूक लागली होती. तो स्वत:शीच म्हणाला, “मी काही सोने खाऊ-पिऊ शकत नाही.” या विचारात असतानाच त्याची मुलगी धावतच त्याच्या जवळ आली. त्याने तिला जवळ घेतलं तर तिचेही सोन्याच्या पुतळ्यात रूपांतर झाले. आता मात्र राजाच्या चेहऱ्यावरचा आनंद मावळला होता.

अति हव्यासाचे फळ मिळाले

राजाने मान खाली घातली आणि तो रडू लागला. राजाला वर देणारी व्यक्ती पुन्हा तेथे प्रकट झाली आणि तिने राजाला विचारले, “राजा, मिळालेल्या वरदानामुळे आता तू आनंदी आहेस ना?” त्यावर राजा म्हणाला, “आता तर मी या जगातला सर्वांत दु:खी माणूस झालो आहे.” त्यावर त्या व्यक्तीने विचारले,“राजा, तुला नक्की काय हवं आहे? अन्न, तुझी मुलगी की सोन्याचे हे गोळे? राजा क्षमा मागून म्हणाला, “मी माझं सर्व सोनं तुम्हाला देऊन टाकतो. कृपा करून तुम्ही मला माझी मुलगी जशी होती तशी परत द्या; कारण या सगळ्या सोन्यापेक्षाही माझी मुलगी मला अधिक मोलाची आहे. तिच्यापुढे या सगळ्या सोन्याची किंमत शून्य आहे.” “राजा, आता तू शहाणा झालास,” त्या व्यक्तीने राजाला दिलेला वर मागे घेतला आणि राजाला त्याची लाडकी मुलगी परत मिळाली.

‘वाईट आणि विकृत विचारांमुळे दु:खच वाटयाला येते.

‘काही वेळेला तुम्हाला पाहिजे ते मिळणं, जे पाहिजे ते न मिळण्यापेक्षाही अधिक दु:खदायक असतं.

‘मैदानावरील खेळ खेळताना गडी बदलता येतात; परंतु आयुष्याच्या खेळात मात्र खेळाडू बदलता येत नाहीत किंवा अजून एक संधी म्हणून पुन्हा चालही मिळत नाही; तसेच या गोष्टीतील मिडास राजाप्रमाणे आपली चूक दुरुस्त करून आपले भविष्य सुधारण्याची संधी प्रत्येकाला मिळेलच असेही नाही.

आपल्या आसपासच्या गोष्टींचा आताच शोध घ्या. या सगळ्या गोष्टींमध्ये आपल्याला त्यांची खरंच किती गरज आहे ते तपासा. यात आपल्याला गरज नसताना उगीचच जमविलेल्या अशा कितीतरी गोष्टी दिसतील. यातील किती वस्तू आपण आपली खरेदी करण्याची क्षमता तपासण्यासाठी किंवा उगाचच श्रीमंतीचा डौल दाखविण्यासाठी खरेदी केलेल्या आहेत?

आताच आपण केलेल्या पाहणीत अर्ध्या किंवा त्यापेक्षाही अधिक गोष्टींची आपल्याला आवश्यकता नाही. असे जर वाटत असेल तर स्वत:ला धन्यवाद द्या; कारण हा शोध आपल्याला आपलं घर एक वस्तुसंग्रहालय किंवा वस्तूंची वखार होण्यापासून नक्कीच वाचवू शकेल. यात मला दुसरा असाही फायदा दिसतो की, नको त्या गोष्टींच्या अकारण आसक्तीपासून आपल्या मनाची सुटका करून आपण त्याला शांततेकडेही वळवू शकाल. अर्थातच असा बदल घडवून आणण्यासाठी आपल्याला थोडा वेळ द्यावाच लागेल. दुर्दैवाने आपण सध्या अशा युगात राहतो आहोत की, जिथे हव्यासाचा पगडा गरजेपेक्षा जास्त प्रभावी झाला आहे. म्हणजेच हाव ही गरजेपेक्षा जास्त प्रभावी झाली आहे. वाढत्या हव्यासामुळे भ्रष्टाचार वाढतो आहे. काय हवं आणि काय नको यामधला आपला संभ्रम वाढला आहे. खरंतर याच काळात सच्चेपणाने आणि साधेपणाने राहण्याची आवश्यकता आहे.

भौतिक गोष्टींच्या हव्यासाचे प्रमुख कारण म्हणजे आपल्या आत्म्याची असंतृप्तता. अशा वस्तूंची आसक्ती म्हणजे आपल्या अंतरात्म्यातील पोकळी आहे. बाह्यगोष्टींच्या मदतीने ही पोकळी का भरून काढावी? तशी ती भरून काढण्याचा प्रयत्न केला तरी, ती अधिकाधिक वाढत जाते आणि अशा प्रकारे संपत्ती गोळा करण्याची हाव संपतच नाही.

याचा अर्थ असा होतो की, हाव ही कधीही न संपणारी गोष्ट आहे. अशा हव्यासाचे रूपांतर पुढे गरजेत केव्हा होते ते आपल्याला समजतही नाही. बऱ्याचवेळा हव्यासामुळे आपला अहंपणा वाढतो आणि आपली सदसद्विवेकबुद्धी बधिर होते. त्यामुळे अवास्तव संग्रह करण्याच्या आपल्या वृत्तीला चालनाच मिळते.

ज्वलंत इच्छा

मनाचा निश्चय केला की, व्यक्ती आपले ध्येय निश्चितपणे गाठू शकते. फक्त गरज असते ती प्रबळ इच्छाशक्तीची! जगात कोठेही असलात तरी एकदा तुमच्या मनाने ठरवले, तर तुम्ही तुमचा हेतू सहज साध्य करू शकता. यश प्राप्त करण्यासाठी यशाची तीव्र ओढ असावी लागते. हृदयापासून काही करायचे ठरवले आणि ते पूर्ण करण्याची ज्वलंत इच्छा असली, तर ठरविलेले कार्य निश्चित पूर्ण होऊ शकते. प्रबळ इच्छाशक्तीमुळे आत्मविश्वास बळावतो, निर्णयक्षमता वाढते, उत्साह निर्माण होतो; तसेच ध्येय गाठण्यासाठी गतिशीलता आणि कृतिशीलता दोन्हींमध्ये आवश्यक असणारा समन्वयही निर्माण होतो.

एकदा एका तरुणाने महान विचारवंत सॉक्रेटिस यांना विचारले, "सर, आपण आयुष्यात इतके यशस्वी झाला आहात म्हणून मी आपल्याकडे यशाचे रहस्य जाणून घेण्यासाठी आलो आहे." तरुणाची जिज्ञासा पाहून त्यांनी त्याला दुसऱ्या दिवशी गावातील नदीकाठी भेटायला बोलविले. अगोदर ठरल्याप्रमाणे ते दोघे नदीच्या काठावर भेटले. सॉक्रेटिस यांनी तरुणाला आपल्याबरोबर नदीकडे चालायला सांगितले. असे करीत करीत ते नदीच्या पात्रातून चालू लागले. खांद्यापर्यंत पाण्यात गेल्यावर सॉक्रेटिसनी अचानक त्या तरुणाचे डोके घट्ट पकडून पाण्याखाली दाबले. तरुणाने डोके वर काढण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु सॉक्रेटिसची पकड मजबूत होती. त्याच्यापुढे तरुणाचे काही चालेना. त्या तरुणाचा श्वास गुदमरून जाईपर्यंत सॉक्रेटिसनी त्याचं डोकं पाण्याखालीच दाबून धरलं. तरुणाचं डोकं जेव्हा सॉक्रेटिसनी बाहेर काढलं तेव्हा त्या तरुणाने धापा टाकीत दीर्घ श्वास घेतला. काय होत आहे हे त्याला कळतच नव्हतं. सॉक्रेटिसनी मात्र शांतपणे तरुणाला विचारलं, "तू पाण्याखाली असताना तुला सर्वांत जास्त गरज कशाची होती? तरुणाने उत्तर दिलं, "हवेची." त्यावर सॉक्रेटिस म्हणाले, "हेच तर यशाचं रहस्य आहे. तुला पाण्यात असताना जेवढ्या तीव्रतेने हवेची गरज भासत होती तेवढ्याच तीव्रतेने यशाची ओढ लागेल, तेव्हाच तुला यश मिळेल. काहीतरी भव्यदिव्य साध्य करायचं आहे ना? मग तुझ्या मनात ज्वलंत इच्छा उत्पन्न व्हायला हवी." ज्वलंत इच्छा असली म्हणजे माणूस काय करू शकतो त्याचा प्रत्यय आपल्याला पुढील गोष्टीतून येईलच.

इच्छा तेथे मार्ग

नाशिक जिल्ह्यातील एका छोटयाशा गावी एक वृद्ध शेतकरी राहत होता. शेतकऱ्याला आपलं शेत नांगरून भुईमुगाचं पीक घेण्याची खूप इच्छा होती; परंतु शेत नांगरून त्यात लागवड करणं हे त्याच्या वयाचा विचार करता त्याच्यासाठी खूप अवघड काम होतं. त्याच्या एकुलत्या एक मुलाने त्याला मदत केली असती; परंतु दुर्दैवानं तो तुरुंगात होता. एके दिवशी तो वृद्ध शेतकरी आपल्या मुलाला पत्र लिहून सर्व परिस्थिती कथन करतो.

"मला खूप वाईट वाटत आहे की, मी या मोसमात आपल्या शेतात काहीही पिकावू शकणार नाही. यामुळे तुझ्या आईच्या आत्म्यास किती वाईट वाटेल. तिला पेरणीचा मोसम खूपच आवडत असे. ती गेल्यावर पहिल्याच मोसमात ही वेळ माझ्यावर आली यामुळे मला अधिकच वेदना होताहेत. माझ्या वयामुळे आता मला शेतीचे कष्ट सहन

होणार नाहीत. तू घरी असतास तर माझा हा सर्व त्रास दूर झाला असता. तू तुरुंगात गेला नसतास तर तू ही शेती नक्कीच केली असती याची मला खात्री आहे; कारण आईवर तर तुझे खूपच प्रेम होते. तिची इच्छा तू अपुरी ठेवली नसतीस.''

काही दिवसांतच शेतकऱ्याला पोस्टातून एक तार येते. ''बाबा, देवाची शपथ आहे, आपण शेत खणण्याचे कष्ट अजिबात करू नका; कारण शेतात मी काही बंदुका पुरून ठेवल्या आहेत.''

दुसऱ्या दिवशी पोलिसांची एक मोठी फौज त्याच्या शेतावर दाखल होते आणि ते सगळं शेत खणून काढतात; परंतु त्यांना कोठेही पुरलेल्या बंदुका मिळत नाहीत. म्हातारा शेतकरी जरा बुचकळ्यात पडतो आणि मुलाला दुसरं पत्र पाठवतो. त्यात लिहितो, ''पोलिसांनी आपलं शेत खणून बंदुकींचा शोध घेतला; पण त्यांना त्यात काहीच सापडलं नाही.'' त्या पत्राला मुलाचं उत्तर येतं, ''बाबा, आता तुम्हाला शेतात भुईमूग पेरायचा होता तो लगेच पेरून टाका. माझ्या अशा परिस्थितीत यापेक्षा चांगली मदत मी तुम्हाला येथून काय करू शकणार होतो?'' आपण जगात कोठेही असला, तरी हृदयापासून आपण काही करायचं ठरवलं आणि ते करण्याची आपली ज्वलंत इच्छा असली, तर आपण ते शक्य करू शकता. त्यासाठी तीव्र ओढ आणि प्रबळ इच्छाशक्ती असायला हवी इतकेच.

जीवन बदलून

टाकणारी एक संधी

सर्वसाधारणपणे सगळी सुखं सहजपणे मिळावीत अशी व्यक्तीची अपेक्षा असते; परंतु 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही' या म्हणीप्रमाणे सुख सहजासहजी मिळविता येत नाही. आपल्याकडे चालत आलेली संधी कष्टांच्या भीतीने धुडकावून एकाच जागी स्वस्थ बसून निष्क्रिय होण्यापेक्षा ती स्वीकारून प्रयत्न करण्यात वेगळीच मजा आहे. अन्यथा वेळ निघून गेल्यावर अखंड आयुष्यभरासाठी पदरी पडतो तो पश्चात्ताप.

नाशिक जिल्ह्यातील एक टुमदार गाव. गाव छोटंसच; परंतु समृद्ध होतं. शेती सुपीक होती. गावाजवळून छोटीशीच; पण बाराही महिने वाहणारी एक नदी होती. डोंगरदऱ्यांच्या कुशीत वसलेलं, झाडाझुडुपांनी नटलेलं. फुलाफळांनी बहरलेलं, सकाळ-संध्याकाळ पक्षयांच्या किलबिलाटाने आल्हाददायक वाटणारं असं हे गाव. गावाजवळच एक छोटेखानी सपाट टेकडी होती. सकाळ-संध्याकाळ गावातले लोक टेकडीवर फिरायला जात असत. टेकडीवर दोन मोठे दगड होते. फिरायला येणाऱ्या गावकरी मंडळींनी गमतीने त्या दोन दगडांना 'होय दगड' आणि 'नाही दगड' अशी नावे ठेवली होती. हे दगड किती वर्षांपासून त्या टेकडीवर आहेत हे कोणालाच सांगता येत नव्हतं.

गावातील मोठी मुले, माणसे अनेकदा टेकडीवरील या दगडांवर येऊन गप्पा मारीत बसत. कितीतरी विषयांवर येथे चर्चा होत असे. अशा विविध गप्पागोष्टी, चर्चा हे दोन्ही दगड अगदी मन लावून ऐकत असत आणि त्यामुळे त्यांची खूपच छान करमणूक होत असे. एकदा अशीच दोन माणसे त्या दगडावर बसून चर्चा करीत होती. एक जण म्हणाला, "आपलं हे गाव किती सुंदर आहे; परंतु आपल्या गावात एकही देवाचं मंदिर नाही. दुसऱ्यानेदेखील त्याला दुजोरा देत म्हटलं, "हो! तुझं म्हणणं अगदी योग्य आहे, मलादेखील वाटतं की, आपल्या गावात एखादं छानसं, टुमदार मंदिर बांधायला पाहिजे." होय आणि नाहीदेखील मोठ्या कौतुकाने त्यांच्या गप्पा ऐकत होते. त्यांनाही वाटले, "वा! छान, याच जागेवर जर ते मंदिर झाले तर किती छान होईल? मंदिरातील देवाचं दर्शन घेण्यासाठी अनेक माणसं इथे येतील. आपल्यालादेखील कितीतरी लोकांना दररोज भेटता येईल. किती छान होईल ना हे?"

गावातील मंडळांनी बऱ्याच प्रयत्नांनी एका तरुण आणि प्रतिष्ठित मूर्तिकाराचा शोध घेतला. त्याचबरोबर एक हुशार आणि तज्ज्ञ शिल्पकारदेखील त्याच्या जोडीला दिला. सुंदर मंदिर बांधण्यात ते दोघेही वाक्बगार आणि सुप्रसिद्ध होते. अनेक वर्षांचा दांडगा अनुभव त्यांच्या पाठीशी होता.

गावात आल्यावर त्यांनी गावाच्या आसपास हिंडून मंदिराच्या जागेसाठी बराच शोध घेतला. शोधत शोधत ते टेकडीवरील या दोन दगडांजवळ आले. ही जागा त्यांच्या मनात भरली. लगेचच त्यांनी ग्रामस्थांना सांगितले, "अहो मंदिर बांधण्यासाठी ही जागा खूप

सोयीची आणि छान आहे. तेव्हा सर्वांत प्रथम आता आपल्याला हव्या असलेल्या देवाची मूर्ती तयार करावयास सुरुवात करायला हवी. त्यासाठी आपल्याला एका सुंदर; तसेच योग्य दगडाची गरज लागणार आहे.''

प्राप्त संधीचा स्वीकार करा

त्यासाठी परत ते गावाच्या आवतीभोवती शोध घेऊ लागले आणि आश्चर्य म्हणजे त्यांचा हा शोध गावातील त्या सुपरिचित होय आणि नाही याच दगडांजवळच येऊन थांबला. त्या दगडांतूनच आपल्याला मंदिरात बसवायची मूर्ती तयार करता येईल असे त्यांना वाटले. या दोघांतून एकाची निवड देवाची मूर्ती बनविण्यासाठी करावयाची असे त्यांनी ठरविले. आपणा दोघांपैकी कोणाची यासाठी तयारी आहे हे आम्हाला सांगा. असा प्रश्न मूर्तिकाराने त्या दोन्ही दगडांना विचारला. त्यानंतर दोघेही मूर्तिकाराला म्हणाले, ''आमचे मूर्तीत रूपांतर करण्यासाठी आपण आमच्यावर काय काय प्रक्रिया करणार आहात, हे आम्हाला जरा नीट समजावून सांगाल का?'' त्यावर मूर्तिकार म्हणाले, ''मी प्रथम एक मोठी हातोडी आणि छिन्नी घेऊन आपल्या अंगावर जबरदस्त प्रहार करणार आहे. त्यामुळे मूर्तीसाठी अनावश्यक असणारा आपल्या शरीरावरील भाग फोडून बाजूला केला जाईल. या जबरदस्त आघातामुळे आपल्याला प्राणांतिक यातना होतील. त्यानंतर मात्र पुढील दहा दिवस मी बारीक बारीक आघात करीत राहीन. त्यामुळे आपल्यातून एक मूर्ती आकार घेऊ लागेल. म्हणजे मला हवी तशी मूर्ती आपल्यातून साकार होऊ लागेल. मला हवे तसे योग्य बदल मी आपल्यात घडवून आणेल. मग त्यानंतरच्या प्रक्रिया मूर्तीला गुळगुळीतपणा आणणाऱ्या असतील. पहिल्यांदा ओबड धोबड कागद वापरून घासावे लागेल आणि नंतर बारीक कागदाचा वापर केला जाईल. म्हणजे मी जेव्हा तुमच्यावर काम करीत असेल तेव्हा तुम्हाला बरेच दु:ख सहन करावे लागणार आहे. या काळात होणाऱ्या यमयातना आपल्याला निमूटपणे सहन कराव्या लागतील. त्यावेळी मी आपली कोणतीही गय करणार नाही. या सर्व प्रक्रियांनंतर आपल्यातून देवाची एक सुरेख मूर्ती तयार होईल.''

हे सर्व ऐकल्यावर नाही दगड जरा घाबरलाच! तो पटकन मूर्तिकाराला म्हणाला, ''महोदय, मी शेकडो वर्षांपासून येथे राहतो आहे आणि येथे मी खूप आनंदीदेखील आहे. आता मी कशासाठी या यमयातना सोसू? नाही, मला हे मुळीच जमणार नाही.'' एवढेच बोलून तो थांबला नाही, तर तो होय दगडाला म्हणाला, ''अरे बाबा! शहाणा असशील तर या मूर्तिकारापासून दूरच रहा. कशाला उगीचच असा जीवघेणा त्रास सोसायला तयार होतो आहेस?

त्यावर होय दगड मूर्तिकाराला म्हणाला, ''महोदय, मी आपल्याबद्दल खूप ऐकून आहे, आपल्याला खूप मोठा अनुभव आहे आणि त्याचा उपयोग करून आपण खूप सुंदर सुंदर मूर्ती बनविलेल्या आहेत. मला पूर्ण खात्री आहे की, काही दिवस असा त्रास सहन केल्यानंतर आपण माझ्यापासून देवाची एक सुंदर मूर्ती तयार कराल आणि माझे पुढचे सर्व आयुष्यच बदलून मला खूप भाग्यवान, खूप सुंदर कराल. मी आपल्याला हवे ते सहकार्य करायला तयार आहे.'' नाही दगडाला होय दगडाचा हा निर्णय अजिबात पसंत नव्हता. तो त्याच्यावर खूपच नाराज झाला. होय दगडाने नाही म्हणावे म्हणून नाही दगडाने त्याला पटवायचे खूप प्रयत्न केले; परंतु 'होय' दगड आपल्या निर्णयावर ठाम

होता. आपले उज्ज्वल भवितव्य त्याला स्वच्छ दिसत होते. त्याने मूर्तिकारास कामाला सुरुवात करण्याची विनंती केली.
मूर्तिकाराने जवळच एक झोपडी उभारली आणि त्याने होय दगडाला त्या झोपडीत हलविले. पहिल्या तासातच झोपडीतून होय दगडाचा जोरजोरात ओरडण्याचा आवाज येऊ लागला. बाहेर येणाऱ्या या आवाजामुळे त्याला खूपच यातना होत होत्या हे लक्षात येत होते. बाहेर मात्र नाही दगड हसत होता. होय दगडाने कसा चुकीचा निर्णय घेतला आहे हे पाहून नाही दगड मात्र आनंदात होता. आपण या त्रासातून सहीसलामत सुटलो याचे त्याला समाधानच होत होते. कधीकधी नाही दगड मात्र खूपच दु:खी होत असे; कारण होय दगड किंचाळून रडत असताना आपल्या या मित्राच्या यातना त्याला सहन होत नसत. सतत छन्नीचे घावही त्याला ऐकू येत असत. घासण्याचे आणि साफ करण्याचे आवाजही येत होतेच. आता मात्र आपण काहीच करू शकत नाही, आपण असाहाय्य आहोत ही भावना नाही दगडाच्या मनात होतीच. काही झाले तरी त्यांचा अनेक वर्षांचा सहवास होता.

सहनशीलतेचे फळ

पंधरा-वीस दिवसांनंतर झोपडी अगदी शांत झाल्यासारखी वाटत होती. 'होय' दगडाचे काय झाले? या चिंतेने 'नाही' दगडास पछाडले, तो खूपच काळजीत पडला. त्याला वाटत होते की आपला हा मित्र हे जग सोडून तर गेला नाही ना? आपण सांगितलेले त्याने ऐकले असते तर? त्याच्यावर ही वेळ आलीच नसती.
मूर्तीच्या कामाबरोबरच मंदिराचे बांधकामही जोरात चालू होते. मंदिर लवकर बांधून तयार करण्याचा गावकऱ्यांनी जणू चंगच बांधला होता. अहोरात्र काम पुढे पुढे सरकत होते. अखेर एक दिवस मंदिराचे सगळे काम पूर्ण झाल्याची घोषणा झाली. मूर्तिकाराच्या झोपडीकडून मंदिराकडे ये-जा करणाऱ्यांच्या फेऱ्या होताना दिसत होत्या. तसा मूर्तिकारही आनंदात दिसत होता; परंतु नाही दगडाला होय दगडाबद्दल काहीच समाचार मिळत नव्हता. आता त्याचा आवाज मात्र पूर्णपणे बंद झालेला होता. काही माणसे मात्र झोपडीकडून मंदिराकडे शांतपणे फेऱ्या मारताना दिसत होती; परंतु 'होय' दगडाबद्दल मात्र त्यांच्या तोंडून एकही शब्द बाहेर पडत नव्हता.
काही दिवसांनंतर एक छानशी पाटी झोपडीजवळ लावण्यात आली. झोपडीतून एक सुरेख देवाची मूर्ती बाहेर काढली गेली. मोठ्या आदराने आणि वाजत गाजत तिला मंदिराकडे नेण्यात आले. नाही दगड हे सर्व बघत होता. मूर्ती मध्येच थांबली. तिने नाही दगडाला विचारले, "काय मित्रा! कसा आहेस? ओळखले नाही वाटतं मला?" नाही दगडाला तर आश्चर्याचा धक्काच बसला. थोड्या विचारानंतर त्याला जाणीव झाली की, हा तर आपलाच मित्र 'होय' दगड आहे; परंतु तोपर्यंत मूर्तीची मिरवणूक देवळापर्यंत पोहोचलीसुद्धा होती. नाही दगड मात्र एकटाच मागे पडला होता. मूर्ती झालेला 'होय' दगड जेव्हा मंदिरात गेला तेव्हा हजारो माणसं त्याच्या दर्शनासाठी रांगेत उभी होती. मंदिरात मंत्रांचे आवाज घुमत होते. बाहेर उभ्या असणाऱ्या व्यक्तींनादेखील काही धार्मिक विधी करायचे होते. प्रत्येकाच्या हातात नारळ दिसत होते. पूजा सुरू होती. काही लोक मंदिरात जाऊन बसले होते. पूजा संपल्यावर भक्तगणांनी बाहेर यायला सुरुवात केली. त्यांना देवळातील मूर्तीसमोर नारळ फोडायचा होता. कसा फोडणार?

सर्वांसमोर मोठे प्रश्नचिन्ह होते. तेवढ्यात काही ग्रामस्थ नारळ फोडण्यासाठी सोयीस्कर दगडाचा शोध घेत 'नाही' दगडाजवळ आले. नारळ फोडण्यासाठी तर हा दगड उत्तम आहे अशी त्यांची खात्री पटली. त्यांनी सर्वांनी मिळून 'नाही' दगडाला नारळ फोडण्यासाठी मंदिरापुढे हलविले. त्यानंतर प्रत्येक भक्त मंदिरातील देवासाठी नाही दगडावर जोरात फटका मारून नारळ फोडू लागला. पुढे तर ही प्रथाच पडत गेली.
होय दगडाने काही दिवसांसाठी मूर्तिकाराला आत्मसमर्पण करून ज्या काही यातना होतील त्या निमूटपणे सहन केल्या. त्याचा परिणाम म्हणून पुढील अनंत वर्षांसाठी तो लाखो भक्तांच्या आदर, मानसन्मानाचा धनी झाला. याउलट नाही दगडाला कोणत्याही प्रकारच्या यातना, मग त्या अगदी थोड्या वेळापुरत्या का असेना त्या त्याला नको होत्या; परंतु त्याचा परिणाम काय झाला? पुढील हजारो वर्षे, दररोज शेकडो नारळांचे घाव त्याला निमूटपणे सहन करावे लागणार आहेत. मला खात्री वाटते की, आता सकारात्मकतेचा फायदा आणि नकारात्मकतेचा तोटा किंवा दुष्परिणाम याची आपल्याला चांगलीच ओळख झाली असेल.

देव दानवा नरे

निर्मिले...

माणसाच्या आयुष्यात चांगलं-वाईट, सज्जन-दुर्जन, देव-राक्षस अशी अनेक द्वंद्वे अपरिहार्य आहेत. त्यांचा सामना प्रत्येकाला करावाच लागतो; परंतु ही द्वंद्वे कशी निर्माण होतात याचा शोध घेताना व्यक्तीने हे लक्षात घ्यायला हवं की, या दोन्ही वृत्ती व्यक्तीच्या आतच असतातच. यातील कोणत्या वृत्तीकडे झुकायचे, कोणत्या वृत्तीचा विकास करायचा आणि कोणत्या वृत्ती टाळायच्या याचं स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला आहे. वाल्या कोळ्याचं रूपांतर वाल्मीकी ऋषीत झालं हा इतिहास आपण जाणताच. राक्षसी वृत्तीकडून देवत्वाकडे जाण्याचा प्रवास गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध दिशेने जाणारा असतो.

रवी हा एक तरुण आणि नवोदित चित्रकार होता. आपल्यातील चित्रकलाकौशल्यांचा विकास करून नामांकित चित्रकार होण्यासाठी त्याची धडपड सुरू होती. एकदा एका वर्तमानपत्रात एका संस्थेला एका सुरेख परमेश्वरी चेहऱ्याचे चित्र पाहिजे, अशी जाहिरात रवीने वाचली. जाहिरातीच्या एकूण धाटणीवरून अनेक चित्रकार यात भाग घेतील आणि त्यामुळे यात आपल्या कलेचा उत्तम कस लागेल असे त्याच्यातील कलाकाराला वाटल्यामुळे या स्पर्धेसाठी आपण चित्र पाठवावे असे रवीने ठरविले. या निमित्ताने परमेश्वरी चेहऱ्याचे एक उत्कृष्ट चित्र काढता येईल अशी प्रबळ इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली होती. प्रत्यक्ष प्रतिमा डोळ्यासमोर असल्याशिवाय रवीला चित्र काढणे जमत नव्हते. म्हणून त्याने उत्तम दैवी चेहऱ्याचा शोध घेणे सुरू केले.

गोंडस मुलाची प्रतिमा

हा शोध घेत असताना तो एका शाळेत पोहोचला. तेथे सात वर्षांच्या एका गोंडस चेहऱ्याचा मुलगा त्याच्या डोळ्यात भरला. त्याचेच चित्र काढून या स्पर्धेसाठी पाठवायचे असे त्याने निश्चित केले. रवीने मुलाला पुढे बसवून आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावून आपल्या मनात होते तसे दैवी चेहऱ्याचे चित्र तयार केले. आपल्या या कलाकृतीवर रवी अत्यंत प्रसन्न होता. त्यावर त्याने शेवटचा हात फिरवून ते चित्र पूर्ण केले आणि त्या संस्थेकडे पाठविले. अपेक्षेप्रमाणे रवीचे हे चित्र सर्वोत्तम चित्र म्हणून स्वीकारले गेले. रवीला आपल्या व्यावसायिक वाटचालीत या चित्राने खूप मोठा मानसन्मान आणि प्रसिद्धी मिळवून दिली. आपण खूप मोठा चित्रकार व्हावं ही त्याची इच्छा होती, ती पूर्ण करण्याच्या वाटचालीला यामुळे वेग मिळाला.

रवीची चित्रकार म्हणून वाटचाल पुढे पुढे सरकत गेली. आयुष्यात रवीला अनेक मानसन्मान मिळाले. जवळजवळ पंधरा वर्षांनंतर असेच एकदा वर्तमानपत्र वाचत असताना त्याला एक जाहिरात दिसली. त्यात एका संस्थेला एका राक्षसाचे उत्तम चित्र पाहिजे होते. जाहिरात वाचल्यावर रवीच्या मनात आपण तयार केलेल्या दैवी

चेहऱ्याच्या चित्राची आणि त्यामुळे मिळविलेल्या मानसन्मानाची आठवण झाली. आता याही स्पर्धेत आपण भाग घ्यायचा असे त्याने ठरवले. रवींची पूर्वीचीच सवय अजून टिकून होती. समोर प्रत्यक्ष प्रतिमा असल्याशिवाय चित्र काढणे अजूनही त्याला जमत नव्हते. या राक्षसाच्या चित्रासाठी प्रतिमा शोधण्याचे काम रवीने सुरू केले. कुठे असेल अशी योग्य प्रतिमा? याचा शोध घेता घेता तो एका तुरुंगात पोहोचतो. तेथील एका कैद्यावर त्याची नजर खिळते आणि त्याच्या लक्षात येते की, राक्षसाच्या प्रतिमेसाठी याहून चांगला चेहरा मिळणे अशक्यच आहे. याच कैद्याचे चित्र काढायचे असे रवी ठरवतो. कैद्याला समोर बसवून चित्र काढायला सुरुवात करतो. अतिशय एकाग्रतेने रवी राक्षसाचे हे चित्र पूर्ण करतो. आपल्याच कलेवर तो प्रसन्न होतो. कैदी गडबडतो, त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहतात. रवीला कळेना की, कैद्याला नेमके काय झाले? न राहून तो कैद्याला विचारतो, "अहो! आपण का रडता आहात?" त्यावर कैदी म्हणाला "साहेब! मी सात वर्षांचा असताना आपण असेच माझे चित्र काढले होते. आजही आपण माझे चित्र कशासाठी काढले हे मला माहिती नाही; पण मागील वेळी आपण मला पैसे मात्र दिले नव्हते. मला त्यावेळी या पैशांची खूप जास्त गरज होती. त्यावेळी ते मला मिळाले असते तर माझे आयुष्य आहे त्यापेक्षा बरेच वेगळे झाले असते; कारण शिक्षणासाठी गरज म्हणून मी छोटया मोठ्या चोऱ्या करू लागलो आणि त्यातूनच एका कुप्रसिद्ध गुन्हेगाराच्या टोळीत अडकलो. त्यांचे बाहुले झालो आणि या सर्वांचा शेवट हा असा झाला.

देवत्व टिकवावे लागते

चांगले आणि वाईट, देवत्व आणि राक्षसत्व या गोष्टी माणसाच्या आत निसर्गत:च असतात. यात देवत्व हे मूलत: अगोदर निर्माण होते आणि माणूस गाफील राहिला की, नकळत राक्षसीवृत्ती त्याचा केव्हा ताबा घेते हे त्याच्याही लक्षात येत नाही. हे टाळायचे असेल तर मात्र माणसाला सतत जागृत राहणे खूप महत्त्वाचे आहे. अशा जागृततेच्या अभावामुळे माणसातील देवत्व नाहीसे होऊन त्याची राक्षसी प्रवृत्ती केव्हा त्याच्यावर कब्जा करेल हे त्याच्या लक्षातही येत नाही. परमेश्वराकडून राक्षसाकडे किंवा राक्षसाकडून परमेश्वराकडे प्रवास केलेली अनेक उदाहरणे आपल्याकडे पहावयास मिळतात. या रूपांतरात परमेश्वराकडून राक्षसाकडे जाणारा प्रवास तुलनेने सहज होतो; कारण हे अध:पतन आहे. त्याला मार्गदर्शनाची आवश्यकता नसते. राक्षसाकडून परमेश्वराकडे नेणारा प्रवास ऊर्ध्वगमनाचा आहे. गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध दिशेने हा प्रवास आहे. अर्थातच हा प्रवास अवघड असला तरी अशक्य मात्र निश्चितच नाही.

वाल्या कोळ्याचं रूपांतर वाल्मीकी ऋषीत झाले. त्याचप्रमाणे अंगुलीमाल या माणसांची हत्या करणाऱ्या क्रूर डाकूचे रूपांतर एका थोर संतामध्ये झाल्याचा इतिहास आपण जाणताच; परंतु त्यासाठी योग्य वेळ आणि प्रभावी मार्गदर्शन करणारे अनेक थोर व्यक्तींचे सान्निध्य आणि मार्गदर्शन मिळायला हवे.

वेळ हीच

मौल्यवान मालमत्ता

आयुष्य फक्त क्षणाक्षणांचं असतं. क्षणांनीच ते तयार झालेलं असतं. या आयुष्यातील प्रत्येक क्षण जगायला हवा आणि त्यात आनंदाचा विसर पडू देऊ नये; कारण तीच गोष्ट आयुष्यात परिणाम देणारी आहे. ज्या गोष्टींसाठी तुम्ही अहोरात्र परिश्रम घेता त्या सर्व भौतिक गोष्टी शेवटी मागेच राहतात. म्हणून मिळालेलं बहुमोल आयुष्य मनमुराद; पण चांगले जगा; कारण एकदा निघून गेलेली वेळ कधीच परत येत नाही.

जगन्नाथला एकदम चक्कर आल्यासारखे झाले आणि तो पलंगावर कोसळला असे का होते आहे हे त्याच्या लक्षात येण्यापूर्वीच एक अक्राळविक्राळ माणूस त्याच्यापुढे उभा ठाकला. जगन्नाथला थोडे घाबरल्यासारखे झाले. तो सावरायच्या आतच तो माणूस कडाडला, "मी यमदूत आहे आणि आता तुला माझ्यासोबत घेऊन जायला आलो आहे." आपला सारा धीर एकटवून जगन्नाथ म्हणाला, "महाराज खरंतर मला अजून बऱ्याच गोष्टी करायच्या आहेत. तेव्हा मी आताच मरायला तयार नाही. यामुळे आपण काही दिवसांनंतर यावे." यमदूत म्हणाला, "बेटा! मला सांगायला दु:ख होत आहे की, आता तुझी वेळ झाली आहे आणि आपल्याला आता निघायला हवे." जगन्नाथ म्हणाला, "अहो महाराज, आपल्याला माहिती नाही का, मी कोण आहे? या शहरातला सर्वांत श्रीमंत माणूस आहे." यावर मान हलवीत यमदूत म्हणाला, "अरे गृहस्था, मी इकडे येताना सर्व माहिती व्यवस्थित घेऊनच येत असतो. चल लवकर तयार हो, आपल्याला आता निघायलाच हवं." यावर जगन्नाथ म्हणाला, "महाराज मी कमवलेल्या संपत्तीचा 10 टक्के वाटा आपल्याला दिला तर! आपल्याला कल्पना यावी म्हणूनच सांगतो की, ही रक्कम कोटचवधी रुपयांची आहे. आता तरी माझ्याकडे थोडी डोळेझाक करून आपण एक वर्षाने मला न्यायला येऊ शकाल का?

संपत्तीचे आमिष

थोडे रागावूनच यमदूत म्हणाला, "बाळ, तुला काहीच कळत नाही असंच दिसतंय. आपली आता निघायची वेळ झालेली आहे." पुढील काही क्षण जगन्नाथने यमदूताबरोबर सौदेबाजी करण्याचा प्रयत्न केला. त्याला पैसे देऊ करून वेळ मागण्याचा प्रयत्न करून बघितला, कळकळीची विनंती करून बघितली. अगदी निर्वाणीचा प्रयत्न म्हणून जगन्नाथ म्हणाला, "महाराज! मी माझी सारीच संपत्ती जी काही कोटी रुपयांची आहे ती मी तुम्हाला देतो आणि त्या बदल्यात तुम्ही मला फक्त पाचच मिनिटे वेळ द्या." याचे कारण यमदूताला स्पष्ट करताना जगन्नाथ म्हणाला, "मला माझ्या बायकोला आणि मुलांना भेटून मी त्यांच्यावर अतिशय प्रेम करतो हे त्यांना सांगायचं आहे; कारण आतापर्यंत ही इतकी महत्त्वाची गोष्ट मी त्यांना कधी सांगितलीच नाही. महाशय, आपण हे नक्कीच मान्य कराल की मला त्यांच्याबद्दल काय

वाटते ते मी त्यांना सांगायला हवे, नाही का? त्याचबरोबर दोन व्यक्तींना मी फार दुखावले आहे. त्यांचीपण मी माफी मागायला हवी. एवढे मोठे ऋण डोक्यावर घेऊन मी आपल्याबरोबर कसा येणार? यासाठी मी तुम्हाला पाचच मिनिटे वेळ मागतो आहे आणि त्या बदल्यात आपल्याला माझी आयुष्यभराची कमाई देऊन टाकतो आहे.''

अमूल्य वेळ

आता मात्र यमदूत जगन्नाथकडे आश्चर्याने बघत म्हणाला, ''ही अब्जावधी रुपयांची संपत्ती मिळवायला तुला किती वर्षे लागली आहेत?'' त्यावर जगन्नाथने स्पष्टीकरण दिले, ''महाराज यासाठी मी माझ्या आयुष्यातील 30 वर्षे घालविली आहेत. आपल्याला हा सौदा तर खूपच फायदेशीर ठरणार आहे; कारण ही संपत्ती मिळाल्यावर आपल्याला कधीही कुठलेच काम करण्याची गरज पडणार नाही.'' यावर रागावून यमदूत म्हणाले, ''तुम्हा माणसांची मनोवृत्तीच मला कळत नाही! तुम्ही फक्त पाचच मिनिटांसाठी स्वत:ची आयुष्यभराची कमाई द्यायला तयार होता; परंतु तुमच्याकडे जेव्हा मुबलक वेळ असतो तेव्हा आपल्या प्रत्येक क्षणाचा जास्तीत जास्त उपयोग का करून घेत नाही? आपल्याजवळ उपलब्ध असणाऱ्या वेळेला आपण काय किंमत देता? त्याचे योग्य मोल का जाणत नाही? तेव्हा आपले प्राधान्यक्रम कोठे जातात? आयुष्यभर ज्यांनी आपल्याला साथ दिली त्या बायकोला आणि मुलांना 'मी तुमच्यावर खूप प्रेम करतो' एवढे साधे शब्द आपण सांगू शकत नाहीत? आपल्याला मनापासून जे महत्त्वाचे वाटते ते आपण वेळच्या वेळी का करीत नाही?''

त्यानंतर जगन्नाथच्या डोळ्यांसमोर एकदम अंधार पसरला आणि जगन्नाथ चा मृत्यू झाला. त्याच्याकडे अब्जावधी रुपये असूनसुद्धा महत्त्वाची कामे करण्यासाठी त्याला पाच मिनिटेदेखील खरेदी करता आली नाहीत.

पुन्हा एकदा...

"भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही. मानवाचे मन केवळ भूतकाळाच्या साखळदंडांनी करकचून बांधून ठेवता येत नाही. त्याला भविष्याच्या गरुडपंखांचं वरदानही लाभलं आहे. एखादं स्वप्नं पाहणं, ते फुलविणं, ते सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतला आनंद लुटणं आणि दुर्दैवानं ते स्वप्न भंग पावलं तरी त्याच्या तुकड्यांवरून रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागे धावणं हा मानवी मनाचा धर्म आहे, मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळेच."

- वि.स.खांडेकर

समुद्रकिनारा लाभलेल्या गावाचे भाग्य काय वर्णावे? तुम्ही समुद्रावर गेलात कधी थोडा वेळ? समुद्राची खळबळ बघून आपल्या मनातील खळबळ मात्र शांत होते. समुद्राच्या विशालतेकडे बघताच आपल्या मनातील संकुचितपणा धुतला जातो आणि हृदय विशाल व्हायला लागते. सागरलहरींवर आपल्या मनात निर्माण होणाऱ्या लहरींना सोडून दिलं, तर मग त्यांच्यातील अवखळपणा जणू सागरातच विरून जातो. डोळे विस्तीर्ण सागराला नजरेत भरून घेण्याचा प्रयत्न करीत असतानाच अंगावर येणाऱ्या खारटसर वाऱ्यामुळे अंग-अंग शहारते. त्याचबरोबर नेहमी सैरभैर धावणारे विचार सागराच्या आत कुठेतरी खोलवर बुडी मारून माणसाला अंतर्मुख करतात. ध्यानावस्था आल्यासारखी वाटते. काळ जरा थांबला तर नाही ना? असा भास होतो.

असाच एकदा एका मित्राबरोबर सहकुटुंब गणपतीपुळ्याला जाण्याचा आमचा योग आला. गणपतीपुळ्याचा समुद्रकिनारा अतिशय सुंदर आहे. आता दोन- तीन दिवस दररोज सकाळ संध्याकाळ समुद्रकिनारी फेरफटका मारायला मिळणार याचा मला मनापासून आनंद होत होता. नकळतच माझे मन त्या क्षणांची आतुरतेने वाट पाहू लागले. काही वेळातच आम्ही समुद्रकिनाऱ्यावर पोहोचलो. वातावरण खूपच आल्हाददायक होते. नेहमी इतस्ततः भरकटणारे मन शांत होऊन आजूबाजूला काय घडते आहे याचा शोध घेत होते.

सुंदर किल्ला

पाण्याच्या जवळ बसून दोन भावंडे ओलसर वाळूत एक छानसा किल्ला तयार करताना दिसली. दोघंही किल्ला बांधण्यात अगदी दंग झालेली होती. त्यांची कल्पकता नजरेत भरणारी आणि मन तृप्त करणारी होती. दोघंही आपापसात चर्चा करून निर्णय घेत होते आणि लगेचच तो अमलातही आणत होते. बघता बघता दोघांच्याही श्रमातून, खूप बारकावे असणारा सुंदर किल्ला तयार झाला. मीदेखील मुलांनी बनविलेल्या त्या सुंदर किल्ल्याकडे आकर्षित झालो. मुलांनी बनविलेल्या त्या सुंदर किल्ल्याबद्दल त्यांचं मनापासून कौतुक करावं ही भावना माझ्या मनात उमटली आणि म्हणूनच मी त्यांच्याकडे खेचला जाऊ लागलो.

मी त्यांच्याकडे जात असतानाच एक मोठी लाट आली. किनाऱ्याजवळ आल्यावर त्या लाटेचा जोर कमी झाला होता; परंतु तिच्या तडाख्याने त्या मुलांनी तयार केलेला तो

सुंदर किल्ला क्षणार्धात होत्याचा नव्हता झाला. त्याची सर्व वाळू खालच्या वाळूत इतकी बेमालूमपणे मिसळून गेली होती की, मुलांनी तयार केलेल्या त्या सुंदर किल्ल्याची पुसटशीदेखील खूण तेथे उरली नव्हती. हे सर्व बघून मी तर पूर्णच भांबावलो, निराश झालो. काय बोलणार मी आता या मुलांशी? माझ्या मनातील विचारच गोठले. कदाचित त्यामुळेच मी थोडा वेळ शुंभासारखा उभा राहिलो होतो. मला वाटलं की आता ती मुले निराश होतील. डोळ्यात अश्रू आणून आदळआपट करतील, आई-बाबांकडे धावतील. आई-वडीलांनादेखील त्यांची समजूत घालता-घालता दमछाक होईल. तेदेखील त्यांची समजूत कशी घालणार? परंतु माझ्या मनातील हे विचार शांत होण्याच्या आतच मला समोर एक अनपेक्षित दृश्य दिसलं. दोन्ही मुलं जोरात उंच उडी मारीत एकमेकांचे हात हातात घट्ट पकडीत आपले आवाज एकमेकांच्या आवाजात मिसळीत म्हणत होते,“अरे यार! चला आता थोडे मागे जाऊन, चांगली जागा पाहून परत यापेक्षाही चांगला दुसरा किल्ला बांधू या!”

वागणुकीतील सहजता

तेव्हा मात्र मी स्तिमित झालो होतो. मुलांची समजूत कशी घालायची? त्यांना काहीतरी कसे सांगायचे, शिकवायचे या विवंचनेत असलेला मी आपल्या दृष्टीने अजाण बालकांकडूनच खूप काही महत्त्वाचं आणि संपूर्ण आयुष्यभर उपयोगी पडेल असं काहीतरी शिकलो होतो. किती सहजता होती त्यांच्या या वागण्यात? यासाठी त्यांचं कौतुक करून आभार मानण्याच्या आत ते एकमेकांचे हात घट्ट पकडीत, हसत हसत माझ्या नजरेतून पसारदेखील झाले होते. हे त्यांचं वागणं आणि त्यांची प्रतिक्रिया बघून माझं मन मात्र मानवीमनाचा, मानवी आयुष्यात घडणाऱ्या गोष्टींचा, त्यावर होणाऱ्या मानवी प्रतिक्रियांचा वेध घेऊ लागलं. आयुष्यातील प्रवासात यासारख्या अनेक प्रसंगांना आपल्याला तोंड द्यावे लागते. एखादी गोष्ट मिळविण्यासाठी आपण अनंत कष्ट उपसत असतो. आपले सर्व कौशल्य पणाला लावीत असतो. हे सर्व समुद्र किनाऱ्यावर किल्ला बांधणाऱ्या त्या दोन मुलांच्या प्रयत्नासारखेच नसते का?

आपल्या प्रवाही आयुष्यातदेखील कधीतरी अशीच अनपेक्षित लाट येऊ शकते. ज्या गोष्टी आपण जमा केल्या, त्या एकत्र बांधून ठेवण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली, जीवाचं रान केलं अशा गोष्टी दैवाच्या तडाख्यात कधीतरी मातीमोल होण्याची शक्यता असते. आपण बांधलेले बंगले कदाचित जमीनदोस्तदेखील होऊ शकतात. तेव्हा आपण अशा प्रसंगाला कसे तोंड देऊ शकतो? या दोन लहान मुलांनी आपल्याला त्याचा धडाच शिकविला आहे. हा धडा आपण कधीच विसरून चालणार नाही.

सकारात्मकतेचे

फळ

सकारात्मक विचारसरणीत कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत आपल्यात उपयुक्त बदल घडवून आणण्याची ताकद, सामर्थ्य असते. त्यामुळे प्रतिकूलतेचे अनुकूलतेत रूपांतर होऊ शकते. त्यामुळे परिस्थिती सुखकारक बनते. आपल्या क्षमता आणि कौशल्य वाढते. सकारात्मक विचारसरणीमुळे अशक्य, अवघड वाटणाऱ्या गोष्टी सोप्या आणि सुलभ होतात. आपले नेमके ध्येय काय आहे यावर आपल्याला लक्ष केंद्रित करता येते. अचानक नवीन आणि उपयुक्त कल्पना सुचतात. सकारात्मक भावनांमुळे अनेक शक्यता दृष्टोत्पत्तीस येतात; तसेच आपल्यासमोर अनेक पर्यायही खुले होतात.

एक घनदाट जंगल होते. जंगलातून खळखळणाऱ्या नदीचा मोठा प्रवाह वाहत होता. जंगलात अनेक प्राणी राहत होते. 'गुण्यागोविंदाने' म्हणता येणार नाही; कारण जंगलात 'बळी तो कान पिळी' या नियमाचे अधिराज्य असते. अर्थात मानवसमाजदेखील याला अपवाद नाही. असे असले तरी जंगलात लहान-मोठे, ताकदवान-कमकुवत, क्रूर-मवाळ प्राणी आपापल्या पद्धतीने जीवन जगत असतात. स्वसंरक्षणाचे ज्ञान निसर्गानेच सर्व प्राण्यांना उपजतच दिलेले असते आणि त्याचा पुरेपूर उपयोग करीत ते जगत असतात.

संकट ओढावले

अशीच एक हरिणी त्या जंगलात वावरत, जगत असते. तिची प्रसूतीची वेळ जवळ आलेली असते आणि त्यासाठी लागणाऱ्या सुरक्षित जागेच्या ती शोधात असते. शोधता, शोधता ती एका खळाळणाऱ्या नदीप्रवाहाजवळच्या घनदाट जंगलात पोहोचते. सर्व दृष्टींनेही जागा योग्य आहे असे तिला वाटते. त्याचवेळी एकदम तिला प्रसूती वेदना सुरू होतात. जणू तीच वेळ साधून आकाश कृष्णमेघांनी भरून येते आणि त्यावर प्रचंड विजा कडाडू लागतात. त्याचा परिणाम म्हणून जंगलात मोठी आग लागते. एकदा संकटांची सुरुवात झाली की, कधी त्यांची मालिका तयार होते हे लक्षातच येत नाही. हरिणीचे हृदय भीतीने धडधडू लागते. सहजच तिची नजर आपल्या उजव्या बाजूला जाते तेव्हा तिच्या लक्षात येते की, एक शिकारी तिच्यावर बंदूक रोखून उभा आहे. भीतीने थरथरतच ती डाव्या बाजूला बघते तो काय एक भुकेला सिंह तिच्यावर आक्रमण करण्याच्या उद्देशाने पुढे पुढे सरकत असतो.

आता या हरिणाने काय करायचे?

प्रसूती वेदनांनी तर तिला जखडून टाकलेले असते. काय होणार अशा परिस्थितीत तिचे? ती हरिणी सुरक्षित राहू शकेल का? ती आपल्या बाळाला जन्म देऊ शकेल का? जन्म दिलाच तरी तिचे बाळ सुरक्षित राहू शकेल का? की, हे सारेच जंगलात लागलेल्या आगीच्या मोठ्या वणव्यात पडून भस्मसात होणार आहे? कोण वाचविणार तिला या संकटातून? अर्थात या संकटातून वाचल्यावरदेखील तो शिकारी तिला जगू देणार आहे

का?

ध्येयावरील अविचलता

क्षणोक्षणी, काळ हरिणीच्या जवळ येत होता. म्हणजे हरिणीच्या एका बाजूला जंगलातील आग आहे. दुसऱ्या बाजूला वेगाने खळाळत वाहणारा पाण्याचा प्रचंड मोठा प्रवाह आहे. तिसऱ्या बाजूला बंदूकधारी शिकारी आणि चौथ्या बाजूला भुकेलेला आणि चवताळलेला सिंह तिच्यावर झडप घालण्यासाठी टपून बसलेला आहे. अशा चारही बाजूंनी संकटांनी घेरलेल्या परिस्थितीचा सामना ती हरिणी कसा करू शकते? दशदिशांपैकी दोनच बाजूंनी मदत मिळण्याची शक्यता वाटते आहे ती म्हणजे आकाश आणि पृथ्वी. या परिस्थितीतदेखील ती आपल्या नवजात बालकाला जन्म द्यायचे ठरविते. त्यावरच लक्ष केंद्रित करते. कारण हेच आपले प्रथम कर्तव्य आहे याची जाणीव तिला असते. त्यानंतर घडलेल्या सर्वच गोष्टी आश्चर्यकारक आणि माणसाच्या तर्कापलीकडच्या होत्या. काय झाले असावे पुढे?

निमिषार्धात कडाडलेल्या विजेमुळे शिकाऱ्याच्या डोळ्यापुढे क्षणभर अंधेरी आली, त्याने हरिणीवर धरलेला बंदुकीचा नेम चुकला आणि त्यातील गोळी सरळ भुकेलेल्या सिंहाला लागली. आकाशातून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे जंगलात लागलेली आग हळूहळू विझायला लागली. अग्निदेवता शांत झाली. गरीब हरिणीला निसर्गदेवतेनेच केलेली मदत बघून शिकाऱ्याचे हृदयपरिवर्तन झाले. त्याला हरिणीची दया आली आणि त्याने तिची शिकार न करण्याचा निर्णय घेतला. या सर्व गदारोळातच हरिणीने एका गोंडस पाडसाला जन्म दिला.

आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा

नेमकं असंच आपल्या सर्वांच्या आयुष्यात घडत असतं नाही का? जेव्हा आपण चहूबाजूंनी संकटांनी, समस्यांनी घेरले जातो तेव्हा नकारात्मक विचार पूर्णपणे आपल्या मनाचा ताबा घेत असतात. बचावाची कोणतीही शक्यता आपल्या नजरेपुढे दिसत नाही. अशा वेळेस विचार करण्याची शक्तीच पूर्णपणे नष्ट होते. आता आपल्या बाबतीत सर्वकाही संपलेले आहे असे वाटते. तेव्हा या हरिणीवर बेतलेल्या प्रसंगाची आठवण करा. आपल्या मूलभूत कर्तव्यावर पूर्णपणे आपले लक्ष केंद्रित करा जसे त्या हरिणीने केले होते. संपूर्ण नकारात्मक परिस्थिती उत्पन्न झाल्यावरदेखील त्या हरिणीने आपल्या मूलभूत कर्तव्यावर म्हणजे अर्भकाला जन्म देण्यावर आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केले जे तिचे प्रथम कर्तव्य होते. बाकी जगणं वा मरणं यावर तिचं काहीही नियंत्रण नव्हतं. तिच्या हातात काहीच नव्हतं, इतकंच नाही तर घडत असणाऱ्या या गोष्टींवरची तिची कोणतीही प्रतिक्रिया तिचा आणि तिच्या नवजात पाडसाचा जीव धोक्यात टाकणारीच ठरली असती. त्याचप्रमाणे अशाप्रसंगी आपल्यादेखील आपल्या मूलभूत, प्राथमिक कर्तव्यांवरच लक्ष केंद्रित करायला हवे, नाही का? आपण स्वत:ला प्रश्न विचारायला हवा की, आपला मुख्य उद्देश काय आहे? आपले कर्तव्य काय आहे? आपण प्रामुख्याने कशावर लक्ष केंद्रित करायला हवे? आपल्या महत्त्वाकांक्षा काय आहेत? अशा संकटात सापडल्यावर आपण आपल्या निर्मात्याची, आर्ततेने आठवण करायला हवी. त्याच्यावर श्रद्धा ठेवायला हवी. जो आपल्या शरीरात, हृदयात वास करतो आणि तोच आपला खरा सहायक आणि रक्षणकर्ता आहे.

श्रमाचे मोल

आपण मुलांचे लाड जरूर करावेत. त्यांचे कौतुकही करावे; परंतु आपण जेव्हा घरात काम करतो तेव्हा त्यात त्यांचेही सहकार्य घ्यावे. त्यांना श्रमाचे मोल कळावे आणि आपल्यालाही सततच्या श्रमातून थोडी विश्रांती मिळावी हाच यामागील उद्देश असावा. मुलांना श्रमाचे मोल कळेल अशी कामे आपण त्यांच्याकडून करून घ्यायला हवीत. काम करताना घ्याव्या लागणाऱ्या कष्टांचा त्यांना अनुभव मिळावा. इतरांबरोबर काम कसे करावे, हे आपल्या मुलांना कळायला हवे. आयुष्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परिस्थितींचा उत्तमप्रकारे सामना करण्याची क्षमता मुलांमध्ये विकसित व्हायला हवी. यामुळेच मुले त्यांच्या आयुष्यात आत्मनिर्भर होतील.

उत्तम शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या विशालने एका मोठ्या कंपनीत व्यवस्थापकाच्या जागेसाठी अर्ज केला होता. त्याला मुलाखतीसाठी बोलावले गेले. आपली पहिलीच मुलाखत त्याने उत्तमप्रकारे पार केली. त्याला अंतिम मुलाखतीसाठी संचालकांकडे पाठविण्यात आले. संचालकांच्या चाणाक्ष नजरेत ही गोष्ट पटकन भरली की, उमेदवाराची गुणवत्ता अगदी माध्यमिक शाळेपासूनच उत्तम राहिलेली आहे. त्याने नैपुण्य मिळवले नाही, असे एकही वर्ष नव्हते. साहजिकच संचालकाने त्याला प्रश्न केला, "बाळा, कॉलेजात तर तुला नेहमीच शिष्यवृत्ती मिळत असणार?" त्याने विनम्रपणे 'नाही' म्हणून उत्तर दिले. संचालकांनी आश्चर्याने विचारले, "तुझे वडील कोण होते की, ज्यांनी स्वत: तुझ्या शिक्षणाचा संपूर्ण भार उचलला? तरुणाने उत्तर दिले, "मी एक वर्षाचा असतानाच माझे वडील वारले. माझ्या शिक्षणाचा सर्व भार माझ्या आईनेच उचलला."

"हो का? मग तुझी आई कोठे काम करते?" संचालकांचा प्रश्न. "माझी आई कपडे धुण्याचे काम करते." तरुणाच्या या उत्तरानंतर संचालकांनी त्या तरुणाला त्याचे हात दाखवण्याची विनंती केली. तरुणाचे हात खूपच मुलायम आणि कोमल होते. "तू कधी तुझ्या आईला कपडे धुण्यासाठी मदत केली आहेस का?" संचालकांनी विचारले.

संचालकांच्या या प्रश्नावर तरुण म्हणाला, "कधीच नाही; कारण माझ्या आईला मी सतत अभ्यासच करायला हवा असं वाटत होतं आणि माझी आई माझ्यापेक्षा कितीतरी अधिक वेगाने कपडे धूत असे." त्यानंतर संचालक तरुणाला म्हणाले, "आज घरी गेल्यावर तू तुझ्या आईचे हात स्वच्छ कर आणि येऊन मला भेट."

आईच्या परिश्रमांची जाणीव

संचालकांच्या एकूण प्रतिसादावरून तरुणाला आपल्याला ही नोकरी नक्की मिळणार असे वाटले. संचालकांनी सांगितल्याप्रमाणे त्याने आईचे हात स्वच्छ केले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, आपल्या आईच्या हातावर बरेच घट्टे पडलेले आहेत. काही ठिकाणी खोलवर जखमाही झालेल्या आहेत. त्या जखमा पाण्याने धुताना आईचे हात दु:खाने कापत होते. आयुष्यात पहिल्यांदाच विशालला तीव्रतेने जाणवले होते की, आपल्या शाळेची फी भरण्यासाठी दररोज हेच हात राबत होते. आपल्याला पदवीधर करण्यासाठी आपल्या आईने या हातावरील जखमांची किंचितही काळजी केली नव्हती.

आपलं भवितव्य उज्ज्वल व्हावं म्हणून तिने स्वत:च्या सुखांची होळी केली होती. आपल्या मुलाच्या आनंदापोटी तिने स्वत:चा देह झिजवला होता. आईचे हात स्वच्छ केल्यानंतर विशालने उरलेले सर्व कपडे स्वत:च्या हाताने धुतले. रात्री बराच वेळ आई आणि मुलगा बोलत बसले होते. खरंतर आपल्या आयुष्याचा मागोवाच ही माय-लेकरं घेत होती. दोघांचेही डोळे कधी मिटले ते त्यांना कळलेच नसणार. सकाळी उठल्यावर कृतार्थ झाल्याचे समाधान आईच्या डोळ्यांवर दिसत होते; तर विशालचे ऊर कृतज्ञतेने भरून आले होते.

लगबगीनेच विशालने संचालकाच्या खोलीत प्रवेश केला. संचालक विशालकडे निरखून बघत होते. विशाललाही आपल्या डोळ्यांतील अश्रू लपविता आले नाहीत. "काल घरी गेल्यावर तू काय केलेस आणि तुला आलेल्या अनुभवावरून तू काय शिकलास? हे मला जाणून घ्यायचे आहे." संचालक म्हणाले. त्यावर विशाल म्हणाला, "सर! मी माझ्या आईचे हात स्वच्छ पाण्याने धुतले आणि त्यानंतर तिच्या पुढे असलेले कपडे माझ्या हाताने धुऊन टाकले." त्यावर संचालक म्हणाले, "नाही! मला तुझ्या भावना समजावून घ्यायच्या आहेत. "कृपया त्या मला सांग." "त्यानंतर विशालने अतिशय नम्रपणे खालील निवेदन केले-

• आईच्या मायेचं आणि तिनं केलेल्या त्यागाचं मोल मला काल कळालं. माझ्या आईमुळंच मी आज एक यशस्वी तरुण म्हणून आपल्यापुढं उभा आहे.

• काल आईबरोबर काम केल्यामुळं, आईला मदत केल्यावर माझ्या लक्षात आलं की, एखादं काम सातत्यानं करणं किती कठीण आहे.

• कौटुंबिक नात्याची जाणीव आणि किंमतही मला कळली.

त्यावर संचालक म्हणाले, "विशाल, नेमकी हीच अपेक्षा माझी माझ्या व्यवस्थापकाकडून आहे. मला असाच व्यवस्थापक हवा आहे की, ज्याला निष्ठेने काम करणाऱ्या सहकाऱ्यांची जाणीव आहे, त्यांचे कौतुक आहे. असाच व्यवस्थापक इतरांकडून चांगले काम करून घेऊ शकतो. आम्ही तुला ही नोकरी दिली आहे."

त्यानंतर विशालने मोठ्या मेहनतीने आणि जिद्दीने काम सुरू केले. वरिष्ठांबरोबरच आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व लोकांचाही आदर मिळवला. त्याच्या कंपनीतील प्रत्येक व्यक्तीने मेहनतीने आणि संघभावनेने काम केले आणि त्यामुळेच त्याच्या कंपनीची कामगिरी उत्तम ठरली.

मुलांचे अतिलाड नकोत

आपल्या मुलांना जेव्हा आपण सतत संरक्षण देतो आणि त्यांच्या मागण्या नेहमीच पुरवीत राहतो तेव्हा त्यांच्यात 'अधिकाराची भावना' निर्माण होते. आपला नेहमीच अग्रहक्क असावा असे त्यांना वाटते आणि त्याची सवय होते. आई-वडिलांच्या प्रयत्नांची किंमत त्याला जाणवत नाही. याबाबत तो निष्काळजी बनतो. तो जेव्हा काम करू लागतो तेव्हा त्याच्यात एक अशी सुप्त भावना निर्माण होते की, आजूबाजूच्या प्रत्येक माणसाने त्याचेच ऐकावे. जेव्हा तो व्यवस्थापक होतो तेव्हा आपल्या हाताखालील लोकांच्या समस्या त्याला जाणवत नाहीत आणि त्यामुळे नेहमीच तो इतरांना दोष देतो. अशा प्रकारची माणसं, जी शाळा-कॉलेजात यशस्वी होतात; पण प्रत्यक्ष काम करताना मात्र त्यांचे यश हे तात्पुरते असते. आपण काही मिळवले असे

त्यांना वाटत नाही. असे लोक असमाधानी राहतात इतरांकडून व जीवनाकडून अधिकाधिक मिळविण्यासाठी ते भांडतात, लढत बसतात. आपण आपल्या मुलांना मोठे करताना, त्यांचे संगोपन करताना, त्यांचे अवास्तव लाड करून त्यांचे नुकसान तर करीत नाही ना? याची काळजी घ्यायला हवी.